CMYK

सोलापूर
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सदाफुलीसह

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | बुधवार, २५ सप्टेंबर २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ४० वे अंक ३२५ | पाने १२+८ | किंमत रु. ६/- | RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

तरुण भारत
सदाफुली
'सिकंदर' मध्ये रश्मिकानंतर आणखी एका साऊथ अभिनेत्रीची

विनम्र अभिवादन

एकात्म मानववादाचे प्रणेते, भारतीय संस्कृतीचे गाढे अभ्यासक व विचारवंत पं. दीनदयाल उपाध्याय यांची आज जयंती

महत्त्वाचे

एनआयएची तामिळनाडूत ११ ठिकाणांवर छापेमारी

नवी दिल्ली : देशात इस्लामिक सत्ता स्थापन करण्याचे दिवास्वप्न पाहणारी व निवडणूकविरोधी मोहीम राबवणारी संघटना हिज्ब-उत-तहरीरच्या तपासाचा एक भाग म्हणून राष्ट्रीय तपास संस्था अर्थात् एनआयएने मंगळवारी तामिळनाडूतील ११ ठिकाणांवर छापेमारी केली, अशी माहिती निवेदनात देण्यात आली. एनआयएच्या अधिकाऱ्यांनी चेन्नई, ताम्बाराम आणि कन्याकुमारी जिल्ह्यात ११ ठिकाणांवर छापेमारी करीत डिजिटल उपकरणांसह बेहिशेबी रोकड, हिज्ब-उत-तहरीरशी संबंधित साहित्य व इतर गुन्हेगारी साहित्य जप्त केले. विविध समाज माध्यम हॅण्डल्सच्या माध्यमातून असंतोष निर्माण करणे आणि निवडणूक यंत्रणेच्या विरोधात अपप्रचार करणे व निवडणूक प्रक्रिया गैर-इस्लामिक किंवा हराम असल्याचा प्रचार हिज्ब-उत-तहरीरने केला होता.

चकमकीत गडचिरोलीच्या रूपेशचा खात्मा

नारायणपूर : छत्तीसगडच्या नारायणपूर जिल्ह्यात सोमवारी झालेल्या चकमकीत सुरक्षा दलाने सुरक्षा दलाने तीन नक्षलवाद्यांचा खात्मा केला. त्यापैकी दोघांची ओळख पटली असून, यातील एक दंडकारण्य स्पेशल झोनल समितीचा सदस्य रूपेश हा गडचिरोलीत सक्रिय होता. रूपेशवर २५ लाख रुपयांचे बक्षीस होते, अशी माहिती बस्तर रेंजचे पोलिस महानिरीक्षक सुंदरराज पी. यांनी मंगळवारी दिली. यावर्षी छत्तीसगडमध्ये झालेल्या चकमकींत दंडकारण्य स्पेशल झोनल कमिटीच्या ठार झालेल्या सदस्यांत तो तिसरा आहे.

त्रिपुरात ५०० बंडखोरांनी पत्करली शरणागती

आगरतळा : नॅशनल लिबरेशन फ्रन्ट ऑफ त्रिपुरा (एनएलएफटी) आणि ऑल त्रिपुरा टायगर फोर्सच्या (एटीटीएफ) जवळपास ५०० बंडखोरांनी मंगळवारी शरणागती पत्करली. मुख्यमंत्री माणिक साहा यांच्यासमोर त्यांनी शस्त्रे ठेवली. बंडखोरी हे कोणत्याही समस्येचे समाधान नाही, असे माणिक साहा यांनी सिहाहिजाला जिल्ह्यातील जंपुईजाला येथे झालेल्या कार्यक्रमात बंडखोरांचे समाजाच्या मुख्य प्रवाहात स्वागत करताना सांगितले. त्रिपुरा आता बंडखोरीपासून पूर्णतः मुक्त झाल्याची घोषणा त्यांनी केली. विविध योजना राबवून केंद्र आणि राज्य सरकार येथील आदिवासींच्या सर्वांगीण विकासाच्या दिशेने प्रयत्न करीत आहे.

पंढरपुरातील दर्शन मंडप, रांगेसाठी १२९ कोटी

- मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील शिखर समितीची बैठक; राज्यातील विविध तिर्थक्षेत्रांच्या विकासासाठी ३०५ कोटींचा आराखडा मंजूर

तभा वृत्तसेवा | विशेष प्रतिनिधी
मुंबई, दि. २४ सप्टेंबर-

राज्यातील विविध तीर्थक्षेत्र विकासाच्या सुमारे ३०५ कोटी ६३ लाख रुपयांच्या आराखड्यांना आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्यस्तरीय शिखर समितीच्या बैठकीत मंजूरी देण्यात आली. यात श्री क्षेत्र पंढरपूर येथील दर्शन मंडप व दर्शन रांग या सुविधेसाठी १२९ कोटी ४९ लाख रुपयांच्या कामांचाही समावेश आहे.

'अर्थसंकल्पात तसेच वेळावेळी आश्वासित केल्याप्रमाणे आपण राज्यातील तीर्थस्थळांच्या विकासासाठी आपण भरीव निधी उपलब्ध करून देत आहे. त्याप्रमाणे या तीर्थस्थळ व पर्यटनस्थळांच्या विकासासाठी तातडीने नियोजन करण्यात यावे. यासर्वच ठिकाणची कामे दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण व्हावीत याची काळजी घ्यावी, असे निर्देशही मुख्यमंत्री शिंदे यांनी या बैठकीत दिले. क्षेत्र पंढरपूर विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसरात भाविक आणि पर्यटकांसाठी दर्शन मंडप व दर्शन रांग सुविधा उभारण्यात येणार आहे. त्यासाठी १२९ कोटी ४९ लाख रुपयांच्या आराखड्यास मान्यता देण्यात आली. भगूर (जि. नाशिक) येथील स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जीवनावर आधारित थीमपार्क साकारण्यात येणार आहे. त्यासाठीच्या चाळीस कोटी रुपयांच्या प्रस्तावास तसेच पहिल्या टप्प्यातील १५ कोटी रुपयांच्या तरतुदीस मान्यता देण्यात आली. अमळनेर (जि. जळगांव)येथील देशातील एकमेद्वितीय अशा मंगळग्रह देवस्थानाच्या २५ कोटींच्या विकास आराखड्यास मान्यता देण्यात आली. सातारा जिल्ह्यातील कोयना जलाशय-मौजे मुनावळे येथील जलक्रीडा पर्यटन सुविधा (ता. जावळी, जि.सातारा) साठी ४७ कोटी रुपयांच्या अतिरिक्त मागणीस मान्यता देण्यात आली. हे सर्व प्रस्ताव पर्यटन विभागाने सादर केले

(उर्वरित वृत्त पान ३ वर)

सावरकरांच्या जीवनावर आधारीत थीमपार्क

भगूर हे स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचे जन्मस्थान आहे. याठिकाणी त्यांचा जीवनपट उलगडवून दाखवणारे स्मारक थीम पार्क रुपात साकारण्यात येणार आहे. सावरकर यांच्या निवासस्थानाच्या जवळच दोन हेक्टरवर हे थीमपार्क साकारण्यात येईल. याठिकाणी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जीवनाचे, संघर्षाचे दर्शन घडवणारे कथाकथन, ऑडिओ-व्हिज्युअल्स, स्वातंत्र्यलढ्यासाठी जीवन समर्पित करण्याच्या त्यांच्या शपथेपासूनचा संपूर्ण जीवन प्रवास तसेच स्वातंत्र्यवीरांचे लेखन, इतर क्रांतीकारकांच्या भेटी, पन्नास वर्षांची शिक्षा, अंदमान तुरुंगातील वास्तव्य हे संग्रहालयाच्या माध्यमातून सादर केले जाणार आहे.

पंढरपुरात भाविकांसाठी प्रशस्त दर्शन मंडप, स्कायवॉकसह दर्शन रांग

पंढरपूरच्या श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी नेहमीच भाविक येत असतात. आषाढी आणि कार्तिक वारीसाठी लाखो वारकरी आणि भाविक पर्यटक पंढरुपरात येतात. त्यांच्यासाठी अद्ययावत असा दर्शन मंडप उभारण्यात येणार आहे. सुमारे १६ हजार चौरस मीटरच्या या मंडपात पहिल्या व दुसऱ्या मजल्यावर सहा हजार भाविकांची सोय करण्यात येईल. या सर्वांना वेळेनिहाय टोकन पद्धतीने प्रवेश देण्यात येईल. याशिवाय त्यांना स्कायवॉक पद्धतीच्या एक किलोमीटरची दर्शन रांगही असेल. या मंडप आणि दर्शन रांगेमुळे भाविकांना सुरक्षित, सुसह्य आणि सोयी-सुविधांनी युक्त अशी दर्शनाची सोय उपलब्ध होणार आहे. स्कायवॉक असल्याने स्थानिकांना दर्शन रांगेचा त्रास होणार नाही. तसेच भाविकांचा दर्शनासाठी लागणार वेळ कमी होणार आहे. मंडप आणि रांगेत पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, लिफ्ट, वैद्यकीय सुविधा उपलब्ध असणार आहेत. अन्नछत्राच्या माध्यमातून जेवण उपलब्ध करून दिले जाणार आहे. याठिकाणी भाविकाना कमीत कमी वेळेत दर्शन व्हावे यासाठी टोकन पद्धतीने प्रवेश दिला जाणार आहे. निश्चित केलेल्या वेळेतच त्यांना मंडप व रांगेत प्रवेश दिल्याने गर्दीचेही नियंत्रण होणार आहे. याशिवाय यात दिव्यांग व ज्येष्ठ नागरिक, मातांसाठी स्वतंत्र व्यवस्था केली जाणार आहे.

सकल मराठातर्फे उद्या सोलापूर बंदची हाक

आरक्षणाची मागणी; शहर-जिल्ह्यात राहणार बंद

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २४ सप्टेंबर -

सकल मराठा समाजातर्फे मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी संघर्ष योद्धा जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ गुरुवार दि. २६ सप्टेंबर २०२४ रोजी सोलापूर शहर व जिल्हा बंदची हाक देण्यात आली आहे, अशी माहिती माऊली पवार यांनी पत्रकार परिषदेत दिली.

गेल्या आठ वर्षापासून मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मराठा समाज बांधवांचे आंदोलन सुरू आहे. ५० टक्केच्या आत ओबीसी मधून आरक्षण मिळावे या मागणीसाठी संघर्ष योद्धा जरांगे पाटील यांचे गेल्या आठ दिवसापासून उपोषण सुरू आहे. परंतु शासनाने त्याची दखल घेतली नाही. शासनाकडून विशेषता: सत्ताधारी पक्षाकडून मराठा व ओबीसी यांच्यात भांडणे लावून जातीय दंगली घडविण्याचे कारस्थान करण्यात येत असल्याचा आरोप पवार यांनी केला आहे. शासनाला जाग आणण्यासाठी सकल मराठा समाजाच्या वतीने सोलापूर शहर व जिल्हा बंदची हाक देण्यात आली आहे. शासन मराठा समाजाने न मागितलेले दहा टक्के आरक्षण देऊन समाजाची बोळवण करीत आहे. ते समाजाला मुळीच मान्य नाही. या पत्रकार परिषदेस राजन जाधव, विनोद भोसले , महादेव गवळी, विलास लोकरे, ज्ञानेश्वर सपाटे, प्रकाश ननवरे, शिवाजी चापले आदी उपस्थित होते.

अत्यावश्यक सेवा सोडून शाळा व आस्थापना बंद

या सोलापूर शहर - जिल्हा बंदच्या दरम्यान सर्व प्रकारच्या अत्यावश्यक सेवा सुरू राहणार आहेत तर शाळा- महाविद्यालय तसेच सर्व प्रकारच्या आस्थापना ,दुकाने बंद करण्यात यावे, असे आवाहन माऊली पवार यांनी केले आहे.

थेट तहसीलदारांचीच खुर्ची पेटवली

- मराठा आंदोलकांचा संयम सुटला
- संभाजीनगरातील घटना

तभा वृत्तसेवा,
छत्रपती संभाजीनगर, २४ सप्टेंबर -

मराठा आंदोलकांनी आरक्षणाच्या मागणीसाठी थेट तहसीलदारांची खुर्ची पेटवून दिल्याची घटना छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील फुलंब्री तालुक्यात घडली आहे. या घटनेमुळे शांततेत आंदोलन करणाऱ्या मराठा आंदोलकांचा संयम आता सुटत चालला असल्याचे चित्र आहे.

जरांगे यांनी मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आंतरवाली सराटीत बेमुदत उपोषण सुरू केले आहे. त्यांच्या आंदोलनाचा आजचा ८ वा दिवस आहे. पण सरकारने अद्याप त्याची दखल घेतली नाही. यामुळे मराठा आंदोलक चांगलेच आक्रमक झालेत. या आंदोलकांनी मंगळवारी सकाळी फुलंब्री तहसील कार्यालयात येऊन जोरदार नारेबाजी केली. त्यानंतर तहसीलदारांच्या दालनातून त्यांची खुर्ची बाहेर आणून ती पेट्रोल टाकून पेटवून दिली. जरांगे यांच्या उपोषणाची दखल घेण्यासाठी आंदोलकांनी हे कृत्य केले. तसेच भविष्यात याहून अधिक तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही दिला. मंगेश साबळे नामक तरुणाच्या नेतृत्वात हे आंदोलन करण्यात आले.

जाफ्राबादेतही आंदोलनं

जालना जिल्ह्यातील जाफ्राबाद येथेही मराठा आंदोलकांनी सरकारचा प्रतिकात्मक पुतळा जाळून सरकारच्या भूमिकेचा निषेध केला. या प्रकरणी पोलिसांनी आंदोलकांना ताब्यात घेतले होते. त्यानंतर सायंकाळी त्यांची सुटका करण्यात आली.

माजी मंत्री ढोबळे व 'दयानंद'चे सचिव चोप्रांचा पीएचडी निकाल स्थगित

- विद्यापीठ अधिसभा बैठकीत निर्णय : खेळाडूंचे ब्लेझर व वकीलांच्या नेमणुकाचांही विषय गाजला

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २४ सप्टेंबर-

माजी शिक्षण मंत्री लक्ष्मण ढोबळे व दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव महेश चोप्रा यांनी नुकतीच पीएचडी कोर्स वर्क पेट ८ची परीक्षा दिली होती. बेकायदेशीर कागदपत्रे व परीक्षेचे नियम डावलून त्यांनी परीक्षा दिल्याने चौकशी समितीचा निर्णय होईपर्यंत त्यांचा निकाल स्थगित ठेवण्याचा निर्णय पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या अधिसभा बैठकीत घेण्यात आला.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
सोलापूर विद्यापीठ

खेळाडूंना ब्लेझर देण्याचा व तत्कालीन कुलगुरुंच्या काळातील बाहेरील वकिलांच्या नियुक्तीच्या समितीच्या अहवालाचाही विषयही गाजला. विद्यापीठाची अधिसभा बैठक विद्यापीठाच्या सभागृहात मंगळवारी झाली. अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर होते. यावेळी प्र. कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा, कुलसचिव योगीनी घारे उपस्थित होते. ढोबळे व चोप्रा यांच्यासंदर्भातील तक्रार अधिसभा सदस्य गणेश डोंगरे यांनी केली होती. तसेच प्रश्नोत्तराच्या तासाच्या वेळीही त्यांनी हा मुद्दा उपस्थित केला होता. डॉ. महानवर यांनी चौकशी समिती नेमली असल्याचे यावेळी सभागृहास सांगितले. प्रश्नोत्तरातच्या तासावेळी परिक्षेचा फॉर्म भरताना दिव्यांग तपशीलामध्ये शासकीय रूग्णालयाऐवजी खाजगी रुग्णालायाचे प्रमाणपत्र जोडले तर एकाने प्रमाणपत्र जोडले नसल्याची त्यांची तक्रार होती. त्यावेळेस वित्त व लेखा अधिकारी डॉ. श्रीकांत अंधारे यांच्याकडून समाधानकारक उत्तर न मिळाल्याने हा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार समितीच्या निर्णय होईपर्यंत दोघांचा निकाल स्थगित करण्यात आल्याचे प्र. कुलगुरू डॉ. दामा यांनी जाहीर केले.

(उर्वरित वृत्त पान २ वर)

तुळजाभवानी देवीची मंचकी निद्रा सुरु

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २४ सप्टेंबर-

- ३ ऑक्टोबरला घटस्थापना
- १३ ऑक्टोबरला सिमोल्लंघन

महाराष्ट्राची कुलस्वामिनी तुळजाभवानी देवीच्या शारदीय नवरात्र महोत्सवास ३ ऑक्टोबरपासून घटस्थापनेने प्रारंभ होणार आहे. त्यापूर्वी देवीच्या मंचकी निद्रेस मंगळवारी प्रारंभ झाला.

सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास देवीचे शेजघर पलंगे कुंटुबियांनी तयार केले. साडेसहा वाजल्यानंतर देविजींना भाविकांचे दही, दूध पंचामृत अभिषेक करण्यात आला. देविजींची मूर्ती स्वच्छ करण्यात आली. नंतर वाघे कुटुंबियांनी दिलेली हळद (भंडारा) देविजींना लावण्यात आली. देविजींची मूळ मुख्य मुर्ती भोपे पुजारी यांनी शेजघरात आणून चांदीच्या पलंगावर निद्रीस्त केली. यावेळी धुपारती करण्यात आली. प्रक्षाळपूजा होवून देविजींच्या शारदीय नवरात्रोत्सवापूर्वीच्या मंचकी निद्रेस आरंभ करण्यात आला. महंत, भोपे पुजारी, सेवेकरी, विश्वस्त, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. देविंजींना मंचकी निद्रा कालावधीत देविजींना सुगंधी तेल अभिषेक सकाळी व सायंकाळी घालण्यात येणार आहेत. नऊ दिवसांची देवीची मंचकी निद्रा संपल्यानंतर ३ ऑक्टोबर रोजी तुळजाभवानी देवीची सिंहासनावर प्रतिष्ठापना केली जाणार आहे.

'स्वातंत्र्यवीर सावरकर' चित्रपटाचा ऑस्कर प्रवेश



मुंबई, २४ सप्टेंबर

ऑस्कर अॅवॉर्ड २०२४ मध्ये 'लापता लेडीज'नंतर आता स्वातंत्र्यवीर सावरकर चित्रपटाचा अधिकृत प्रवेश झाला आहे. ऑस्करच्या शर्यतीत प्रवेश करणारा हा दुसरा भारतीय चित्रपट आहे. २२ मार्च रोजी हा चित्रपट प्रदर्शित झाला होता.

यात रणदीप हुड्डाने 'स्वातंत्र्यवीर सावरकर' यांची भूमिका अतिशय प्रभावीपणे साकारली होती. चित्रपट निर्मात्यांनी एक पोस्ट शेअर करून ही आनंदाची बातमी चाहत्यांना दिली. 'स्वातंत्र्यवीर सावरकर'ला अधिकृतरीत्या ऑस्करसाठी पाठविण्यात आले आहे. चित्रपटाचे पोस्टर आणि क्लॅपबोर्डसोबत रणदीप हुड्डा, संदीपसिंह आणि चित्रपटाचे निर्माते आनंद पंडित यांचा एक फोटो शेअर करून माहिती दिली.

अधिकृत घोषणेनंतर आनंद

पोस्ट शेअर करीत निर्मात्यांनी लिहिले, 'सन्मानित आणि विनम्रता! आमचा चित्रपट स्वातंत्र्यवीर सावरकरला अधिकृतपणे ऑस्करसाठी प्रवेश देण्यात आला. उल्लेखनीय प्रशंसेसाठी फिल्म फेडरेशन ऑफ इंडियाचे धन्यवाद. हा प्रवास अविश्वसनीय आहे. आम्ही त्या सर्वांसाठी खूप आभारी आहोत, ज्यांनी आम्हाला पाठिंबा दिला.' ही पोस्ट पाहिल्यानंतर चाहत्यांना आनंद झाला आहे. सर्व लोक चित्रपट निर्माते आणि रणदीप हुड्डाला शुभेच्छा देत आहेत. या चित्रपटात रणदीप हुड्डासोबत अंकिता लोखंडेही मुख्य भूमिकेत दिसली होती.

राज्यात सर्वत्र जोरदार पावसाची हजेरी

मुंबई : प्रदीर्घ कालावधीनंतर राज्यात पुन्हा एकदा मुसळधार पावसाला सुरुवात झाली. राज्यातील अनेक भागांत परतीच्या पावसाने हजेरी लावली. मुंबई, पुणे, ठाण्यासह कोकणाला पावसाने झोडपून काढले. मराठवाडा, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रातील बहुतांश जिल्ह्यांत जोरदार पाऊस झाला. हवामान विभागाच्या माहितीनुसार, कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात येत्या ७२ तासांत जोरदार पावसाची हजेरी राहणार आहे. उत्तर महाराष्ट्रातही विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

जम्मू-काश्मीर विधानसभेच्या दुसऱ्या टप्प्याचे आज मतदान

नवी दिल्ली, २४ सप्टेंबर

जम्मू-काश्मीर विधानसभेच्या दुसऱ्या टप्प्यात २६ मतदारसंघात बुधवार मतदान होणार आहे.

काश्मीर खोऱ्यातील श्रीनगर, बडगाम आणि गंडेरबाल जिल्ह्यातील १५ तर, जम्मू भागातील पुंछ, रियासी आणि राजौरी जिल्ह्यातील ११ विधानसभा मतदारसंघांचा यात समावेश आहे. २६ मतदारसंघांत २३९ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहे. जम्मू-काश्मीर विधानसभेच्या पहिल्या टप्प्यात १८ सप्टेंबरला २४ मतदारसंघांत विक्रमी ६१.३८ टक्के मतदान झाले होते. विशेष म्हणजे, पहिल्या टप्प्यात देशाच्या विविध भागात राहत असलेल्या ३५ हजार काश्मिरी पंडितांनी मतदान केले होते. तिसऱ्या टप्प्यात विधानसभेच्या ४० मतदारसंघांत १ ऑक्टोबरला मतदान होणार आहे. २५ लाख ७८ हजार मतदार उद्या ३,५०२ मतदान केंद्रांतून मताधिकार बजावणार आहेत. मतदान शांततेत आणि सुरळीत पार पडावे म्हणून कडेकोट सुरक्षा व्यवस्था करण्यात आली आहे.

माजी मुख्यमंत्री आणि नॅशनल कॉन्फरन्सचे नेते उमर अब्दुल्ला तसेच जम्मू-काश्मीर प्रदेश भाजपाचे अध्यक्ष रवींद्र रैना यांच्यासह अनेक उमेदवारांचे भाग्य उद्या ईव्हीएममध्ये बंद होणार आहे.

युक्रेन संघर्ष सोडविण्यासाठी शक्य तितके योगदान

- झेलेन्स्कींसोबतच्या चर्चेत पंतप्रधान मोदी यांची ग्वाही

न्यूयॉर्क, २४ सप्टेंबर-

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी युक्रेन संघर्षावर तीव्र चिंता व्यक्त केली आणि युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांच्यासोबत झालेल्या बैठकीत त्यांनी हा संघर्ष सोडवण्यासाठी शक्य तितके योगदान दिले जाईल, अशी ग्वाही दिली. परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांनी याबाबतची माहिती दिली.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेच्या पृष्ठभूमीवर नरेंद्र मोदी यांनी झेलेन्स्की यांच्यासोबत द्विपक्षीय चर्चा केली. ही बैठक झेलेन्स्की यांनी केलेल्या विनंतीनुसार पार पडली, असे मिस्त्री यांनी सांगितले.

संवाद आणि मुत्सद्देगिरीच्या माध्यमातून शांततेचा मार्ग निघावा, अशी आमची भूमिका असून, ती नवीन नाही. आपण ही भूमिका स्वीकारणे स्वाभाविक आहे. मला असे वाटते की, झेलेन्स्की यांच्याशी मोदी यांची ही भेट एका अर्थाने या प्रयत्नाची बांधिलकी प्रतिबिंबित करते. कारण, केवळ मनुष्यहानीच नव्हे, जागतिक पातळीवर होणारी प्रभाव त्यांनी जाणला आहे. विशेषतः याचा जागतिक दक्षिणेवर मोठा परिणाम होणार आहे, असे मिस्त्री यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.

मंदिरांचे सरकारीकरण नको, सामाजिकीकरण व्हावे

- विहिंपचे संयुक्त महामंत्री डॉ. सुरेंद्र जैन यांचे प्रतिपादन

नवी दिल्ली, २४ सप्टेंबर

तिरुपती मंदिरातील प्रसादाला गंभीर स्वरूपात अपवित्र करण्यात आल्याच्या प्रकाराने विश्व हिंदू परिषद मनातून अतिशय व्यथित असून. मंदिरांचे सरकारीकरण नव्हे तर, सामाजिकीकरण करण्याची गरज निर्माण झाली आहे, असे प्रतिपादन विहिंपचे संयुक्त महामंत्री डॉ. सुरेंद्र जैन यांनी केले.

डॉ. सुरेंद्र जैन यांनी एका पत्रपरिषदेत ही भावना व्यक्त केली. ते म्हणाले की, या दुर्दैवी प्रकाराची उच्चस्तरीय न्यायालयीन चौकशी करून दोषींना कठोर शिक्षा व्हायला हवी. सोबतच भाविकांना सहभागी करून अशी व्यवस्था सुनिश्चित करायला हवी, ज्यात कोणत्याही प्रकारच्या कटकारस्थानांची शक्यता उरणार नाही. बालाजी मंदिरातील प्रसादाची पवित्रता हिंदूंच्या आस्थेशी निगडीत आहे. तेथील प्रकाराने संपूर्ण देशातील हिंदू समाज संतप्त आहे आणि हिंदूंचा हा संताप वेगवेगळ्या रूपात व्यक्त होत आहे. तिरुपती मंदिराचे संचालक आंध्रप्रदेश सरकारद्वारे केले जाते. तेथे प्रसादाबाबतच गैरप्रकार झाला नाही, तर भाविकांकडून मिळणाऱ्या देणगीचा राजकीय नेत्यांद्वारे दुरुपयोग केला जात असल्याच्या बातम्या समोर येत असतात. बरेचदा हिंदू धर्मावर आघात करीत धर्मांतरण करणाऱ्या संस्थांना येथील रक्कम देणगी म्हणून देण्यात आल्याची माहिती उघडकीस आली होती. अशा प्रकारची माहिती तामिळनाडू, केरळ आणि कर्नाटकातूनही समोर आली आहे.

हे सर्व प्रकार पाहता देशातील हिंदूंना आता वाटत आहे की, आपल्या मंदिरांना सरकारी नियंत्रणातून मुक्त केले पाहिजे. असे झाल्याशिवाय मंदिरांची पवित्रता पुनर्स्थापित होणार नाही, असेही डॉ. जैन म्हणाले.

तातडीने पाहिजेत

सोलापूर, पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यासह महाराष्ट्रातील लोकप्रिय दैनिक सोलापूर तरुण भारतमध्ये तातडीने खालील पदांची भरती करावयाची आहे.

१) डेस्क उपसंपादक	२ पदे
२) बातमीदार	४ पदे
३) डिटीपी ऑपरेटर	२ पदे
३) मार्केटिंग प्रतिनिधी	४ पदे

किमान तीन वर्ष कामाचा अनुभव आवश्यक आहे. संगणकावर स्वतंत्रपणे काम करता येणे आवश्यक आहे. आकर्षक पगार. इच्छुकांनी ७ दिवसांत अर्जासह कार्यालयात समक्ष भेटावे.

संपर्क: ९८८११९१४४३

पत्ता- १९/२०, दैनिक तरुण भारत कार्यालय, होटगी रोड, सोलापूर.

संक्षिप्त वृत्त

प्रबुद्ध, संकल्प संस्थेच्या वतीने गुणवंतांचा सत्कार व उद्योजकता मेळावा

नातेपुते, दि. २४ सप्टेंबर-

नातेपुते येथे प्रबुद्ध मागासवर्गीय बहुउद्देशीय संस्था नातेपुते व संकल्प बहुउद्देशीय संस्था गुरसाळे यांच्या संयुक्त विद्यमाने उद्योजकता मेळावा व तांत्रिक प्रशिक्षण कार्यक्रम (अनु. जातीसाठी) पार पडला. कार्यक्रमासाठी सोलापूर जिल्हा उद्योग केंद्राचे उद्योग निरीक्षण तुषार लुकंड, मिटकॉनचे प्रमुख ट्रेनर चंद्रकांत लोंढे, राष्ट्रीय संत आखाडा परिषदेचे मोहनानंद महाराज, माजी उपजिल्हाधिकारी अण्णासाहेब समिंदर, माजी वैद्यकीय अधिकारी डॉ.पांडुरंग नलवडे, प्रबुद्ध बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष माणिक देठे, सचिव सुनील साळवे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी विश्वजीत अरूण आवळे यांना एमबीबीएसला प्रवेश मिळाल्याबद्दल तसेच सायली अरविंद सोनवणे हिस ज्यु इंजिनिअर जि.प. पुणे येथे नियुक्ती झाल्याबद्दल व सौरभ किसनराव ढोबळे यांना जि.प. सोलापूर येथे नियुक्ती झाल्याबद्दल संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आले. कार्यक्रमासाठी दोन्ही संस्थांचे पदाधिकारी महिला प्रशिक्षणार्थी हजर होते. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष राहूल भोसले, खजिनदार युवराज वाघमारे जेष्ट संचालक पांडुरंग सोरटे गुरूजी, संचालक शिवाजी साळे, संचालीका लक्ष्मी देठे, ललिता वाघमारे, योजना निकळजे, सुजाता भोसले, अकबर तांबोळी, संतोष कांबळे, विशाल झेंडे उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रकाश साळवे यांनी केले. प्रस्ताविक विलास भोसले केले आभार प्रवीण वाघमारे यांनी मानले.

परशुराम आर्थिक विकास महामंडळाची स्थापना केल्याबद्दल पंढरपुरात साखर वाटणार

पंढरपूर,दि.२४ सप्टेंबर -

महाराष्ट्र राज्य महायुती सरकारने ब्राह्मण समाजासाठी स्वतंत्र अशा परशुराम आर्थिक विकास महामंडळाची स्थापना केलेली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून ब्राह्मण समाजाकडून स्वतंत्र महामंडळ स्थापन करण्याची मागणी केली जात होती त्यास अखेर भाजप, शिंदे शिवसेना व अजित पवार यांची राष्ट्रवादी यांच्या महायुती सरकारमुळे मुर्हुत लागलेला आहे या महामंडळाच्या माध्यमातून गोरगरीबांना आर्थिक अडचणीतून बाहेर पडण्यासाठी व स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी कर्ज मिळणार आहे सदरच्या निर्णयामुळे पंढरपुरात साखर वाटून आनंद साजरा करणार असल्याची माहिती कण्व शाखेचे माजी शहराध्यक्ष दत्तात्रय बडवे- शिंदे यांनी दिली. दरम्यान राज्यपाल नियुक्त विधानपरिषदेवर ब्राह्मण समाजातील एका व्यक्तीस संधी देण्यात यावी व पंढरपूरच्या श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर समितीमध्ये एक ब्राह्मण प्रतिनिधीला संधी द्यावी या बरोबरच संत तुकाराम महाराज यांच्या वंशजाप्रमाणे संत एकनाथ महाराज यांच्या वंशजाला संधी द्यावी. अशी मागणी बडवे शिंदे यांनी केली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्या सोलापूर विमानतळाचे उद्घाटन

सोलापूर, दि. २४ सप्टेंबर-

सोलापूर-मुंबई उड्डाणाला उशीर झाल्यामुळे नागरी विमान वाहतूक मंत्रालयाने पुणे-सोलापूर विमानसेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. उद्या पंतप्रधान नरेंद्र मोदी गुरुवारी, दि. २६ सप्टेंबर रोजी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सोलापूर विमानतळाचे उद्घाटन करणार आहेत. अधिकाऱ्यांनी याबाबत माहिती दिली. उद्घाटनानंतर काही दिवसांतच सोलापूरहून पुणे आणि मुंबईसाठी विमानसेवा सुरू होईल, असेही ते म्हणाले. सोलापूर-मुंबई सेवा सुरू करण्यापूर्वी पुणे-सोलापूर विमानसेवा सुरू करण्याचा निर्णय नागरी विमान वाहतूक मंत्रालयाने घेतला आहे. ही सेवा कंपनी 'प्लाय९१' द्वारे प्रदान केली जाईल आणि व्हायबिलिटी गॅप फंडिंग (VGF) योजनेअंतर्गत सुरू होईल. विमान कंपनीचे आर्थिक नुकसान झाल्यास राज्य सरकार त्यांना नुकसान भरपाई देईल, केवळ ४० मिनिटात सोलापूर मधून पुण्याला जाता येणार आहे. असे अधिकाऱ्यांनी सांगितले. गेल्या आठवड्यात केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी सोलापूर विमानतळाच्या प्रगतीचा आढावा घेतला. त्यांनी सोशल मिडियावर सांगितले की, सोलापूर विमानतळाचे काम अंतिम टप्प्यात आहे आणि या प्रकल्पासंदर्भात नवी दिल्ली येथे आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीत विमानतळाच्या बांधकामाच्या अंतिम टप्प्यातील विविध मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. यावेळी कामाची स्थिती आणि तांत्रिक बाबींचाही आढावा घेण्यात आला, असेही ते म्हणाले.

...अखेर १६ व्या दिवशी उपोषण स्थगित

उपोषणकर्ते संभाजी नगरच्या दिशेने जाणार

- सत्ताधारी, विरोधकांवर समाजाचा ठपका
- विशाल कोकरेच्या हस्ते लिंबू पाणी घेऊन उपोषण स्थगित

तभा वृत्तसेवा,
पंढरपूर, दि. २४ सप्टेंबर-

धनगर एसटी आरक्षण अंमलबजावणीसाठी पंढरपूर येथे मागील सोळा दिवसापासून सुरू असलेले आमरण उपोषण अखेर समाजाच्या अग्रहास्तव स्वर्गीय बि के कोकरे यांचे सुपुत्र विशाल कोकरे यांच्या हस्ते लिंबू पाणी घेऊन स्थगित करण्यात आले.

धनगर समाजाच्या एसटी आरक्षणाच्या अंमलबजावणीसाठी पंढरपूर येथील टिळक स्मारक मैदानावर मागील सोळा दिवसापासून माऊली हळणवर, दीपक बोराडे गणेश केसकर ,योगेश धरम यशवंत गायके आणि विजय तमनर हे आमरण उपोषणास बसले होते. पालकमंत्री चंद्रकांत पाटील, मंत्री शंभूराज देसाई व विभागीय आयुक्त यांनी भेट देऊन सात दिवसात मागण्या मान्य केल्या जातील तुम्ही उपोषण स्थगित करा अशी विनंती केली होती परंतु जोपर्यंत मागण्या मान्य होत नाही तोपर्यंत उपोषण स्थगित करणार नसल्याचा निर्धार त्यांनी केला होता.

धनगरांनो फक्त धनगरांनाच मतदान करा

सत्ताधारी पक्षानी आमची चेष्टा केली तर विरोधी पक्षाने दखल ही घेतली नाही त्यामुळे प्रस्थापित हे आमच्या उपोषणकर्त्यांची दखल घेण्यासाठी आले नाहीत त्यामुळे धनगर समाजातून नाराजी पसरले आहे त्यामुळे यापुढे येणाऱ्या निवडणुकांमध्ये धनगर समाजातील मतदारांनी फक्त धनगर समाजातील उमेदवारालाच मतदान करावे असे आवाहन उपोषणकर्त्यांनी केले. यावेळी राज्यभरातून आलेल्या धनगर समाज बांधवांनी उपोषणकर्त्यांना उपोषण मागे घ्या आपण मरून आरक्षण घेण्यापेक्षा लढून घेऊ असे हात वर करून टाहो फोडून आवाहन केले त्यामुळे समाजाच्या आग्रहास्तव उपोषण स्थगित करण्यात आले.

जिथे अस्त तिथून सुरुवात

१९९० धनगर समाजाचे क्रांतीसुर्य स्व.बी के कोकरे यांनी एसटी आरक्षण अंमलबजावणीसाठी धनगर समाजात जागृती केली परंतु प्रस्थापितांनी या दैवताचा राजकीय अस्त केला त्यामुळे ज्या पांडुरंगाच्या नगरीत ज्यांनी अस्त केला त्याच पंढरीतून आम्ही नव्याने सुरुवात करीत आहोत आणि या प्रस्थापितांना मातीत गाढणार आहोत.त्यामुळे स्व.बि के कोकरे यांच्या मुलाच्या हस्ते लिंबू पाणी घेऊन उपोषण स्थगीत करीत आहोत.

दुसरीकडे राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील खिल्लारे कुटुंबाचे खाडाखोड करून मिळविलेले जात प्रमाणपत्र रद्द करण्याचे लेखी निर्देश जात पडताळणीला विभागाला दिले असले तरी तेथील अधिकारी हे मुख्यमंत्र्यांचाही आदेश डावलत असल्याने आम्ही आज पंढरीच्या पांडुरंगाचे दर्शन घेऊन छत्रपती संभाजीनगर येथील जात पडताळणी विभागाच्या कार्यालयावर मोर्चा घेऊन निघणार असल्याचे उपोषणकर्ते माऊली हळणवर,दिपक बोराडे यांनी सांगितले.

मंद्रुपच्या शिबिरात ७५६ दिव्यांगाची तपासणी

दिव्यागांना घरपोच प्रमाणपत्र मिळणार

तभा वृतसेवा,
मंद्रुप, दि.२५ सप्टेंबर -

पंचायत समिती व आरोग्य विभाग यांच्या समन्वयामुळे शिबिराचे नियोजन उत्तम झाली होती. वरुणराजांनीही विश्रांती घेतल्याने मंद्रुपमध्ये ७५६ दिव्यांगाची तपासणी करण्यात आली. चांगल्या नियोजनामुळे दिव्यांगांची सोईस्कर तपासणी झाल्यानंतर त्यांना अल्पोपहार व स्वच्छ पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. दिव्यांगांकडून गटविकास अधिकारी बाळासाहेब वाघ व वैद्यकीय अधीक्षक डॉ. अशोक राठोड यांचे कौतुक करण्यात येत आहे.

जिल्हा परीषद प्रशासन आयोजित जिल्हा सामान्य रूग्णालय , जिल्हा दिव्यांग फुनर्वसन केंद्र व डॉ. वैश्यपायन स्मृती शासकीय महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग व्यक्ती अस्मिता अभियानांतर्गत मंद्रुप येथील ग्रामीण रूग्णालयात आयोजित विशेष नोंदणी व तपासणी मोहीमेत ७५६ दिव्यांगांची ऑनलाईन प्रमाणपत्र व वैश्विक ओळखपत्रासाठी तपासणी करण्यात आली . आमदार सुभाष देशमुख यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी गटविकास अधिकारी बाळासाहेब वाघ, वैद्यकीय अधीक्षक डॉ. अशोक राठोड, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. निलीमा घोगरे, गटशिक्षण अधिकारी मल्हारी बनसोडे, शिबिरप्रमुख अभिजीत राऊत , माजी सभापती दादा कोरे, सरपंच अनिता कोरे, उपसरपंच भगवान व्हनमाने , ग्रामविकास अधिकारी सोमण्णा पुजारी आदि उपस्थित होते.

दिव्यांग व्यक्ती अस्मिता अभियानांतर्गत मंद्रुप परीसरातील ३० गावातील दिव्यांगांची ऑनलाईन नोंदणी करून तपासणी करण्यात आली. शिबिरामध्ये दिव्यांग तपासणी होऊन UDID कार्ड व रेल्वे सुट स्मार्ट कार्ड साठी पात्र दिव्यांग संख्या अंध व अल्पदृष्टी -८१, श्रवणदोष व कर्णबधिर - १०९, बौद्धिक दिव्यांगता -१९७, अस्थिव्यंग - २१८, वैद्यकीयदृष्ट्या व्यंग - ९२

बालरोगतज्ञ- ५९ असे एकूण - ७५६ दिव्यांग ऑनलाईन तपासणी करण्यात आली असुन त्यांना घरपोच प्रमाणपत्र देण्यात येणार आहे . यावेळी ग्रामपंचायत सदस्य शिवपुत्र जोडमोटे, सुरेश टेळे, विस्तार अधिकारी सचिन चव्हाण, डॉ. हिना बागवान डॉ. मिताली रेडी डॉ. वर्णमाला गावडे, माणिक कदम , मेहमूद सुभेदार आदिंनी शिबिर यशस्वीसाठी परीश्रम घेतले.

मंदिर समितीच्या लेखा अधिकारीपदी मुकेश अनेचा

तभा वृत्तसेवा,
पंढरपूर,दि.२४ सप्टेंबर-

येथील विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समितीच्या लेखा अधिकारी पदी शासनाने प्रतिनियुक्तीवर मुकेश अनेचा यांची नियुक्ती केली असल्याची माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

सोमवारी (ता.२३) लेखा अधिकारी पदाचा पदभार श्री. अनेचा यांनी स्विकारला आहे. यावेळी मंदिर समितीचे सदस्य संभाजी शिंदे यांच्या हस्ते श्री.अनेचा यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी विभाग प्रमुख पृथ्वीराज राऊत, विनोद पाटील, ज्ञानेश्वर कुलकर्णी, पांडुरंग बुरांडे, राजेंद्र सुभेदार, अतुल बक्षी, दादा नलवडे व इतर कर्मचारी उपस्थित होते. अनेचा हे यापूर्वी जलजीवन मिशन गोंदिया येथे कार्यरत होते.

मंदिर समितीच्या आस्थापनेवर उपजिल्हाधिकारी संवर्गातून कार्यकारी अधिकारी, नायब तहसिलदार संवर्गातून व्यवस्थापक तसेच वित्त व लेखा सेवा मार्फत लेखा अधिकारी ही शासन प्रतिनियुक्तीवरील पदे आहेत.

आजपासून शासकीय चित्रकला ग्रेड परीक्षेस सुरुवात

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २४ सप्टेंबर-

शासकीय रेखाकला ग्रेड परीक्षेला बुधवारपासून (दि. २५) सुरवात होणार असुन राज्यात ११९६ केंद्रातून ही परीक्षा होत आहे. यामध्ये एलिमेंट्री ग्रेड व इंटरमिजिएट ग्रेड अशा दोन चित्रकला परीक्षा होणार आहेत.

या दोन्ही परीक्षा मिळून महाराष्ट्रातून७लाख५०हजार९३५ विद्यार्थी परीक्षा देणार आहेत तर सोलापूर शहर व जिल्ह्यातून ५० केंद्रातून २३ हजार ४१० विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. दरवर्षी महाराष्ट्र राज्य कला मंडळ, मार्फत या दोन्ही ग्रेड परीक्षा घेण्यात येतात. चालू वर्षी २५ व २६ सप्टेंबर रोजी एलिमेंट्री ग्रेड परीक्षा तर २७ व २८ सप्टेंबरला इंटरमिजिएट ग्रेड परीक्षा घेण्यात येणार आहेत. या परीक्षेसाठी इयत्ता ७ वी ते१० वी चे विद्यार्थी प्रविष्ट होतात. सदर परीक्षेसाठी स्थिरचित्र, स्मरण चित्र, संकल्पचित्र (नक्षीकाम), कर्तव्य भूमिती, अक्षरलेखन व घन भूमिती या ४ विषयाचा स्वतंत्र अभ्यासक्रम असतो. हा अभ्यासक्रम तीन महिन्यात पूर्ण करावा लागतो. सोलापूर जिल्ह्यातून सर्वाधिक १३६६ विद्यार्थी केंद्र क्रमांक १०९०१४ सांगोला विद्यामंदिर, सांगोला व ग्रामीण भागातून १००७ विद्यार्थी केंद्र क्रमांक १०९०३५ कै. शाहाजीराव पाटील विद्यालय व ज्युनियर कॉलेज नरखेड (ता. मोहोळ) या ठिकाणी तर सोलापूर शहरातून ६३७ विद्यार्थी केंद्र क्रमांक १०९०३२ संभाजीराव शिंदे प्रशाला विडी घरकुल या ठिकाणी तर ५३४ विद्यार्थी केंद्र क्रमांक १०९०४२जागृती विद्यामंदिर नेहरूनगर येथून बसलेले आहेत. या परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना दहावीच्या बोर्ड परीक्षेत सवलतीचे गुण दिले जातात. यामध्ये ए श्रेणीला सात गुण, बी श्रेणीला पाच गुण व सी श्रेणीला तीन गुण असे सवलतीचे गुण दिले जातात. तसेच उत्तीर्ण विद्यार्थ्यांना आयटीआय , सायन्स कॉलेज, डिप्लोमा, इंजीनियरिंग, कृषी डिप्लोमा या ठिकाणी प्रवेश घेतेवेळी प्रथम प्राधान्य दिले जाते, अशी माहिती राज्य शैक्षणिक कलाशिक्षक संघाचे सहसचिव शांतप्पा काळे यांनी दिली.

कोतवालांची वेतन निश्चिती करा, चतुर्थ श्रेणीचा दर्जा द्या

आ. समाधान आवताडे यांनी महसूल मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांना दिले पत्र

तभा वृत्तसेवा,
पंढरपूर, दि. २४ सप्टेंबर-

राज्याच्या महसूल विभागातील कोतवालांना वेतन श्रेणी निश्चित करून शासकीय सेवेमध्ये चतुर्थ श्रेणी कर्मचारी म्हणून सामावून घेण्यात यावे, या मागणीसाठी राज्याचे महसूल मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांची मंत्रालयीन दालनात भेट घेऊन संबंधित मागणीचे त्यांना पत्र दिल्याची माहिती आ. समाधान आवताडे यांनी दिली.

आ. आवताडे यांनी सांगितले की, राज्यातील कोतवाल शासकीय कामास बांधिल राहून कर्तव्य व जबाबदाऱ्या प्रामाणिकपणे पार पाडत आहेत. राज्यातील लोकसंख्या ठिकाणी कोतवाल हे सज्जा मुख्यालय सोडून जिल्हाधिकारी कार्यालय, उपविभागीय कार्यालय, तहसील कार्यालय या ठिकाणी वर्ग ३ व वर्ग ४ या पदावरील कर्मचाऱ्यांची कामे वरिष्ठांच्या लेखी व तोंडी आदेशानुसार करत आहेत. कोतवाल हे पद महसूल विभागातील गाव पातळीवर शेवटचे महत्त्वाचे पद आहे. निवडणुका व विविध शासकीय योजना सामान्य जनतेपर्यंत पोहोचवण्यात त्यांची महत्त्वपूर्ण भूमिका आहे.

गाव पातळीवरील विविध शासकीय व निमशासकीय कर्तव्याशी बांधिल राहून लोककेंद्रीत विविध योजनांच्या विस्तारासाठी कोतवाल हा महत्त्वपूर्ण समन्वयक समजला जातो. कोतवाल बांधवांच्या भविष्याचा विचार करून त्यांना या पदावर नेमणूक द्यावी अशी मागणी केल्याचे पत्रामध्ये नमूद केल्याचे आ. आवताडे यांनी सांगितले. यावेळी ज्येष्ठ पत्रकार अबुक सुतार, संबंधित प्रशासकीय विभागातील अधिकारी आणि पदाधिकारी उपस्थित होते.

माजी मंत्री ढोबळे व दयानंदचे सचिव चोप्रा...

पान १ वरुन...

तसेच कागदपत्राची पडताळणी न करता परिक्षेस बसण्यास परवानगी दिली त्या संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी यावेळी करणत आली.

सोलापूर : प्राचार्य डॉ. कैलास कारंडे व प्राचार्य डॉ. धीरजकुमार बाड यांची अधिसभा सदस्यपदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल त्यांचा कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांनी सत्कार केला. यावेळी प्र. कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा.

खेळाडूंच्या ब्लेझरप्रकरणाची चौकशी

खेळाडूंना ब्लेझर देताना भेदभाव केल्याचा मुद्दा अधिसभा सदस्य ए. बी. संगवे यांनी उपस्थित केला होता. विद्यापीठाच्या राज्य स्पर्धेपेक्षा पश्चिम विभागीय स्पर्धेचा दर्जा अव्वल असतानाही या खेळाडूंना क्रीडा दिन कार्यक्रमात सन्मान चिन्ह दिले नाही. या विषयावरही क्रीडा विभागाकडून समाधानकारक उत्तर मिळाले नाही. तसेच क्रीडा दिनी कार्यक्रमात खेळाडू, प्रशिक्षक, संघ व्यवस्थापक व विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांना ब्लेझर दिले होते. ते ब्लेझर आखूड शिवले होते. त्यामुळे या ठेकेदारावर काय कारवाई करायची यासाठी प्र. कुलगुरू लक्ष्मीकांत दामा, व्यवस्थापन परिषद सदस्य सचिन गायकवाड व अधिसभा सदस्य ए. बी. संगवे यांची समिती नेमण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच खेळाडूंना ब्लेझर तर अधिकाऱ्यांना ब्लेझर व पँट विद्यापीठाच्या खर्चातून घेण्यात आली आहे का? या प्रश्नाचेही समाधानकारक उत्तर प्रभारी क्रीडा संचालक डॉ. केदारनाथ काळवणे यांना देता आले नाही. प्रश्नोत्तराच्या तासात ४० पैकी फक्त २ विषयावर एका तास चर्चा झाली.

दप्तर दिरंगाईवर अधिसभेची नाराजी

मागील अधिसभेने जे प्रस्ताव व ठराव मंजूर केले आहेत. त्यावर कार्यवाही काय झाली याचा अहवाल पुढील अधिसभेत ठेवण्यात येतो. ते विषय पुढील अधिसभा होईपर्यंत व्यवस्थापन परिदेसमोर येत नाहीत. या दप्तर दिरंगाईवर अधिसभा सदस्य सचिन गायकवाड, चनबसप्पा बंकुर यांनी नाराजी व्यक्त केली. तसेच संबंधित विभागावर कुलगुरु, प्र. कुलगुरू व कुलसचिव यांचे अंकुश नसल्याची तक्रार त्यांनी केली. प्राध्यापकांच्या (कॅस) पदोन्नतीसंदर्भात केंद्रीय पद्धतीने प्रक्रिया राबविण्याऐवजी महाविद्यालयीन स्तरावरच ही प्रक्रिया राबिवावी असे चर्चेअंती ठरले. या चर्चेत डॉ. सीमा गायकवाड, डॉ. वंदना गवळी, डॉ. जैनोद्दीन मुल्ला, डॉ. वीरभद्र दंडे यांनी भाग घेतला.

चौकशी समितीच बेकायदेशीर : ॲड. पवार

तत्कालीन कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस यांच्या कार्यकाळात विद्यापीठाच्या विविध न्याय प्रकरणात व्यवस्थापन परिषदेच्या मंजूरीशिवाय विद्यापीठाने नेमलेल्या सर्व वकिलांच्या नेमणुका, वार्षिक लेखा व महालेखाकार कार्यालय यांच्या परीक्षण अहवालावर अधिसभा सदस्य डॉ. भगवान अधटराव यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. या समितीने आपला अहवाल अधिसभेपुढे ठेवला होता. संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची समितीने शिफारस केली आहे. परंतु यातील तत्कालीन अधिकाऱ्यांची नावे वगळण्यात आली. तसेच तत्कालीन जबाबदार अधिकाऱ्यांची नावे वगळून त्यांचे पद ठेवावे अशी दुरुस्ती करून समीतीच्या या अहवालास अधिसभेने मंजुरी दिली. परंतु ही सामितीच बेकायदेशीर असल्याचे मत या समितीचे सदस्य ॲड. उषा पवार यांनी व्यक्त केले होते. परंतु त्यांचे मत डॉ. अधटराव, डॉ. बी. पी. रोंगे, राजाभाऊ सरवदे, डॉ. दंडे यांनी खोडून काढले. या चर्चेत पद्मजादेवी मोहिते-पाटील, डॉ. मुल्ला, डॉ. समाधान पवार, ॲड. मल्लिनाथ शहाबादे , ॲड. नीता मंकणी, ॲड. सुनंदा भगत, रोहिणी तडवळकर यांनीही मत व्यक्त केले. अखेर कुलगुरू प्रा. महानवर यांनी कायदेशीर सल्ला घेऊन हा अहवाल येत्या दोन महिन्यात कुलपती यांना पाठविणार असल्याचे जाहीर केले.

उज्ज्वल भविष्यकाळासाठी भूतकाळाला पूर्णविराम द्या

ब्रह्माकुमार पीयूष भाई : बार्शीतील प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयात स्नेहमिलन

तभा वृत्तसेवा,
बार्शी, दि. २४ सप्टेंबर-

ज्याप्रमाणे लेखन करताना नवीन वाक्य सुरु करण्यासाठी पूर्वीच्या वाक्यानंतर पूर्णविराम लावावा लागतो; त्याप्रमाणे उज्ज्वल भविष्यकाळासाठी भूतकाळाला पूर्णविराम देणे आवश्यक आहे, असे उद्‌गार विज्ञान व अभियंता प्रभागाचे क्षेत्रीय समन्वयक ब्रह्माकुमार पीयूष भाईजी यांनी काढले.

बार्शी येथील प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयात आयोजित स्नेहमीलन कार्यक्रमात बोलत होते. भूतकाळाला विसरा व भविष्यकाळाला बदला हा त्यांचा विषय होता. निसर्ग, पर्यावरण व आपत्ती प्रबंधन अभियानांतर्गत हा कार्यक्रम घेण्यात आला. पीयूष भाईजी पुढे म्हणाले, ईश्वराने आपणास विसरण्याची शक्तीही दिली आहे; त्याचबरोबर स्मरणात ठेवण्याची शक्तीही दिली आहे.

आपण मात्र या दोन्ही शक्तींचा चुकीचा वापर करत आहोत. जे विसरायचे ते स्मरणात ठेवत आहोत व जे स्मरणात ठेवायचे ते विसरत आहोत. यावेळी मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. ब्रह्माकुमारी भगिनींनी व अतिथींचा यथोचित सन्मान केला. पर्यावरणविषयक प्रतिज्ञांचे सामूहिक उच्चारण करण्यात आले. सुप्रिया बहनजी यांनी अभियानाचा उद्देश कथन केला. प्रज्ञाबहनजी यांनी ब्रह्माकुमारी विद्यालयाचा परिचय दिला. मीराबहेनजी यांनी स्वागतपर मनोगत व्यक्त केले.

बार्शी सेवा केंद्र संचालिका संगीता बहनजी यांनी आभार प्रदर्शन केले. ब्र. कु. अनिता बहनजी करवा यांनी सूत्रसंचालन केले.

पंढरपूर - श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर समितीचे सह-अध्यक्ष सद्गुरु गहिनीनाथ महाराज औसेकर यांना नुकताच मुंबई येथे महाराष्ट्र रत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल हैदराबाद येथील आमदार टी.राजसिंघ यांनी गहिनीनाथ महाराज औसेकर यांचा आशीर्वाद या आपल्या निवासस्थानी सत्कार करुन महाराजांचे आशीर्वाद घेतले.

करमाळ्याच्या विकासासाठी संजयमामांना आमदार करा

उपमुख्यमंत्री अजित पवार; करमाळ्यात २७१ कोटींच्या रस्ते कामांचा शुभारंभ

तभा वृत्तसेवा,
करमाळा, दि. २४ सप्टेंबर-

आमदार संजयमामा शिंदे यांना करमाळा विधानसभा मतदार संघाच्या विकास कामासाठी तीन हजार कोटी रुपयांचा निधी दिला आहे. त्यांना निवडून आणा अधिक भरगच्च निधी तालुक्याचा विकास कामासाठी देऊ, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.

जनसंवाद यात्रे प्रसंगी झरे येथील कार्यालयात ते बोलत होते. यावेळी खासदार सुनिल तटकरे, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर, करमाळा विधानसभा मतदारसंघाचे आमदार संजयमामा शिंदे, माढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार बबनराव शिंदे, उपविभागीय अधिकारी प्रियंका आंबेकर, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता सुनीता पाटील, उप अभियंता कुंडलिक उबाळे, तहसिलदार शिल्पा ठोकळे व अन्य मान्यवर उपस्थित होते.



पुढे बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, या भागातील ऊस अनेक ठिकाणी जात आहे येथील दोन कारखाने मकाई व आदिनाथ बंद पडला आहे. आमदार संजयमामा शिंदे यांना निवडून आणा या कारखान्याला योग्य ते सहकार्य भविष्यात केले जाईल. शेतकऱ्यांनी काळजी करू नका, लाडकी बहीण योजनेमध्ये महिलांनी लाभ घ्यावा. विरोधक म्हणतात ही योजना बंद पडणार पण तसे होऊ देणार नाही. लाडकी बहीण योजनेची रक्कम वेळेतच तुमच्या खात्यावर पडेल. यावेळी एकात्मिक पर्यटन विकास आराखडा व प्रशासकीय इमारतीचे भूमिपूजन तर रस्ते कामांचा शुभारंभ राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आला.

सोलापूर जिल्हा हा पर्यटनासाठी खूप महत्त्वाचा जिल्हा आहे. पर्यटनाच्या माध्यमातून स्थानिक स्तरावर पर्यटन पूरक उद्योग वाढवून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती शक्य आहे. यामुळे जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेला वेग येईल तसेच येथून होणारे स्थलांतर ही थांबण्यास मदत होणार आहे. उजनी जल पर्यटन १९० कोटी १९ लाख, कृषी पर्यटन १९ कोटी ३० लाख, विनयार्ड पर्यटन ४८ कोटी २६ लाख, धार्मिक पर्यटन २५ कोटी असा एकूण २८२.७५ कोटीचा जिल्ह्याचा एकात्मिक पर्यटन विकास आराखड्या अंतर्गत विविध विकास कामांचे भूमिपूजन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते आज करमाळा येथे करण्यात आले. तसेच करमाळा शहरातील विविध उपविभागीय कार्यालय तसेच तालुकास्तरीय कार्यालयांसाठी नवीन प्रशासकीय इमारतीची आवश्यकता होती. या इमारतीसाठी ३४ कोटी ६८ लाखाचा निधी मंजूर करण्यात आलेला असून या प्रशासकीय इमारतीच्या कामाचे भूमिपूजन ही पवार यांच्या हस्ते यावेळी करण्यात आले. त्याप्रमाणेच रस्ते विकास महामंडळ अंतर्गत हॅम सावडी जिल्हा हद तालुका करमाळा ते वेणेगाव तालुका माढा या ७१ किलोमीटर लांबीच्या रस्त्याच्या कामासाठी २७१ कोटी ५५ लाखाचा निधी मंजूर असून या रस्त्याच्या कामाचा शुभारंभ उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी करमाळा विधानसभा मतदारसंघातील असंख्य महिला गुलाबी कलरच्या फेटा घालून सभास्थळी उपस्थित होते. तसेच तालुक्यातील आजी-माजी पदाधिकारी सरपंच असंख्य उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार करमाळा दौऱ्यावर आले होते. तालुक्यातील विविध विकास कामांचे भूमिपूजन व शेतकरी मेळावा, महिला मेळावा यांना त्यांनी संबोधित केले. सकाळी ११ वाजता अजित पवार यांचे हेलिकॉप्टरने यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या प्रांगणामध्ये आगमन झाले होते. त्यानंतर श्री कमला भवानी देवी मंदिर येथे दर्शन घेऊन तेथून बाईक रॅली निघाली होती.

अक्षय शिंदेसारखेच बदलापूर प्रकरणातील इतर आरोपींचेही एन्काउंटर करा : नाना पटोले

मुंबई, दि. २४ सप्टेंबर :

बदलापूर प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याचे पोलीसांनी एन्काउंटर केले, याप्रकरणात आरोपीचे कोणीही समर्थन केलेले नाही. मात्र या एन्काऊंटवर जे प्रश्न उपस्थित केले आहेत, त्याची उत्तरे सरकारने दिली पाहिजेत. हे सरकार पापी व खोटारडे असून स्वतःचे पाप दुसऱ्यावर ढकलत आहे. शिंदे सारखेच बदलापूर प्रकरणातील सर्व आरोपींचे एन्काऊंटर करा, विरोधक सरकारच्या पाठीशी उभे राहितील, असे आव्हान काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी मंगळवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिले. यशवंतराव चव्हाण सेंटर येथे पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले की, बदलापूरच्या त्या शाळेत लहान मुलींचे पोर्न व्हीडीओ बनवले जात होते अशी माहिती समोर आली आहे, हे अत्यंत भयावह आहे. ती शाळा एका पक्षाची असून शाळेतील कृत्ये लपवण्यासाठी व शाळेच्या संचालकांना वाचवण्याचा सरकार प्रयत्न करत आहे. साध्या पाकीटमारालाही पोलीस हातकडी बांधून घेऊन जातात मग अक्षय शिंदेला हातकड्या घातल्या नव्हत्या का? तो काय तुमचा जावई होता का? ज्या पोलिसाची रिव्हॉलव्हर अक्षय शिंदेने घेतली ती लॉक नव्हती का? बदलापूर प्रकरणातील बाकीचे आरोपी अजून का पकडले गेले नाहीत? हे प्रश्न उपस्थित होतात. जे लोक या प्रकरणात आहेत त्या सर्वांना शिंदे सारखीच शिक्षा द्या. बदलापुरातच अशी घटना घडली असे नाही तर गृहमंत्र्यांचे शहरातही अलिकडच्या काळात यापेक्षा भयानक घटना घडली आहे. राज्यात लहान मुलींवरील अत्याचारांच्या घटनांमध्येही प्रचंड वाढ झाली आहे, असेही पटोले यांनी सांगितले.

धावत्या चेन्नई एक्सप्रेसमध्ये १७ वर्षीय युवतीचा विनयभंग

मुंबई, दि.२४ सप्टेंबर-

राज्यात महिला व मुलीवरील अत्याचारांच्या घटना सुरूच आहेत. चेन्नईला जाणाऱ्या रेल्वे गाडीत १७ वर्षीय युवतीचा विनयभंग करणाऱ्या तरुणाला सीएसएमटी रेल्वे पोलिसांनी अटक केली. पीडित मुलगी गुलबर्गा शिक्षण घेत असून, मुंबईत कुटुंबीयांना भेटण्यासाठी आली होती. ती चेन्नई एक्सप्रेसने गुलबर्गा येथे जात असताना हा प्रकार घडला. याप्रकरणी विनयभंग व पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सीएसएमटी- चेन्नई एक्सप्रेसच्या ए १ डब्यातून पीडित मुलगी प्रवास करत होती. यावेळी तिचे आई-वडीलही तिला सोडण्यासाठी सीएसएमटी स्थानकावर आले होते. शनिवारी रात्री १० वाजून ५० मिनिटांनी ती रेल्वे सुटली. यावेळी मुलीची आजीही तिच्यासोबत प्रवास करत होती. त्या गुलबर्गा येथे जात होत्या. त्यावेळी एका तरूणाने तिचा विनयभंग केला. पीडित मुलीने त्याचा हात झटकला असता आरोपीने तिच्या कमरेत हात घातला. त्यामुळे ती घाबरली. तिने हा प्रकार आजीच्या कानावर घातला. पण तोपर्यंत तो तरूण तेथून निघून गेला होता. त्यावेळी पीडित मुलीच्या आजीने तो तरूण पुन्हा दिसल्यास आपल्याला कळवायला सांगितले. त्यानंतर रेल्वे कर्जत स्थानकाजवळ आली असताना आरोपी तरूण पुन्हा तिला डब्यात दिसला. तिने त्याबाबत आजीला सांगितले. त्यावेळी दोघींनीही त्या तरूणाला याबाबत जाब विचारला असता त्यांने तक्रारदार तरूणीसोबत वाद घालण्यास सुरूवात केली. त्यानंतर तिने आरडाओरडा केला असता तिकीट तपासनीस व इतर सहप्रवासी तेथे आले. त्यांनी आरोपीला ताब्यात घेतले. त्यानंतर कर्जत रेल्वे स्थानक आल्यानंतर त्याला कर्जत रेल्वे पोलिसांच्या स्वाधीन करण्या आले. त्यानंतर कर्जत व पुणे स्थानकांच्या दरम्यान रेल्वे पोलिसांनी पीडित मुलीची तक्रार नोंदवली.

पंढरपुरातील दर्शन मंडप...

पान १ वरुन

त्याबाबत सविस्तर सादरीकरण व त्यातील प्रकल्प आणि सुविधांची माहिती सादर केले. सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे झालेल्या या बैठकीस उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, मदत व पुनर्वसन मंत्री अनिल पाटील, आमदार छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले, आमदार समाधान अवताडे, आमदार श्रीमती सरोज अहिरे राज्याच्या मुख्य सचिव श्रीमती सुजाता सौनिक आदी, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे, वित्त विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, नियोजन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजगोपाल देवरा, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव ब्रिजेश सिंह, ग्रामविकास विभागाचे सचिव एकनाथ डवले, पर्यटन विभागाच्या सचिव श्रीमती जयश्री भोज, सोलापुरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद आदी उपस्थित होते. जळगांव, नाशिक आणि सातारा जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी दृकश्राव्य प्रणालीच्या माध्यमातून सहभागी झाले. ग्राम विकास विभागाने सादर केलेल्या अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर येथील संत गाडगेबाबा यांची कर्मभूमी ऋणमोचन येथील १८ कोटींच्या विकास आराखड्यास मान्यता देण्यात आली. तसेच श्री क्षेत्र गहिनीनाथगड (जि. बीड) च्या विकास आराखड्यातील २ कोटी ६७ लाखांच्या कामांस मान्यता देण्यात आली. याशिवाय मुंबईवरील २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यात अजमल कसाब या सशस्त्र दहशतवाद्यास जीवंत पकडणाऱ्या शहीद तुकाराम ओंबळे यांच्या सातारा जिल्ह्यातील केंडबे (ता. जावळी) येथील मुळगांवी स्मारक उभारण्यासाठी १५ कोटी रुपयांच्या निधीच्या तरतुदीसाठी बैठकीत मान्यता देण्यात आली. याशिवाय नगर विकास विभागाने नागपूर शहरातील आराखडे सादर केले. त्यातील लक्ष्मीनारायण शिवमंदिर- नंदनवनच्या २४ कोटी ७३ लाखांच्या विकास आराखड्यास, कुत्तेवालेबाबा मंदिर आश्रम-शांतीनगरसाठी १३ कोटी ३५ लाख रुपये आणि मुरलीधर मंदिर पारडी विकास आराखड्यासाठी १४ कोटी ३९ लाख रुपयांच्या तरतूदीस मान्यता देण्यात आली.

मुख्यमंत्र्यांचा सोलापूर दौरा तिसऱ्यांदा पुढे ढकलला

तभा,वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २४ सप्टेंबर -

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा वचनपूर्ती सोहळा सोलापुरात घेण्याची घोषणा राज्य सरकारच्या वतीने करण्यात आली होती. सोलापूरच्या होम मैदानावर हा मेळावा होणार होता. मात्र, सलग तिसऱ्यांदा हा मेळावा पुढे ढकलावा लागण्याची नामुष्की प्रशासनावर आली आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा सोलापूर दौरा पुन्हा एकदा रद्द झाला आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या वचनपूर्ती सोहळ्यासाठी मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री येत्या बुधवारी (ता. २५ सप्टेंबर) सोलापूरला येणार होते. मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या महाराष्ट्र दौऱ्यामुळे मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांचा सोलापूर दौरा पुढे ढकलण्यात आला आहे. याबाबतची माहिती प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून देण्यात आली.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा वचनपूर्ती सोहळा सोलापुरात घेण्याची घोषणा राज्य सरकारच्या वतीने करण्यात आली होती. त्याचे नियोजनही जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले होते. सोलापूरच्या होम मैदानावर हा मेळावा होणार होता. मात्र, सलग तिसऱ्यांदा हा मेळावा पुढे ढकलावा लागण्याची नामुष्की प्रशासनावर आली आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील पात्र लाभार्थींना अनुदानाचे वाटप करण्यासाठी मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री हे येत्या बुधवारी (ता. २५ सप्टेंबर) सोलापूरच्या दौऱ्यावर येणार होते. त्यांच्या दौऱ्याची संपूर्ण तयारी करण्यात आली होती. या सोहळ्यासाठी सोलापूर शहर आणि जिल्ह्यातून तब्बल ४० हजार महिलांना आणण्याचे नियोजनही प्रशासनाकडून करण्यात आले होते. या कार्यक्रमाची संपूर्ण तयारी प्रशासनाच्या वेगवेगळ्या समित्यांकडून पूर्ण करण्यात आलेली होती. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि दोन्ही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांचा दौरा रद्द झाल्याची माहिती शुक्रवारी रात्री उशिरा जिल्हा प्रशासनाकडून मिळाली, त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा सोलापूर दौरा तब्बल पाचव्यांदा पुढे ढकलण्याची नामुष्की जिल्हा प्रशासनावर आली आहे.

मुख्यमंत्र्यांचा दौऱ्याला विरोध करत त्यांचा कार्यक्रम उधळून लावण्याचा इशारा

दुसरीकडे, मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण अंतरवाली सराटी येथे सुरू आहे. त्याचे पडसाद सोलापूरमध्येही उमटले आहेत. मुख्यमंत्र्यांचा दौऱ्याला विरोध करत त्यांचा कार्यक्रम उधळून लावण्याचा इशारा सकल मराठा समाजाचे समन्वयक माऊली पवार यांनी दिले आहे. त्याला मराठा समाजातील दुसऱ्या गटाने विरोध दर्शविला आहे, त्यामुळे मुख्यमंत्र्यांच्या दौऱ्याआधी मराठा समाजाच्या नेत्यांमध्ये जुंपली आहे.

पंतप्रधान, गृहमंत्र्यांचा महाराष्ट्र दौरा

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे येत्या आठवड्यात महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येत आहेत, त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि दोन्ही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांना त्यांच्या दौऱ्यावर उपस्थित राहावे लागणार आहे.त्यामुळे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना आपल्या दौऱ्यामध्ये बदल करावा लागला. त्यातून सोलापूरमधील माझी लाडकी बहीण योजनेचा कार्यक्रमासाठी दौरा मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना पुढे ढकलावा लागला.

सोलापुरात पावसाची जोरदार बॅटींग

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २४ सप्टेंबर

शहर व जिल्ह्यात पाचच्या सुमारास पावसाने जोरदार बॅटिंगब केली. सलग तिसऱ्यादिवशी मुसळधार पाऊस कोसळला. यामुळे सोलापूर शहरात सकल भागामध्ये पाणी साठले. या मुसळधार पावसामुळे नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागला. हवामान खात्याने सलग पाच ते सहा दिवस परतीचा पावसाचा इशारा दिला आहे.

सोलापूरात परतीचा पाऊस मोठ्या प्रमाणात होतो. मंगळवारी सायंकाळी चार नंतर वातावरणांमध्ये अचानक बदल झाला. सायकांळी पाच वाजण्याच्या सुमारास ढगाळ वातावरण निर्माण होऊन जोरदार पावसाला सुरुवात झाली. जिल्ह्यातही मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याचे वृत आहे.

पावसामुळे वाहन चालक व विद्यार्थ्यांना भिजत घरी परतावे लागले. साठलेल्या पाण्यातून नागरिकांना वाट काढावी लागली.

बार्शीत चार दिवसात ६८ मि.मी. पाऊस

सुर्डी मंडळात एकाच दिवशी ६२ मि.मी.ची नोंद

तभा वृत्तसेवा,
बार्शी, दि. २४ सप्टेंबर-

बार्शी शहर तालुका यावर्षी पावसाची चांगलीच कृपादृष्टी आहे. यंदाच्या पावसाळ्यात सरासरीच्या दुप्पट पाऊस तालुक्यात पडला आहे. या पावसामुळे तालुक्यातील जवळगाव मध्यम प्रकल्प वगळता सर्व लघु,मध्यम पाटबंधारे प्रकल्प, पाझर तलाव पूर्ण क्षमतेने भरले आहेत. या प्रकल्पाच्या सांडव्याद्वारे मोठ्या प्रमाणात पाणी नदीपात्रात वाहत आहे.

सप्टेंबर महिन्यातील २४ दिवसात १७ दिवस वगळले तर उर्वरित पाच ते सहा दिवसात १५६ मिलीमीटर पाऊस पडला आहे. मागील चार दिवसात सरासरी ६८ मिमी एवढया पावसाची नोंद झाली आहे. तालुक्याची सप्टेंबर महिन्याची पावसाची सरासरी ही १७२ मिमी एवढी आहे. दि. २४ पर्यंत तालुक्यात मिमी म्हणजे सरासरीच्या ९०% एवढा पाऊस पडला आहे.

ऐन सोयाबीन काढणीत सुरु झाला पाऊस

मागील २० दिवसापूर्वी देखील ऐन उडदाची काढणी सुरु असताना हा पाऊस पडला होता. त्यामुळे शेतकऱ्यांना याचा मोठा फटका बसला. उडीद भिजल्याने दर कमी मिळाला. पावसाने उघडीप दिल्याने शेतकरी काहीसा आनंदात असतानाच नेमकी सोयाबीनची काढणी सुरु झाली आणि इकडे पाऊस सुरु झाला आहे. त्यामुळे आता पुनः हातातोंडाशी आलेला घास पुन्हा एकदा निसर्ग हिरावून घेतो की काय अशी भीती निर्माण झाली आहे.

तालुक्यातील प्रकल्प भरल्याने सीनेला पाणी

तालुक्यातील सर्व प्रकल्पातील पाणी हे सीना नदीला जाऊन मिळते. निळकंठा, नागझरी, भोगावती, राम नदी घोर ओढा या नद्यांचे पाणी माढा आणि मोहोळ तालुक्यात सीना नदीला येऊन मिळते तर चांदणी नदीचे पाणी परांडा तालुक्यात सीना नदीत मिसळते. यावर्षी दक्षिण अहमदनगर जिल्ह्यात पाऊस कमी असल्याने परांडा तालुक्यातील सीना कोळगाव प्रकल्प अद्यापही भरलेला नाही. त्यामुळे सीना नदीला आलेले सर्व पाणी बार्शी तालुक्यातील प्रकल्प भरुन नद्या वाहत असल्याचे दिसत आहे.

ठोकले अक्षय शिंदेला आणि एन्काऊंटर विरोधकांचा : शेलार

तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी
मुंबई, दि. २४ सप्टेंबर-

अक्षय शिंदेला पोलिसांनी ठोकला पण एनकाऊंटर विरोधकांचा झाला आहे. अफजल गुरुची बरशी करता तशी आता अक्षय शिंदेची पण बरसी करणार का? असा सवाल मुंबई भाजपा अध्यक्ष आमदार अँड आशिष शेलार यांनी केला

भाजपा प्रदेश कार्यालयात पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले की, त्या चिमुकलीवर झालेल्या अत्याचार बाबत, तो झाला की नाही? पोलिसांनी काही नाही केले? या सर्व गोष्टींवर प्रश्नचिन्ह उपस्थित करायचे आहे काय? याचे राजकारण करता की तो अक्षय शिंदे, गुन्हेगाराची माळ हे जपत आहात? असा थेट सवाल करीत तो लिंगपिपासू आणि हे सत्तापिपासू, अशा शब्दांत शेलार यांनी हल्लाबोल केला. पोलिसांच्या बंदुकीचा जो हात घालेल, त्याला ठोकायलाच पाहिजे. आम्ही पुर्णपणे पोलिसांच्या पाठीशी आहोत. उबाठा गट आता ज्या अधिकाऱ्यांनी आरोपीला ठोकले त्या अधिकाऱ्याला आता काय

जोडे मारो करणार काय? असा खोचक सवाल ही त्यांनी केला. महाविकास आघाडीला सवयच लागली आहे, आतंकवादी, गुन्हेगार असेल त्याला ठोकला की त्याचे फोटो घ्यायचे व गळा काढायचा. त्या गुन्हेगाराच्या विरोधात बोलताना का जीभ अडकत आहे यांची ? आदित्य ठाकरे आज ट्विट करीत आहेत. मग त्यांच्याकडे माहिती होती तर ते पोलिसांत का गेले नाहीत? त्यांनी हे कर्तव्य का नाही केले? नागरिक म्हणून चिमुकलीला न्याय मिळावा म्हणून ते पोलिसांकडे का गेले नाहीत? या असा थेट सवाल शेलार यांनी केला आहे.

अक्षयने शिव्या देत हवालदारच्या दिशेने गोळ्या झाडल्या त्यामुळे प्रत्युत्तर द्यावे लागले

एन्काऊंटर करणाऱ्या निरीक्षकांचा जबाब

तभा वृत्तसेवा । जमीर काझी
मुंबई,दि.२४ सप्टेंबर-

अक्षय शिंदेला दुसऱ्या गुन्ह्यात ताब्यात घेऊन बदलापूरकडे निघालो होतो त्यावेळी मागे व्हॅनमध्ये त्याच्या बाजूला बसलेल्या पोलिसांना शिवी दिली, त्यानंतर हवालदार तावडेंच्या दिशेने दोन गोळ्या झाडल्या. प्रकरण बिकट असल्याने स्वसंरक्षणार्थ आम्हाला प्रत्युत्तर द्यावे लागले, त्यात तो जखमी झाला आणि उपचारसाठी रुग्णालयात नेले असतानाचा मृत्यू झाला ,अशी माहिती अक्षयचा एन्काऊंटर करणाऱ्या पोलीस निरीक्षक संजय शिंदे यांनी सांगितले. बदलापूरातील बालिकांवर अत्याचार करणाऱ्या नराधम शिंदेचा सोमवारी एन्काऊंटर झाला. त्यावरून राज्यात खळबळ उडाली असून विरोधकांनी सत्ताधाऱ्यावर कडाडून टीका केली आहे.

पोलिसांनी शिंदेला तळोजा जेलमधून ताब्यात घेतल्यानंतर नेमके काय घडले, याबद्दल निरीक्षक शिंदे यांनी सविस्तर जबाब दिला आहे. ते म्हणाले, संध्याकाळी पाच वाजता त्याला घेऊन तळोजातून बदलापूरातील परिमंडळ -१ कार्यालयाकडे जात होतो. त्यावेळी सहायक पोलीस निरीक्षक निलेश मोरे, हवालदार अभिजित मोरे, हरीश तावडे होते. पोलीस व्हॅनमध्ये अक्षय शिंदे याच्यासोबत एपीआय मोरे, हवालदार अभिजीत मोरे आणि हरीश तावडे बसले होते. मी चालकाच्या शेजारी बसलो होतो. निलेश मोरेंनी फोन करून सांगितले की, अक्षय शिंदे जोरजोराने ओरडत आहे. त्यामुळे मी गाडी थांबवण्यास सांगून मागे जाऊन बसलो. माझ्या समोरच्या बाजूला निलेश मोरे, त्यांच्या शेजारी अक्षय शिंदे त्यानंतर अभिजीत मोरे बसले होते. मी अक्षयला शांत करण्याचा प्रयत्न केला. परंतु तो शिवीगाळ करत होता. आमची गाडी मुंबईतील वाय जंक्शन पुलाजवळ संध्याकाळी ६.१५ वाजता पोहचली. त्यावेळी शिंदेने मोरे यांच्या कंबरेवर असलेली पिस्तूल खेचली. आणि मला जाऊ द्या, असे ओरडला. त्यावेळी मोरे यांची पिस्तूल लोड होवून एक गोळी त्यांच्या पायाला लागली. त्यानंतर तो ओरडला, आता मी कोणाला जिवंत सोडणार नाही. मग त्याने हवालदार तावडे यांच्या दिशेने दोन गोळ्या झाडल्या. परंतु सुदैव चांगले होते, त्या गोळ्या त्यांना लागल्या नाही. त्याचे ते रुप पाहून तो आम्हाला जीवे मारणार, ही खात्री झाल्याने मी माझ्या आणि सहकाऱ्यांच्या सुरक्षेसाठी एक गोळी अक्षयच्या दिशेने चालवली. त्यानंतर तो जखमी झाला अन् खाली पडला. त्याच्या हातातून पिस्तूल खाली पडली.'

निरीक्षक शिंदे यांनी पुढे आपल्या जबाबात म्हटले की, आम्ही तातडीने कंट्रोल रूम व वरिष्ठांना हा प्रकार कळवून आम्ही शिंदे याच्यावर नियंत्रण मिळवले आणि गाडी कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाकडे वळवली. त्या ठिकाणी त्याला आणि एपीआय मोरे यांना उपचारासाठी दाखल केले. डॉक्टरांनी उपचार सुरु केले. परंतु अक्षय शिंदे याचा मृत्यू झाला होता.

एन्काऊंटर चा तपास सीआयडीकडे

नराधम अक्षय शिंदे याचा पोलिसांच्या व्हॅनमध्ये एन्काऊंटर झाल्याने राज्यात सर्वत्र खळबळ उडाली आहे .पोलिसांच्या ताब्यात एखाद्या आरोपीचा मृत्यू झाल्यास त्याचा तपास गुन्हा अन्वेषण शाखेकडून करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिलेले आहेत. त्यामुळे या प्रकरणाचा तपासही सीआयडीकडे वर्ग करण्यात आला आहे.

मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात

एन्काऊंटर झालेल्या ठिकाणी चा पंचनामा केल्यानंतर अक्षय शिंदे याचा मृतदेह शवविच्छेदनासाठी मंगळवारी सकाळी ११ च्या सुमारास जे जे रुग्णालयात नेण्यात आला. पोस्टमार्टम झाल्यावर त्याचा मृतदेह बदलापुरातील त्याच्या नातेवाईकांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. दरम्यान एन्काऊंटर झालेल्या यांची फॉरेनची तपासणी करण्यात येत असून त्याबाबतचा अहवाल आल्यानंतर घटनेबाबतची नेमकी स्पष्टता होईल.

अग्रलेख...

दूरदृष्टीचे निर्णय

महायुती सरकारच्या मंत्रिमंडळाने २३ सप्टेंबर २०२४ रोजी झालेल्या बैठकीत आगामी निवडणुकांवर डोळा ठेवून अनेक निर्णय घेतल्याची टीका होण्याची शक्यता असली, तरी त्यातील अनेक निर्णय हे दूरदृष्टीचे आणि त्यामुळेच राज्याच्या व राज्यातील जनतेच्या भल्याचे आहेत. मंत्रिमंडळाची बैठक आणि त्यातील निर्णय हा तसा निरंतर चालणारा प्रकार आहे. कोणत्या तरी टप्प्यावर त्यातील औपचारिकतेचा भाग बाजूला ठेवून काही ठोस निर्णय घेणे गरजेचे असते. ती दूरदृष्टी महायुती सरकारने दाखविली. महायुती सरकारच्या कार्यकाळातील सर्वांत महत्त्वाचा निर्णय म्हणून ब्राह्मण समाजाच्या विकासासाठी भगवान परशुराम आर्थिक विकास महामंडळाच्या स्थापनेच्या निर्णयाकडे पाहिले पाहिजे. राजकीय, सामाजिक व आर्थिक फायद्यांसाठी सर्व समाज, समुदाय आपापले घोडे पुढे रेटत असताना अल्पसंख्यक असलेला ब्राह्मण समाज नेहमीच शांत असतो. या समाजाला कोणतीही सवलत नाही, आरक्षण नाही. इतर समाजांप्रमाणे ब्राह्मण समाजातही गरीब, दरिद्री लोक आहेत. त्यांना दिलासा देण्यात सरकारला अनेक अडचणी होत्या. त्या या निर्णयाद्वारे दूर झाल्या आहेत. मात्र, महामंडळाला पुरेसे आर्थिक व राजकीय पाठबळ देणे आणि त्याच्या माध्यमातून ब्राह्मण समाजातील गरजू व गरीब घटकांचे उत्थान साधणे हे आव्हानात्मक काम असून तेथे जाती-पातींच्या पारंपरिक चष्म्यातून न पाहता काम करणारे लोक असले पाहिजेत. महायुतीच्या मंत्रिमंडळाचा दुसरा महत्त्वाचा निर्णय म्हणजे सरपंच, उपसरपंच यांच्या मानधनात केलेली भरीव वाढ. सरपंच आणि उपसरपंचांचे मानधन आता दुप्पट होईल. ते पुरेसे आहे की नाही, हा वादाचा मुद्दा आहे. मात्र, त्यांना मिळणाऱ्या मानधनात सन्मानजनक वाढ करण्याचा निर्णय सरकारने घेतला, हेही नसे थोडके. महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण-२०२४ याच बैठकीत मंजूर झाले. २०१० सालातील सांस्कृतिक धोरणाचा फेरविचार केल्यावर हे नवे धोरण तयार करण्यात आले आहे. महाराष्ट्राची ओळख सशक्त सांस्कृतिक केंद्र म्हणून निर्माण करणे, महाराष्ट्राचा समृद्ध वारसा आणि कलेची जपणूक करून जागतिक पातळीवर राज्याचे सांस्कृतिक महत्त्व अधोरेखित करणे हा या धोरणामागील हेतू आहे. ऐतिहासिक स्थळे, कला संग्रहालये आणि साहित्य यासारख्या सांस्कृतिक संपत्तीचे संरक्षण आणि संवर्धन करणे, विविध प्रकारांच्या उपक्रमांमध्ये स्थानिक समुदाय आणि कलाकारांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करणे, सांस्कृतिक वारसा व परंपरांबद्दल लोकांमध्ये जागरूकता निर्माण करून उपक्रम राबविणे, सांस्कृतिक कार्यक्रमांना आर्थिक पाठबळ देण्यासाठी वित्तीय योजना तयार करणे, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सांस्कृतिक वारसा आणि कला यांचे संरक्षण आणि संवर्धनासाठी उपाययोजना करणे, सांस्कृतिक धोरणांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संशोधन व विकासास प्रोत्साहन देणे, पायाभूत सांस्कृतिक सुविधा निर्माण करणे, सामाजिक एकता वाढीसाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे, सांस्कृतिक क्षेत्राची आर्थिक मूल्यवृद्धी धोरणे निश्चित करणे, सांस्कृतिक क्षेत्रातील पायाभूत सुविधा आणि वारसा संवर्धन यासाठी गुंतवणूक आकर्षित करणे अशी अनेक उद्दिष्टे या धोरणाच्या माध्यमातून निश्चित करण्यात आली आहेत. याशिवाय, पुण्याच्या लोहगाव विमानतळाला जगद्‌गुरू संत तुकाराम महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ असे नाव देण्यासाठी केंद्राकडे शिफारस करणे, बालगृहे निरीक्षणगृहातील कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजना व शिक्षकांना वरिष्ठ श्रेणी, प्रतिक्विंटल ४० रुपये अतिरिक्त भरडाई दर देऊन धान उत्पादकांना दिलासा देणे, शिरूर ते छत्रपती संभाजीनगर या १४ हजार ८८६ कोटींच्या ग्रीन फिल्ड द्रुतगती मार्गास मंजुरी, करदात्यांचे हित लक्षात घेऊन जीएसटी अधिनियमात सुधारणा करणे, जळगाव आणि यवतमाळ जिल्ह्यातील सूत गिरण्यांना सहाय्य देणे, ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी पदांचे एकत्रीकरण करून 'ग्रामपंचायत अधिकारी' पद निर्माण करणे, हरित हायड्रोजन धोरणात अँकर युनिटची पारदर्शकपणे निवड करण्याचा निर्णय, एसटी महामंडळाच्या जमिनी बीओटी तत्त्वावर विकसित करण्याचा निर्णय, राजपूत समाजासाठी वीर शिरोमणी महाराणा प्रताप आर्थिक विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूर येथील विधि विद्यापीठांना सात कोटी रुपये देण्याचा निर्णय, गायीच्या दुधासाठी लिटरमागे उत्पादकांना सात रुपयांचे अनुदान, कुणबी समाजाच्या तीन जातींचा इतर मागासवर्ग यादीत समावेश करणे, सारथी, महाज्योतीच्या विद्यार्थ्यांना नोंदणीपासून संपूर्ण अधिछात्रवृत्ती देणे, अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना शासकीय सेवेत थेट नियुक्तीसाठी सहज पदे उपलब्ध होतील, यासाठी धोरणात सुधारणा करणे यासह इतर अनेक निर्णयही या बैठकीत घेतले गेले. या सर्व निर्णयांकडे राजकारणाच्या पलीकडे पाहिले तर त्यामागील कल्याणकारी भावना लक्षात येईल. सरकार चालविण्याची संधी राजकारणातूनच मिळते. त्यामुळे राजकीय नफा-तोटा लक्षात ठेवावाच लागतो. या नियमाला कोणत्याही पक्षाचे सरकार किंवा कोणताही पक्ष अपवाद असू शकत नाही. मात्र, काही निर्णय पक्षातीत आणि राजकीय फायद्या-तोट्याच्या पलीकडे विचार करून घ्यावे लागतात. ब्राह्मण समाजासाठी भगवान परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय हा त्यातीलच एक निर्णय आहे. महाराष्ट्रात ब्राह्मण समाजाकडे पाहण्याची एक विकृत दृष्टी गेली अनेक दशके अस्तित्वात आहे. या महामंडळाच्या निर्मितीच्या संदर्भातही त्या विकृतीला धरून टीका होऊ शकते. हा समाज कोणत्याही टीकाटिप्पणीचे उत्तर देत नाही. निषेधसुद्धा क्वचित करणारा हा समाज आहे. मात्र, एक प्रकारचे नैराश्य या समाजात आहे, हे नाकारता येत नाही. त्यावर काही ना काही फुंकर घालण्याचा मार्ग म्हणून भगवान परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन केले जात असेल तर त्याकडे समाजाच्या आणखी एका कमकुवत घटकाच्या उत्थानासाठी केला जात असलेला प्रयत्न म्हणून पाहिले पाहिजे. सरकारतर्फे एखादा निर्णय घेतला जातो तेव्हा त्यावर बरेच मंथन झालेले असते. त्या निर्णयाचे सामाजिक, राजकीय आणि विशेषतः आर्थिक परिणाम अग्रीमात विचारात घेतले जातात. महायुतीचे सरकार तीन पक्षांचे असले तरी त्यात अनुभवी लोक आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दीर्घ अनुभव आहे. उपमुख्यमंत्रिद्वय देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार हे दोघेही अनुभवी आहेत. त्यामुळे राजकीय दृष्टिकोनातून घ्यावयाचे निर्णय आणि राज्याच्या हितासाठी घ्यावयाचे निर्णय यांच्यातील सीमारेषा कशी राखायची, हे या सर्वांना आणि मंत्रिमंडळातील त्यांच्या सहकाऱ्यांनादेखील कळते. सरपंच, उपसरपंच हा आपल्या बहुस्तरीय स्थानिक स्वराज्य संस्था प्रणालीतील सर्वांत खालचा स्तर. गावाच्या पातळीवरचा. त्यांना आपल्या कामाचे समाधान मिळेल, अशा पद्धतीने मानधन दिले पाहिजे, असे राज्य सरकारला वाटले आणि त्यांनी तसा निर्णय घेतला, हे कौतुकास्पदच म्हटले पाहिजे. २३ सप्टेंबरच्या बैठकीतील अनेक निर्णय चांगले आहेत, कल्याणकारी आहेत. लोकशाहीत मतभेद असणे, ते व्यक्त होणे, टीका होणे यात काहीही वावगे नाही. सर्वांनी या निर्णयांचे स्वागत करावे, अशीही अपेक्षा करण्यात अर्थ नाही. मंत्रिमंडळाने मंजुरी दिल्यानंतर खेरीज त्यातील निर्णयांची प्रत्यक्ष अंमलबजावणी व्हायला बराच मोठा काळ लागत असतो. त्यापूर्वी विधिमंडळाच्या अधिवेशनांदरम्यान यातल्या अनेक विषयांवर चर्चा होईल. कुठेतरी सुरुवात करावी लागते. ती महायुती सरकारने या निर्णयांच्या माध्यमातून केली आहे. यानिमित्ताने काही अपेक्षा व्यक्त केल्या पाहिजेत. त्या अशा की, शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रासाठी या सरकारने आता काही दिशादर्शक निर्णय घेतले पाहिजेत. तशी सुरुवात तरी करून ठेवली पाहिजे. समाजाच्या निकडीचे असे हे दोन विषय आहेत. या दोन्ही क्षेत्रांचा फायदा घेणारे लोक प्रत्येक घरी आहेत. शिक्षण क्षेत्राची अवस्था चांगली नाही. सरकारी शाळांमध्ये विद्यार्थी नाहीत. ते असले तर मास्तर नाहीत. खाजगी शाळा, कोचिंग क्लासेसचे स्तोम माजलेले आहे. सरकारी दवाखान्यांची स्थिती वाईट आहे. ग्रामीण भागात तर सरकारी शाळा आणि दवाखाने यांचा एकुणात आनंदच आहे. त्यांच्यासाठी काही क्रांतिकारी निर्णय आता या सरकारने घेतले पाहिजेत; जेणेकरून भविष्यात ही क्षेत्रे दुरुस्त होतील आणि लोकांकडून वसूल केलेल्या करातून दिल्या जाणाऱ्या सोयींचा अधिकाधिक लोकसंख्येला लाभ होऊ शकेल. ▮▮

चिंतन

गुरुदत्त दिनकर वाकदेकर

चला स्व-गणना करू!

ई-मार्केट, ई-ॲप्लिकेशन, रेल्वे आणि बसमध्ये आरक्षण आणि ई-पेमेंटनंतर आता ई-सेन्सेस अर्थात जनगणनेचीही देशात सुरुवात होणार आहे. यामध्ये जन्म आणि मृत्यू दोन्ही डिजिटल जनगणनेशी जोडले जातील. डिजिटल जनगणना प्रत्येक जन्मानंतर आपोआप अद्ययावत केली जाईल आणि जेव्हा एखाद्याचा मृत्यू होईल तेव्हा त्याचे नाव डेटामधून आपोआप हटवले जाईल. बालकाचा जन्म, आई-वडील, जात आणि जन्म ठिकाण यासह ३१ प्रश्नांची उत्तरे जनगणना नोंदवहीत नोंदवली जातील. मूल १८ वर्षांचे झाल्यावर त्याचे नाव आपोआप निवडणूक आयोगाकडे जाईल. त्यामुळे त्याचे मतदार ओळखपत्र बनविण्यासोबतच त्याचे नाव मतदार यादीत आपोआप नोंदले जाईल. अशाप्रकारे जनगणना डेटा नेहमी आपोआप अद्ययावत केला जाईल.

राष्ट्रीय लोकसंख्या निबंधक (एनपीआर) प्रक्रियेसाठी सुमारे १२ हजार कोटी रुपये खर्च येणार आहे. १ फेब्रुवारी २०२१ रोजी अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी डिजिटल जनगणनेची घोषणा केली होती. जनगणना-२०२१ मध्ये, नागरिकांना जनगणनेमध्ये सहभागी होण्यासाठी एक चांगली आणि अनोखी ऑनलाईन सुविधा देण्यात आली आहे. जनगणना (सुधारणा)-२०२२ नुसार, पारंपरिकपणे सरकारी कर्मचारी घरोघरी जाऊन जनगणना करतीलच; परंतु आता नागरिकही स्व-गणनेद्वारे माहिती भरू शकतात. यासाठी पूर्वीच्या नियमांमध्ये 'इलेक्ट्रॉनिक फॉर्म' हा शब्द जोडण्यात आला आहे. या अंतर्गत तयार केलेली, पाठवलेली किंवा माध्यमात साठवलेली माहिती, चुंबकीय, संगणकाद्वारे तयार केलेली मायक्रोचिप किंवा इतर तत्सम उपकरण इलेक्ट्रॉनिक स्वरूपात दिलेली माहिती मानली जाईल. म्हणजेच तुमची नोंदणी ॲण्ड्रॉईड मोबाईलवरूनही केली जाऊ शकते. लक्षात ठेवा, ही जनगणना २०२१ मध्ये होणार होती, परंतु कोरोना महामारीमुळे ते शक्य झाले नाही. आता ही ऑनलाईन मोजणी पुढे नेण्यासाठी पुढाकार घेतला जात आहे; जेणेकरून भारतीय नागरिकांची मोजणी लवकर करता येईल. जर हा प्रयोग यशस्वी झाला तर २०३१ ची प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाईन होण्याची शक्यता आहे. ऑनलाईन वापर अद्वितीय आहे, यात शंका नाही. परंतु देशातील जनतेची कायमस्वरूपी आणि सतत गतिमान नोंदणी पाहता आता जनगणनेची जबाबदारी ग्रामपंचायत स्तरावर सोपविणे गरजेचे आहे.

गणनेच्या विकेंद्रीकरणाची ही कल्पकता १० वर्षीय जनगणनेच्या जटिल परंपरेपासून मुक्त करेल. त्याचवेळी देशाला प्रत्येक महिन्याला प्रत्येक पंचायत स्तरावरून जीवन आणि मृत्यूच्या मोजणीची अचूक आणि विश्वासार्ह आकडेवारी मिळत राहील. जनगणनेच्या या पद्धतीचा अवलंब करणेदेखील आवश्यक आहे. कारण वेगवान यांत्रिक आणि संगणकीकृत जीवनात, सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक बदल घडवून आणण्यासाठी लोकसंख्येच्या सर्वमान्य आकार आणि संरचनेसाठी १० वर्षे वाट पाहू शकत नाही? भारतीय समाजात होत असलेल्या जलद लिंग, रोजगार आणि राहणीमानातील बदलांशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करायचा असेल तर आपण जनगणना परंपरेत आमूलाग्र बदल घडवून आणणे आवश्यक आहे. जर लोकसंख्येच्या आकार, लिंग आणि वयानुसार त्याच्या जटिल रचनेची माहिती नसेल, तर सामान्यतः अर्थव्यवस्थेच्या विकासात कालांतराने प्रगती, उत्पन्नात वाढ, अन्नपदार्थांची उपलब्धता आणि पिण्याचे पाणी, घरे, वाहतूक, दळणवळण, रोजगार संसाधने, शिक्षण, आरोग्य आणि सुरक्षा उपायांमध्ये पुरेशा वाढीचा अंदाज लावणे कठीण आहे. लोकसंख्येच्या वाढीच्या प्रमाणात सीमांकनाद्वारे लोकसभा आणि विधानसभेच्या जागा वाढवल्या जातात. जनगणनेतील सातत्यही महत्त्वाचे आहे. कारण देश आणि जगामध्ये लोकसंख्या वाढ स्फोटक असल्याचे म्हटले जाते. पृथ्वीवरील मानवी समुदायांची लोकसंख्या १९ व्या शतकात इतकी झपाट्याने वाढली आहे की, ती यापूर्वी कधीही नोंदली गेली नव्हती. लोकसंख्या वाढीचा अंदाज घेणाऱ्या तज्ज्ञांच्या मते भारतातील लोकसंख्या दरवर्षी १ कोटी ६० लाखांनी वाढते. या दरानुसार, आपल्याला आपल्या देशातील सुमारे १ अब्ज ४० कोटी लोकसंख्येची एका निश्चित स्वरूपात मोजणी करावी लागेल; जेणेकरून लोक आणि संसाधनांच्या संख्येच्या बरोबरीने आर्थिक आणि रोजगाराभिमुख विकासाची ब्लू प्रिंट तयार करता येईल. वैज्ञानिक पद्धतीने केलेल्या अचूक जनगणनेचा हा आकडा म्हणजे अज्ञात भविष्यातील विकासाच्या परीक्षेवर पात्र ठरण्यासाठी केलेला एक प्रामाणिक प्रयत्न आहे. दर १० वर्षांनी होणाऱ्या जनगणनेत सुमारे २० लाख कर्मचारी सहभागी होतात. सहा लाख गावे, पाच हजार शहरे, शेकडो शहरे आणि डझनभर महानगरांतील रहिवाशांचे घरोघरी जाऊन जनगणना करणे कर्मचाऱ्यांना अवघड आहे. कर्मचाऱ्यांची एक टीम त्यांच्या स्थानिक दैनंदिन कामातून काढून दूरच्या गावात पाठवल्यास हे काम अधिक बोजड बनते. अशा परिस्थितीत, मोजणीच्या घाईत, ते मानवी समूह सोडले जातात जे उपजीविकेसाठी त्यांच्या मूळ निवासस्थानापासून स्थलांतर करतात. त्यामुळे जनगणना प्रक्रियेचे सध्याचे स्वरूप असे बदलणे आवश्यक आहे की, तिच्या मोजणीत सातत्य राहील. केवळ मोजणीची केंद्रिकृत जटिल प्रणाली विकेंद्रित करून सोपी करावी लागेल.

मोजणीची ही पद्धत वरपासून सुरू होणार नाही तर तळापासून सुरू होईल. ग्रामपंचायत देशातील सर्वात छोटे राजकीय आणि प्रशासकीय एकक आहे. आपल्याला फक्त पंचायत कार्यालयात लोकसंख्येची नोंद तीन प्रतींमध्ये ठेवायची आहे. या नोंदवहीची प्रत संगणकात साठवलेल्या लोकसंख्येच्या नमुन्यातदेखील टाकली पाहिजे. कुटुंबाचा एक घटक म्हणून विचार करून सरपंच, सचिव आणि पटवारी यांना या नोंदींमध्ये कुटुंबातील प्रत्येक सदस्याचे नाव आणि इतर माहिती लोकसंख्येच्या नमुन्यानुसार टाकण्याची जबाबदारी देण्यात यावी. गावात कोणत्याही मुलाचा जन्म झाला किंवा कोणत्याही व्यक्तीचा मृत्यू झाल्याची माहिती लगेचच गावभर पसरते, त्यामुळे विनाविलंब नोंदवहीमध्ये ही माहिती नोंदविता येते. ग्रामपंचायतीमध्ये संकलित केलेली ही माहिती दर महिन्याच्या ठरावीक तारखेला विकास गट स्तरावर पाठविण्यात यावी आणि रजिस्टरची प्रत विकास गट कार्यालयात ठेवावी. सर्व विकास गटांची ही माहिती जिल्हास्तरावर मागविण्यात यावी व त्याचे एकत्रीकरण केल्यानंतर ही मोजणी संगणकात नोंदविण्यात यावी. अशाप्रकारे सर्व विकास गटांची आकडेवारी मोजून दर महिन्याला जिल्ह्याची जनगणना केली जाणार आहे. देशाच्या राजधानीतील लोकसंख्या कार्यालयात राज्यस्तरावर जिल्हानिहाय जनगणनेची आकडेवारी आणि राज्याच्या लोकसंख्येची आकडेवारी संग्रहित केल्यास, देशाच्या जनगणनेची वैज्ञानिक आणि अस्सल आकडेवारी दर महिन्याला उपलब्ध होईल. शहरांमध्ये प्रभागनिहाय जनगणनेसाठी वरील मोजणी पद्धतीचा अवलंब करावा. या मोजणीत जी पारदर्शकता आणि अचूकता येईल, ती अन्य कोणत्याही पद्धतीने शक्य नाही. ▮▮

९९८७७४६७७६

वेध

गिरीश शेरेकर

रेल्वेवर जिहादी घातपाताचे संकट

ब्रिटिश काळात उदयास आलेली भारतीय रेल्वे देशभरातील सामान्य नागरिकांचे आज प्रवासाचे मुख्य साधन आहे. विस्तीर्ण भूभागावर वसलेल्या भारतात स्वातंत्र्यानंतर रेल्वेचे जाळे खऱ्या अर्थाने विणायला सुरुवात झाली. जशी लोकसंख्या वाढली, त्या आवश्यकतेनुसार रेल्वेचा विस्तार सातत्याने होत आला आहे. सामान्य जनतेला माफक दरात आरामदायी प्रवास करता यावा, यासाठी रेल्वेचे निरंतर प्रयत्न सुरू आहेत. वेगवेगळ्या सुविधा प्रवाशांना देण्यात येत आहेत. केंद्र शासनाने गेल्या १० वर्षांपासून रेल्वेचे अत्याधुनिकीकरण सुरू केले आहे. वंदे भारत नावाने अत्याधुनिक रेल्वे गाड्या प्रवाशांच्या सेवेत दाखल होत आहेत. आतापर्यंत लांब पल्ल्याच्या ५४ वंदे भारत रेल्वे सुरू झाल्या असून त्यापैकी ११ गाड्या महाराष्ट्राला देण्यात आल्या आहेत. आता तर वंदे भारत मेट्रो सुरू करण्यात आली आहे. रेल्वे स्थानके सोयी-सुविधांनी सुसज्ज होत आहेत. देशाची जीवनवाहिनी म्हणून ओळखल्या जाणारी भारतीय रेल्वे जगात चौथ्या क्रमांकावर आहे. व्यवस्था कोणती असो, त्यात अडचणी येतातच. रेल्वे त्याला अपवाद नाही. रेल्वेचे अपघात नेहमीच चिंतेचा विषय राहिला आहे. अनेक अपघात आजपर्यंत झाले. बहुतांश अपघात तांत्रिक व मानवी चुकीमुळे झाले आहेत. या अपघातांवर नियंत्रण मिळविण्यासाठी वेगवेगळे उपाय करण्यात आले. आता रेल्वेने कवच प्रणाली विकसित केली आहे. २०२७-२८ पर्यंत ३४ हजार किमी रेल्वे मार्गावर ही प्रणाली कार्यान्वित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. एकीकडे रेल्वे सक्षम होत असून दुसरीकडे जाणीवपूर्वक रेल्वेचे अपघात घडविण्याचे प्रयत्न होत आहेत. जिहादी मानसिकता जोपासणाऱ्यांचे हे कृत्य असल्याचे समोर येत आहे. अलिकडच्या काळात अनेक राज्यांत रेल्वे रुळांवर लोखंडी रॉड, बोल्डर, सिलेंडर इत्यादी काही वस्तू ठेवून घातपाताचे प्रयत्न उजेडात आले आहेत. या महिन्यातल्या उत्तरप्रदेशच्या दोन घटनांसह गेल्या दोन महिन्यांत रेल्वेचा घातपात करण्याचे २० पेक्षा जास्त प्रयत्न समोर आले आहेत. त्यामागे दहशतवाद्यांचा हात असण्याची शक्यता वर्तविली जात असतानाच केंद्र सरकारने त्याबाबत कठोर पावले उचलली आहेत. ताज्या घटनांचा तपास पोलिस, गुप्तचर यंत्रणेव्यतिरिक्त एनआयएदेखील करीत आहे. तपासातून मिळालेल्या माहितीनंतर रेल्वेने सतर्कता वाढवली आहे. गुप्तचर विभागाला इशारा दिला आहे. भारताला अस्थिर करण्याचे प्रयत्न निष्फळ ठरत असल्याने हे नवे षडयंत्र रचले जात आहे. भारतविरोधी बाह्य व अंतर्गत शक्ती या घातपातामागे आहे. हे डाव उधळले जात असले तरी मोठ्या दुर्घटना घडण्याच्या पूर्वी अशा विघातक शक्ती शोधून ठेचणे अत्यंत आवश्यक झाले आहे.

रेल्वे घातपाताचा कट देशद्रोहाच्या गुन्ह्यांतर्गत आणण्याची तयारी सरकार करीत आहे. त्यासाठी रेल्वे अधिनियमात दुरुस्ती केली जाणार आहे. याविषयीची अधिसूचना लवकरच जाहीर होण्याची शक्यता आहे. विद्यमान स्थितीत रेल्वे अधिनियम-१९८९ च्या कलम १५१ अंतर्गत रेल्वे दुर्घटनेचा कट सिद्ध झाल्यास कमाल १० वर्षांची शिक्षा व दंडाची तरतूद आहे. आता या अधिनियमात उपकलम जोडून त्यास देशद्रोहाच्या श्रेणीत आणले जाईल. रुळावर अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न हा कट आहे. यातून दुर्घटना घडल्यास प्राणहानी होते. अशा आरोपीच्या विरोधात सामूहिक हत्येचे कलम लावण्याचा विचार होत आहे. त्यात जन्मठेपेपासून मृत्युदंडापर्यंतची तरतूद असू शकते. त्यावरून कायदेशीर सल्ला घेतला जात आहे. घातपात थांबविण्यासाठी निवडक प्रवासी गाड्यांना संवेदनशील भागातून पाठविण्याआधी पायलट लोको चालवली जाणार आहे. सोबतच रेल्वे रुळावर पोलिस, गँगमनचे निरीक्षण वाढविण्यावर जोर दिला जात आहे. संवेदनशील भागात रेल्वे प्रशासन कॅमेरे लावणार आहे. रेल्वे इंजिनावर कॅमेरे लावण्याची योजना आहे. यातून चांगली निगराणी होईल आणि घातपाताचे प्रयत्न आधीच रोखता येतील, असे सांगितले जात आहे. केंद्र सरकार योग्य दिशेने प्रामाणिक काम करीत आहे. फक्त हे उपाय तातडीने करून अंमलबजावणी व्हावी आणि रेल्वेवर घोंगावणारे संकट दूर करावे, अशी माफक अपेक्षा जनतेला आहे. ▮▮

९४२०७२१२२५

धर्म-संस्कृती

प्रा. दिलीप जोशी

पितृपक्षाचे शास्त्र!

हिंदू संस्कृती ही जगातील एकमेव संस्कृती आहे, ज्यात शाश्वत सिद्धांत आहेत. म्हणूनच अनादिकाळापासून आजतागायत ती टिकून आहे. आपल्या संस्कृतीत मोक्ष, मुक्ती, पुनर्जन्म, चौऱ्यांशीचा फेरा, इहलोक, स्वर्ग, पाप-पुण्य, नैतिकता अशा बाबींचा शाश्वत विचार केला आहे. 'मातृदेवो भव, पितृदेवो भव, आचार्यदेवो भव' हा विचार आपल्या रक्तात भिनलेला आहे. म्हणूनच जिवंत असताना तर आई-वडील-गुरू यांची सेवा भारतीय माणूस करतोच; पण त्यांच्या मृत्युपश्चातही त्यांना मुक्ती मिळावी म्हणून श्राद्ध, तर्पण, पिंडदानादी क्रिया हिंदू संस्कृतीत दृढ श्रद्धेने केल्या जातात. इतर संस्कृतीत ही श्रद्धा नाही. आई-वडील-सगेसोयरेच नाही तर प्राणिमात्रांचीदेखील केवळ जिवंतपणीच सेवा नाही तर मेल्यावरही त्यांच्या मुक्तीसाठी धडपड हे फक्त इथेच भारतात आहे.

आपल्या धर्मात मृत्युपश्चातचाही विचार केला आहे. आपली पहिली इच्छा मोक्ष किंवा मुक्ती आहे. हे नाही तर मनुष्ययोनीत आणि तेही भारतातच पुनर्जन्म व्हावा. चौऱ्यांशीचा फेरा शक्यतो नकोच ही आपली सततची इच्छा असते. यासाठी आयुष्यभर पुण्याईसाठी आपला प्रयत्न असतो. मृत्यूनंतरही सद्‌गतीसाठी इथे व्यवस्था आहेत. यातलाच महत्त्वाचा भाग म्हणजे पितृपक्ष.

भाद्रपद महिन्याचा कृष्णपक्ष म्हणजे पितृपक्ष. या १५ दिवसांना शास्त्रात 'महालय' म्हणतात. हा विशेष कालावधी असून तो अत्यंत पवित्र कालावधी आहे. पितरांना सद्‌गती देणारा हा कालावधी असून तो निषिद्ध अजिबात नाही.

कधी झाली सुरुवात? : पितृपक्ष अनादिकाळापासून आहे. या महालयाचा उल्लेख वेद, उपनिषद, पुराण, रामायण आणि महाभारतातही आहे. आपल्या पितरांना मोक्ष मिळावा, मुक्ती मिळावी, सद्‌गती मिळावी, शांती मिळावी म्हणून पक्षपंधरवड्यात पितरांचे आवाहन करून त्यांना पाचारण करतात. या पितृपक्षात ते भूलोकात आपल्या घरी येतात, हा आपला विश्वास आहे. पिंडदान श्राद्ध, तर्पण, क्षमादान, अर्घ्यदान, अग्नौकरण, विकीरदान, स्वधावाचन करून त्यांना भोजनाने तृप्त केले जाते. ते तृप्त होऊन उत्तमलोकात परत जातात. ही आपली नितांत श्रद्धा आहे.

ज्या तिथीला आपले वडील मृत्यू पावले; पितृपक्षातील त्याच तिथीला पिंडदान केले जाते. जर तिथीबद्दल संभ्रम असेल किंवा काही अपरिहार्यतेमुळे नियोजित तिथीला पिंडदान होऊ शकले नाही तर सर्वपितृ अमावास्येला पिंडदान करून पितरांचे भोजन करतात.

जर आपली आई किंवा घरातील स्त्री सौभाग्यवती गेली असेल तर चालू वर्षात पितृपक्षात नवमी तिथीला ज्या तिथीला 'आईनवमी' किंवा 'अविधवा नवमी' म्हणतात. या नवमीला पिंडदान तर्पण केले जाते. याच पितृपक्षात चतुर्थी किंवा पंचमीला भरणी नक्षत्र असते. म्हणून या दिवशीच्या श्राद्धाला भरणी श्राद्ध करतात. ज्यांना कोणाला गया, त्र्यंबक, ब्रह्मकपाल अशा पवित्र ठिकाणी जाऊन पिंडदान श्राद्ध करण्याची इच्छा असते; पण त्यांना ते शक्य होत नाही, त्यांनी भरणी श्राद्ध करावे. हे श्राद्ध गयादी तीर्थश्राद्धाचे फळ देते.

चालू वर्षात कोणी अविवाहित पुरुष गेला असेल तर चतुर्थी किंवा पंचमीला भरणी श्राद्ध केले जाते. वर्षश्राद्ध झाल्याशिवाय भरणी श्राद्ध करू नये. कारण एक वर्षपर्यंत तो जीव प्रेतयोनीतून पितृयोनीत जात नाही. म्हणूनच वर्षभर दर महिन्याला मासिक श्राद्ध सांगितले आहे. पितृपक्षाचे शास्त्र समजून घेतले पाहिजे. आपल्या शास्त्रात आपले चार प्रकारांचे देह सांगितले आहेत. स्थूलदेह, सुक्ष्मदेह, कारणदेह आणि महाकारण देह. यातील स्थूलदेह म्हणजे जो आपल्याला दिसतो, ज्याची आपण काळजी घेतो ते आपले शरीर. हा देह पंचमहाभूतांचा किंवा पंचतत्त्वांचा बनलेला असतो. माणूस मृत पावतो म्हणजे त्याचा अंत्यसंस्कार केला जातो. म्हणजे हा स्थूलदेह पंचतत्त्वात विलीन होतो. हा देह संपला तरी सुक्ष्मदेह इथेच असतो. स्थूलदेहाची अंत्यसंस्काराने सोय झाली, पण सुक्ष्मदेहालाही अवयव असतात. श्राद्ध प्रयोगात त्या सर्व अवयवांचा उल्लेख असतो. विशेष म्हणजे हा सुक्ष्मदेह कावळ्याला दिसतो. पक्षितज्ज्ञ मारुती चितमपल्ली यांनी त्यांच्या पुस्तकात आणि साहित्य संमेलनात अध्यक्षीय भाषणात स्पष्टपणे सांगितले आहे. म्हणून पितृपक्षात सुक्ष्मदेहाकरिता श्राद्ध विधी आहे. मनुष्य मृत झाला की तो मनुष्ययोनी सोडून प्रेतयोनीत जातो. स्थूलदेह त्याग आणि सुक्ष्मदेह धारण हा पहिला टप्पा. 'प्रेतलोक गमनार्थम्' श्राद्धकर्म असते. या सुक्ष्मदेहाची तृप्ती झाली की, हा देह पितृलोकात ज्याला शास्त्रात 'यमलोक' म्हणतात, तेथे जातो. हा कालावधी एक वर्षाचा असतो. वर्षश्राद्धानंतर सुक्ष्मदेहाची व्यवस्था होते. तेव्हा उरतो कारणदेह. कारणदेह पितृपक्षात आपल्याकडे येत असतो. हा कारणदेह तृप्त होतो तेव्हा त्यांना उत्तमलोक प्राप्त होतो. त्यानंतर तृप्त होऊन कारणदेहाची व्यवस्था होते. आता उरला महाकारणदेह. हा महाकारणदेह पितृपक्षात पिंडदान आणि श्राद्ध यामुळे मुक्त होऊन तो उत्तमलोकांतून कैलासलोक, वैकुंठलोक ज्याला शास्त्रात मोक्ष, मुक्ती म्हणतात, तिथे स्थिरावतो. यालाच 'सद्‌गती' म्हणतात. भूलोकातून प्रेतलोकात, प्रेतलोकातून उत्तमलोकात आणि उत्तमलोकातून वैकुंठ अर्थात सद्‌गती. स्थूलदेह सुक्ष्मदेहात, सुक्ष्मदेह कारणदेहात, कारणदेह महाकारणदेहात आणि शेवटी महाकारणदेह नारायण स्वरूपात विलीन होतो. म्हणजे पिंड ब्रह्मांडात विलीन होते. असा हा प्रवास पिंडदानाने सुकर होतो. म्हणून पितृपक्ष महत्त्वाचा. पिंडदानातील पिंड हा भात, तीळ आणि मध किंवा तुपाचा बनवतात; त्याला 'चरूपिंड' म्हणतात. श्राद्धादी प्रयोगात पिंड जर कणकेचा बनला असेल तर त्याला 'सत्तूपिंड' म्हणतात. हे पिंड म्हणजे पितरांचे शरीर आहे. दर्भासनावर बसवून त्याचेच पूजन आपण करतो. पिंडाला नमस्कार करतो. पिंडदान करताना तीन तीन पिंडांच्या तती मांडतात. पिता, पितामह आणि प्रपितामह म्हणजे वडील, आजोबा आणि पणजोबा यांच्यासाठी ती असतात. तीन पिंडांची रांग ही प्रातिनिधिक असते. या क्रियेत आईवडील, पूर्वज, सगेसोयरे यांचीही तृप्ती केली जाते. आपल्या गुरूंनाही तृप्त करण्याचा विधी यात आहे. इतकेच नाही, तर प्राणिमात्रांचे पिंडदान आपल्या संस्कृतीत आहे. भगवान रामचंद्रांनी पक्षिराज जटायूचे तर ज्ञानेश्वर माउलींनी आळे फाट्यावर रेड्याचे पिंडदान केल्याचे सर्वश्रुत आहे.

'तत्र देवो सहाय्यकृत' हा आपला विश्वास आहे. त्यांची तृप्ती आपल्या घरातील अवदसा आणि अवकळा घालवते. पितृपक्षात पितराना तृप्त केल्याने घरातील नकारात्मकता नष्ट होऊन घरात निरामय वातावरण निर्माण होते. या पितृपक्षात गया, हरिद्वार, त्र्यंबक, बद्रीनाथ आणि उज्जैन क्षेत्री श्राद्ध, तर्पण, पिंडदान फलदायी असते. या शिवाय ब्रह्मकपाल येथे जिवंतपणी स्वतःचे श्राद्ध स्वतः करण्याची परंपरा आहे. स्वश्राद्ध इतर स्थानीही करता येते. या सर्व तीर्थात गया क्षेत्र अग्रस्थानी आहे. 'श्राद्धारंभे गयायां ध्यात्वा, ध्यात्वा देव गदाधरं-' भाद्रपदातील पौर्णिमा आणि कृष्णपक्ष मिळून सोळा दिवस होतात. हा महालय म्हणून प्रसिद्ध आहे. महालय म्हणजे सर्वात मोठे घर अर्थात वैकुंठस्थान. पितृपक्षात पितरांना अन्न आणि अक्षय्यतृतीयेला घडाभरून पाणी दिल्यास त्यांना सद्‌गती तर मिळतेच; आपल्याही जीवनात सुख-शांती-समाधान कायम निवासी राहते. पितृपक्ष हा पितरांना सद्‌गती देणारा पवित्र पंधरवडा आहे. अतीव विश्वासाने भारतात श्राद्ध, तर्पण, पिंडदान केले जाते. ते निश्चित फलदायी आहे. पितृपक्ष ही पुण्य कमावण्याची सर्वात मोठी संधी आहे. ▮▮

९८२२२६२७३५

वाचक पत्रे

हे तर महापाप

आंध्रप्रदेशातील जगप्रसिद्ध तिरुपती बालाजी मंदिरातील प्रसादाच्या लाडवांमध्ये प्राण्यांच्या चरबीचा वापर झाल्याची माहिती मुख्यमंत्री चंद्रबाबू नायडू यांनी दिली. या लाडूच्या प्रयोगशाळेतील परीक्षणाचा अहवाल तेलगू देसम पक्षाने उघड केला आहे. अहवालानुसार या लाडवांमध्ये माशांचे तेल, बीफ टॅलो म्हणजे गोमांसाच्या चरबीपासून बनवलेला एक पदार्थ आणि डुकराची चरबी यांचा वापर केल्याचे निदर्शनास आले आहे. तिरुपती मंदिराच्या ३०० वर्षे जुन्या असलेल्या स्वयंपाकघरात दररोज २०० ब्राह्मण जवळजवळ साडेतीन लाख लाडू बनवतात. हे लाडू बनवताना शुद्ध बेसन, बुंदी, साखर, काजू आणि शुद्ध तूप यांचा वापर केला जातो. असे असतानाही माशांचे तेल, बीफ टॅलो आणि डुकराची चरबी असलेले लाडू भक्तांना प्रसाद म्हणून दिले जात आहेत. लाखो भक्त मोठ्या श्रद्धेने तिरुपती मंदिरात दर्शनाला येत असतात. जाताना ते प्रसाद म्हणून स्वतःसाठी आणि इतरांसाठीही लाडू घेऊन जात असतात. असे भेसळीचे लाडू प्रसाद म्हणून देणे हा भक्तांनी दाखवलेल्या श्रद्धेला मोठा तडाच आहे आणि हे खूप मोठे महापाप आहे. हा प्रसाद नाही तर एकप्रकारचे विषच आहे. या अक्षम्य अपराधाला देवदेखील क्षमा करणार नाही.



भीमराव साळुंखे/९४२३८६५९५०

●● ●●

श्राद्धाचा उल्लेख महाभारतात

एकूण अठरा दिवस सुरू असलेले महाभारत युद्ध जेव्हा समाप्त झाले तेव्हा कौरव आणि पांडव या दोन्ही पक्षांतील हजारो सैनिकांचा वध झाला. हे सर्व पाहून भगवान श्रीकृष्ण सम्राट युधिष्ठिर यांना उपदेश करतात की, हे युधिष्ठिरा युद्धामध्ये वध झालेले हे सर्व सैनिक तुझ्या बाजूने कौरवांशी लढताना मृत्युमुखी पडले आहेत. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांना पुढची गती मिळावी यासाठी युद्धात मृत्युमुखी पडलेल्या सर्व सैनिकांचे तू श्राद्ध करावे. श्रीकृष्णाने असे सांगताच सम्राट युधिष्ठिराने श्रीकृष्णाच्या आज्ञेचे तत्परतेने आज्ञापालन करून युद्धामध्ये मृत्यू पावलेल्या सर्व सैनिकांचे श्राद्ध केले. याचाच अर्थ असा की, महाभारत काळापासून श्राद्धविधी करण्यास अनन्यसाधारण महत्त्व आहे.

दीपाली गीते/९८२२००४०५४

●● ●●

मुलांची अती चिंता नको

'माझ्या पाल्याचे कसे होईल?' अशा प्रकारची चिंता किंवा भीती आजच्या या स्पर्धेच्या युगात सर्वच पालकांना सतावत असते. सगळ्याच क्षेत्रात म्हणजे अगदी लहान गटात प्रवेश मिळण्यापासून ते शिक्षण घेऊन नोकरी, व्यवसाय, उद्योग करेपर्यंतच्या प्रवासात वाढलेली प्रचंड स्पर्धा. यात आपला पाल्य कुठे टिकेल का? तो यशस्वी होईल का? त्याचे काय होईल? अशी चिंता न करता आपल्या पाल्याला सक्षम करण्यासाठी आपण काय करू शकतो, यावर विचारमंथन होणे गरजेचे आहे. प्रत्येकाला जन्मतःच काही ना काही नैसर्गिक शक्ती, सामर्थ्य व कौशल्ये उपजत मिळालेली असते. त्याच्या जोरावर व्यक्ती पुढील आयुष्यात कष्ट, सराव सातत्याने करण्याचा प्रयत्न करीत असल्याने यशस्वी होतो. जर तुमच्या पाल्याला आयुष्यात चांगले करीअर घडवायचे असेल तर त्याला पूरक वातावरण देणे, हे पालक म्हणून तुमच्या हातात आहे. अभ्यासाची मेहनत करणं त्याचं काम आहे. त्याची आवड आणि कल पाहून शिक्षणाची दिशा ठरवा. त्याच्या आवडीच्या क्षेत्रात जाण्यासाठी त्याला प्रेरित करा. त्याला प्रोत्साहन द्या. त्याचे मनोबल वाढवा. पालक म्हणून प्रत्येक यशापयशाच्या वेळी त्याच्या पाठीशी ठामपणे उभे राहा. त्याला विश्वास द्या. एक दिवस तुमचा पाल्य नक्कीच या जगात चमकलेला असेल आणि तोही स्वतःच्या कर्तृत्वावर. यासाठी खालील बाबींकडे लक्ष द्या- आपल्या पाल्याला सर्वप्रथम माणसं ओळखायला शिकवा. पाल्याची शैक्षणिक प्रगती, व्यक्तिमत्त्व विकास याबरोबर व्यावहारिक ज्ञान, कौशल्य कसे वाढेल याकडे लक्ष द्या. मुलांना सतत सांगणे, ऐकवणे यापेक्षा प्रत्यक्ष अनुभव देण्याचा प्रयत्न करा. मुलांना मानसिकदृष्ट्या कणखर आणि सक्षम बनवा. परिस्थिती कितीही बिकट असेल तरी स्थिर राहायला शिकवा. मोठ्यांचा आदर करण्याबरोबरच माणसे जोडण्याची कला शिकवा. हाती घेतलेले कोणतेही काम मनापासून आणि आवडीने करण्याची सवय लावा. मानापमानाचे प्रसंग पचविण्याची क्षमता निर्माण करा. ते एक उत्तम जीवन शिक्षण आहे. अनावश्यक गोष्टीत वेळ वाया घालविण्यापेक्षा स्वतःला समृद्ध करणाऱ्या गोष्टीत रस घ्यायला शिकवा. संयमाने वेगवेगळ्या प्रसंगांना तोंड देऊन आपली निर्णयक्षमता कशी विकसित करता येईल, याचे अनुभवशिक्षण द्या. प्रचंड कष्ट करण्याची तयारी ठेवण्याचा कानमंत्र द्या. इतर मुलांशी तुलना करू नका. सकारात्मक विचारांची ज्योत त्याच्या मनात सतत तेवत ठेवा. ▮▮

अरुण कराळे/९०९६३२६२७२

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर
तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

HEALTH DEPARTMENT
GOVERNMENT OF MAHARASHTRA
Tender Notice 2024-25
CIVIL SURGEON SOLAPUR

Rate Contract for Supply of Medicines, Surgicals, Consumables & Lab Materials Tender Reference No. CSS/Med.Store/Medicine, Surgicals, Consumables & Lab Materials/Tender-02/24-25

Civil Surgeon, Solapur invites proposals from reputed and experienced companies, Recognized Manufacturers/Sole Distributors and supplier to participate in the competitive bidding process to Purchase of Medicines, Surgicals, Consumables & Lab Materials.

For the detailed tender documents, interested bidders should visit **http://www.maharashtra.gov.in/tenders**

Tender submission would be online and the deadline to submit the proposals is 07/10/2024 (17.00 PM)

Sd/-
Civil Surgeon, Solapur

Aryan Creation

महाळुंग श्रीपूर नगरपंचायत

ता. माळशिरस जि. सोलापूर
स्थापना - ०९/०३/२०२१
स्वातंत्र्यांचा अमृत महोत्सव
E-mail- comcmahalung@gmail.com

जा. क्र.५४/२०२४ दि. २४/०९/२०२४

जाहीर सूचना

महाळुंग श्रीपूर नगरपंचायत अंतर्गत सर्व नागरीकांना कळविण्यात येते की, मुंबई येथे जनहित याचिका क्र. ०३/२०२४ मध्ये दिलेल्या निर्देशानुसार महाळुंग श्रीपूर नगरपंचायत कडून श्री. तानाजी गायकवाड आरोग्य निरीक्षक मो. क्र ९७३०२७१८०२ यांची (CUSTODIAN) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. करिता सर्व नागरिकांनी याची नोंद घ्यावी.

शिक्का

सही/-
मुख्याधिकारी
महाळुंग श्रीपूर नगरपंचायत

जाहीर नोटीस

मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात

जन्म-मृत्यू प्रकरण अर्ज क्र. २७५/२०२४

१) अनुराधा राम शिंदे,
रा. बारंगुळे प्लॉट, गाडेगाव रोड, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
(असल्यास, तर्फे वकील वृक्षाली शं. वाघमारे) **अर्जदार**

- विरुद्ध -

२) जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी,
नगरपरिषद, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर **गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, स्वतः अर्जदार, रा. बारंगुळे प्लॉट, गाडेगाव रोड, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक ०१ जून १९६४ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक ०१ जून १९६४ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिद्धीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. १२ ऑगस्ट २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

सही/-
(गोल शिक्का) **कार्यकारी दंडाधिकारी,**
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

Classifieds

शेतीविषयक

नर्सरी (शेती) काम करणारे जोडपे, ड्रायव्हर पाहिजेत. राहण्याची उत्तम सोय. पगार : १८ ते २२ हजार महिना जोडीला.

संपर्क
9922004242

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

जाहीर प्रसिद्धीकरण

दि. कि. अर्ज नं. १४/२०२४ नि.नं. ६
पुढील नेमलेली तारीख १०/१०/२०२४

बार्शी येथील मा. दिवाणी न्यायाधीश सो. वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

१) **शारदा महेंद्र अवतार,** वय ३१ वर्षे, धंदा- काही नाही,
रा. मु.पो. वाशी, ता. वाशी, जि. धाराशिव ह.मु. पराग इस्टेट, उपळाई रोड, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर (स्वतःकरीता व अज्ञान अर्जदार नं. २,३ चे अ.पा.क. जनक आई म्हणून)
२) **शुभम महेंद्र अवतार,** वय १२ वर्षे, धंदा- शिक्षण,
रा. सदर- अज्ञान
३) **सोहम महेंद्र अवतार,** वय ०९ वर्षे, धंदा- शिक्षण,
रा. सदर- अज्ञान **अर्जदार**

- विरुद्ध -

भागाबाई रावजी भोये, वय ५७ वर्षे, धंदा- घरकाम,
रा. मु. निरगुडे, पो. हरसुल, ता. त्रंबकेश्वर, जि. नाशिक **सा. वाली**

ज्याअर्थी अर्जदार नं. १ ही अर्जदार नं. २,३ ची जन्मदाती आई व सा.वाली ही सासू आहे. अर्जदार नं. १ चे पती म्हणजेच अर्जदार नं. २,३ चे वडील व सा.वालीचा मुलगा महेंद्र रामदास अवतार हा होता. ते बार्शी येथे दि. २१/११/२०२३ रोजी मयत झालेले आहेत. अर्जदार सा.वाला हेच मयत महेंद्र रामदास अवतार यांचे कायदेशीर वारस आहेत. सा.वाली हिने दुसरा विवाह केलेला असला तररू ती मयत महेंद्र रामदास अवतार याची जन्मदाती आहे. अर्जदारांना त्यांचे कायदेशीर अडचणीचे निवारण करीता वारस प्रमाणपत्राची गरज भासली. परंतु त्यांचेकडे ते नसलेने त्यांना अनेक कायदेशीर अडचणीस सामोरे जावे लागत आहे, असे कथान करुन अर्जदारांनी ते मयत महेंद्र रामदास अवतार यांचे कायदेशीर वारस असलेबाबत वारस/हेअरशिप प्रमाणपत्राची मागणी अर्ज या मे.कोर्टात आणलेला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिद्धीकरणाने कळविण्यात येते की, वर नमूद अर्जदाराच्या अर्जातील मागणी व विधानासंबंधाने जर कोणाचे काही आक्षेप असलेस संबंधितानी हे जाहीर प्रसिद्धीकरण प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत वा पुढील नेमले तारीख १०/१०/२०२४ रोजी मे. कोर्टात स्वतः वा माहितगार ॲडव्होकेटमार्फत हजर होवून आपले हरकती, तक्रारी लेखी स्वरुपात सादर कराव्यात. अन्यथा मुदतीनंतर मे. कोर्टाचे पुढील हुकूम होतील.

हे जाहीर प्रसिद्धीकरण आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिद्ध केले असे. तारीख : २०/०९/२०२४

सही/-
कनिष्ठ लिपीक

(कोर्टाचा
गोल शिक्का)

सही/-
सहा. अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर

जाहीर नोटीस

मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात

जन्म-मृत्यू प्रकरण अर्ज क्र. २१२/२०२४

१) मोईनोद्दीन महिबूब बासडे,
रा. महेदी नगर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
(असल्यास, तर्फे वकील) **अर्जदार**

- विरुद्ध -

२) जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी,
नगरपालिका, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर **गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, स्वतः अर्जदार, रा. महेदी नगर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक ११ जून १९६८ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक ११ जून १९६८ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिद्धीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. २५ जून २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

सही/-
(गोल शिक्का) **कार्यकारी दंडाधिकारी,**
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

जाहीर नोटीस

मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात

जन्म-मृत्यू प्रकरण अर्ज क्र. २७६/२०२४

१) सुनिता लक्ष्मण व्हटकर,
रा. मंगळवार पेठ, ढोर गल्ली, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
(असल्यास, तर्फे वकील वृक्षाली शं. वाघमारे) **अर्जदार**

- विरुद्ध -

२) जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी,
नगरपरिषद, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर **गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, स्वतः अर्जदार, रा. मंगळवार पेठ, ढोर गल्ली, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक १६ सप्टेंबर १९९४ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक १६ सप्टेंबर १९९४ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिद्धीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. १२ ऑगस्ट २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

सही/-
(गोल शिक्का) **कार्यकारी दंडाधिकारी,**
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः बार्शी तालुका व मौजे गाताचीवाडी परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

बार्शी तालुकापैकी मौजे गाताचीवाडी येथील जमीन जुना गट नं. २५९४ याचा चालू गट नं. ६९/अ/१ क्षेत्र ०२ हे. ४२ आर आकार ०१ रु. ७० पैसे यापैकी दक्षिण बाजूची क्षेत्र ०१ हे. २० आर आकार ०० रु. ८५ पैसे अशी मिळकत श्री. सुनील भिमाशंकर बंडेवार, रा. बार्शी यांनी मिळकतीचे मालक श्रीमती शोभा राजशेखर परदेशीमठ वगैरे यांचेकडून सन २०१० साली खरेदीपूर्वी मोजणी रजिस्टर अ.ता.ह.का. २१८४/२०१० अन्वये हद्दीखुणा कायम करुन क्षेत्राची खात्री करुन कायम खुशखरेदी केलेली आहे व त्यानंतर सब-डिव्हीजन मोजणी रजिस्टर क्र. ९४/२०१२ अन्वये खरेदी घेतलेल्या क्षेत्राच्या हद्दीखुणा कायम झालेल्या आहेत. खरेदीपूर्वी रितसर दि. ०९/११/२०१० रोजी दैनिक लोकमत या वृत्तपत्रात जाहीर नोटीसही प्रसिद्ध झाली होती व आहे. वरील क्षेत्राप्रमाणे बिनतक्रार नोंदीही प्रमाणित झाल्या आहेत व खरेदीदार सुनील भिमाशंकर बंडेवार यांची खरेदी क्षेत्रात उघडपणे अव्यातपणे बिनतक्रार मालक म्हणून प्रत्यक्ष कब्जेवहिवाटही आहे.

श्री. सुनील भिमाशंकर बंडेवार यांच्याबरोबर आमचे अशिल इच्छुक खरेदीदार खाली सही करणार यांच्या खरेदीबाबत वाटाघाटी व बोलणी चालू आहेत. सबब वरील नमूद मिळकतीचे संदर्भात कुणाचीही कसल्याही स्वरुपाची तक्रार असल्यास योग्य त्या कागद पुराव्यानिशी खालील पत्त्यावर संपर्क साधून स्वतःच्या हक्काविषयी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून आठ दिवसांच्या आत खात्री करुन द्यावी. पोकळ व तोंडी तक्रारीचा विचार केला जाणार नाही.

वर नमूद मुदतीत लेखी योग्य त्या प्रमाणित पुराव्याच्या कागदपत्रासह तक्रार प्राप्त न झाल्यास आमचे अशिल पुढील व्यवहाराची बोलणी करतील व संबंधितांनी हक्क जाणीवपूर्वक **WAIVE** केला आहे असे समजण्यात येईल.

ही जाहीर नोटीस दिली असे. दिनांक : १८/०९/२०२४

सही/-
ॲड. ए. आर. देशपांडे,
नवी चाटी गल्ली, बार्शी, ता. बार्शी,
जि. सोलापूर मो.नं. ९८२२९९९८११
(इच्छुक खरेदीदार अशिलातर्फे विधीज्ञ)

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन : डि ।। व सब डि ।। सोलापूर पैकी तालुका दक्षिण सोलापूर पैकी गावठाण हद्दीतील मौजे बोरामणी येथील यांसी सि.स.नं. १७१, याचे क्षेत्र ९३.०० चौ.मी. यांसी ग्रामपंचायत मिळकत क्र. १९४/१ व १९४/२ असे आहे. यांसी चतुः सिमा :- पुर्वेस :- विश्वनाथ हेबळे यांची मिळकत, पश्चिमेस :- राजकुमार हलसगे यांची मिळकत, दक्षिणेस :- रस्ता, उत्तरेस :- बाबुराव खोबरे यांची मिळकत असे आहे.

वर नमुद मिळकतीबाबतचे खरेदीखत दस्त क्र. ४४०५/२०२४, दस्त क्र. ६९९७/२०१३ व दस्त क्र. २०४१/२००७ असे तीन्ही खरेदीखत आमचे अशिल सोमनाथ प्रकाश हेबळे यांचेकडून मूळ खरेदीखत अनावधानाने गहाळ झाले आहेत. त्यामुळे आमचे अशिलांनी सोलापूर तालुका पोलीस स्टेशन, सोलापूर ग्रामीण या पोलीस स्टेशनमध्ये रितसर तक्रार दिली असून तिचा गहाळ रजिस्ट्रेशन नं. ०२८०/२०२४ ने दि. २०-०९-२०२४ असा आहे.

तरी या नोटीसीने कळविण्यात येते की, सदरहू मिळकत आयकेएफ होम फायनान्स प्रा.लि. सोलापूरकडे गहाण तारण ठेवून कर्ज घेणार आहेत. तरी सदरहू मिळकतीवर कोणाचाही हक्क, हितसंबंध, गहाण, दान, लिन, बक्षीस, बोजा, पोटगी, कब्जा वगैरे असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत खाली नमुद आमच्या पत्त्यावर त्यांचे हक्काचे पृष्ठ्यर्थ कागदपत्रे आणून द्यावीत. जर कोणी मुदतीत हरकत घेतली नाही तर सदरील मिळकत ही निर्वेध व निजोखमी आहे, असे समजून आयकेएफ होम फायनान्स प्रा.लि. सोलापूर या फायनान्सने सदरहु मिळकतीच्या गहाणतारण कर्ज अदा करतील, तद्नंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी. ही जाहीर नोटीस दिली ता. २४/०९/२०२४.

सही/-
अशिल

अशिलातर्फे ॲडव्होकेट
सही/-
ॲड. सलाम एम. बगलुर
बी.ए., एलएल. बी, एम.एस. डब्ल्यु,
ऑफीस-शॉप नं. १०, पहिला मजला
दरूस-सलाम अपार्टमेंट,
सिध्देश्वर पेठ, सोलापूर. मो.नं.
९८६००९४५९६

खरेदीपूर्व जाहीर नोटिस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, जिल्हा सोलापूर, ता. दक्षिण सोलापूर पैकी मौजे कासेगांव येथील शेतजमीन यासी गट नं.३८८/ब, पैकी, ० हेक्टर ८१ आर ही मिळकत भारत मारुती राऊत, रा.उळे यांच्या मालकीची व कब्जे वहिवाटीची आहे.

सदर संपुर्ण मिळकत आमच्या अशिलांस विक्री करण्याचे ठरवुन भारत मारुती राऊत यांनी आमच्या अशिलाबरोबर करार केलेला आहे. सदर संपुर्ण मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याची हमी व खात्री त्यांनी आमच्या अशिलांस दिलेली आहे.

याउपरही सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचेही कसलाही स्वरुपाचे हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी प्रस्तुत नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १० दिवसांचे आत आमच्याशी संपर्क साधुन लेखी हरकत नोंदवावी, याप्रमाणे कोणाची हरकत न आल्यास सदर संपुर्ण मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याचे गृहीत धरुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व त्या नंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली तारीख २५/०९/२०२४

सही
अभिजीत मोरेश्वर देवधर
बी.कॉम. एलएल.बी. ॲडव्होकेट
मो.नं.९८९०६३८३५०
सौख्या रेसिडेन्सी, बलदवा हॉस्पीटल जवळ,
वसंत विहार, जुना पुणे नाका,
सोलापूर-४१३००१
अशिलातर्फे ॲडव्होकेट

खरेदीपूर्व जाहीर नोटिस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, जिल्हा सोलापूर, ता. दक्षिण सोलापूर पैकी मौजे कासेगांव येथील शेतजमीन यासी गट नं.३८८/ब, पैकी, संपुर्ण क्षेत्र ० हेक्टर ९७ आर ही मिळकत लता लक्ष्मण राऊत, रा.उळे यांच्या मालकीची व कब्जे वहिवाटीची आहे.

सदर संपुर्ण मिळकत आमच्या अशिलांस विक्री करण्याचे ठरवुन लता लक्ष्मण राऊत यांनी आमच्या अशिलाबरोबर करार केलेला आहे. सदर संपुर्ण मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याची हमी व खात्री त्यांनी आमच्या अशिलांस दिलेली आहे..

याउपरही सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचेही कसलाही स्वरुपाचे हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी प्रस्तुत नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १० दिवसांचे आत आमच्याशी संपर्क साधुन लेखी हरकत नोंदवावी, याप्रमाणे कोणाची हरकत न आल्यास सदर संपुर्ण मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याचे गृहीत धरुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व त्या नंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली तारीख २५/०९/२०२४

सही
अभिजीत मोरेश्वर देवधर
बी.कॉम. एलएल.बी. ॲडव्होकेट
मो.नं.९८९०६३८३५०
सौख्या रेसिडेन्सी, बलदवा हॉस्पीटल जवळ,
वसंत विहार, जुना पुणे नाका, सोलापूर-४१३००१
अशिलातर्फे ॲडव्होकेट

महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग
तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय अक्कलकोट यांच्या न्यायालयात
संकलन - अभिलेख कक्ष
दुरध्वनी नं.-०२१८१-२२०२३३ Email- tahakkalkot@gmail.com

जा.क्र. २०२४/अभिलेख/कावि/८०४/२०२४ दि. २४/०९/२०२४

-: जाहिर प्रसिध्दीकरण :-

प्रति,
श्री. राजेंद्र तिपण्णा हत्ते
रा. घोळसगांव ता. अक्कलकोट - अर्जदार
विरुध्द
जन्म मृत्यू नोंदणी, कार्यालय
ग्रामपंचायत, घोळसगांव ता अक्कलकोट - सामनेवाला

ज्याअर्थी, यातील राजेंद्र तिपण्णा हत्ते रा. घोळसगांव ता. अक्कलकोट यांनी या कार्यालयाकडे अर्ज करुन त्यांची मुलगी भाग्यश्री राजेंद्र हत्ते हिचा जन्म दि.१०/०२/१९९७ रोजी मौजे घोळसगांव ता. अक्कलकोट येथील राहत्या घरी झाला आहे. परंतू माझ्या मुलीच्या जन्माची नोंद हे सामनेवाला यांच्या दप्तरी आढळून आले नाही. त्यामुळे अर्जदार यांनी त्यांच्या मुलीच्या जन्माची नोंद करुन भाग्यश्री राजेंद्र हत्ते या नावाने जन्म दाखला मिळण्याकामी जन्म मुत्यू नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) अन्वये मा. तहसिलदार अक्कलकोट यांच्या न्यायालयात दि.०८/०८/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाकामी अर्जदार यांच्या मुलीचा जन्म दाखला मिळणेकामी कोणाची हरकत अथवा म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात आपण स्वतः अथवा आपल्या वकिलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे मांडावे. मुदतीत कोणचाही काही हरकत अथवा म्हणने न आल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजून या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबंधीत दाखला देण्यात येईल.

हे आज दि.२४/०९/२०२४ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्याने प्रसिध्द केले असे.

शिक्का

सही/-
(विनायक मगर)
तहसिलदार अक्कलकोट

जाहीर समन्स

मा.उपनिबंधक सहकारी संस्था, (परसेवा)
सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप. असोसिएशन लि.सोलापूर
११३(अ), सिध्देश्वर पेठ, स्टेट बँक ऑफ इंडिया, ट्रेझरी शाखेशेजारी, सोलापूर
दि. लातुर अर्बन को-ऑप बँक लि. लातुर - अर्जदार
शाखा सोलापूर
विरुद्ध
(खालील तपशिलातील नमुद केलेले थकबाकीदार सभासद) **- जाब देणार**

अ. क्र.	केस नंबर	दावा रक्कम	जाब देणार नं.	जाब देणार यांचे नाव व पत्ता
१	६५/ २०२३-२४	२,५५,९६६/-	३	**महादय्या सातिरय्या स्वामी,** रा. मु.पो. कंदलगाव, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर

या कामी अर्जदार बँक यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमुद केलेल्या जाब देणार यांनी दिलेला पत्ता उपलब्ध होत नसल्याने सदर जाहीर समन्स देत आहोत.

उपनिर्दिष्ठ अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वार - मंगळवार, दि. ०८/१०/२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता कागदपत्रासह या कार्यालयात हजर रहावे.

या नोटीसीद्वारे जाब देणार यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व निर्णय देण्यात येईल. त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पूर्वी आपला संपूर्ण पत्ता कळविण्यास कसुर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि. २४/०९/२०२४ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले आहे.

शिक्का

सही/-
उपनिबंधक
सहकारी संस्था (परसेवा)
सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स्
को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर

मध्य रेल्वे

सोलापूर विभाग
ई-निविदा सूचना

निविदा सूचना क्रमांक SUR-N-T-2024-25- 32-33 तारीखः- 21.09.2024 DRM(ST) कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर भारताच्या राष्ट्रपतींसाठी आणि त्यांच्या वतीने सक्षम व्यक्तींकडून रेल्वेच्या ई-खरेदी वेबसाइट www.Ireps.gov.in वर ऑनलाइन ई-निविदा आमंत्रित करते. , खालील कामांसाठी प्रतिष्ठित कंपन्या/कंत्राटदार: क्र. क्रमांक: 1 त्याच्या परिसरासह कामाचे नाव: सेंट्रल रेल्वेच्या सोलापूर विभागातील सोलापूर आणि कुर्डूवाडी स्थानकावरील SSE/सिग्नल कार्यालयातील सिग्नल स्टोअरचे अपग्रेडेशन. निविदा क्रमांक: SUR-N-T-2024-25-32 कामाची किंमत: रु. 40,14,499.30 निविदा फॉर्मची किंमत: NIL जमा करावयाची बयाणा रक्कम: रु. 80,300.00 कामाच्या कालावधीवर पूर्ण: 12 महिने क्र. क्र. 2 कामाचे नाव त्याच्या परिसरासह: मध्य रेल्वेवरील संपूर्ण सोलापूर विभागात तेखझ आधारित ट्रेन कंट्रोल कम्युनिकेशन सिस्टमचा पुरवठा, स्थापना, कॉन्फिगरेशन, चाचणी आणि चालू करणे. निविदा क्रमांक: SUR-N-T- 2024-25-33 कामाची किंमत: रु. 2,82,24,369.54 निविदा फॉर्मची किंमत: NIL जमा करावयाची बयाणा रक्कम: रु. 2,91,100.00 कामाच्या कालावधीत पूर्ण: 12 महिने निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ www.Ireps.gov.in वर 14.10.2024 15:30 वाजता. तपशील IREPS वेबसाइटवर उपलब्ध आहेत. शुद्धीपत्र/दुरुस्ती जर असेल तर ती फक्त वरील ई-प्रोक्योरमेंट वेबसाइटवर अपलोड केली जाईल. फक्त ऑनलाइन निविदा स्वीकारल्या जातील. मॅन्युअल/पोस्टल/ई-मेल, फॅक्स, हाताने निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. बोलीदारांना विनंती केली जाते की त्यांनी कंपनीच्या नावासह वर्ग III डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र प्राप्त करावे आणि www.Ireps.gov.in वर नोंदणी करावी. पेमेंट ऑफ अर्नेस्ट मनी (EMD) फक्त नेट बँकिंग किंवा पेमेंट गेटवेद्वारे स्वीकारले जाईल. अधिक तपशिलांसाठी कृपया www.Ireps.gov.in ला भेट द्या.

DRM, ST, सोलापूर

अपने जानवरों को रेल लाइन से दूर रखे SLP-30

तालुका कार्यकारी दंडाधिकारी तथा अपर तहसिलदार मंद्रुप, ता. दक्षिण सोलापूर यांचे न्यायालयात

संकलन-जमीनबाब
दूरध्वनी क्र. (०२१७) २२५५५५१ Email- tahmandrup@gmail.com

जा.क्र.जमीनबाब/जन्म-मृत्यू दाखला/एस.आर.-१२२/२०२४ मंद्रुप, दि. २३/०९/२०२४

जाहिर प्रसिध्दीकरण

श्री. चिदानंद झंपण्णा नंदुरे, **- अर्जदार**
वय-४३ वर्षे, धंदा-शेती,
रा.मंद्रुप, ता.दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर.
विरूध्द
ग्रामसेवक, ग्रामपंचायत मंद्रुप, **- सामनेवाला**
ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर

ज्याअर्थी, यातील अर्जदार श्री. चिदानंद झंपण्णा नंदुरे हे वर नमूद पत्यावरील कायमचे रहिवासी असून अर्जदार यांची मुलगी निकिता चिदानंद नंदुरे यांचा जन्म दि.३१/०१/२००६ रोजी गाव-मंद्रुप, ता.दक्षिण सोलापूर येथे झालेला आहे, सदर जन्माची नोंद मंद्रुप ग्राम पंचायतीस झालेली नाही. तरी सदर जन्माची नोंद होऊन तसा जन्म दाखला मिळणेकामी जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) अन्वये ग्रामपंचायत मंद्रुप यांना आदेश होणेकामी इकडील न्यायालयात प्रस्तुत अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी, तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की, निकिता चिदानंद नंदुरे यांच्या जन्माची नोंद होऊन तसा जन्म दाखला मिळणेकामी कोणाची काही हरकत असल्यास अथवा सदर अर्जाचे पृष्ठ्यर्थ अथवा विरूध्द कोणाचे काही म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १५ दिवसांच्या आत स्वतः अथवा आपल्या विधिज्ञामार्फत हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाचीही काही हरकत अथवा म्हणणे न आल्यास कोणाचीही काहीही हरकत नाही, असे समजून अर्जाच्या चौकशीअंती निकिता चिदानंद नंदुरे यांच्या जन्म तारखेची नोंद होऊन तसा जन्म दाखला देण्याचा आदेश मंद्रुप ग्रामपंचायतीस मे. कोर्टातर्फे देण्यात येईल. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती, तक्रारी अथवा म्हणणे विचारात घेतले जाणार नाही.

हे आज दि. २३/०९/२०२४ रोजी आमचे सहीने व कोर्टाच्या शिक्याने प्रसिध्दी केले असे.

सही/-
(सुजित नरहरे)
तालुका कार्यकारी दंडाधिकारी तथा
अपर तहसिलदार मंद्रुप, ता. दक्षिण सोलापूर.

तालुका कार्यकारी दंडाधिकारी तथा अपर तहसिलदार मंद्रुप, ता. दक्षिण सोलापूर यांचे न्यायालयात

संकलन-जमीनबाब
दूरध्वनी क्र. (०२१७) २२५५५५१ Email- tahmandrup@gmail.com

जा.क्र.जमीनबाब/जन्म-मृत्यू दाखला/एस.आर.-१२१/२०२४ मंद्रुप, दि. २३/०९/२०२४

जाहिर प्रसिध्दीकरण

श्री. सिध्दाराम काशप्पा सोलापूरे, **- अर्जदार**
वय-३८ वर्षे, धंदा-शेती,
रा.मंद्रुप, ता.दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर.
विरूध्द
ग्रामसेवक, ग्रामपंचायत मंद्रुप, **- सामनेवाला**
ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर.

ज्याअर्थी, यातील अर्जदार श्री. सिध्दाराम काशप्पा सोलापूरे हे वर नमूद पत्यावरील कायमचे रहिवासी असून अर्जदार यांची मुलगी सोनूबाई सिध्दाराम सोलापूरे यांचा जन्म दि.२०/०७/२००६ रोजी गाव-मंद्रुप, ता. दक्षिण सोलापूर येथे झालेला आहे, सदर जन्माची नोंद मंद्रुप ग्रामपंचायतीस झालेली नाही. तरी सदर जन्माची नोंद होऊन तसा जन्म दाखला मिळणेकामी जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) अन्वये ग्रामपंचायत मंद्रुप यांना आदेश होणेकामी इकडील न्यायालयात प्रस्तुत अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी, तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की, सोनूबाई सिध्दाराम सोलापूरे यांच्या जन्माची नोंद होऊन तसा जन्म दाखला मिळणेकामी कोणाची काही हरकत असल्यास अथवा सदर अर्जाचे पृष्ठ्यर्थ अथवा विरूध्द कोणाचे काही म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १५ दिवसांच्या आत स्वतः अथवा आपल्या विधिज्ञामार्फत हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाचीही काही हरकत अथवा म्हणणे न आल्यास कोणाचीही काहीही हरकत नाही, असे समजून अर्जाच्या चौकशीअंती सोनूबाई सिध्दाराम सोलापूरे यांच्या जन्म तारखेची नोंद होऊन तसा जन्म दाखला देण्याचा आदेश मंद्रुप ग्रामपंचायतीस मे. कोर्टातर्फे देण्यात येईल. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती, तक्रारी अथवा म्हणणे विचारात घेतले जाणार नाही.

हे आज दि. २३/०९/२०२४ रोजी आमचे सहीने व कोर्टाच्या शिक्याने प्रसिध्दी केले असे.

सही/-
(सुजित नरहरे)
तालुका कार्यकारी दंडाधिकारी तथा
अपर तहसिलदार मंद्रुप, ता. दक्षिण सोलापूर.

बँक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra

प्रधान कार्यालय/ Head Office
लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5
आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur
आंचलिक कार्यालय, अगरवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट – भारती विद्यापीठ रोड, जुले सोलापूर, सोलापुर - 413004
फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail: legal sol@mahabank.co.in

नियम - ८ (१)
ताबा सूचना

तर, अधोस्वाक्षरी केलेले हे सिक्युरिटायझेशन अँड रिकन्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल सेट्स अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अन्वये बँक ऑफ महाराष्ट्रचे प्राधिकृत अधिकारी आहेत आणि कलम 13 च्या उप-कलम (12) अन्वये दिलेल्या अधिकारांचा वापर करत आहेत. सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, 2002 ने डिमांड नोटीस जारी केली आहे ज्यामध्ये खाली नमूद केलेल्या कर्जदारांना आणि जामीनदारांना ही नोटीस मिळाल्यापासून 60 दिवसांच्या आत संपूर्ण देय परतफेड करण्याचे आवाहन केले आहे.

कर्जदाराची रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यास, याद्वारे कर्जदार, जामीनदार आणि सामान्य जनतेला नोटीस दिली जाते की खाली स्वाक्षरीदाराने उपकलम (४) अन्वये त्याला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा प्रतीकात्मक ताबा घेतला आहे. 20/09/2024 रोजी सुरक्षा व्याज अंमलबजावणी नियम, 2002 च्या नियम 8 सह अधिनियमाचे कलम १३ वाचले

विशेषतः कर्जदाराला आणि सर्वसाधारणपणे जनतेला याद्वारे सावध केले जाते की मालमत्तेचा व्यवहार करू नये आणि मालमत्तेचा कोणताही व्यवहार वर नमूद केलेल्या रकमेसाठी बँक ऑफ महाराष्ट्रच्या शुल्काच्या अधीन असेल.

सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करण्यासाठी, उपलब्ध वेळेनुसार, कायद्याच्या कलम 13 च्या उप-कलम (8) च्या तरतुदींकडे कर्जदाराचे लक्ष वेधले जाते.

अ.क्र.	शाखा, कर्जदार आणि जामीनदार यांचे नाव	गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील	डिमांड नोटिसची तारीख आणि एकूण थकबाकी
1	**कर्जदार - मेसर्स जमादार एंटरप्रायझेस** प्रा.सौ. निलम्मा दत्तात्रय सांगापूर पत्ता :-1. मुख्य रस्ता मैंदर्गी ता. अक्कलकोट, जि.सोलापूर पिन-413217. पत्ता :-2. सुभाष गल्ली मैंदर्गी, ता. अक्कलकोट, जि.सोलापूर पिन-413217.	स्टॉक, कर्जदार, बँक फायनान्समधून स्थिर मालमत्ता खरेदी इ.चे अनुमान ि नलम्मा दत्तात्रय सांगापूर.	**मागणी सूचना:** दि. 20/01/2022 रु.11,53,462.00/- तसेच 20/01/2022 पासून लागू न केलेले व्याज कर्जाची वसुली होईपर्यंत **सांकेतिक ताबा** **तारीख :** 20/09/2024
3	**शाखा- मैंदर्गी.** **कर्जदार - श्री.सिद्राम येल्लाप्पा मैंदर्गीकर.** पत्ताः मेन रोड मैंदर्गी ता. अक्कलकोट, जि.सोलापूर पिन-413217. **हमीदार:-** **1.श्री. शिवशरण बसवनप्पा भरमा** पत्ता:- मेन रोड मैंदर्गी ता. अक्कलकोट, जि.सोलापूर पिन-413217. 2. **यल्लापा मल्लपा मैंदर्गीकर** पत्ताः मेन रोड मैंदर्गी ता. अक्कलकोट, जि.सोलापूर पिन-413217.	1 श्री. सिद्राम येल्लाप्पा मैंदर्गीकर यांचे स्टॉक फूट वेअर इत्यादीचे हायपोथेकेशन	**मागणी सूचना:** दि. 20/01/2022 रु.05,56,172.65/- अधिक लागू न केलेले व्याज 20/01/2022 पासून कर्जाची वसुली होईपर्यंत **सांकेतिक ताबा** **तारीख:**20/09/2024

ठिकाण - सोलापूर
दिनांक - २४/०९/२०२४

सही/-
मुख्य व्यवस्थापक आणि
प्राधिकृत अधिकारी, सोलापूर झोन.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर
तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

महत्त्वाचे

मकाऊ ओपन बॅडमिंटनमध्ये त्रिशा-गायत्री विजयी

मकाऊ : त्रिशा जॉली आणि गायत्री गोपीचंद या तिसऱ्या मानांकित भारतीय जोडीने मंगळवारी येथे अकारी सातो आणि माया तागुची या जपानी जोडीचा तीन गेमच्या चुरशीच्या लढतीत पराभव केला आणि मकाऊ ओपन बॅडमिंटनच्या दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. जवळपास तासभर चाललेल्या या सामन्यात भारतीय जोडीने पहिली फेरी १५-२१, २१-१६, २१-१४ अशी जिंकली. इतर लढतींमध्ये एन सिक्की रेड्डी आणि रुत्विका शिवानी यांनी महिला दुहेरी पात्रता उपांत्यपूर्व फेरीत चेउंग यान यू आणि च्यु विंग ची यांचा २१-१५, २१-१० असा पराभव केला. आर्यमन टंडनने पुरुष एकेरीच्या पात्रतेत आपल्याच देशाच्या तरुण मानेपल्लीचा ११-२१, २१-१५, २१-१७ असा पराभव केला, परंतु उपांत्यपूर्व फेरीत आलाप मिश्राविरुद्ध १०-२१, २२-२४ असा पराभव पत्करावा लागला.

सिंधूच्या मार्गदर्शक प्रशिक्षकपदी ली ह्यून इल

नवी दिल्ली : दक्षिण कोरियाचे दिग्गज ली ह्यून इल यांची अंतरिम आधारावर दोन वेळा ऑलिम्पिक पदक विजेती भारतीय बॅडमिंटनपटू पी. व्ही. सिंधूचा सल्लागार प्रशिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सिंधूचे अंतरिम प्रशिक्षक म्हणून अनुप श्रीधर यांची अलिकडेच नियुक्ती झाल्यानंतर हे पाऊल उचलण्यात आले आहे. हे दोघेही डिसेंबर २०२४ पर्यंत सिंधूच्या प्रशिक्षक संघात राहतील. तोपर्यंत कायमस्वरूपी प्रशिक्षक संघाबाबत निर्णय होणे अपेक्षित आहे. सिंधू ऑक्टोबरमध्ये फिनलंड ओपन आणि डेन्मार्क ओपनच्या स्पर्धांमध्ये पुनरागमन करेल अशी अपेक्षा आहे. ली ह्यून इल हा माजी जागतिक नंबर वन खेळाडू आहे. प्रीमियर बॅडमिंटन लीग दरम्यान तो सिंधूसोबत खेळला आहे. त्याला आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळण्याचा मोठा अनुभव आहे. तो २००६ च्या वर्ल्ड चॅम्पियनशिपचा कांस्यपदक विजेता आहे. याशिवाय २००२ आणि २०१४ मध्ये झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत सांघिक स्पर्धेतही त्याने सुवर्णपदक जिंकले होते.

खेळाडू, व्यवस्थापन यांच्यातील संवादासाठी पीसीबीची समिती

लाहोर : राष्ट्रीय संघातील खेळाडू, व्यवस्थापन आणि बोर्ड यांच्यात सुसंवाद साधण्यासाठी पाकिस्तान क्रिकेट बोर्ड (पीसीबी) ने दोन सदस्यीय स्वतंत्र समिती स्थापन करण्यास सहमती दर्शविली आहे. पीसीबीचे अध्यक्ष मोहसीन नक्वी यांनी सोमवारी ‘क्रिकेट कनेक्ट’ परिषदेनंतर खेळाडूंना आश्वासन दिले की त्यांच्या तक्रारींवर विचार करण्यासाठी लवकरच एक स्वतंत्र समिती स्थापन केली जाईल. या परिषदेला राष्ट्रीय संघाचे प्रशिक्षक गॅरी कर्स्टन आणि जेसन गिलेस्पी यांच्यासह बोर्डाचे सर्वोच्च नेतृत्व उपस्थित होते. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, खेळाडूंनी पीसीबीच्या उच्च अधिकाऱ्यांशी, विशेषत: आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत क्रिकेट विभागांशी संवाद साधण्यात येणाऱ्या अडचणींबद्दल चिंता व्यक्त केली. मोहसीन नक्वी यांनी खेळाडूंना सांगितले की, राष्ट्रीय संघाच्या कर्णधारपदात त्वरित बदल होणार नाही आणि त्यांनी त्यांच्या कामगिरीवर लक्ष केंद्रित करावे.

पाकिस्तानच्या कर्णधारपदी शान मसूदची शक्यता

कराची : पाकिस्तान पुढील महिन्यात इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेसाठी शान मसूदला कर्णधारपदी कायम ठेवू शकते. याशिवाय, बाबर आझम ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका दौऱ्यासाठी मर्यादित षटकांच्या संघाचा कर्णधारपदी राहणार हे निश्चित आहे.

जिल्हा बॅडमिंटन स्पर्धेत बार्शीच्या सेंट जोसेफ स्कूलला विजेतेपद

बार्शी, दि. २४ सप्टेंबर-

शालेय जिल्हा बॅडमिंटन स्पर्धेत बार्शीच्या सेंट जोसेफ स्कूलने १४ वर्षांखालील मुलींच्या गटात विजेतेपद पटकाविले. सोलापूर जिल्हा क्रीडा संकुलात झालेल्या या स्पर्धेत सेंट जोसेफ स्कूलने अंतिम सामन्यात पंढरपूरच्या अरिहंत स्कूलचा पराभव केला. या संघात सेजल शहा, सई ताकभाते, सोनाक्षी जाधवर, सहाना जगदाळे, कृतिका येवणकर यांचा सहभाग होता. त्यांना क्रीडा मार्गदर्शक क्रीडाशिक्षक अतुल डुरे व महेश शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे मुख्याध्यापक फादर वर्गीस अगस्ती, व्यवस्थापक फादर रॉबिन, उपमुख्याध्यापक शेर्ली यांनी अभिनंदन केले.

ऑलिम्पियाड विजेत्यांचे जल्लोषात स्वागत

गुकेश, प्रज्ञानंद, वैशाली आणि श्रीनाथसाठी गर्दी ● ‘बुद्धिनायक’ येती घरा, तोचि दिवाळी, दसरा

चेन्नई विमानतळावर प्रसारमाध्यमांशी बोलताना आर. प्रज्ञानंद, आर. वैशाली आणि श्रीनाथ नारायणन्

चेन्नई विमानतळावर डी. गुकेशचे स्वागत करण्यात आले

◆ **चेन्नई, २४ सप्टेंबर**

बुडापेस्ट, हंगेरी येथे झालेल्या ४५ व्या बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये सुवर्णपदक जिंकून इतिहास घडविल्यानंतर, मंगळवारी मायदेशी परतलेल्या भारतीय संघातील खेळाडूंचे चाहते, अधिकारी आणि कुटुंबीयांनी स्वागत केले.

डी. गुकेश, आर. प्रज्ञानंद, आर. वैशाली आणि पुरुष संघाचा कर्णधार श्रीनाथ नारायणन् सकाळी चेन्नईला पोहोचले. हंगेरीतील बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये भारतीय पुरुष आणि महिला दोन्ही संघांनी रविवारी प्रथमच सुवर्णपदक जिंकून इतिहास घडविला. त्यांच्या असाधारण विजयाने बुद्धिबळातील नवीन महासत्ता म्हणून भारताचे स्थान मजबूत केले. चौघेही विमानतळाबाहेर येताच चाहत्यांनी त्यांचे जल्लोषात स्वागत केले.

या स्पर्धेत अपराजित मोहिमेसह भारतीय पुरुष संघाच्या वर्चस्वात मोलाची भूमिका बजावणाऱ्या डी. गुकेशने वैयक्तिक आणि सांघिक सुवर्णपदकांची चुणूक दाखवली. एप्रिलमध्ये कॅंडिडेट्स टूर्नामेंट जिंकून जागतिक अजिंक्यपदासाठी आव्हान देणारा सर्वात तरुण खेळाडू ठरलेला १८ वर्षीय गुकेश आता नोव्हेंबरमध्ये चीनच्या डिंग लिरेनविरुद्धच्या विश्व अजिंक्यपद सामन्यासाठी सज्ज झाला आहे. प्रज्ञानंद आणि वैशाली ही भाऊ-बहीण जोडी गुकेशच्या आधी आली. प्रत्येकाचे पुष्पहार, पुष्पगुच्छ आणि पारंपरिक स्टोल्सने स्वागत करण्यात आले आणि चाहत्यांनी त्यांच्यासोबत सेल्फी घेण्यासाठी गर्दी केली.

पुरुष संघाचा कर्णधार नारायणन्‌साठी सुवर्णपदक हे अनेक वर्षांच्या मेहनतीचे फळ आहे. तो म्हणाला, एवढ्या प्रभावी पद्धतीने ऑलिम्पियाड जिंकणाऱ्या बलाढ्य संघाचा मी कर्णधार होतो याचा मला आनंद आहे. (वृत्तसंस्था)

सुवर्ण पदक जिंकल्याचा आनंद : आर. प्रज्ञानंद

आम्ही पहिल्यांदाच ऑलिम्पियाड जिंकलो याचा मला खूप आनंद आहे. याआधी आम्ही फक्त कांस्यपदक जिंकले होते. आम्ही दोन्ही श्रेणी जिंकण्यात यशस्वी झालो त्यामुळे आमच्यासाठी हा एक अतिशय खास भावना आणि अभिमानाचा क्षण आहे, असे आर. प्रज्ञानंदने सांगितले.

आमच्यासाठी स्वप्नवत् क्षण : आर. वैशाली

हा एक स्वप्नवत् क्षण आहे. गेल्या वेळी चेन्नई ऑलिम्पियाडमध्ये आम्ही कांस्यपदक जिंकले होते, आम्ही सुवर्णपदक जिंकण्याच्या खूप जवळ होतो पण अंतिम फेरीत आम्ही हुकलो होतो. आता दोन्ही संघांनी सुवर्णपदक जिंकले याचा मला आनंद आहे, असे महिला संघाच्या विजयाचा पाया रचणाऱ्या वैशालीने सांगितले.

बीएआयचा पॅरालिम्पिक विजेत्यांवर बक्षिसांचा वर्षाव

एकूण ५० लाख रुपयांचा पुरस्कार जाहीर

◆ **नवी दिल्ली, २४ सप्टेंबर**

बॅडमिंटन असोसिएशन ऑफ इंडिया (बीएआय) ने गेल्या महिन्यात पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये पदक जिंकणाऱ्या देशातील पॅरा बॅडमिंटनपटूंसाठी एकूण ५० लाख रुपयांचा पुरस्कार जाहीर केला आहे.

पॅरिस गेम्समध्ये भारतीय पॅरा बॅडमिंटनपटूंनी एक सुवर्ण, दोन रौप्य आणि दोन कांस्य अशी एकूण पाच पदके जिंकली होती.

पुरुष एकेरी एसएल ३ प्रकारात सुवर्णपदक जिंकणाऱ्या नितीश कुमारला रौप्यपदक विजेते सुहास यथीराज (पुरुष एकेरी एसएल ४) आणि तुलसीमती मुरुगेसन (महिला एकेरी एसयू ५) यांना प्रत्येकी १० लाख रुपयांचे बक्षीस दिले जाईल.

कांस्यपदक विजेत्या मनीषा रामदास (महिला एकेरी एसयू ५) आणि नित्या श्री सिवन (महिला एकेरी एसएच ६ श्रेणी) यांना प्रत्येकी ७ लाख ५० हजार रुपये मिळतील.

तुलसीमती, मनीषा आणि नित्या यांनी पॅरालिम्पिकमध्ये पदक जिंकणाऱ्या पहिल्या भारतीय महिला बॅडमिंटनपटू बनून इतिहास घडविला.

बीएआय सरचिटणीस संजय मिश्रा म्हणाले, भारतीय पॅरा बॅडमिंटनपटू जागतिक स्तरावर सातत्याने चांगली कामगिरी करत आहेत आणि रोख पारितोषिक म्हणजे पॅरालिम्पिकमध्ये देशाला पदक जिंकून देण्यात त्यांच्या प्रयत्नांची दखल घेण्याचा बीएआयचा मार्ग आहे.

ते म्हणाले, बीएआय देशभरात पॅरा बॅडमिंटनचा विकास आणि प्रचार करण्यासाठी कटिबद्ध आहे आणि या खेळाडूंना अधिक यश मिळविण्यात मदत करत आहे. खेळाडूंच्या व्यस्त स्पर्धेचे वेळापत्रक लक्षात घेता, बीएआय या खेळाडूंचे अभिनंदन करण्यासाठी आणि त्यांच्या सतत विकासासाठी आवश्यक असलेल्या गरजा समजून घेण्यासाठी त्यांच्याशी एक आभासी संवाद सत्र देखील आयोजित करेल. (वृत्तसंस्था)

बांगलादेशविरुद्धचा चेन्नई येथील पहिला कसोटी सामना जिंकल्यानंतर भारतीय संघ कानपूर येथे होणाऱ्या दुसऱ्या कसोटी सामन्यासाठी दाखल झाला. भारताचा कर्णधार रोहित शर्मा, शुभमन गिल आणि तडाखेबंद फलंदाज विराट कोहली हॉटेलमध्ये दाखल होताना. ही कसोटी २७ सप्टेंबरपासून कानपूर येथील ग्रीन पार्क स्टेडियमवर होणार आहे.

निवडणुकांविरोधातील याचिकेवर भूमिका मांडा

दिल्ली हायकोर्टाची एआयटीएला नोटीस

◆ **नवी दिल्ली, २४ सप्टेंबर**

दिल्ली उच्च न्यायालयाने मंगळवारी ऑल इंडिया टेनिस असोसिएशनला (एआयटीए) या महिन्याच्या अखेरीस होणाऱ्या निवडणुकांविरोधातील याचिकेवर आपली भूमिका मांडण्यास सांगितले. ही निवडणूक क्रीडा संहितेचे कथित उल्लंघन असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

न्यायमूर्ती पुरुषेंद्र कुमार कौरव यांनी माजी भारतीय एकेरी टेनिसपटू सोमदेव देववर्मन आणि दुहेरीचा खेळाडू पूरव राजा यांच्या याचिकेवर क्रीडा संस्था आणि केंद्राला नोटीस बजावली आणि निवडणूक याचिकेच्या निकालाच्या अधीन असेल असे सांगितले.

या टप्प्यावर निवडणुकीला स्थगिती देण्यास नकार देत न्यायमूर्ती पुरुषेंद्र यांनी २८ सप्टेंबर रोजी होणाऱ्या निवडणुकीचे निकाल जाहीर केले जाणार नाहीत, असा निर्देशही दिला.

याचिकाकर्त्यांतर्फे उपस्थित असलेल्या वरिष्ठ वकिलांनी युक्तिवाद केला की एआयटीए ‘वेबसाईटवर काहीही नव्हते’ म्हणून ‘गुप्त पद्धतीने’ निवडणुका घेत आहे.

निवडणुकीला स्थगिती मागताना ज्येष्ठ वकील म्हणाले की, एआयटीएचे वर्तन हे क्रीडा संहितेचे आणि हायकोर्टाने दिलेल्या निकालांचे घोर उल्लंघन आहे. न्यायालयाने याचिकाकर्त्याला या प्रकरणात निवडणूक रिटर्निंग ऑफिसरला दोष देण्यास सांगितले आणि प्रतिवादींना त्यांचे उत्तर दाखल करण्यास सांगितले. या प्रकरणाची पुढील सुनावणी १४ ऑक्टोबर रोजी होणार आहे. (वृत्तसंस्था)

नवीन सचिवाच्या नियुक्तीवर मंथन होणार नाही

बीसीसीआयची आज अनेक मुद्यांवर चर्चा

◆ **नवी दिल्ली, २४ सप्टेंबर**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळ बुधवारी बोर्डाच्या कामकाजाशी संबंधित अनेक मुद्यांवर चर्चा करणार आहे, परंतु निवर्तमान सचिव जय शाह यांच्या जागी नवीन सचिवाची नियुक्तीचा बैठकीच्या अजेंड्याचा भाग नसल्याचे समजते.

पाच दिवस बंगळुरू येथे होणाऱ्या बोर्डाच्या ९३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेपूर्वी सर्वोच्च परिषदेची ही शेवटची बैठक असेल. शाह यांची आयसीसी अध्यक्षपदी एकमताने निवड झाल्यानंतर नव्या सचिवाची नियुक्ती आवश्यक झाली आहे. तथापि, आगामी एजीएम दरम्यान ते बीसीसीआय सचिव म्हणून ते कायम राहतील, कारण त्यांना १ डिसेंबरपासून आयसीसीमध्ये त्यांचे नवीन पद स्वीकारायचे आहे.

परंतु नामनिर्देशन प्रक्रियेवरील चर्चा देखील सर्वोच्च परिषदेच्या अजेंडावर सूचीबद्ध केलेल्या आठ बाबींचा भाग नाही ज्यामध्ये बायजूच्या प्रकरणावरील अद्यतनाचा समावेश आहे.

पेमेंट सेटलमेंटबाबत बीसीसीआयचा त्याच्या माजी टायटल स्पॉन्सर बायजूसोबत वाद आहे. अडचणीत आलेल्या एडटेक फर्मने गेल्या वर्षी मार्चमध्ये बीसीसीआयसोबतचा प्रायोजकत्व करार संपवला होता.

बायजू रवींद्रन यांनी सह-स्थापित केलेल्या बंगळुरूस्थित कंपनीने सुरुवातीला मार्च २०१९ मध्ये तीन वर्षांसाठी जर्सी प्रायोजकत्व करारावर स्वाक्षरी केली, जी नंतर ५५ दशलक्ष रकमेसाठी आणखी एका वर्षासाठी वाढविण्यात आली. (वृत्तसंस्था)

जीवन, विजय हँगझोऊ स्पर्धेचे विजेते

भांबरी-ऑलिवेट्टी उपविजेते

◆ **नवी दिल्ली, २४ सप्टेंबर**

भारताच्या जीवन नेदुंचेझियान आणि त्याचा जोडीदार विजय सुंदर प्रशांत यांनी मंगळवारी हँगझोऊ खुल्या अजिंक्य स्पर्धेत पुरुष दुहेरीत पहिले एटीपी विजेतेपद जिंकले, तर युकी भांबरी आणि त्याचा साथीदार फ्रान्सचा अल्बानो ऑलिवेट्टी यांनी पुरुष दुहेरीत विजेतेपद पटकावले.

जीवन आणि विजय या गैरमानांकित भारतीय जोडीने कॉन्स्टँटिन फ्रँटझेन आणि हेंड्रिक जेबेन्स या गैरमानांकित जर्मन जोडीचा एक तास मिनिटे चाललेल्या लढतीत ४-६, ७-६ (५), १०-७ असा पराभव केला.

त्याच्या पस्तीस वर्षांच्या कारकीर्दीतील हे त्याचे दुसरे एटीपी टूर स्तरावरील विजेतेपद आहे. त्याने २०१७ मध्ये रोहन बोपण्णासोबत चेन्नई ओपन जिंकली. विजयचे हे एटीपी टूरमधील पहिले विजेतेपद आहे.

सुरुवातीचा सेट गमावल्यानंतर भारतीय जोडीने शानदार पुनरागमन करत दुसरा सेट जिंकून सामना टायब्रेकपर्यंत नेला. टायब्रेकमध्ये भारतीय जोडी १०-७ अशी पुढे होती. जीवन आणि विजय या जोडीने त्यांच्या सर्व्हिसवर गुणांचे रूपांतर केले.

तत्पूर्वी, भांबरी आणि ऑलिवेट्टी या जोडीला चेंगडू ओपनच्या रोमांचक अंतिम फेरीत सॅडिओ डुम्बिया आणि फॅबियन रेबोल या अव्वल मानांकित फ्रेंच जोडीकडून पराभव पाहावा लागला.

सुमारे दीड तास चाललेल्या या सामन्यात सुरुवातीचा सेट गमावल्यानंतर भांबरी आणि ऑलिवेट्टी यांनी दुसरा सेट जिंकून सामना टायब्रेकवर नेला.

भारत आणि फ्रान्सच्या खेळाडूंच्या जोडीने त्यांच्या प्रतिस्पर्ध्याच्या दोन एसेसच्या तुलनेत सहा एसेस मारले पण सहा डबल फॉल्ट त्यांना महागात पडले. फ्रेंच जोडीचा भांब्री-ऑलिवेट्टीवरचा हा पहिला विजय होता. भांबरी आणि ऑलिवेट्टी या जोडीने एप्रिलमध्ये म्युनिकमध्ये बीएमडब्ल्यू ओपन आणि मेमध्ये गस्टाडमध्ये स्विस ओपन जिंकले होते. (वृत्तसंस्था)

चषकासह जीवन नेदुंचेझियान आणि विजय सुंदर

विष्णू, प्रज्वल, रश्मिका आकर्षणाचे केंद्र

राष्ट्रीय टेनिस स्पर्धा

◆ **नवी दिल्ली, २४ सप्टेंबर**

आशियाई क्रीडा स्पर्धेत बहुपदक विजेते विष्णू वर्धन, अव्वल मानांकित प्रज्वल देव आणि गतविजेती रश्मिका एस भामिदिपाठी हे २८ सप्टेंबरपासून येथील डीएलटी कॅम्पसमध्ये होणाऱ्या २९ व्या फेनेस्टा खुल्या राष्ट्रीय टेनिस स्पर्धेत आकर्षणाचे केंद्र असतील.

इतर शीर्ष नावांमध्ये भारताची माजी नंबर दोन रिया भाटियाचा समावेश आहे. या स्पर्धेत वरिष्ठ गटाव्यतिरिक्त १८ वर्षांखालील, १६ वर्षांखालील आणि १४ वर्षांखालील मुले व मुलींच्या स्पर्धाही होणार आहेत.

स्पर्धेच्या सुरुवातीच्या आठवड्यात पुरुष, महिला, १८ वर्षांखालील मुले आणि १८ वर्षांखालील मुलींचे एकेरी आणि दुहेरीचे सामने होतील.

पात्रता फेरीचे सामने २८ ते २९ सप्टेंबरला होतील तर मुख्य ड्रॉचे सामने ३० सप्टेंबर ते ५ ऑक्टोबर दरम्यान खेळवले जातील. ६ ते १२ ऑक्टोबर या कालावधीत १६ वर्षांखालील आणि १४ वर्षांखालील मुला-मुलींचे सामने होणार आहेत. स्पर्धेची एकूण बक्षीस रक्कम २१ लाख ५५ हजार रुपये आहे. (वृत्तसंस्था)

सेंट जोसेफ स्कूलला दुहेरी मुकट

शालेय फुटबॉल स्पर्धेतील कामगिरी

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २४ सप्टेंबर-

शालेय फुटबॉल स्पर्धेत सेंट जोसेफ स्कूलने १७ वर्षाखालील मुले आणि १४ वर्षाखालील मुलींच्या गटात विजेतेपद पटकावले. १७ वर्षाखालील मुली आणि १४ वर्षाखालील मुलांच्या गटात त्यांना उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. वालचंद कॉलेजच्या मैदानावर झालेले या स्पर्धेत सेंट जोसेफ हायस्कूल पहिल्यापासूनच आघाडीवर होती. १७ वर्षाखालील मुलांच्या गटात शांती इंग्लिश स्कूलचा पेनल्टी मध्ये पराभव करत विजेतेपद पटकावले. कर्णधार वसंत वाघमोडे याने केलेल्या एकमेव गोलच्या जोरावर सामन्यात १-० ने आघाडीवर असलेल्या सेंट जोसेफ हायस्कूलने शेवटपर्यंत सामना रंगतदार केला. परंतु सामन्याला काही मिनिटे शिल्लक असताना शांती इंग्लिश मीडियम स्कूलच्या खेळाडूंनी फ्री किकवर गोल करत सामना बरोबरीत आणला. त्यानंतर पेनल्टी मध्ये ३-० फरकाने सेंट जोसपने अंतिम सामना जिंकला. गोलकी अथर्व बोरकर याने शानदार कामगिरी केली. त्या अगोदर बटरफ्लाय इंग्लिश स्कूलचा ५-०, राज स्कूलचा ४-०,आय एम एस चा २-०, आणि हरिभाई हायस्कूलला २-० या फरकाने सेंट जोसेफ स्कूलने हरवले.

१४ वर्षाखालील मुलींच्या गटात कर्णधार स्वरा पेंटर हिच्या नेतृत्वाखाली विजेतेपद पटकावले. १४ वर्षाखालील मुलींच्या गटात कर्णधार जॉन पिल्ले तर १७ वर्षाखालील मुलींच्या गटात कर्णधार नंदिनी पवार हीच्य नेतृत्वाखाली उपविजेतेपद पटकावले.

या खेळाडूंना क्रीडा शिक्षक सनी भोसले यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल हायस्कूलचे फादर आनंद गायकवाड यांनी सर्व खेळाडूंचे अभिनंदन केले.

वाघमोडेचे सर्वाधिक गोल

सेंट जोसेफचा कर्णधार वसंत वाघमोडे यांनी सर्वाधिक ११ गोल केले. बटरफ्लाय विरुद्ध ५, राज मेमोरियल २, आय एम एस १, हरीभाई १, शांती इंग्लिश मीडियम विरोधात १ आणि पेनल्टी १ असे गोल केले.

व्यायामशाळेमुळे विद्यार्थ्यांचे आरोग्य निरोगी

संग्रामसिंह मोहिते-पाटील यांचे प्रतिपादन

तभा वृत्तसेवा,
अकलूज, दि. २४ सप्टेंबर-

महर्षि खुली व्यायामशाळेचे विद्यार्थ्यांचे आरोग्य निरोगी व तंदुरुस्त राहील, असे प्रतिपादन शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील यांनी केले.

महर्षि शंकरराव मोहिते प्रशाला यशवंतनगर येथे संग्राम सिंह जयसिंह मोहिते-पाटील अध्यक्ष शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज यांच्या हस्ते महर्षि खुली व्यायाम शाळेचे उद्घाटन झाले. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी सदाशिवराव माने विद्यालय अकलूज प्रशाला समिती सदस्य मनोज रेळेकर, सभापती ॲड. नितीनराव खराडे, महर्षि प्रशाला मुख्याध्यापक संजय गळीतकर, महर्षि जिम खाना कार्याध्यक्ष अनिल जाधव उपस्थित होते. उद्घाटनाप्रसंगी शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज संस्थेचे अध्यक्ष संग्रामसिंह जयसिंह मोहिते पाटील तसेच सर्व मान्यवरांचा सत्कार समारंभ मुख्याध्यापक संजय गळीतकर यांच्या हस्ते झाला. महर्षि प्रशालेने मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा योजनेत सलग दोन वर्ष माळशिरस तालुक्यात प्रथम क्रमांक व चालू वर्षी जिल्हास्तरावर द्वितीय क्रमांक पटकावला याबद्दल सर्वांचे अभिनंदन केले. प्रशालेत झालेल्या नवीन भौतिक सुविधा, विद्यार्थ्यांच्या हस्ताक्षरातील तक्ते ,वर्ग सजावट, विद्यार्थ्यांनी काढलेली सुंदर चित्रे पाहूनसर्व विद्यार्थी, पालक व शिक्षकांचे कौतुक केले. कार्यक्रमास प्रशाला समिती सदस्य कैलास चौधरी, नितीन इंगवले देशमुख, विनोद जाधव, मुख्याध्यापिका अनिता पवार उपस्थित होते. सूत्रसंचालन किरण सूर्यवंशी यांनी केले. आभार मुख्याध्यापक शिवाजी पारसे यांनी मानले.

महर्षि संकुल
खुली व्यायाम शाळा

संक्षिप्त वृत्त

श्रीराम जन्मोत्सव सोहळा

जागृती नवरात्र मंडळात यंदा शिंपी समाजास सहसचिवपद

सोलापूर, दि. २४ सप्टेंबर-

जागृती नवरात्र मंडळाची नुकतीच ट्रस्टी समितीची सभा पार पडली. यंदाच्या वर्षी नियुक्ती झालेल्या ट्रस्टी सभासदांमध्ये आपल्या शिंपी समाजाला मान मिळाला आहे. नेहमीच आपल्या संयमी व शांत स्वभावाने सुपरिचित असणाऱ्या आणि नामदेव शिंपी समाजाच्या प्रत्येक कार्यक्रमात हिरीरीने सहभागी होणाऱ्या शाहीर वस्ती परिसरातील शिवराज नगरकर यांची जागृती नवरात्र मंडळाच्या ट्रस्टी सहसचिवपदी निवड झाली आहे. यावेळी समाजातील सर्वश्री नामदेव जवंजाळ, प्रा.संजय जवंजाळ, मुकुंद सूत्रावे, तुळशीदास जवंजाळ, बाळकृष्ण राशीनकर,प्रकाश भडंगे, भागवत मानकूसकर, प्रकाश केकडे, नामदेव उंडाळे,अक्षय भडंगे आदी समाज बांधवानी श्रीयुत शिवराज नगरकर सर यांचा फेटा बांधून सत्कार केला. सूत्रसंचालन राजेश केकडे यांनी केले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

रश्मी ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त हळदी-कुंकुचा कार्यक्रम

सोलापूर, दि. २४ सप्टेंबर-

सोलापूर शिवसेना महिला आघाडीच्या वतीने रश्मी उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त श्री महालक्ष्मी मंदिर येथे कुंकू अर्चना व पूजा महाआरती शिवसेना उपनेते अस्मिता गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आली. तसेच उपनेत्या अस्मिता गायकवाड यांनी भगव्या साड्यांनी सुवासिनींच्या ओठ्याही भरून रश्मी ठाकरे यांच्या सर्व मनोकामना पूर्ण व्हाव्यात तसेच, उद्धव ठाकरे हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व्हावेत असे साकडेही श्री महालक्ष्मीच्या चरणी घातले. लोकसभा क्षेत्र संघटिका शशिकला चिवडशेट्टी,शहर संघटिका प्रीती नायर उपजिल्हा संघटिका मंगल मोरे, सुनीता लोंढे मध्यच्या विधानसभा संघटिका सुनंदा माने, उपशहर संघटक नागू कनमुषे, ज्योती माळवतकर, जयश्री पाटील, प्रभावती येलगुंडे, दिपाली पवार,सोनाली भोसले, अनिता राठोड, शहनाज गायकवाड, नागमणी भंडारी, प्रियांका वाघमोडे, विभाग प्रमुख- मीना लोंढे, सुमन रुपनर, लमुशा देवकुळे, संगीता देवकुळे, कविता चव्हाण,पूजा खराडे, सुरेखा सिरसागर आदी महिला पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या

महिला व मुलींना सशक्तीकरणास चालना देण्यासाठी रोजगार निर्मितीचे आयोजन

सोलापूर, दि. २४ सप्टेंबर-

महिला व बाल विकास विभागामार्फत महिला व मुलींना रोजगार निर्मितीस चालना देणे, त्यांचे आर्थिक, सामाजिक पुनर्वसन करणे, स्वावलंबी, आत्मनिर्भर करणे, सशक्तीकरणास चालना देण्यासाठी तसेच महिला व मुली यांचा सुरक्षित प्रवास होणे यासाठी पिंक (गुलाबी) ई-रिक्षा ही योजना सुरु केली आहे. सदर योजनेनुसार सोलापूर शहरातील २०० पात्र महिलांना लाभ देण्याचे लक्ष निश्चित केले आहे. या योजनेनुसार ७० टक्के कर्ज बैंकेमार्फत उपलब्ध करुन दिले जाणार असून राज्य शासन २० टक्के आर्थिक भार उचलनार आहे व १० टक्के रक्कम लाभार्थि यांना भरावयाची आहे. पिंक ई-रिक्षा हा महिलांनीच चालवायचा आहे. या योजनेसाठी पात्रता- लाभार्थीचे कुटुंब महाराष्ट्र राज्याचे रहिवाशी असावे,अर्जदार महिलेचे वय २०-४० वर्षे दरम्यान असावे,अर्जदार महिलेचे बैंक खाते असावे, लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु.३ लाखापेक्षा जास्त नसावे. तरी ईच्छुक पात्र महिलांनी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, सी.एस.नं.१६०८/०९, प्लॉट नं.१२ पहिला मजला, शोभा नगर, सात रस्ता, बिग बझारच्या पाठीमागे,सोलापूर येथे अर्जाचा नमूना व अधिक माहिती साठी संपर्क साधावा असे अवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी. यांचे मार्फत करण्यात येत आहे.

निधन वार्ता

सुरेश पाटील

बार्शी, दि. २४ सप्टेंबर-

येथील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शीचे कार्यकारिणी सदस्य सुरेश (बप्पा) बापूराव पाटील वय ७४ यांचे सोमवार दि. २३ रोजी रात्री १०:३० वा. अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शीचे संस्थापक कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांचे सहकारी बापूराव पाटील यांचे ते सुपुत्र होत. कर्मवीरांच्या विचारांमुळे, निर्भीडता, निर्णयक्षमता, हजरजबाबीपणा, परखडता या त्यांच्या गुणांमुळे सुरेश पाटील नेहमीच अनेकांचे प्रेरणास्थान राहिले. पाटील हे १५ वर्षे कार्यकारिणी सदस्य राहिले आहेत. तालुक्यातील कासारवाडी येथे त्यांच्यावर अंत्यविधी करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, चार मुली, सुना, जावाई, नातवंडे असा परिवार आहे.

मयुरेश चिकोडी

सोलापूर, दि. २४ सप्टेंबर-

मयुरेश शिरीष चिकोडी (वय २४) यांचे ऋदय विकाराच्या झटक्याने पुणे येथे निधन झाले. त्यांच्यावर मोदी स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात वडिल, आई, आजी, भाऊ असा परिवार आहे. शिरीष चिकोडी यांचे ते पुत्र होत.

लक्ष्मीबाई उरट

सोलापूर, दि. २४ सप्टेंबर-

लक्ष्मीबाई विठ्ठल उरट वय (७३ वर्षे) रा. अशोक चौक, नरसिंह मंदीर जवळ यांचे आज दुपारी ३: ४५ वाजता निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, सूना, नातवंडे असा परिवार आहे.

पालिकेत निष्ठेने काम करा : आयुक्त तेली-उगले

अनुकंपा तत्वावर ५९ वारसांना नियुक्तीपत्र प्रदान

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २४ सप्टेंबर-

अनुकंपा तत्वावर वारसांना जी नोकरी मिळाली ती त्यांनी व्यवस्थित करावी. तुमच्या ज्ञानाचा लाभ महापालिका प्रशासनाला व्हावा. महापालिकेचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी. महापालिका एक कुटुंब म्हणून उत्तमरीत्या, प्रामाणिकपणे आणि निष्ठेने आपले काम करा, असे मार्गदर्शन महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांनी केले.

सोलापूर महापालिकेतील मयत कर्मचाऱ्यांच्या ५९ वारसांना अनुकंपा तत्त्वावर नियुक्ती पत्र प्रदान कार्यक्रम आज दुपारी महापालिका सभागृहात पार पडला. त्याप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी विचारमंचावर महापालिका उपायुक्त आशिष लोकरे, तैमूर मुलाणी, सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले, गिरीश पंडित , मुख्य लेखापाल डॉ. राजरत्न जवळगेकर, मुख्य लेखा परीक्षक रूपाली कोळी आदी मान्यवर उपस्थित होते. महापालिका आयुक्त शीतल तेली- उगले पुढे म्हणाल्या, सोलापूर महापालिकेच्या माध्यमातून महापालिकेत आतापर्यंत नवी भरती, लाड - पागे समिती व अनुकंपा असे सर्व मिळून जवळपास ५०० लोकांना कायम नियुक्ती दिली आहे. इतिहासात प्रथमच इतक्या संख्येने नियुक्त्या देण्यात आल्या आहेत. या नव नियुक्त कर्मचाऱ्यांना नवीन पेन्शन योजना लागू राहणार आहे. दोन वर्ष प्रोबेशनवर काम करावे लागेल. महापालिकेचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी. निष्ठेने, प्रामाणिकपणे काम करावे. महापालिका कुटुंबात स्वागत करतानाच काम व्यवस्थित न केल्यास कामावरून काढण्यात येईल, असा धोक्याचा इशाराही महापालिका आयुक्त तेली-उगले यांनी दिला. प्रारंभी सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांनी स्वागत केले. तर प्रास्ताविक व आभार प्रदर्शन उपायुक्त आशिष लोकरे यांनी केले.

कोविड काळात मयत कर्मचारी वारसास ५० लाखाचा धनादेश प्रदान

कोविड काळात कर्तव्यावर असताना मयत झालेल्या कर्मचारी वारसास शासन निर्देशानुसार ५० लाखाचे सानुग्रह अनुदान देण्यात येते. त्या अंतर्गत मयत बिगारी कर्मचारी नागनाथ शिवशरण यांच्या वारस सखुबाई नागनाथ शिवशरण यांना ५० लाखाचा सानुग्रह सहाय्य अनुदानाचा धनादेश आयुक्त शितल तेली - उगले यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

उपायुक्त लोकरे, भोसले यांच्यासह अधिकाऱ्यांचे केले कौतुक !

महापालिका प्रशासनात सुमारे ५०० जणांना कायम नियुक्त्या दिल्या आहेत. ही प्रक्रिया यशस्वी करण्यासाठी महापालिकेचे उपायुक्त आशिष लोकरे, सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले, सामान्य प्रशासन विभागाचे अधीक्षक लक्ष्मीनारायण दोंतुल व या विभागाने अथक परिश्रम घेतले. त्यामुळे आजचा कार्यक्रम घेण्यात येत आहे असे सांगत या सर्व अधिकाऱ्यांचे महापालिका आयुक्त उगले यांनी कौतुक व अभिनंदन केले.

शैक्षणिक पात्रतेनुसार त्या-त्या विभागात दिल्या नियुक्त्या : उपायुक्त लोकरे

अनुकंपा तत्वावर नियुक्तीपत्र देण्याची प्रक्रिया नेटक्या पद्धतीने पार पडली. छोट्या छोट्या गोष्टीचाही विचार करण्यात आला. प्राधान्याने वारसांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार पालिकेतील विविध विभागात अनुषंगिक पदावर त्यांना नियुक्त करण्यात आले आहे. एम.एस. झूलॉजीची पदवी असलेल्या वारसास प्राणिसंग्रहालयात तर बी. ई. कॉम्प्युटर असलेल्या संबंधितास संगणक विभागात नियुक्त करण्यात आले असल्याचे उपायुक्त आशिष लोकरे यांनी नमूद केले.

राज्यातील कोतवालांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा द्या!

- महाराष्ट्र राज्य कोतवाल संघटनेचे धरणे आंदोलन

तभा वृत्तसेवा,
सोलापूर दि. २४ सप्टेंबर-

सोलापूर जिल्हा कोतवाल संघटना यांच्यावतीने विविध प्रलंबित मागण्यासाठी सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले.

संघटनेच्या प्रमुख मागण्यांमध्ये कोतवाल कर्मचाऱ्यांना चतुर्थश्रेणी कर्मचारी दर्जा देण्यात यावा, कोतवाल कर्मचाऱ्यांचे पदनाम बदलून महसूल सेवक करण्यात यावे, कोतवाल कर्मचाऱ्यांना तलाठी व महसूल सहाय्यक या तत्सम पदांमध्ये पदोन्नती देण्यात यावी, सर्व कोतवाल कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधी देण्यात यावे, कोतवाल कर्मचाऱ्यांना अनुकंपा लागू करण्यात यावा. अशा विविध प्रलंबित मागण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर विविध घोषणा देत आंदोलन करण्यात आले. यावेळी अनिल जाधव, कृष्णा शिंदे, राहुल तोडकरी, मल्लिनाथ बाळगी , भगवान पारसी, गोरख ढोबळे , प्रल्हाद खरे, गुरुदास आरणे, बंदेनवाज दफेदार, प्रवीण बाबर, भारत चंदनशिवे, रवी धेंडे, रशीद शेख, नवनाथ इंगोले, शहाजी हुलगे, शिवाजी काळे, आनंद इंगळे, अर्जुन सोनके, दयानंद क्षीरसागर, आदिसह संघटनेचे पदाधिकारी सदस्य आणि कोतवाल कर्मचारी उपस्थित होते.

> महाराष्ट्र राज्य कोतवाल संघटनेच्या राज्यस्तरीय विविध प्रलंबित मागण्यांबाबत शासनाने येत्या दोन दिवसात दखल न घेतल्यास शासनाचे लक्ष वेधून घेण्यासाठी गुरुवार (दि.२६) सप्टेंबर रोजी आझाद मैदान मुंबई येथे मागण्या मान्य होईपर्यंत बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येईल.
>
> **- विठ्ठल गुरव, जिल्हाध्यक्ष**
> महाराष्ट्र राज्य कोतवाल संघटना शाखा सोलापूर.

राज्याबाहेर अस्तित्व निर्माण करणाऱ्या गलाई बांधवांचा अभिमान

माजी आ. दीपक साळुंखे-पाटील यांचे कोलकत्ता येथे प्रतिपादन

तभा वृत्तसेवा,
सांगोला, दि.२४ सप्टेंबर-

राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष दीपक साळुंखे-पाटील हे कोलकत्ता दौऱ्यावर गेले होते. यावेळी नेताजी सुभाषचंद्र बोस आंतरराष्ट्रीय विमानतळावर त्यांचे महाराष्ट्रातील गलाई बांधवांनी स्वागत केले. त्यानंतर त्यांनी कालीमातेचे दर्शन घेऊन कोलकत्ता येथील अग्रेसन सेवा समिती हॉलमध्ये गलाई बांधवांशी संवाद साधला. गलाई बांधवांनी त्यांचा सन्मान केला.

यावेळी आसाम राज्य गलाई संघटनेचे अध्यक्ष सुभाष बाबर तसेच पश्चिम बंगाल गलाई संघटनेचे अध्यक्ष अनिल शिंदे यांच्यासह उद्योजक संजय दिघे, रामदाजी चव्हाण, उत्तमराव जरे, महादेव जरे, दत्तात्रय बुलबुले, विनोद पवार व आसाम आणि पश्चिम बंगाल या दोन्ही राज्यातील हजारो मराठी गलाई बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गलाई बांधवांनी अनेक वर्ष प्रलंबित असणाऱ्या मागण्यांचे निवेदन दीपक साळुंखे-पाटील यांना दिले. साळुंखे-पाटील म्हणाले, ज्या पद्धतीने सांगोल्याच्या डाळिंबाने आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत आपली ओळख निर्माण करून सांगोल्याचे नाव जगाच्या नकाशावर उज्ज्वल केले. त्याच पद्धतीने सांगोला तालुक्यातील गलाई बांधवांनी देशभर आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटवून सांगोला तालुक्याची देशाच्या नकाशात ठळक ओळख निर्माण केली. राज्याच्या बाहेर आपले वेगळे अस्तित्व निर्माण करणाऱ्या बांधवांचा आपल्याला सार्थ अभिमान आहे. देशभरात पसरलेल्या सर्व गलाई बांधवांच्या वर्षानुवर्ष प्रलंबित असणाऱ्या मागण्या पूर्ण करण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष दिपक साळुंखे-पाटील यांनी सांगितले.

> **महाराष्ट्र भवन उभारणार :** देशभरातील गलाई उद्योगाचा लघुउद्योगामध्ये समाविष्ट करण्यासाठी आपण शासन दरबारी प्रयत्न करू तसेच राज्याच्या बाहेर चोरीचे सोने घेतले असा बनाव करून अनेक गलाई बांधवांना बाहेरील पोलिसांकडून नाहक त्रास दिला जातो. यावरही तात्काळ उपाय योजना केल्या जातील आणि गलाई बांधवांसाठी प्रत्येक राज्यात स्वतंत्र महाराष्ट्र भवन उभा करण्यासाठी आपण प्रयत्नशील राहू असे अभिवचनही दीपक साळुंखे-पाटील यांनी दिले.

CBSE South Zone- II
Handball Tournament
2024-25
U-14, U-17 and U-19 Boys & Girls
September 2024

स्त्री सन्मानाचा विषय प्रत्येक खेळाडूच्या मनात रुजावा : नवले

- मुला-मुलींचे १०७ संघ; १४६० स्पर्धक सहभागी
- हँडबॉल टूर्नामेंटची धुरा सिंहगडच्या महिलांच्या हाती

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २४ सप्टेंबर-

'एक पाऊल स्त्री सन्मानाकडे' या संकल्पनेचा वापर करून यंदाच्या स्पर्धा पार पाडणार आहेत. स्त्री सन्मानाचा विषय प्रत्येक नागरिकांच्या व खेळाडूच्या मनात रुजावा, असा या संकल्पनेचा हेतू असल्याने संपूर्ण स्पर्धेची धुरा सिंहगड पब्लिक स्कूल व ज्युनियर कॉलेजच्या महिलांनी उचलल्याची माहिती संस्थेचे कॅम्पस डायरेक्टर, महाराष्ट्र हँडबॉल असोसिएशनचे अध्यक्ष व सोलापूर जिल्हा व्हॉलीबॉल असोसिएशनचे अध्यक्ष संजय नवले यांनी उद्घाटन प्रसंगी मत व्यक्त केले.

दरम्यान,कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सोलापूर शहराचे पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांनी कार्यक्रमाचे उद्घाटन झाल्याचे जाहीर केले. पोलीस आयुक्त मा. एम. राजकुमार यांनी आपल्या अध्यक्ष भाषणात त्यांच्या शालेय व कॉलेज जीवनातील त्यांनी स्पर्धा प्रकारामध्ये घेतलेल्या सहभागाची आठवण करून देऊन सर्व स्पर्धकांना खेळ पाहुणेने खेळा असा संदेश दिला.

सीबीएसई साउथ झोन दोनच्या हँडबॉल टूर्नामेंट च्या स्पर्धेचे आयोजन दि. २० सप्टेंबर २०२४ रोजी सोलापूर केगाव येथील सिंहगड इन्स्टिट्यूट च्या भव्य आणि प्रशस्त प्रांगणात झाले. या स्पर्धेमध्ये एकूण तीन विभागातील संघ सहभागी झाले आहेत महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक, केरला येथून मुला मुलींचे १०७ संघ आणि जवळपास १४६० स्पर्धक सहभागी झाले आहेत.

हँडबॉल च्या एका टीम मध्ये एकूण १६ महिलां स्पर्धकचा समावेश आहे. त्याच धर्तीवर या हँडबॉल स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी सिंहगडच्या १६ महिलांनी जबाबदारी घेतलेली आहे व त्या अतिशय उत्तमरीत्या पार पाडत असल्याचे दिसून येत आहे. स्पर्धेचे अत्यंत सूक्ष्म आणि तपशीलवार नियोजनाने पर राज्यातून आलेल्या स्पर्धक संघांनी संस्थेचे आणि नियोजन करणाऱ्या शिक्षकांचे मनापासून कौतुक व अभिनंदन केले.

या कार्यक्रमाच्यावेळी सीबीएसई ध्वजाचे ध्वजारोहण कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सोलापूर शहराचे पोलीस आयुक्त एम. राज कुमार यांच्या हस्ते झाले. यानंतर सर्व संघांचे संचालन करण्यात आले. क्रीडाज्योत प्रज्वलित करून सिंहगडच्या विद्यार्थिनींनी त्याचे प्रांगणात प्रदर्शन केले. यानंतर सर्व संघांनी व स्पर्धकांनी क्रीडाशपथ घेतली. या कार्यक्रमाची खरी रंगत महाराष्ट्राच्या ठसकेबाज लावणीजोगवा या नृत्याने आणली.

या उद्घाटनाच्या सोपस्करानंतर महाराष्ट्राच्या लावणी व जोगवा या नृत्याने सर्वांनाच मंत्रमुग्ध करून अचंबित केले. यासोबतच आपली संस्कृती आणि परंपरेचे प्रतीक 'विठुरायाची वारी' या नृत्याने सर्वांना भारावून टाकले. या तीनही नृत्य प्रकारानंतर फ्युजन डान्सने सुद्धा स्पर्धकांना एक अनोखी अनुभूती दिली.

या उद्घाटन सोहळ्याप्रसंगी सिंहगड संस्थेचे कॅम्पस डायरेक्टर संजय नवले, सीबीएसई निरीक्षक प्रुणा श्रेष्ठा, एन.बी. नवले, इंजीनियरिंग कॉलेजचे प्राचार्य डॉ. शंकर नवले, फौजदार चावडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद माने, तसेच सिंहगड पब्लिक स्कूल कमलापुर सांगोला च्या प्राचार्या चैताली मराठे यांची प्रमुख उपस्थिती होती. हा उद्घाटन सोहळा यशस्वी करण्यासाठी सिंहगड पब्लिक स्कूल आणि जूनियर कॉलेजचे प्राचार्य निखत शेख व उपप्राचार्य प्रकाश नवले आणि सर्व शिक्षक वृंद, कर्मचारी यांनी श्रम घेतले.

प्राध्यापकांनी कुशल विद्यार्थी घडवावे : चितारी

- ए.जी.पाटीलअभियांत्रिकीमध्ये बीआयएम कार्यशाळा

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २४ सप्टेंबर-

प्राध्यापकांनी उद्योगाला चालना देणारे व व्यवसायाला उपयोगी पडणारे कुशल विद्यार्थी घडविण्याचा प्रयत्न करावा. व त्यासाठी सर्व संस्था प्रमुखांनी ही नैतिक जबाबदारी समजून अशा कार्यशाळा घेण्यास प्रोत्साहन दिल्यास प्रगत भारताचे स्वप्न लवकरच उतरेल.शिक्षक जर ज्ञानानी संपन्न असेल तर आपोआपच त्यांच्या हातून घडणारा विद्यार्थी हा सर्व गुण संपन्न असतो, असे प्रतिपादन इंजिनियर गोकुळ चितारी यांनी केले.

दरम्यान,शिक्षकांनी संगणकीय विषयाचे ज्ञान वाढवावे व त्याचा उपयोग विद्यार्थ्यांनी करावा, नवीन शोध लावणे तंत्रज्ञानाचा वापर करून रोजच्या जीवनातील समस्या सोडविणे व क्रिटिकल थिंकिंग वाढवण्यासाठी करावा. असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्हि.व्हि.पोतदार यांनी केले. बी. आय. एम. या तंत्रज्ञानाची माहिती करून घ्यावी. व त्याचा वापर स्थापत्य व यांत्रिकी विद्यार्थ्यांनी एम. ई. पी. मॉडलिंग साठी केला. तर उद्योग क्षेत्रात लागणारी कुशल कारागिराची कमतरता सहज भरून निघेल व इंजिनियर्स भेडसावणारी रोजगाराची समस्या ही सुटेल. असे मत टेक मंत्राचे प्रमुख रेवणकर यांनी केली.

यांत्रिकी अभियांत्रिकी मधील नवीन संगणक प्रणाली, बिल्डिंग इन्फॉर्मेशन, मॉडलिंग या विषयात पारंगत करण्यासाठी कार्यशाळा स्थापत्य अभियांत्रिकी विभागाच्या वतीने व टेड मंत्रा ऑटोडेस्क लर्निंग पार्टनर यांच्या संयुक्त विद्यमाने एक आठवड्याची प्रशिक्षण कार्य शाळा संपन्न झाली. या कार्यशाळेच्या उद्घाटन समारंभास एन्व्हायरो कन्सल्टंट चे प्रमुख इंजिनीयर गोकुळ चितारी व इंजिनियर आशुतोष पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. कल्याणी मामडयाल यांनी केले. व आभार प्रदर्शन प्रा. प्रशांत स्वामी यांनी केले कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विभाग प्रमुख प्रा.तृप्ती मसलेकर, प्रा. अनिल लिगाडे, प्रा. श्रीशैल बिराजदार, प्रा.विवेक भोगडे, प्रा. प्रवीण हेडगिरे, प्रा. रुकैया आडते, सोनाली दुधी व शुभम कानडे यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमासाठी संस्थेचे सचिव एस. ए. पाटील,विश्वस्त शिवानंद पाटील आणि कॅम्पस डायरेक्टर डॉ. एम. ए. चौगुले यांचे मार्गदर्शन लाभले.

कार्यशाळेत ४० शिक्षकांचा सहभाग...

या कार्यशाळेमध्ये सोलापूर जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील ४० प्राध्यापक सहभागी झाले होते. आर्किटेक्चर, स्ट्रक्चरल आणि एम.इ या विषयासंदर्भात ऑटोकॅड,रेव्हीट नेव्हीस वर्क या संगणकीय प्रणालीचा वापर करून प्रत्यक्ष संगणकावर प्रशिक्षण देण्यात आले.

CHANGE IN NAME
I hereby declare that my old name **Ashpak Mahebub Shaikh** has been changed to new name **Ashpak Mahibub Shaikh** (As per Adhar card) R/o-post - 192/115 Nale Plot, Barshi, Dist. Solapur
(Affi. no.- 45920)
Date - 23/09/2024

CHANGE IN NAME
I hereby declare that my old name **Ilasbi Mahiboob Shaikh** has been changed to new name **Ilasabi Mahibub Shaikh** R/o-post - 192/115 Nale Plot, Barshi, Dist. Solapur
(Affi. no.- 45919)
Date - 23/09/2024

CHANGE IN NAME
I hereby declare that my old name **Dastegir Makaji Shaikh** has been changed to new name **Dastgir Makaji Shaikh** R/o-post - 192/115 Nale Plot, Barshi, Dist. Solapur
(Affi. no.- 45919)
Date - 23/09/2024

CHANGE IN NAME
I hereby declare that my Old Name Mrs.CHANCHAL RAMESHCHANDRA DEDHIA has been changed to New Name **Mrs.CHANCHAL RAMESH DEDHIA**and residing At-101, MANDAR APPARTMENT,RAILWAY LINES,SOLAPUR,Dist. SOLAPUR-413001. Kindly Note The Same

CHANGE IN NAME
I hereby declare that my Old Name Mrs.RIMPLE KUSHAL DEDHIA has been changed to New Name **Mrs.RIMPLE KHUSHAL DEDHIA** and residing At-101,MANDAR APPARTMENT, RAILWAY LINES,SOLAPUR, Dist. SOLAPUR-413001. Kindly Note The Same

CHANGE IN NAME
I hereby declare that my Old Name Mr.KHUSHALCHANDRA RAMESHCHANDRA DEDHIA has been changed to New Name **Mr.KHUSHAL RAMESH DEDHIA** and residing At-101, MANDAR APPARTMENT, RAILWAY LINES,SOLAPUR, Dist. SOLAPUR-413001.Kindly Note The Same.

हालचिंचोळी तलाव कोरडाच

●उजनीचे पाणी तलावात सोडण्याची मागणी

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २४ सप्टेंबर-

सप्टेंबर महिना संपला तरीही हालचिंचोळील तलाव अद्यापही कोरडाच आहे. त्यामुळे उजनी धरणातून या तलावात पाणी सोडून तो भरूण देण्याची मागणी ग्राम स्थांच्यावतीने जिल्हा प्रशासनाकडे करण्यात आली आहे.

अक्कलकोट तालुक्यातील हालचिंचोळी येथील तलाव हा हालचिंचोळी, कर्जाळ, आचेगाव येथील पाणीपुरवठा करणारा तलाव म्हणून ओळखले जातो. सर्वत्र चांगला पाऊस झाला आहे, तरी आजपर्यंत तलाव कोरडा असल्याने तिन्ही गावाचा पाणी पिण्याचा प्रश्न अत्यंत गंभीर आहे. त्यासाठी एकरूख सिंचन तर्फे उजनी ते कुरनूर धरण पाणी जात आहे. तेथून हालचिंचोली पाझर तलाव तलावात पाणी सोडावे अशी मागणी या तिन्ही गावच्या ग्रामस्थांनी केली आहे. तिन्ही गावचे सरपंच व नागरिक यांनी उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर यांना निवेदन देऊन पाणी सोडण्याची मागणी केली. यावेळी सरपंच श्रीशैल माशाळे, सरपंच मल्लिनाथ डब्बे, आचेगावचे उपसरपंच रफिक मुल्ला, माजी सरपंच मानव घोडके, तंटामुक्त अध्यक्ष शिवानंद खांडेकर, मलकारी संभूभैरे, कुमार वाघमारे, राजू दुलंगे, तंबाके उपस्थित होते.

जिल्ह्यात अंगणवाडी ताईची १८७ तर मदतनिसांची ६५० पदे रिक्त

● २ हजार ७४८ अंगणवाड्यांना स्व-मालकीच्या इमारती

● १ हजार ३२८ अंगणवाड्यांनी घेतला अन्यत्र आधार

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २४ सप्टेंबर

एकात्मिक बालविकास सेवा योजनेअंतर्गत सोलापूर जिल्हा परिषद महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने जिल्ह्यात ४ हजार ७६ अंगणवाड्या चालवल्या जातात. या अंगणवाड्यांच्या माध्यमातून तीन ते सहा वर्ष वयोगटातील १ लाख १४ हजार ३८९ बालकांना शालेय पूर्व शिक्षण दिले जाते. जिल्ह्यातील ४ हजार ७६ अंगणवाड्यामध्ये केवळ ३ हजार ८८९ अंगणवाडी ताई कार्यरत आहेत. तर १८७ पदे रिक्त आहेत. तर ३ हजार ४२६ मदतनीस सध्या कार्यरत असून ६५० पदे रिक्त आहेत. त्यामुळे साहजिकच बालकांच्या शिक्षणावर याचा परीणाम होतो. दरम्यान मदतनीसांची भरती प्रक्रिया सध्या तालुका पातळीवर सुरू असल्याची माहिती महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने देण्यात आली. ४ हजार ७६ अंगणवाड्यांपैकी २ हजार ७४८ अंगणवाड्यांना स्वतःच्या मालकीची इमारत आहे. तर १ हजार ३२८ अंगणवाड्या या जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा, ग्रामपंचायत इमारत, समाज मंदिर व खासगी जागेत भरविल्या जात आहेत. स्वतःची इमारत नसणाऱ्यापैकी १०१ अंगणवाड्यांच्या बांधकामासाठी सध्या जागा उपलब्ध आहेत. अंगणवाडी बांधकामासाठी जागेचा प्रश्न भेडसावत असल्याने स्थानिक लोकप्रतिनिधींनी यामध्ये लक्ष घालण्याची गरज आहे. स्वतःची इमारत नसणाऱ्या ५३ अंगणवाड्या जिल्हा परिषद शाळेत तर ३०५ अंगणवाड्या ग्रामपंचायत इमारतीत भरविल्या जातात. समाज मंदिरात १४६ भाड्याच्या तर खासगी विना जागेत ३०८ अंगणवाडया भरविल्या जातात. केवळ २८ अंगणवाड्या या भाडयाच्या जागेत भरविल्या जात आहेत.

२८ नवीन अंगणवाडी बांधकामांना मंजुरी

२०२३ या आर्थिक वर्षात मिनी अंगणवाडीचे रूपांतर मोठ्या अंगणवाडीत करण्याचा निर्णय शासनाने घेतला. यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील ८०० अंगणवाड्यांचा समावेश आहे. यापूर्वी मिनी अंगणवाड्यांना इमारतीधी तरतूद नव्हती. ज्या मिनी अंगणवाडीचे रूपांतर मोठ्या अंगणवाडीत करण्यात आले. त्या अंगणवाड्यांसाठीही टप्प्याटप्याने नवीन इमारती बांधण्यात येणार आहेत. २०२४ मध्ये जिल्ह्यात २८ अंगणवाडी बांधकामांना मंजुरी मिळाली आहे.

- प्रसाद मिस्कले, महिला व बालकल्याण विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी

कामाच्या तुलनेत तुटपुजे मानधन

तीन ते सहा वर्ष वयोगटातील मुलांना पूर्व शालेय शिक्षण देणे, त्याबरोबरच अंगणवाडी कर्मचाऱ्यांना गरोदर व स्तनदा मातांना पूरक आहार पुरविणे, त्यांची आरोग्य तपासणी करणे, दरमहा वजन घेणे, माता व किशोरी यांना आरोग्य विषयक मार्गदर्शन करणे, सकस आहार पुरवणे ही कामे दिली जातात. याशिवाय यासह अन्य कामांसाठीही अंगणवाडी कर्मचाऱ्यांची मदत घेतली जाते. कामाच्या तुलनेत अंगणवाडी कर्मचाऱ्यांना तुटपुंजे मानधन दिले जात आहेत. अंगणवाडी कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा द्यावा व त्याप्रमाणे त्यांना वेतन देण्यात यावे, यासाठी अंगणवाडी कर्मचारी संघटनांच्या वतीने आंदोलनाद्वारे पाठपुरावा सुरू आहे.

१८९ पैकी १२५ कामे सुरू...

● कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी यांचे ठेकेदांराना पत्र

● जलजीवनचे काम बंद ठेवलेल्या ठेकेदारांवर होणार कारवाई

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २४ सप्टेंबर

सोलापूर जलजीवन मिशनच्या कामाचे बिले मिळत नसल्याने जिल्ह्यातील ठेकेदारांनी काम बंद ठेवले आहे. मात्र काम बंद ठेवता येत नसल्याचे पत्र ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी यांनी पत्र काढून संबधित ठेकेदारांवर कारवाईचा इशारा दिला असल्याची माहिती दैनिक,'तरुण भारतशी'बोलताना दिली.

२० सप्टेंबर पासून जलजीवनचे ठेकेदार नक वैतागून काम बंद ठेवून प्रशासनाला तसे निवेदन प्रशासनाला दिले आहे की, जोपर्यंत क बिले काढणार नाही तोपर्यंत काम करणारच नाहीत. मात्र ठेकेदारांची क्षमता नसताना एक तर जलजीवनचे कामे देण्यात आली. वर्क ऑर्डर मध्ये अटी व शर्ती ठेकेदारांना घालून दिल्या असून तशा प्रकारचे काम बंद ठेवता येत नसल्याचे पत्र ग्रामीण पाणी पुरवठा विभागाने सर्व ठेकेदारांना काढले आहे. विशेष म्हणजे गेल्या वर्षभरात प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे जवळपास ३८ कोटी रूपये शासनाकडे परत गेले आहेत आणि आता बिलासाठी कामे बंद ठेवण्यात आली आहेत. त्यामुळे अनेक गावातील प्रलंबित जलजीवनचे कामे ठप्प असल्याने प्रशासनाने कारवाईचा इशारा तर दिला आहे त्यावर ठेकेदार काय भूमिका घेतात ते पहावे लागेल

जिल्ह्यात जलजीवनच्या चौकशीत अडकलेले १८९ कामापैकी १२५ कामाची बिले देण्यात आली आहेत. ६४ कामे प्रलंबित असून त्यावर शासनाने निर्णय घ्यावे असे कळविले आहे. त्यामुळे शासन त्या ६४ कामाबाबत काय निर्णय घेतेय ते बघावे लागेल. तर ठेकेदारांना काम बंद ठेवता येत नाही, उलट ठेकेदारांच अडचणीत येऊ शकतात. त्यामुळे ठेकेदारांनी जर न ऐकता काम बंदच ठेवण्यावर ठाम असेल तर मला कारवाई करावी लागेल.

- संजय धनशेट्टी,
कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा

मंगळवेढ्यात दारूच्या नशेत मोटरसायकल चालविल्याप्रकरणी गुन्हा

तभा वृत्तसेवा
मंगळवेढा दि.२४ सप्टेंबर-

शहरातील बसस्थानकासमोर एक २६ वर्षीय तरूण दारूचे अंमलाखाली मोटर सायकल चालवत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आल्याने त्याला ताब्यात घेवून ब्रेथ ॲनालायझर मशिनने तपासले असता त्याची टेस्ट पॉझिटिव्ह आली असून या प्रकरणी मोटर वाहन अधिनियमानुसार त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मंगळवेढा बसस्थानकासमोर मंगळवारी (दि.२४) पोलिस पथकातील महिला पोलिस नाईक कविता सावंत, पोलिस अंमलदार धनंजय जाधव, सुनिल राऊत व अन्य पोलिस कर्मचारी संयुक्त कारवाई सायंकाळी ४.१० वा. करीत असताना बसस्टँडचे गेट समोरील रोडवर यातील दुचाकीस्वार तथा आरोपी सोमनाथ गुंडीबा माने (वय २६,रा. एकलासपूर ता.पंढरपूर) हा त्याचे ताब्यातील मोटर सायकल (क्र.एम एच १३,डब्ल्यू ९०३५) वाकडी तिकडी चालवत येत असल्याचे सदर पथकास दिसल्याने त्यास हाताचा इशारा करून थांबण्यास सांगितले. पोलिसांनी अशा वाहनांचा शोध घेवून तात्काळ कारवाई करावी अशी मागणी ज्येष्ठ नागरिकांमधून पुढे येत आहे.

क्राईम वृत्त

चाकूने वार करून खूनाचा प्रयत्न करणाऱ्याविरुध्द गुन्हा दाखल

सोलापूर, दि. २४ सप्टेंबर-

तरुणाच्या डोक्यात चाकूने वार करून त्याच्या खूनाचा प्रयत्न करणाऱ्याविरुध्द एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना २३ सप्टेंबर रोजी दुपारी दोन ते तीन वाजण्याच्या दरम्यान मिम चौकाजवळील पोल्ट्रीच्या पाठीमागे चंद्रकला नगर नई जिंदगी येथे घडली. याप्रकरणी हसिनाभी जब्बार शेख (वय ५५, रा. मसरे वस्ती) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सज्जाद सय्यद याच्याविरुध्द एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हसिनबी शेख यांचा मुलगा बाबूलाल जब्बार शेख हा रिक्षा चालवण्यासाठी गेला असता, नई जिंदगी परिसरातील चंद्रकला नगर येथे सज्जाद याने जीवे मारण्याच्या उद्देशाने डोक्यात चाकूने वार करून त्याच्या खूनाचा प्रयत्न केला. याबाबत एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक चंदनशिवे हे करीत आहेत.

नातू, सुनेला माहेरी घेऊन जाण्याच्या कारणावरून लोखंडी रॉडने मारहाण

सोलापूर, दि. २४ सप्टेंबर-

नातू व सुनेला माहेरी सोबत घेऊन जाण्याच्या कारणावरून लोखंडी रॉडने मारहाण केल्याप्रकरणी आठ जणांविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.हि घटना २३ सप्टेंबर रोजी सकाळी अकरा वाजण्याच्या दरम्यान इंण्डेन गॅस गोडाऊन बोडकोटे नगर येथे घडली. याप्रकरणी अमरनाथ नवनाथ शिंदे (वय ४५, रा. इंण्डेन गॅस गोडाऊन, बोळकोटे नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून संतोष लखमू चव्हाण, सुरेश सिताराम भोसले, राधाबाई संतोष चव्हाण, अंकुश संतोष चव्हाण, अभिमान भीमराव माळवे, गयाबाई भिमराव माळवे, कमळाबाई अभिमान माळवे व करण धर्मा इंगोले (सर्व.रा. सांगोला,जि. सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. २३ सप्टेंबर रोजी अमरनाथ शिंदे व त्यांचा मुलगा गणेश शिंदे हे दोघे घरात असताना संतोष चव्हाण व इतरांनी शिंदे यांची सून व नातू यांना माहेरी घेऊन जाण्याच्या कारणावरून लोखंडी रॉडने मारहाण करून जखमी केले. म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा खल करण्यात आला आहे.

काम करताना मारहाण; चौघांवर गुन्हा

सोलापूर, दि. २४ सप्टेंबर-

पत्रा शेडचे काम करत असताना, काम करण्यास विरोध करून कामगारांना शिवीगाळ करत जिवंत सोडणार नसल्याची धमकी देत मारहाण केल्याप्रकरणी चार जणांविरुद्ध सलगर वस्ती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना २३ सप्टेंबर रोजी दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास देशमुख वस्ती येथे घडली. याप्रकरणी सखाराम अभिमान घोरपडे (वय-३८, रा. देशमुख वस्ती, देगाव) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून नागेश बब्रुवान घोरपडे, सरस्वती घोरपडे, प्रदीप घोरपडे व दीपक शिंदे (सर्व रा. देशमुख वस्ती) यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. २३ सप्टेंबर रोजी दुपारी देशमुख वस्ती येथे सखाराम घोरपडे व इतर हे पत्रा शेडचे काम करीत होते. त्यावेळी नागेश घोरपडे व इतरांनी शिवीगाळ करून मारहाण केल्याची नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे.

सोलापूर शहरवासीयांनो जागे व्हा; फसवणुकदारांपासून सावध रहा

तभा वृत्तसेवा
सोलापूर, दि. २३ सप्टेंबर -

सोशल मिडीया प्लॅटफॉर्म जसे फेसबुक/इंस्टाग्राम/टेलिग्राम/वॉटसअॅप युटयुब/शेअरचॅट यावर आर्थिक फसवणुकीचे भ्रामक आकर्षक जाहिरातीव्दारे लोकांची मोठया प्रमाणात फसवणूक होत असल्याने नागरीकांनी जागरुक राहणे अंत्यत गरजेचे झाले आहे. याबाबत लोकांनी संतर्क राहुन बरेच दिवस वापरात नसलेले फेसबुक, इंस्ट्राग्राम, शेअरचॅट, व्हॉटसअॅप अकाऊंट त्वरीत सोशल साईटवरुन डिलीट करावे किंवा ते लॉगिन करुन, टु स्टेप व्हेरीफिकेशन करुन घ्यावे. जेणेकरुन तुमचे अकाऊंट फसवणुकदाराचे जाळयात सापडणार नाही व त्यांचे अकाऊंटचा वापर करुन पुन्हा त्यांचेकडे पैश्याची मागणी होणार नाही. किंवा तुमचे अकाऊंट कोणत्याही बेकायदेशीर बाबीमध्ये वापरण्यात येणार नाही असे आवाहन पोलिस विभागाच्यावतीने करण्यात येत आहे.

सोशल मिडीयावरुन प्राप्त होणा-या जाहिरातीमध्ये शेअर मार्केट ट्रेडींग मध्ये पैसे गुंतविल्यास एका महिन्यात दोनशे ते तिनशे टक्के नफा मिळेल असे अमिष दाखवून लोकांना पैसे गुंतविण्यास भाग पाडुन लोकांची मोठ्या प्रमणात आर्थिक फसवणुक होत असल्याचे दिसून आले आहे. त्यामध्ये लोकांना बनावट लिंकव्दारे व्हॉटसअॅप ग्रुपमध्ये अॅड करुन बनावट अॅप मध्ये मोठया कंपनीचे शेअर दिल्याचे व त्यातुन मोठया रक्कमेची परतावा मिळत असल्याचे भासवत आहेत. त्यानंतर शेअर मार्केट ट्रेडींग मधील लोकांनी गुंतविलेली रक्कम व नफा रक्कम विड्रॉल होत नसल्याचे कारण विचारले असता, सदर रक्कम विड्रॉल करण्यासाठी लागणा-या बनावट अटी जसे इन्कमटॅक्सची रक्कम भरणा करावी लागेल, शेअर ट्रेडींग मध्ये झालेल्या फायद्यामध्ये टॅक्सची भरणा केल्यानंतरच रक्कम खात्यात जमा होणार आहे किंवा तुमचा आयपीओ वाढला आहे तो पुर्ण करण्यासाठी तुम्हाला पुढची राहिलेली रक्कम भरावी लागेल अशी खोटी माहिती देऊन लोकांना पुन्हा रक्कम भरण्यास भाग पाडुन लोकांचे आर्थिक नुकसान करीत असल्याचे आढळून आले आहे.

तसेच शेअरमार्केट बाबत इंस्ट्रा, फेसुबुक, व्हॉटसअॅपवरुन जादा प्रॉफिट कसे मिळते याबाबत खोटी कागदपत्रे वॉटसअॅप व सोशल मिडीयावरुन पाठवून लोकांचा विश्वास संपादन करुन, त्यांना ट्रेडींग करण्यास भाग पाडुन सुरवातील छोटया रकमेचे मुददल व प्रॉफिट मिळवून त्यांचेकडुन पुन्हा त्यामध्ये जादा रक्कम गुंतविण्यास सांगुन त्याबाबत शेअर मार्केच्या बनावट प्लॅटफॉर्मवर जादा प्रॉफिट मिळत असल्याचे भासवून फसवणुक केली जात आहे. लोकांना बनावट मोबाईल क्रमांकावरुन तुमचे सिमकार्ड ब्लॉक होणार आहे, तुमच्या बँक खात्यावरुन संशयास्पद ट्रॉन्झंक्शन झालेले आहेत, तुमच्याकडुन इन्कमटॅक्स नियमांचे उल्लंघन झालेले आहे, तुम्हाला पोलीस कोणत्याही क्षणी अटक करतील, तुमच्या नावावर पोलीसांत गुन्हा दाखल झालेला आहे, आम्ही क्राईम ग्रॅन्च मुंबई/दिल्ली येथुन तसेच कार्यालयातुन बोलत आहोत, उच्च पदावरील पोलीस अधिकारी यांचे नांवे घेवून तुमच्या नावांने अटक वांरट काढले आहे, तुमच्या बँक खात्याची चौकशी चालू आहे, तुमच्या बँक खात्यातून मोठ्या रक्कमेचे व्यवहार झालेले आहेत, तुमचे किंवा तुमच्या मुलाचे रेप केसमध्ये नाव आले आहे किंवा त्याचेविरुध्द केस दाखल आहे, तुमचा मोबाईल क्रमांक पॉर्न व्हीडीओ बनवणाऱ्या ग्रुपमध्ये मिळून आला आहे, त्यामध्ये बऱ्याच लोकांना अटक केली आहे. अशाप्रकारे भिती घालुन लोकांना त्यांची नांवे, बँकेचे नांव, राहण्याचा पत्ता, घरातील लोकाचा माहिती, सोन्या- चांदी दागीनेची माहिती, व्यवसाय व मालमत्तेची माहिती विचारुन त्या आधारे लोकांच्या मनात भितीचे वातारवण निर्माण करुन, पोलीस तुम्हाला अटक होणेपासून वाचवतील तसेच तुम्ही याबाबत कोणतीही माहिती कोणासही सांगू नये अगदी घरातील नातेवाईक यांना देखील न सांगणेची धमकीची भाषा तसेच समाजात बदनामीची भाषा वापरुन मालमत्तेची माहिती घेतल्यानंतर त्याच्या आधारे आरटीजीएस/गुगल पे फोन पे/आयएमपीएस/बँक खाते क्रमांक यावर मोठ्या रक्कमा ट्रान्सर करण्यास भाग पाडुन फसवणूक करीत असल्याचे दिसून येत आहे.

तसेच तुमचे फेसबुक, इंस्ट्राग्राम, शेअरचॅट, व्हॉटसअॅप अकाऊंट हे बरेच दिवसापासुन वापरात नसेल आणि त्याचे टु स्टेप व्हेरिफिकेशन झाले नाही. ते अकाऊंट हॅक होत असलेबाबत व त्यामध्यमातुन लोकांचे फोटो एडीट (मॉर्फिंग) करुन, सदर अश्लिल व्हीडीओ / बदनामीकारक मेसेज त्यांचे ग्रुपमधील मित्रांचे अकाऊंटवर पाठविणार आहोत अशी धमकी देवुन, बदनामी नको असेल तर तुम्हाला पैसे पाठवावे लागतील अशी धमकी देवुन पैश्याची मागणी होत असल्याच्या तक्रारीचे प्रमाण वाढले आहे.

तसेच तुम्हाला तुमच्या मोबाईलवर टेक्स्ट मेसेजव्दारे, व्हॉटसअॅपवर बनावट लिंक पाठविली जाते सदर लिंक ओपन करताच तुमचा मोबाईल अथवा व्हॉटसअॅप हॅक होवुन तुमच्या मोबाईलमध्ये लिंक असलेले बँकेची माहिती घेवुन त्याव्दारे तुमच्या खात्यातील रक्कम काढुन घेण्याचे प्रमाण वाढले आहे. याबाबत लोकांनी अशा येणारे अनावश्यक लिंक ओपन करण्याचे टाळावे जेणेकरुन तुमचा मोबाईल हॅक होवून कोणत्याही माध्यमातुन आर्थिक फसवणुक होणार नाही, असे आवाहन सोलापूर शहर पोलीसांच्या वतीने करण्यात येत आहे.

भावपूर्ण श्रध्दांजली

१९ वे पुण्यस्मरण

कै.डॉ.व्यंकटसा वासुदेवसा मेघराज

स्वर्गवास-भाद्रपद कृ.९ शके १९२७
दि. २६ सप्टेंबर २००५

।आपले।
समस्त मेघराज परिवार
सोलापूर, भाग्यनगर व
खटवटे परिवार (गदग)

महिला व मुलींना सशक्तीकरणास चालना देण्यासाठी रोजगार निर्मितीचे आयोजन

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २४ सप्टेंबर

महिला व बाल विकास विभागामार्फत महिला व मुलींना रोजगार निर्मितीस चालना देणे, त्यांचे आर्थिक, सामाजिक पुनर्वसन करणे, स्वावलंबी, आत्मनिर्भर करणे, सशक्तीकरणास चालना देण्यासाठी तसेच महिला व मुली यांचा सुरक्षित प्रवास होणे यासाठी पिंक (गुलाबी) ई-रिक्षा ही योजना सुरु केली आहे.

सदर योजनेनुसार सोलापूर शहरातील २०० पात्र महिलांना लाभ देण्याचे लक्ष निश्चित केले आहे. या योजनेनुसार ७० टक्के कर्ज बँकेमार्फत उपलब्ध करुन दिले जाणार असून राज्य शासन २० टक्के आर्थिक भार उचलनार आहे व १० टक्के रक्कम लाभार्थि यांना भरावयाची आहे. पिंक ई-रिक्षा हा महिलांनीच चालवायचा आहे.

या योजनेसाठी पात्रता- लाभार्थीचे कुटुंब महाराष्ट्र राज्याचे रहिवाशी असावे,अर्जदार महिलेचे वय २०-४० वर्षे दरम्यान असावे, अर्जदार महिलेचे बैंक खाते असावे, लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु.३ लाखापेक्षा जास्त नसावे.

तरी ईच्छुक पात्र महिलांनी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, सी.एस. नं.१६०८/०९, प्लॉट नं.१२ पहिला मजला, शोभा नगर, सात रस्ता, बिग बझारच्या पाठीमागे, सोलापूर येथे अर्जाचा नमूना व अधिक माहिती साठी संपर्क साधावा असे अवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचे मार्फत करण्यात येत आहे.

Tujhe Meri Kasam
It's Not A Love Story
RE - RELEASE
13 Sep 2024

नवरा माझा नवसाचा 2



भागवत उमामंदिर
एअर कुल्ड
हाऊसफुल्ल २ रा आठवडा
हाऊसफुल्ल गर्दीत
03.30.06.30.09.30.PM
12.30.PM
Book The Ticket At BookMyShow तिकीट बुक करण्यासाठी कॉल करा-9158142780

शेवटचे २ दिवस
श्रीनिवास सिनेमॅटिक जेलरोड जवळ, सोलापूर
Book The Ticket At BookMyShow
सस्पेन्स थ्रिलर ॲक्शन मर्डर मिस्ट्री तेलगु चित्र
१२॥,३॥,६॥,वा.
स्वस्त तिकिट दरात पहा
एक्झुकिटिव्ह क्लास ति दर १०० रू फक्त

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे**.● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

रोटरीच्या नेशन बिल्डर ॲवॉर्डचे उद्या वितरण

तभा वृत्तसेवा
सोलापूर, दि. २४ सप्टेंबर -

रोटरीक्लबऑफसोलापूरनॉर्थच्यावतीनेदेण्यात येणाऱ्या नेशन बिल्डर ॲवॉर्डचे वितरण गुरुवार, दि. २५ सप्टेंबर रोजी सायंकाळी रंगभवन येथील मेसॉनिक हॉल येथे करण्यात येणार असल्याची माहिती क्लबच्या अध्यक्षा जान्हवी माखिजा यांनी दिली.

या कार्यक्रमास पोलिस आयुक्त एम राजकुमार हे उपस्थित राहणार असून त्यांच्या हस्ते या ॲवॉर्डचे वितरण करण्यात येणार आहे. प्रियंका मुंढे, विजयालक्ष्मी पितळकर, काजल कुलकर्णी, स्मिता अनिखंडी, सुवर्णा कट्टीमणी, संध्या गुमास्ते, मोमीन नासीर, तेजश्री टोणपे, भिकाजी कुलकर्णी, संतोष वालावलकर, ज्ञानेश्वर पाटील, बाळासाहेब बिराजदार यांना नेशन बिल्डर ॲवॉर्ड प्रदान करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन अध्यक्षा जान्हवी माखिजा, सचिव स्वप्निल कोंडगुळे, दीपक आहुजा, सुनिल दावडा यांनी केले आहे.

क्राईम वृत्त...

चाकू व तलवारीने मारहाण केल्याने तरूण अत्यवस्थ

सोलापूर, दि. २४ सप्टेंबर-

शहरातील नई जिंदगी परिसरातील सितारा चौकाजवळ तरूणास चाकू व तलवारीने मारहाण करण्यात आल्याची घटना सोमवारी दुपारी घडली. सुलतान शेख (वय ३४, रा. रविवार पेठ, सोलापूर) असे जखमीचे नाव असून शेखवर शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत. सोमवारी दुपारी अडीचच्या सुमारास अलपुरकान मदरशाच्याजवळ सितारा चौकाच्या पुढे सज्जाद याने अज्ञात कारणावरून सुलतान यास चाकू व तलवारीने जबर मारहाण केली. यामध्ये सुलतान याच्या डोक्यात, पाठीवर, बरगडीवर जबर वार झाले असून रक्तबंबाळ झालेल्या अवस्थेत सुलतानला मोहसीन मुजावर यांनी शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिसात नोंद करण्यात आली आहे.

दुकानातून मोबाईल पळवला

सोलापूर, दि. २४ सप्टेंबर-

शेळगी परिसरातील मित्र नगर येथून चोरट्याने २२ हजार ५०० रुपये किंमतीचा मोबाईल चोरून नेला. या प्रकरणी रामचंद्र विठोबा कांबळे (वय २२, रा.मित्र नगर, शेळगी) याने दिलेल्या फिर्यादीवरुन जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मित्र नगर येथील रामचंद्र कांबळे यांच्या मोबाईल दुकानातील मोबाईल दुरूस्त करून दुकानातील काउंटरवर ठेवलेला असताना अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना १८ सप्टेंबर रोजी रात्री आठ ते नऊ वाजण्याच्या दरम्यान घडली. पुढील तपास पोलीस हवालदार आरेनवरू हे करीत आहेत.

बसमध्ये मोबाईल पळवला

सोलापूर, दि. २४ सप्टेंबर-

रेल्वे स्टेशन बाहेर असलेल्या बस स्टॉप वरुन तेरामैल येथे जाणाऱ्या बसमध्ये चढत असताना अज्ञात चोरट्याने तरुणांच्या खिशामध्ये हात घालून मोबाईल हिसकावून चोरून नेल्याची घटना २३ सप्टेंबर रोजी सकाळी पावणे सात वाजण्याच्या दरम्यान घडली.याप्रकरणी नरेंद्र सितलु (वय ३५, रा. मुपो. उमर, अटवा, जि. उन्नाव, राज्य - उत्तर प्रदेश) याने दिलेल्या फिर्यादीवरुन सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक शिंदे हे करीत आहेत.

पार्किंगमधून दुचाकी लंपास

सोलापूर, दि. २४ सप्टेंबर-

जुळे सोलापुरातील मेलेडी अपार्टमेंटच्या पार्किंगमध्ये पार्क केलेली १२ हजार रुपये किंमतीची दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना ८ ते १८ सप्टेंबर दरम्यान घडली. याप्रकरणी वीणा ज्ञानेश्वर पवार (वय ४३, रा. मेलेडी अपार्टमेंट) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार भिसे हे करीत आहेत.

मंडपाच्या साहित्याला आग लावल्याने दीड लाखांचे नुकसान

सोलापूर, दि. २४ सप्टेंबर-

उत्तर सदर बझार येथील घराजवळ ठेवलेले मंडपाच्या व्यवसायाच्या साहित्याला आग लावून साहित्य नष्ट करून १ लाख ५० हजार रुपयांचे नुकसान केल्याप्रकरणी तीन जणांविरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी बाळकृष्ण पांडुरंग सदाफुले (वय ४०, रा. बॉम्बे पार्क, जुळे सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन राहुल बंडू गुजले, बंडू गुजले व विठ्ठल गुजले (सर्व रा. उत्तर सदर बझार) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. ६ ऑगस्ट रोजी तीन ते चार च्या दरम्यान उत्तर सदर बझार सदाफुले यांच्या मंडपाच्या व्यवसायाचे मंडप, लाईट, डेकोरेटर, साऊंट सिस्टिमचे साहित्य तसेच इतर साहित्य नष्ट करण्याच्या उद्देशाने गुजले व इतरांनी आग लाऊन नुकसाना केले. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घरातून १२ हजारांचा चोरट्याकडून ऐवज लंपास

सोलापूर, दि. २४ सप्टेंबर-

घराचा दरवाजा पुढे केलेला असताना अज्ञात चोरट्याने घराचा दरवाजा उघडून प्रवेश करत घरातील रोख रक्कम व चांदीचे पैंजण असा एकूण ११ हजार ९०० रुपयांचा ऐवज चोरून नेला आहे. याबाबत अंबुबाई गोपाळ भंडारे (वय ५५, रा. स्लॅटर हाऊस, घर नंबर ९१) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार चव्हाण हे करीत आहेत.

अजितदादांचे वजन अनगर पाटलांच्या पारड्यात?

● प्रदेशाध्यक्ष तटकरेंकडूनही कानटोचणी; दादांना उपरती आल्याची रंगली चर्चा; राजकारण तापणार

तभा वृत्तसेवा । प्रशांत माने
सोलापूर, दि. २४ सप्टेंबर-

मोहोळ तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसमधील पक्षांतर्गतची धुसफूस गेल्या अनेक महिन्यांपासून अरेरावीवर आली अन् अप्पर तहसीलच्या विषयावरून तर तालुक्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले. दरम्यान नुकतेच मोहोळ दौऱ्यावर आलेले राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी पक्षाच्या प्रदेश प्रवक्त्यांना थेट दम भरत अनगरकरांच्या पारड्यात आपले वजन टाकले. तर प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरेंनी देखील कानटोचल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या. कारण पूर्वीची जिल्ह्यातील बलवान व एकसंघ राष्ट्रवादी फुटण्यासाठी पक्षांतर्गत वादाला वरिष्ठांनीच दिलेले छुपे बळ कारणीभूत ठरले होते. मोहोळमध्ये सुरु झालेली ही पुनर्रावृत्ती अजितदादांनीच रोखल्याने दादांना आता उपरती आल्याची चर्चा जिल्ह्यात रंगली आहे.

सोलापूर जिल्हा हा ऐककाळी एकसंघ राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला होता. जाणकार धरंधर राजकारणी शरद पवार हे त्या राष्ट्रवादीचे नेतृत्व करीत होते. जिल्ह्यातील एक खासदार, बहुतांश आमदार राष्ट्रवादीचे, जिल्ह्यातील बहुतांशी सहकारी संस्था राष्ट्रवादीच्या, सोलापूर महापालिकेच्या सत्तेत वाटा, जिल्हा परिषद, जिल्हा बँक, जिल्हा दूध संघ, बाजार समित्या, जिल्हा लेबर फेडरेशन आदीसह जिल्ह्यातील नगरपालिका, नगरपरिषदा, पंचायत समित्या, ग्रामपंचायती या देखील राष्ट्रवादीच्या सत्ता छत्राखाली होत्या. अकलूजच्या शिवरत्न बंगल्यावरून राष्ट्रवादीची जिल्ह्याची सूत्रे फिरत होती. असे असतानाही जिल्ह्यातील अनेक तालुक्यात राष्ट्रवादीचे प्रस्थापित स्थीरस्थावर होते. तालुक्यांच्या नावापेक्षा संबंधित नेत्यांच्या नावानेच तालुक्याची ओळख अधीक होती. अशी सुबत्ता असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये बारामतीमधूनच पक्षांतर्गत वादाला खतपाणी घातली गेली अन् बघता-बघता जिल्ह्यात राष्ट्रवादी अल्प झाली. शरद पवारांच्या राष्ट्रवादीला अनेकांनी राम-राम ठोकला. यामध्ये अकलूजचे मोहिते-पाटील, पंढरपूरचे परिचारक, बार्शीचे सोपल, करमाळ्याचे बागल, मंगळवेढ्याचे आवताडे, सांगोल्याचे साळुंखे अशा अनेकांनी भाजपाच्या वेगवान नावेत बसणे पसंत केले. याला मूळ कारण होते ते पक्षांतर्गत वादच होय. अजितदादांनी जिल्ह्यातील काही पक्षातील सहकाऱ्यांनाच हाताशी धरून मोहिते-पाटलांच्या सत्तेला धक्के दिले आणि याला काकांची देखील मूक संमत्ती होती, अशी दबक्या आवाजातील चर्चा राजकारणात चांगलीच रंगली होती.

अखेर पक्षांतर्गत वाढलेला वाद संपला नाही, पण जिल्ह्यातील राष्ट्रवादी पक्ष मात्र संपण्याच्या मार्गावर आला. राष्ट्रवादीची वाताहात होत असताना मोहोळच्या अनगरकर पाटलांनी मात्र राष्ट्रवादीची साथ कायम ठेवली. मध्यंतरीच्या काळात त्यांच्याही पक्ष सोडण्याच्या वावड्या उठल्या होत्या. पण प्रत्यक्षात तसे काही झाले नाही. मोहोळ विधानसभा मतदारसंघ आरक्षित झाला तरी देखील अनगरकरांनी तालुक्यावरील पकड ढिली होवू दिली नाही.

राजन पाटील म्हणतील तोच आमदार अशी राजकीय स्थिती मजबूत ठेवली. पण गेल्या काही वर्षांपासून अनगरकर पाटलांना मोहोळचे राष्ट्रवादीचे दुसरे युवा नेतृत्व प्रदेश प्रवक्ते पाटील यांनी शह देण्याचा प्रयत्न केला. दोन्ही पाटलांमधील वाद सातत्याने वाद चव्हाट्यावर आला. परंतु वरिष्ठ नेत्यांनी यात ठोस भूमिका न घेतल्याने वाद विकोपास गेला. मोहोळचे अपर तहसील कार्यालय अनगरला होण्यावरून पक्षांतर्गत वाद आणखीन पेटला.

नुकतेच झालेल्या अजितदादांच्या दौऱ्याप्रसंगी मोहोळ तालुका बंद पाळण्यात आला. तर अजितदादांचा दौरा रद्द केल्याच्याही वावड्याही उठल्या. अजितदादांना रस्त्यात अडविण्याचाही प्रयत्न झाला. यावरून संतापलेल्या अजितदादांनी जाहीर सभेतच इशारा दिला की, अजित पवाराचा दौरा रद्द करणारा अजून जन्माला आलेला नाही. अजितदादांचा राग माहिती असणाऱ्यांनी याची दखल नक्कीच घेतली असणार तर प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांनी देखील थेट कानटोचणी केल्याने अजितदादांचे वजन अनगरकरांच्या पारड्यात पडल्याची चर्चा मोहोळ तालुक्यात रंगली.

दरम्यान यानंतर राष्ट्रवादी कांग्रेसचे प्रदेश प्रवक्ते उमेश पाटील यांनी व्हिडिओ शेअर केला की, 'अजितदादा आपसे बैर नही राजन तेरी खैर नही'. राष्ट्रवादीचे आमदार असून इतर पक्षाबरोबर असतात त्यांच्यावर पक्षाने कारवाई केली पाहिजे, असेही ते म्हणाले. शरद पवारांची साथ सोडून काकांनाच कात्रजचा घाट दाखविणाऱ्या अजितदादांनी महायुतीत सत्तेचा वाटा उचलला. दरम्यान लोकसभा निवडणुकीत बसलेल्या पराभवाच्या झटक्यानंतर अजितदादांचा देधडक-बेधडक स्वभाव बदलला असून गुलाबी थीममुळे तर दादांच्या वागण्या-बोलण्यातही कमालीचा बदल जाणवतो आहे. पूर्वी पक्षांतर्गत वादाला खतपाणी घालण्यामुळे बसलेला फटका सर्वश्रुत असल्याने दांदांनी मोहोळच्या पक्षांतर्गत वादावर ठोस भूमिका घेत अनगरकरांच्या पारड्यात वजन टाकल्याची चर्चा आहे. मात्र प्रदेश प्रवक्ते उमेश पाटील पुढे काय भूमिका घेतात हे पाहणे देखील औत्सुक्याचे आहे.

आ. यशवंत माने यांचीही खदखद

मोहोळ विधानसभा मतदारसंघ हा सध्या राखीव असल्याने माजी आमदार राजन पाटील म्हणतील तोच उमेदवारच मोहोळचा आमदार होतो. परंतु गेल्या काही टर्ममध्ये एकही आमदार रिपिट झालेला नाही. त्यामुळे यंदा विद्यमान आमदार यशवंत माने पुन्हा आमदार होणार का? अशी चर्चा तालुक्यात रंगली होती. उमेश पाटील यांच्या विरोधाबाबत आ. माने यांनी आपल्या भाषणातून अजितदादांसमोरच पक्षातील पदाधिकारीच आमच्यावर उघड टिका करतात, अशी खदखद व्यक्त केली. आता विधानसभेच्या निवडणुका आहेत. मोहोळच्या आमदारकीसाठी अनगरकर कोणाला पसंती दर्शवतात आणि आमदार होतो काणे? हे पाहणे देखील महत्वाचे ठरणार आहे.

'अजितदादा आपसे बैर नही राजन तेरी खैर नही'

मोहोळ दौऱ्याप्रसंगी संतापलेल्या अजितदादांनी जाहीर सभेतच इशारा दिला की, अजित पवाराचा दौरा रद्द करणारा अजून जन्माला आलेला नाही. तर प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांनी देखील थेट कानटोचणी केली. अजितदादांचे वजन अनगरकरांच्या पारड्यात पडल्याची चर्चा मोहोळ तालुक्याच्या राजकारणात चांगलीच रंगली. दरम्यान यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश प्रवक्ते उमेश पाटील यांनी व्हिडिओ शेअर केला की, 'अजितदादा आपसे बैर नही राजन तेरी खैर नही'. यावरून स्पष्ट होते की, दादांच्या इशाऱ्यानंतरही उमेश पाटील आक्रमकच जाणवत आहेत. राजन पाटलांना असणारा त्यांचा विरोध देखील कायम असल्याचे चित्र आहे.

१४ लाखांसाठी पिता-पुत्राचे अपहरण

पोलिस मागावर असल्याचे समजताच पिता-पुत्रास सोडून अपहरणकर्ते पसार

तभा वृत्तसेवा
सोलापूर, दि. २४ सप्टेंबर -

१४ लाखांसाठी सराफ व्यावसायिक धर्माधिकारी पिता - पुत्राचे तिघांनी मिळून अपहरण केले. जोपर्यंत पैसे देत नाहीत तोपर्यंत चार चाकी वाहनातून दोन दिवस फिरवत होते. शेवटी पैसे कोण देणार व पोलिसांतही गुन्हा दाखल झाल्याने संशयितांनी पहिल्यांदा वडील व नंतर मुलास सोडून दिले. अपहरणकर्ते तिघे फरार असून शोध फौजदार चावडी पोलिसांकडून सुरु आहे.

महेश शिंगाडे(रा. सोलापूर) उमेश बंडगर व दादा माशाळकर (दोघेही रा. इटकळ, ता. तुळजापूर, जि. धाराशिव) अशी संशयित तीन आरोपींची नावे आहेत. समर्थ नागेश धर्माधिकारी (वय २१) आणि नागेश शंकर धर्माधिकारी (वय ५४, रा. ५३१, प्लॉट नं. २, दुसरा मजला, हरी प्रसाद अपार्टमेंट, शुक्रवार पेठ, सोलापूर) अशी अपहरण झालेल्या बाप-लेकाची नावे आहेत. याबाबत काळम्मा उर्फ स्नेहा नागेश धर्माधिकारी (वय ५०, रा. ५३१, प्लॉट नं. २, दुसरा मजला, हरी प्रसाद अपार्टमेंट, शुक्रवार पेठ, सोलापूर) या महिलेच्या फिर्यादीवरुन अपहरणकर्त्यांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार नागेश धर्माधिकारी व त्यांचा मुलगा समर्थ यांचे इटकळ (ता. तुळजापूर, जि.धाराशिव) या ठिकाणी सोन्याचे दुकान आहे. त्यांनी महेश शिंगाडे यांच्याकडून सोन्याचा व्यापार करण्यासाठी दोन महिन्यापूर्वी दहा लाख रुपये व्याजाने घेतले होते. त्यातील दिड लाख रुपये परत केले. साडे आठ लाख रुपये राहिले होते. ८ लाख ५० हजार रुपये मुद्दल व व्याजाची रक्कम मिळून १४ लाख रुपये धर्माधिकारी यांच्याकडे होते. ही रक्कम देण्यासाठी २० सप्टेंबरपर्यंत शिंगाडे यांनी मुदत दिली होती. मुदतीत पैसे दिले नाहीत, मुदत संपल्याने २१ सप्टेंबर रोजी सायंकाळी सातच्या सुमारास धर्माधिकारी पिता व पुत्राचे त्या संशयित तिघांनी अपहरण केले. अपहरण करून इटकळ, नंतर माळशिरस, बारामती असे चारचाकी वाहनातून शनिवार सायंकाळी सात ते सोमवारी रात्री दहापर्यंत फिरत होते.

पैशासाठी ज्या फोनवरून संपर्क केला, त्या फोनचे लोकेशन पोलिसांनी शोधून त्यानुसार त्याच्या मागावर पोलिस होते. पोलिसांनी माळशिरस येथे त्या संशयितांच्या मोबाईलचे लोकेशन दिसले. पोलिस निरीक्षक विकास देशमुख व त्यांची टीम माळशिरसच्या दिसने रवाना झाली. मात्र अपहरणकर्त्यांनी पैसे कोण देणार, यासाठी त्यांनी नागेश धर्माधिकारी यांना माळशिरस येते सोडून दिले. टीम माळशिरसमध्ये पोहोचली, तोपर्यंत धर्माधिकारी सोलापुरात घरी आले होते. पैसे दिल्याशिवाय मुलास सोडणार नाही अशी अपहरणकर्त्यांची भुमिका असल्याने, समर्थ अपहरण कर्त्यासमावेत होता. गुन्हा दाखल झाल्याने पोलिसही पाठलाग करीत आहेत, हे संशयितांच्या लक्षात आल्यानंतर समर्थ धर्माधिकारी यासही इटकळमध्ये आणून सोडून तीनही आरोपी फरार झालेले आहेत. आता या तिघां अपहरणकर्त्यांचा शोध पोलिसांकडून सुरु आहे.

फोनवरून कळाले अपहरणकर्त्यांचे लोकेशन...

अपहरण कर्त्याने यवतमाळमधील एका व्यक्तीच्या नावाने सिमकार्ड घेवून चालू केलेले होते. पोलिसांनी नंबरच्या पत्यावरून माहिती घेतली असता, त्या नंबरचा व्यक्ती यवतमाळ मध्ये राहत असल्याचे दिसून आले. मात्र फोन नंबर दोन तीन तासाने चालू होत असल्याने विविध ठिकाणी लोकेशन दाखवत होते.

बार्शीतील शेतजमिनीच्या विक्रीत ७० लाखांचा घोटाळा

माजी खासदाराची पोलिसांत तक्रार

तभा वृत्तसेवा,
बार्शी, दि. २४ सप्टेंबर-

बार्शी शहरातील जमिनीच्या व्यवहारात मोठ्या आर्थिक फसवणुकीचा प्रकार समोर आला आहे. माजी खासदार शिवाजीराव विठ्ठलराव कांबळे (वय ७४, रा. जामगांव रोड, बार्शी) यांनी त्यांच्या मालकीच्या शेतजमिनीची विक्री करताना ७० लाख रुपयांचा बनावट डिमांड ड्राफ्ट (डीडी) दिला गेल्यामुळे फसवणूक झाल्याची फिर्याद बार्शी पोलीस ठाण्यात दाखल केली आहे.

कांबळे यांनी जामगांव येथील गट क्र. १४७/ब मधील १३१ आर जमिनीची विक्री करण्याचे ठरवले होते. हा जमीन व्यवहार सतीश श्रीमंत आरगडे (रा. तावडी, ता. बार्शी) यांच्याशी १ कोटी २४ लाख रुपयांत ठरला. या व्यवहारात आरगडे यांनी २४ लाख रुपयांचा एक आणि २५ लाख रुपयांचा एक असे दोन चेक दिले. तसेच ५ लाख रुपये थेट कांबळे यांच्या बँक खात्यात जमा केले. या व्यवहारानुसार, ५४ लाख रुपये कांबळे यांना मिळाले.राहिलेले ७० लाख रुपये आरगडे यांनी २१ ऑक्टोबर २०२३ तारखेचा फेडरल बँकेचा डीडी देऊन फेडायचे ठरवले. परंतु या डीडीचा वापर त्यावेळीच करण्याची अट ठेवली की, सातबारा उताऱ्यावर आरगडे यांचे नाव चढवल्यानंतरच डीडी वटवता येईल. २७ ऑक्टोबर २०२३ रोजी कांबळे यांनी या जमिनीचे खरेदीखत नोंदवून दिले आणि सातबारा उताऱ्यावर आरगडे यांच्या नावाने फेरफार नोंदवून घेतला.

कांबळे यांनी बँकेत जाऊन ७० लाख रुपयांचा डीडी वटवण्यासाठी प्रयत्न केला असता, बँकेने तो डीडी बनावट असल्याचे स्पष्ट केले. यामुळे फसवणूक झाल्याचे कांबळे यांच्या लक्षात आले. कांबळे यांनी तातडीने आरगडे यांच्याशी संपर्क साधला. तेव्हा आरगडे यांनी काही दिवसांची वेळ मागून घेतली आणि पैसे रोख स्वरुपात देण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर कांबळे यांनी अनेकवेळा पैसे मागून देखील आरगडे यांनी पैसे न दिल्यामुळे हे प्रकरण गंभीर बनले. तब्बल १० महिने उलटूनही पैसे न मिळाल्याने, कांबळे यांनी फेडरल बँकेकडून डीडी खोटा असल्याचे प्रमाणपत्र घेतले. त्यानंतर त्यांनी आरगडे यांच्याविरोधात बार्शी शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. या तक्रारीत कांबळे यांनी बनावट डीडीद्वारे ७० लाख रुपयांची फसवणूक झाल्याचे नमूद केले आहे. पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरु केला असून, बनावट डीडीद्वारे करण्यात आलेल्या या फसवणुकीचा तपास करण्यासाठी विशेष पथक नेमण्यात आले आहे.

कांद्याने केला ग्राहकांचा वांदा!

दर वधारल्याने सर्वसामान्य नागरिक हवालदिल

● बाजार समितीत कांद्याची आवक घटल्याने दर तेजीत

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.२४ सप्टेंबर-

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये कांद्याचे दर तेजीत आले आहेत. कांद्याच्या दरात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने सर्व सामान्य नागरिकांच्या डोळ्यात मात्र पाणी आले आहे. सद्य परिस्थितीत बाजार समितीमध्ये लाल कांद्याचा घाऊक दर प्रति क्विंटल १५०० रू ते ५००० रू तर सर्व साधारण दर हा ३००० रू इतका झालेला आहे. घाऊक बाजारात कांद्याची चागलीच दरवाढ झाल्याने किरकोळ बाजारपेठेत देखील कांद्याचे भाव ६० ते ७० रू प्रतीकिलो असे विक्री केले जात आहेत.

दरम्यान सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती ही कांद्याच्या बाजारपेठेसाठी राज्यात दुसऱ्या क्रमांकावर आहे. येथे महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील शेतकरी कांदा विक्रीसाठी दाखल होतात. कांद्याचे दर आणि वेळेत मिळणारी पट्टी यामुळे शेतकरी सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये कांदा विक्रीसाठी मोठ्या प्रमाणात घेऊन येत असतात. सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत सद्या कांद्याची आवक घटली आहे. सुमारे दीडशे ट्रक इतकी कांद्याची आवक बाजार समितीमध्ये आली आहे. आवक कमी प्रमाणात आल्याने दरात वाढ झाली आहे. आशा परिस्थितीमध्ये पावसाने पुन्हा उघडीप दिल्याने उपलब्ध शेतमाल आणि काढणीला आलेला कांदा खराब झाल्यास कांद्याचे दर भविष्यात आणखीन वाढतील असा अंदाज वर्तवण्यात येत आहे.

कांद्याचे दर वाढण्याची शक्यता

सद्या कांद्याची आवक कमी आणि दर जास्त आहेत. यापूर्वी घाऊक बाजारात कांदा सरासरी २००० रू प्रतिक्विंटल, यादराप्रमाणे विकला जायचा परंतु आता तोच कांदा ३००० रू प्रतिक्विंटल दराप्रमाणे विकला जात आहे. त्यामुळे कांद्याचे दर वाढलेले आहेत. भविष्यात जर आवक कमी राहिली तर दर आणखीन वाढण्याची शक्यता आहे.

- **सादिक बागवान,** कांदा अडत व्यापारी सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती

महागाईने गृहिणींचे बजेट कोलमडले

कांद्याच्या दरामध्ये मोठी उसळी आली आहे. पूर्वी कांदा २० रुपये ते ३० रुपये प्रतिकिलो प्रमाणे खरेदी केला, जायचा परंतु आता तोच कांदा ६० रुपये तर मोठा कांदा ७० रुपये पर्यंत खरेदी करावा लागत आहे. महागाई वाढल्याने गृहिणींचे बजेट कोलमडले आहे.

- **नीता केळकर,** ग्राहक

एसटी बसचालकाचा ताबा सुटल्याने बसचा अपघात

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २४ सप्टेंबर-

मुटी फाटा (नळदुर्ग रोड, तुळजापूर) येथे एस.टी. बसचालकाचा बसवरील ताबा सुटल्याने बसचा अपघात होऊन सहा प्रवासी जखमी झाले. हा अपघात सोमवारी सकाळी साडेदहाच्यासुमारास झाला.

साधु निवृत्ती अंबुले (वय ७६, रा. मुटी, ता. तुळजापूर), दयानंद विश्वाथ खोत (वय ७८, रा. कोर्टी, ता. तुळजापूर), प्रभाकर बाबूराव कालेकर (वय ६०, रा. वडगाव देव, ता. तुळजापूर), सुमन शिवाजी राठोड (रा. धनदोरा, ता. तुळजापूर), रमेश मलकोदा राजमाने (रा. कोर्टी, ता. तुळजापूर), सुनिता दत्तात्रय भोसले (वय ५२, रा. कोर्टी, ता. तुळजापूर) अशी जखमींची नावे असून त्यांच्यावर सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात उपचार सुरुवात आहे. वरील सर्व जखमी हे एस.टी. महामंडळाच्या बसमधून सोमवारी सकाळी प्रवास करीत होते. मुटी फाटा येथे बस चालकाचा बसवरील ताबा सुटल्याने बस रोडखाली जाऊन अपघात झाला. या अपघातात वरील सर्वजण जखमी झाल्याने त्यांना उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

ज्ञानामृत आनंदलहरी - ८९५

सेना म्हणे करणी तैसेचि भोगावे ।
तेथे केशव दूर राहे ।।

जे पेरले तेच उगवणार किंवा एका हाताने करावे आणि दुस-या हाताने भरावे, हा निसर्गाचा नियम आहे. या नियमाला कोणीही अपवाद असत नाही. अर्थात, चांगले वागले तर त्याचे परीणामही चांगले होतात आणि वाईट वागले तर विपरीत परीणामाला सामोरे जावे लागते. माणसाला वाटते की, माझी चूक झाकून राहिली तर त्या चुकीचा विपरीत परीणाम भोगण्याचे कारण असणार नाही. पण असे होत नाही. अयोग्य कृती किंवा चुका हया झाकून गेल्या तरी त्याचा विपरीत परीणाम हा होणारच असतो. विपरीत परीणामाला वेळ लागेल; पण कालांतराने का होईना त्याची प्रचिती आल्याशिवाय राहत नाही. माणूस बहुतांश चुका हया तारुण्यात करतो. इंदियांना ताब्यात न ठेवता मनाधिन होऊन इंदियांचे लळे पुरवतो. तारुण्य संपू लागले की तारुण्यातील भोगाचे विपरीत परीणाम सुरू होतात. विपरीत परीणामाला तोंड देताना भय, चिंता, तणाव, अशांती, मनाची अस्थिरता वेगाने वाढू लागते. अशा विपरीत अवस्थेत जगणारा माणूस मन:पूर्वक केशवाची आठवण करणे शक्यच नसते. ज्याला केशवाची आठवण येत नाही, त्याची केशवही आठवण करीत नाही. अर्थात,

सेना म्हणे करणी तैसेचि भोगावे ।
तेथे केशव दूर राहे ।।,

या वचनांप्रमाणे केशव त्याच्यापासून दूर राहतो, असे सेनाजी सांगतात. सर्व संत महात्म्यांनी चांगले वागायला सांगीतले आहे. चुकीचे वागले तर परिणाम कसे भोगावे लागतात हेही सांगीतले आहे. बुध्दीजीवी माणूस फार अवघड आहे. तो माझे काहीच होत नाही किंवा मी भोगाला जुमानत नाही, अशा अविर्भावात वागत राहतो. माणसाने दुष्कृत्याला आणि त्याच्या परिणामाला घाबरले पाहीजे. भोग हे ज्याचे त्यालाच भोगावे लागतात. वाल्याचा महर्षि वाल्मिक होऊ शकतो तर आपण चांगले होणार नाही का? आपण वाईटच असले पाहीजे मग चांगले व्हावे असे नाही

तर चांगले असणा-यांनी चांगुलपण टिकून राहण्यासाठी आपल्या वर्तनाकडे लक्ष दिले पाहीजे. कारण कर्माचे भोग कोणालाही चुकत नाही. श्री ज्ञानेश्वर माऊली या अनुषंगाने,

केलें काम्य कर्म तैसें । फळ भोगावया धरणें बैसे ।
न फेडितां ऋण जैसें । वोसंडीना ।।,

असे म्हणतात. कर्ज फेडल्याशिवाय फिटत नाही तसे भोग भोगल्याशिवाय संपत नाहीत. वाईट व चुकीचे वागणा-यांनी संतांच्या म्हणण्याप्रमाणे भगवंतानी मदत करावी अशी अपेक्षा करण्यात काय अर्थ? आपण चांगले वागत असू तर भगवंताच्या कृपेची वेगळयाने अपेक्षा करण्याची गरज पडत नाही. आपले चांगले वर्तन, आपले चांगले कर्म हाच भगवंत असतो.

जय जय राम कृष्ण हरी।

- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड
मो. ९४२२२१६४४८

सुप्रभात

आजचा दिवस

वार : बुधवार
दि. २५ सप्टेंबर २०२४
विक्रम संवत् २०८०,
शके - १९४६
संवत्सर - क्रोधी नाम
मास - भाद्रपद
कृ. अष्टमी (१२.१०)
ऋतु - वसंत
नक्षत्र- आर्द्रा (२२.२२)
योग - वरियन (२४.१६)
करण - तैतिल (२४.१२)
सुर्योदय - ०६.३०
सूर्यास्त - १८.३०

दिनविशेष -
नवमी महालय
गोविंद उपळेकर महाराज
पुण्यतिथी, फलटण

....राहू काल....
रविवार : दु.४.३० ते ६.००
सोमवार : स. ७.३० ते ९.००
मंगळवार : दु. ३ ते ४.३०
बुधवार : दु. १२ ते १.३०
गुरुवार : दु. १.३० ते ३.००
शुक्रवार : स.१०.३० ते १२
शनिवार : स. ९ ते १०.३०

राशीभविष्य

मेष : जीवनसाथीच्या सहकार्याने कौटुंबिक समस्या दूर होतील. फायदेशीर चर्चा घडून येई. भोग-विलास प्रवृत्तीत वाढ होईल. व्यापार चांगला चालेल.

वृषभ : सहनशिलता कमी होऊ देऊ नका. आर्थिक अडचणी येऊ शकतील. व्यापार, नौकरीमधील स्थिती मध्यम राहील. जास्त विश्वास, जास्त उत्साह आपले होणारे काम बिघडवू शकतात.

मिथुन: अविवाहितांना लग्नाचे प्रस्ताव येतील. कामकाजाचे क्षेत्र विस्तारीत होईल. व्यापाराकरिता आजचा दिवस शुभ जाईल.

कर्क : विश्वासदर्शक वातावरण राहील. स्वत:च्या प्रयत्नाने समाजात मान मिळेल.

सिंह : प्रतिष्ठित व्यक्तींच्या उदारपणामुळे आपली कार्यक्षमता वाढणार आहे. कामकाजात सुधारणा होईल. विद्यार्थ्यांनी अभ्यासाकडे लक्ष द्यावे.

कन्या : व्यापार चांगला चालेल. कार्यक्षेत्रात नवीन कामाची योजनेमुळे फायदा होईल. मेहनतीचे उचीत फळ मिळेल.

तुळ : नवीन कामाची आखणी कराल. फायदेशीर बातम्या ऐकण्यास मिळतील. जुना रोग उदभवण्याची शक्यता आहे.

वृश्चिक : साहित्य वाचनाची गोडी वाढणार आहे.आधिकारी लोकांशी नवीन संबध जुळतील. चैनीच्या वस्तू घेण्याकडे आपला ओढा राहील. रोजगारात प्रगीत होईल. खर्चावर नियंत्रण राखा.

धनु : आपली कार्यकुशलता व इतरांच्या सहयोगाने कामात यश मिळेल. आपले विचार योग्य असतील. कर्मचाऱ्यांवर लक्ष ठेवा.

मकर : नातेवाईंकाशी असलेले संबंध मर्यादित ठेवा. मुलांच्या प्रकृतीत सुधारणा होईल. विरारधीन असलेले कामे पार पडतील. व्यवसायिक निर्णय वेळेवर घ्या.

कुंभ : लोकांशी संपर्क वाढवून आपण आपल्या योजना पूर्णत्वास न्याल. राजकीय लोकांपासून फायदा होईल. व्यापारात नवीन संबंध प्रस्तापित होतील. मुलांच्या कामाकडे लक्ष द्या.

मीन : रचनात्मक कार्यात प्रगती होईल. मुलांच्या इच्छा पूर्ण होतील. फायद्याच्या संधी मिळतील. मित्रांची मदत मिळेल. व्यवहारात नम्रता व सहनशिलता आवश्यक आहे.

वळसंगचे आरोग्य केंद्र धोत्रीत होणार

जिल्हा परिषद : आरोग्य विभागाकडून जागेची शोधमोहीम

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २४ सप्टेंबर-

दक्षिण सोलापूर तालुक्यातील वळसंग येथे नव्याने ग्रामीण रुग्णालय झाल्याने तेथील प्राथमिक आरोग्य केंद्र हे धोत्री येथे स्थलांतर होणार आहे. त्यासाठी जागेची शोधमोहीम सुरू असल्याची माहिती जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने दिली आहे.

वळसंग येथे ग्रामीण रुग्णालय बांधण्यात आले आहे. त्यामुळे तेथील प्राथमिक आरोग्य केंद्र धोत्री येथे हालविण्याचा निर्णय आरोग्य विभागाने घेतला असून, त्यासाठी जागेचा शोध घेण्यात येत आहे. वळसंग येथे उभारण्यात आलेल्या ग्रामीण रुग्णालयाचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री तानाजी सावंत

यांच्या हस्ते मार्च २०२४ मध्ये लोकार्पण सोहळा झाले आहे. त्यानंतर येथील प्राथमिक आरोग्य केंद्र हालविण्याचा विचार झाला होता. त्यावेळी धोत्री येथील ग्रामस्थांकडून मागणी होत असल्याने आणि या भागातील लोकांच्या आरोग्याची सोय होणार असल्याने धोत्री येथे प्रा. आरोग्य केंद्र स्थलांतर करण्याचा निर्णय झाला आहे.

वळसंग येथे ग्रामीण रुग्णालय झाले आहे. येथील प्राथमिक आरोग्य केंद्र धोत्री येथे स्थलांतर करण्याचा निर्णय झाला आहे. त्या गावात आरोग्य केंद्रासाठी जागेचे शोध घेण्यात येत आहे. जागा मिळाल्यानंतर तेथे प्रा. आरोग्य केंद्र स्थलांतर केले जाईल.

डॉ. संतोष नवले, जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प. सोलापूर

३० बेडचे ग्रामीण रुग्णालय

महाराष्ट्र राज्यात आरोग्य विभागात साडेचार कोटी खर्चुन उभारलेल्या नवीन ग्रामीण रुग्णालय ३० बेडचे असून उपसंचालक कार्यालयाकडून रुग्णालयास अत्यावश्यक असणारी सर्व साहित्यांची खरेदी केले आहे. आरोग्य विषयक सर्व सोयी सुविधा आणि सुसज्ज असलेल्या या इमारतीचे लोकार्पण झाले आहे. त्यामुळे येथील प्राथमिक आरोग्य केंद्र धोत्री येथे स्थलांतर होणार आहे. गावातील २५ ते ३० हजार नागरिकांना मोठा फायदा होणार आहे.

राष्ट्रीय क्षयरोग दुरिकरण कार्यक्रम
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

आस्था रोटी बँकेतर्फे रुग्णांना धान्याचे किट

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २४ सप्टेंबर-

आस्था फाऊंडेशन संचलित आस्था रोटी बँकेतर्फे सोलापुरातील प्रभाग ८ ब मधील ६ रुग्णांना प्रति व्यक्ती लागणारा मासिक धान्याचे किट दिले. त्यात प्रामुख्याने गव्हू, तांदुळ, साखर, शेंगा, तेल, चहापत्ती, पोहे असा संच बनवून देण्यात आला

यावेळी आस्थाचे सर्वेसर्वा विजय छंचुरे, संगिता छंचुरे व छाया गंगणे यांची उपस्थिती होती. येथील वैद्यकीय अधिकाऱ्यां उपचारादरम्यान रुग्णांना दिल्या जाणाऱ्या सुविधा मोफत औषधे वाटप तसेच गरजू रुग्णांना ५०० रुपयांपर्यंतची आर्थिक मदतीची माहिती दिली.



संविधान जनजागृतीतून समाज परिवर्तन होईल : डॉ. नांदुरे

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २४ सप्टेंबर-

शिवदारे महाविद्यालयात जागतिक लोकशाही दिनानिमित्त हरघर संविधान उपक्रम पार पडला. या अंतर्गत विद्यार्थ्यांना संविधानाचे पुस्तक वाटप करण्यात आले. कार्यक्रमात प्राचार्य डॉ. डी. एस. सुत्रावे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना भारतीय संविधान पुस्तक वाटप करण्यात आले.

याप्रसंगी भारतीय संविधान पुस्तक वाटपाचे पुरस्कर्ते परभणी येथील डॉ. भारत नांदुरे यांनी भारतीय संविधानाच्या एक कोटी प्रति वाटण्याचा संकल्प केला आहे. आतापर्यंत पाच लाख प्रती वाटप त्यांनी केले आहे. अंदाजे दोन कोटी एवढा खर्च अपेक्षीत आहे. ते स्वतः आपल्या उत्पन्नातून खर्च करणार आहेत. संविधान जन जागृतीतून समाजपरिवर्तन होऊ शकते. सर्व जाती धर्मातील तरुणांना एकत्र करुन संविधानाने दिलेले मुलभूत हक्क आणि राष्ट्राप्रती असलेले आपले कर्तव्य याची माहिती होणे गरजेचे आहे, असे डॉ. भारत नांदुरे आपल्या भाषणात सांगितले. यावेळी प्रा. व्यंकटेश काळे (परभणी), आणि प्रतापसिंह कांचन-पाटील यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक प्रा. चंद्रशेखर उमरजकर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उपप्राचार्य प्रा. एम. बी. पाटील, प्रा. डॉ. डी. डी. बनसोडे यांचे सहकार्य लाभले.

डॉ. शेटे यांना स्वामी विवेकानंद राष्ट्रीय पुरस्कार

प. पू. स्वामी गोविंद देव गिरिजी यांची प्रमुख उपस्थिती

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २४ सप्टेंबर-

गीता परिवाराचा स्वामी विवेकानंद राष्ट्रीय पुरस्कार ख्यातनाम शिवचरित्र व्याख्याते डॉ. शिवरत्न शेटे यांना सोमवारी समारंभपूर्वक प्रदान करण्यात आला.

जुनी मिल कंपाऊंड येथील नागेश करजगी ऑर्किड स्कूलमध्ये आयोजित छत्रपती शिवाजी महाराज कथा कार्यक्रमात गीता परिवाराचे संस्थापक अध्यक्ष प. पू. स्वामी गोविंद देव गिरिजी महाराज यांच्या हस्ते डॉ. शिवरत्न शेटे यांना पुरस्काराने गौरविण्यात आले. यावेळी व्यासपीठावर आयुष्यमान भारत योजनेचे महाराष्ट्र प्रमुख डॉ. ओमप्रकाश शेटे, डॉ. सुप्रज्ञा शेटे, गीता परिवाराचे उपाध्यक्ष हरिनारायण व्यास, राष्ट्रीय कार्यकारणी सदस्या संगीता जाधव, राष्ट्रीय कार्यकारणी सदस्य ओम दरक, श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र आयोध्याचे आर्थिक सल्लागार समितीचे प्रमुख सी. ए. राजगोपाल मिणीयार, हेमंत पिंगळे उपस्थित होते. राष्ट्र, धर्म, समाजासाठी जाणीव जागृतीचे उत्तुंग कार्य करणाऱ्या व्यक्तींना गीता परिवारातर्फे स्वामी विवेकानंद राष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात येते. स्मृतिचिन्ह, मानपत्र, महावस्त्र आणि ७१ हजार रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप होते. शिवचरित्र व्याख्याते डॉ. शिवरत्न शेटे यांनी आजवर शेकडो व्याख्यानांच्या माध्यमातून समाजाला छत्रपती श्री शिवाजी महाराजांचे चरित्र सांगितले आहे. 'चला संस्कार जपूया' या व्याख्यान मालिकेतून विशेषतः तरुणींसह संपूर्ण कुटुंब प्रबोधनासाठी महाराष्ट्रभर हजारो नागरिकांची जाणीवजागृती केली आहे. डॉ. शेटे यांच्या या कार्यासाठी त्यांना सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी डॉ. शेटे म्हणाले, श्री शिवचरित्रावर भगवान श्रीकृष्ण यांचा मोठा प्रभाव दिसून येतो.

संपूर्ण शिवचरित्र हे जणू कृष्णनीतीला वाहिले आहे, असे भगवान श्रीकृष्णांच्या आणि श्री शिवचरित्राच्या अभ्यासातून दिसते. युद्ध, तह, आक्रमण असो किंवा राजनीति असो या प्रत्येकवेळी छत्रपती श्री शिवरायांनी अत्यंत बुद्धिमत्तेने आणि सावधपणे निर्णय घेऊन धर्म रक्षणाचे काम केले. प्रास्ताविक हरिनारायण व्यास यांनी केले. गुरूशांत धुत्तरगावकर यांनी सूत्रसंचालन तर सी.ए. राजगोपाल मिणीयार यांनी आभार प्रदर्शन केले.

विरंगुळा संस्थेची सर्वसाधारण सभा उत्साहात

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २४ सप्टेंबर-

विरंगुळा जेष्ठ नागरिक बहुउद्देशीय संस्थेची पहिली वार्षिक सर्वसाधारण सभा शंकर बटगेरी यांच्या अध्यक्षतेखाली द्वारकाधिश मंदिरात खेळीमेळीत पार पडली.

सभेसाठी प्रमुख अतिथी म्हणून माजी उपमहापौर राजेश काळे व ब्रीजमोहन वृध्दाश्रमचे संस्थापक ब्रीजमोहन फोफलिया उपस्थित होते. सभेची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. उपस्थितांचे स्वागत शंकर बटगेरी यांनी केले. विषय वाचन सचिव बाळासाहेब पाटील यांनी केले. विषय पत्रिकेवरील सर्व विषयांना सभासदांनी एक मताने मंजूरी दिली. या सभेस उपाध्यक्ष आंनद कानडे, सहसचिव विठ्ठल भोसले, खजिनदार मारूती गोरे, संचालक त्र्यंबक कुंभार, अरुण कदम, महादेव बिराजदार उपस्थित होते. सभा यशस्वी करण्यासाठी पाठक विलास कुलकर्णी, अवदप्पा पुजारी, वसंत पवार यांचे सहकार्य लाभले.

जिल्ह्यात होणार ५९ अंगणवाड्यांचे बांधकाम

साडेसात कोटींचा निधी

जिल्हा नियोजन समितीतून मंजुरी

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २४ सप्टेंबर-

अंगणवाडी बालकांचा हक्काचा निवारा उपलब्ध करुन देण्यासाठी जिल्हा नियोजन समितीतून सात कोटी ६० लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. त्यामुळे जिल्ह्यात ५९ अंगणवाड्यांचे बांधकाम होणार आहे तसेच ९६ अंगणवाड्यांची किरकोळ दुरुस्ती, शौचालयांचे बांधकाम करण्यात येणार आहे.

जिल्ह्यात इमारती नसलेल्या अंगणवाड्यांच्या इमारत बांधकामासाठी तालुका बाल विकास प्रकल्प अधिकारी यांच्याकडून जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाकडे प्रस्ताव येतात. त्या प्रस्तावांतून ज्या गावामध्ये अंगणवाडी बांधकामांची गरज गरज आहे, तेथे अंगणवाडी बांधकामासाठी जागा उपलब्ध आहे, अशाठिकाणीच अंगणवाडी बांधकामांना मंजुरी दिली जाते. त्यासाठी बालविकास प्रकल्प अधिकारी हे प्रस्ताव आलेल्या गावामध्ये जाऊन जागेची शहानिशा करुनच अंगणवाडी बांधकामांना मंजुरी देण्यासाठी प्रस्ताव पाठवित असल्याची माहिती महिला व बालकल्याण विभागाने सांगितली. जिल्हा नियोजन समितीकडून चालू वर्षात जिल्ह्यात ५९ नवीन अंगणवाडी बांधकाम, ९६ अंगणवाड्यांच्या किरकोळ दुरस्तीसाठी निधी मंजूर केला आहे. नवीन अंगणवाडी बांधकामांसाठी ११ लाख २५ हजार रुपये दिले जाणार आहे. दुरुस्तीसाठी एक लाख रुपयांचा निधी देण्यात येणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील ९६ अंगणवाड्यांची किरकोळ दुरुस्ती होणार आहे.

अंगणवाडी बांधकामासाठी - १३० प्रस्ताव
अंगणवाडी बांधकाम संख्या - ५९
अंगणवाडी दुरुस्ती संख्या - ९६
अंगणवाडी बांधकाम निधी ११ लाख २५ हजार
अंगणवाडी दुरुस्तीसाठी - एक लाख रुपये

जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून जिल्ह्यात ५९ अंगणवाड्यांचे बांधकाम होणार आहे. यासाठी शंभरपेक्षा जास्त प्रस्ताव आले आहेत. जेथे अंगणवाडी बांधकामाची गरज आणि जागा उपलब्ध असेल तेथे प्राधान्याने अंगणवाडीचे बांधकाम करण्यात येईल.

- प्रसाद मिरकले,
जिल्हा कार्यक्रम अधिकारी,

अंनिसचे प्रबोधन: अंत्रोळी गावात देवीचा कौल, चमत्काराच्या अफवा



तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २४ सप्टेंबर-

दि १० सप्टेंबर मंगळवार रोजी अंत्रोळी दक्षिण सोलापूर येथील लक्ष्मी मंदिरात चमत्कार झाला अशा सरवत्र चर्चा सुरू झाल्या. एका उभ्या दगडावर फक्त शेंदूर फासलेले एक देवीचे छोटेसे मंदिर आहे. त्या देवीला रात्रीतून डोळा आला अशी चर्चा सुरू झाली. चमत्कार घडला, देवी जागृत झाली आहे, तिने १ डोळा उघडला आहे, कौल दिला आहे, नवरात्रीत दुसरा डोळा सुद्धा येणार आहे, मोठे मंदिर बांधले पाहिजे, यात्रा काढली पाहिजे अशा असंख्य अफवा पाहता पाहता सर्वदूर परिसरात पसरल्या.

आजू बाजूच्या गावतूनही लोक दर्शनासाठी येवून गर्दी करू लागले. पाहता पाहता तिथे खण, नारळ, नेवेद्य इ चा ढीग होवू लागला. त्या देवीचा तो डोळा असलेला फोटो बघता बघता सोशल मीडिया वर वायरल झाला. अंधश्रद्धा निर्मुलन समिती सोलापूर शहर शाखेस सदर बातमी कळताच त्यांनी अंत्रोळी येथे जावून गावकऱ्यांचे प्रबोधन करायचे ठरविले. त्याच बरोबर त्यांनी सोलापूर ग्रामीण पोलिस उपअधिक्षक विजयालक्ष्मी कुर्री यांना सदर घटनेची माहिती दिली. उपअधीक्षकांनी अनिस सोबत मंद्रुप पोलीस सहकार्यासाठी आश्वासन दिले.

मंद्रूप पोलीस स्टेशनमधील श्रीकांत बुर्जे आणि आयेशा फुलारी हे पोलीस अनिस टीम सोबत सदर ठिकाणी गेले. अनिस ची टीम सदर मंदिरात जाताच हळूहळू गावकऱ्यांची गर्दी झाली. प्रथम झाला प्रकाराबद्दल सखोल चौकशी करून नेमके काय कसे झाले ही माहिती काढण्यात आली. एका लहान मुलाने प्रथम देवीला डोळा आला असे पाहून सर्व गावकऱ्यांना सांगितले आणि हि अफवा पसरली. पुजाऱ्याने दुसऱ्या बाजूला सुद्धा खपली निघत आहे, तेथेही डोळा येईल असे सांगितले. सर्वांचे ऐकून घेतल्या नंतर गावकऱ्यांना समजावून सांगण्यात आले कि कोणतीही गोष्ट अपोआप चमत्काराने घडत नसते. प्रत्येक गोष्टीच्या मागे काहीतरी कार्यकारण भाव हा असतो. हा डोळा आपोआप आलेला नसून तो खोडसाळपणे कोणीतरी चिकटविला आहे. हा चमत्कार नाही. दुसऱ्या बाजूला असलेली खपली दुसरा डोळा येणार असल्याची खुण नसून फासलेल्या शेंदुराचा पापुद्रा आहे. जर कोणी हा चमत्कार आहे असा दावा करीत असेल तर त्यांनी अनिस ला ते लेखी द्यावे, आम्ही योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यास तत्पर आहोत. असे सांगताच कोणीही पुढे आले नाही. बहुसंख्य नागरिकांनी हा चमत्कार नसून खोडसाळपणाने कोणीतरी हा डोळा चिकटवला असे सांगितले. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मुलन समिती सोलापूर शहर शाखेचे कार्यकर्ते प्रा शंकर खलसोडे, मानसोपचारतज्ञ डॉ अस्मिता बालगावकर, उषा शहा, निशा भोसले, अंजली नानल, ग्रंथमित्र कुंडलिक मोरे, इतिहासतज्ञ नितीन अन्वेकर, सिद्धार्थ परिट, ब्रम्हानंद धडके इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते.

अफवा आहे

शेवटी पुजाऱ्याने कबुल केले की, इथे कोणताही चमत्कार नाही. ही अफवा आहे. देवी जागृत झाली, प्रसन्न झाली, कौल दिला असे काहीही आमचे म्हणणे नाही.

- तानाजी कोळी, पुजारी

कोणत्याही प्रकारच्या चमत्काराचा दावा करणे हे जादूटोणा प्रतिबंध व उच्चाटन कायद्या अंतर्गत कायदेशीर गुन्हा आहे. असा कोणीही दावा करीत असल्यास त्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

-डॉ. अस्मिता बालगावकर,
महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मुलन समिती

मुलीचा विनयभंग; तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल

सोलापूर, दि. २४ सप्टेंबर -

शाळकरी मुलीचा विनयभंग केल्याप्रकरणी जेलरोड पोलीस ठाण्यात तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रामन्ना उर्फ बालाजी सुभाष मुदगल (रा. सोलापूर) असे गुन्हा दाखल झालेले तरुणाचे नाव आहे. याबाबत पिडीत मुलीच्या नातेवाईकांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील फिर्यादी यांची पुतणी शाळेला जात असताना आरोपीने पाठलाग करून मोबाईल नंबर मागितला. ही घटना २१ सप्टेंबर रोजी सकाळी आठच्या सुमारास घडली.

तत्पूर्वी गणेशोत्सवाच्या दरम्यान ही आरोपीने अशाच प्रकारे पिडीतेला मोबाईल नंबर मागितल्याची घटना घडली होती. म्हणून जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा तपास जेलरोड पोलीस करत आहेत.

संक्षिप्त वृत्त

बार्शीत धनगर समाजाचे रस्ता रोको

बार्शी, दि. २४ सप्टेंबर-

तालुक्यातील मालवंडी येथे सकल धनगर समाजाच्यावतीने धनगर समाजाला एसटी प्रवर्गामध्ये आरक्षण मिळावे यासाठी मालवंडी येथील बस स्थानकाच्या चौकामध्ये रस्ता रोको आंदोलन करण्यात करण्यात आले होते. गेल्या ७0 वर्षांपासून धनगर समाजाची मागणी असलेल्या एसटी प्रवर्गामध्ये धनगर समाजाला आरक्षण मिळावे यासाठी समाजाच्यावतीने वर्ष नव वर्ष गल्लीपासून दिल्लीपर्यंत अनेक मोर्चे आंदोलने रस्ता रोको करण्यात आलेले होते. तरीही सरकारला जाग येत नाही म्हणून 'अभी नही तो कभी नही' हे ब्रीद वाक्य घेऊन धनगर समाजाच्यावतीने संपूर्ण महाराष्ट्रामध्ये आज आंदोलने करण्यात आली आहेत. धनगर समाजाच्यावतीने अनेक समाज बांधव उपोषणाला बसलेले आहेत तरीही सरकार दखल घेत नाही म्हणून या सरकारने दखल घेऊन सकल धनगर समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण मिळावे म्हणून मालवंडी येथे रस्ता रोको आंदोलन करण्यात आले होते. यावेळी जिल्हा परिषद सदस्य श्रीमंत थोरात, सुनील सलगर, संतोष थोरात यांनी समाजाबद्दल मनोगत व्यक्त केले. यावेळी हनुमंत होनमाने, पांडुरंग सलगर, सोमनाथ थोरात, शशिकांत पाटील, हरिभाऊ बीडकर, हनुमंत कानडे, विठ्ठल पांढरे, उद्धव करे उपस्थित होते.

उत्कर्ष विद्यालयात हिंदी दिन साजरा

सांगोला, दि.२४ सप्टेंबर-

येथील उत्कर्ष विद्यालय येथे हिंदी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. हिंदी निबंध स्पर्धा, हिंदी सुलेखन स्पर्धा घेण्यात आल्या. यावेळी हिंदी कविता पठण व हिंदी साहित्य लेखक प्रेमचंद यांच्याविषयी माहिती तसेच हिंदीचे महत्त्व पटवून देणारे नाटक व हिंदी व्याकरणावर आधारित गीताचे सादरीकरण पाचवी ते नववीमधील विद्यार्थ्यांनी केले. हिंदी विभाग प्रमुख डॉ. नवनाथ शिंदे यांनी हिंदी भाषेचे महत्त्व सांगत भाषा समृद्ध असेल तरच मनुष्य जीवनात प्रगती करू शकतो म्हणूनच भाषेचे श्रवण, भाषण, वाचन, लेखन ही कौशल्य विद्यार्थ्यांनी आत्मसात करून भाषा समृद्ध करावी, असे सांगितले. प्राचार्य कुलकर्णी यांनीही मार्गदर्शन केले. यावेळी पर्यवेक्षक भोसले, मिसाळ, ज्ञानदा कुल, सपताळ, सर्वगोड, मुलाणी, वैभवी लवटे, मनस्वी मिसाळ आदी उपस्थित होते.

सांगोल्यातील शिंपी समाज बांधवांकडून आ. शहाजीबापू पाटील यांचा सत्कार

सांगोला, दि.२४ सप्टेंबर-

सांगोला शहरातील नामदेव शिंपी समाजाचा बऱ्याच दिवसापासून प्रलंबित असलेला समाज मंदिरासाठीचा प्रश्न आ. शहाजी पाटील यांनी मार्गी लावत समाज मंदिरासाठी ५0 लाख रुपये निधी मंजूर केला. समाज मंदिर संदर्भातील महत्वपूर्ण कार्यासाठी समस्त शिंपी समाज बांधवांकडून आ. शहाजी पाटील यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी आ. शहाजी पाटील म्हणाले, समाज मंदिरासाठी कसलाही निधी कमी पडू न देता येणाऱ्या काही दिवसात अतिशय सुंदर व देखणे असे सांगोला शहरात नामदेव शिंपी समाजमंदिर बांधण्यात येईल. यावेळी शिंपी समाजाच्या वतीने शैलेश चांडोले यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी समस्त शिंपी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निधी उपलब्ध होत असल्याने विकासाला गती : लक्ष्मी चव्हाण

श्रीपूर, दि. २४ सप्टेंबर-

महाळुंग-श्रीपूर नगरपंचायतीच्या माध्यमातून १७ प्रभागातील बहुतांशी वॉर्डामधून आज मोठ्या प्रमाणावर पक्के रस्ते, भुयारी गटारींची कामे होत आहेत. माढा मतदारसंघाचे आ. बबनदादा शिंदे यांनी आमदार निधीतून आत्तापर्यंत १५ कोटी उपलब्ध करून दिले असून अजून ९ कोटी रुपयांच्या कामांना मंजुरी दिली आहे. यामुळे विकास होत असल्याचे नगराध्यक्षा लक्ष्मी चव्हाण यांनी सांगितले. महाळुंग-श्रीपूर नगरपंचायतीस निधी उपलब्ध होत असल्याने या भागात विकासकामांना गती आली आहे. श्रीपूर नगरपंचायतमिधील वॉर्ड नं. बारा (जमदाडे प्लॉट) मध्ये पंचवीस लाख रुपयांची भुयारी गटार व सिमेंट रस्त्याचे कामांचे भूमिपूजन नगराध्यक्षा लक्ष्मी चव्हाण व पत्रकार बी. टी. शिवशरण यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी गटनेते राहुल रेडे-पाटील, नगरसेविका तेजश्री लाटे, प्रकाश नवगिरे, रावसाहेब सावंत-पाटील, मौला पठाण, विक्रमसिंह लाटे, भाऊसाहेब कुलकर्णी, लक्ष्मण आतार, पैलवान अशोक चव्हाण, वगरे, पांडुरंग गोरे, आबा रजपूत, विपिन वगरे, योगेश जोशी उपस्थित होते. यावेळी नगरसेवक राहुल रेडे-पाटील यांनी नागरिकांनी आपल्या वॉडीमधील समस्या तसेच विकास कामे सुचवावीत ती सर्व कामे पूर्ण करण्याचा आम्ही प्रयत्न करू असे सांगितले.

आरक्षण द्या; अन्यथा मोठी किंमत मोजावी लागेल

शिवाजी कांबळे; धनगर आरक्षणासाठी करकंबमध्ये रास्ता रोको

तभा वृत्तसेवा,
करकंब, दि.२४ सप्टेंबर-

गेल्या १0 वर्षांपूर्वी आरक्षण देण्याचे आश्वासन सध्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी दिले होते.परंतु अजूनही धनगर समाजाला न्याय मिळालेला नाही. अनुसूचित जमातीतून (एसटी) आरक्षण मिळायलाच हवे.येत्या १0 दिवसात त्याचा विचार झाला नाही तर, या सरकारच काय होईल हे सांगता येत नाही. धनगर समाजाला आरक्षण द्या अन्यथा तुम्हाला मोठी किंमत मोजावी लागेल. त्यासाठी एकजुटीने लढण्याचे आवाहन जि. प.चे मा. समाजकल्याण सभापती शिवाजी कांबळे यांनी करकंब येथील रास्ता रोको कार्यक्रमात केले.

धनगर (एसटी) आरक्षणाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी यासाठी सोमवारी जळोली चौक, करकंब येथे रास्तारोको करण्यात आले. यावेळी विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अभिजीत पाटील यांनी धनगड आणि धनगर या शब्दांच्या खेळामुळे कित्येक वर्षे झाली हा आरक्षणाचा प्रश्न प्रलंबित राहिला आहे. त्यासाठी खांद्याला खांदा लावून, एकजूट होऊन सर्वांनी काम करण्याची गरज आहे. आम्ही तुमच्या सोबत आहोत ही आरपारची लढाई आहे, असे मनोगत व्यक्त केले. यावेळी संचालक युवराज दगडे, आप्पासाहेब पाटील, जळोली सरपंच ज्योतीराम मदने, नितिन गायकवाड, राष्ट्रवादी महिला जिल्हा उपाधक्ष सविता नवगिरे, सचिन शिंदे इरफान तांबोळी यांचीही भाषणे झाली. यावेळी सकल धनगर समाजाच्यावतीने आरक्षणाबाबतच्या मागण्यांचे निवेदन मंडलाधिकारी राजाभाऊ वाघमारे, करकंबचे सपोनि सागर कुंजीर, तलाठी आकांक्षा फुले व तोडकर यांना देण्यात आले.

आबांनी वाजविला ढोल

धनगर समाजाला आमचा पाठिंबा आहे, असे सांगून विठ्ठल स. सा. कारखान्याचे अध्यक्ष अभिजित पाटील यांनी गळ्यात ढोल अडकवून तो वाजविताच आरक्षण आमच्या हक्काचे नाही कोणाच्या बापाचे अशा घोषणा दिल्या. रास्ता रोकोमुळे जवळपास ५ किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या होत्या.

धनगर समाजाच्या मागण्या

राज्य सरकारने तात्काळ धनगडांचे दाखले रद्द करावेत.आदिवासी समाजाच्या ७ टक्के आरक्षणाला धक्का लागू नये ही धनगर समाजाची भावना आहे.धनगर समाजाच्या एसटी आरक्षण अंमलबजावणीचा जीआर राज्य सरकारने तात्काळ काढावा. अनुसूचीत जमातीच्या यादीत ३६ नंबरला धनगड ऐवजी धनगर असे गृहीत धरून धनगर समाजाला अनुसूचित जमातीचे दाखले वितरित करण्यात यावेत.

वडार समाजाचा अकलूजमध्ये मोर्चा

तभा वृत्तसेवा,
अकलूज, दि. २४ सप्टेंबर-

गणपती विसर्जनाप्रसंगी वडार समाजाच्या बंधू-भगिनींवर अकलूज पोलिसांनी केलेल्या कथित लाठी हल्ल्याची चौकशी होऊन संबंधितांवर कारवाई करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सकल वडार समाजाच्या वतीने उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालयावर निषेध मोर्चा काढून निवेदन देण्यात आले. एका आठवड्यात या प्रकरणाची चौकशी करुन कार्यवाही करण्याचे पोलीस उपअधीक्षक नारायण शिरगावकर यांच्या अश्वासनानंतर मोर्चा विसर्जित झाला.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापासून अभिवादन करुन मोर्चाला सुरुवात झाली. जुने बसस्थानक, साहित्यरत्न आण्णा भाऊ साठे स्मारक, सदुभाऊ चौकमार्गे निषेधाच्या घोषणा देत महर्षी चौकातून मोर्चा अकलूज उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर आल्यावर मोर्चेकऱ्यांनी ठिय्या मांडून उपविभागीय पोलीस अधिकारी नारायण शिरगावकर यांना निवेदन दिले. याप्रसंगी राज्य वडार संघटनेचे विजय चौगुले, राष्ट्रवादीचे उत्तमराव जानकर, किरण साठे, सुरेश धोत्रे, सुनीता जाधव, अमोल धोत्रे उपस्थित होते.

अणदूर येथे पालखी मिरवणुकीने पर्यूषण पर्वाची सांगता

पालखी, सामुदायिक नमोकार महामंत्राने झाली दिवसाची सुरुवात

तभा वृत्तसेवा,
अणदूर, दि. २४ सप्टेंबर-

तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील जैन कासार समाज बांधवांकडून पर्यूषण पर्वाच्या कालावधीत विविध धार्मिक उपक्रम घेऊन दशलक्षण उपवास, सोडशकारण व्रत, पंचमेरू स्थापना, सुगंध दशमी, श्रुतपंचमी, व्याख्यानमाला, क्षमावलिने पर्यूषण पर्वाची सांगता झाली.

या कालावधीत झालेल्या व्याख्यानमालेमध्ये उत्तम क्षमा, उत्तम मार्दव, उत्तम आर्जव, उत्तम सत्य, उत्तम संयम, उत्तम तप, उत्तम अकिंचण्य, उत्तम ब्रम्हचर्य आणि उत्तम त्याग या व अशा विषयांवर जैन अभ्यासिका धर्मानुरागी सुरेखा नान्नजकर आणि जैन अभ्यासक धर्मानुरागी नेमचंद अग्रे यांचे व्याख्यान घेण्यात आले. २२ सप्टेंबर रोजी अनंत रोटच्या निमित्ताने पांडूशीला पूजन, अभिषेक आणि चढाव घेऊन पालखी मिरवणुकीला सुरुवात झाली. यावर्षीचा मिरवणुकीचा मानाचा मोठा कळस प्रियांका सनद धावते यांच्या परिवाराने मिळविला तर श्राविका पूनम अभिनंदन कंदले यांनी स्वेच्छेने मोठ्या स्वरूपात देणगी देऊन मानाच्या दुसऱ्या मोठ्या कळसाच्या मानकरी ठरल्या. या निमित्ताने काढण्यात आलेल्या पालखी मिरवणुकीमध्ये श्रावक श्राविकांनी ध्वज घेऊन अहिंसा परमो धर्म की जय, सिद्धांत शास्त्र की जय, पर्युषण पर्व की जय या व अशा घोषणा देऊन हा दिवस उत्साहात पार पाडला. यावर्षीचे अनंत रोटचे भोजनदाते पायल प्रफुल्ल कस्तुरे यांचा परिवार होता. त्याप्रमाणे सर्वसमाज बांधवांना जैन मंदिरामध्ये महाप्रसाद देण्यात आला. यावेळी आळंद, सोलापूर, विजापूर, पुणे, धाराशिव, काकरंबा व परिसरातील सर्व नातेवाईक, जैन व कासार समाज बांधव उपस्थित होते. भगवान महावीर जयंती, पर्यूषण पर्व यासह वर्षभरातील अनेक सण व उत्सव एकत्र पद्धतीने साजरा करण्याची परंपरा जैन कासार समाज बांधवांमध्ये आहे.

कोल्हापूर-कलबुर्गी-कोल्हापूर इंटरसिटी रेल्वे सुरू करा

अशोक कामटे संघटनेची मागणी

तभा वृत्तसेवा,
सांगोला, दि.२४ सप्टेंबर-

शहीद अशोक कामटे बहुउद्देशीय सामाजिक संघटनेच्यावतीने पुणे विभागाचे वरिष्ठ मंडल कार्मिक अधिकारी मच्छिंद्र गळवे यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. यामध्ये कोल्हापुरातून सोलापूरला जाण्याकरता सकाळच्या ७ ते ८ यावेळेत रेल्वे सुरू करावी, परतीच्या प्रवासाकरता सायंकाळी ५ वाजता कलबुर्गी ते कोल्हापूर अशी रेल्वे सेवा सुरू करावी, यासह विविध मागण्या करण्यात आल्या आहेत.

कोल्हापूर-सोलापूर-हैदराबाद रेल्वे सेवा सुरू करावी,कोल्हापूर ते कोलकत्ता, कोल्हापूर-पंढरपूर-तिरुपती रेल्वे सुरू करावी,कुर्डूवाडी मिरज रेल्वेचा विस्तार कोल्हापूर पर्यंत करावा तसेच लातूर,मिरज,कोल्हापूर या मार्गावरील पुणे अंतर्गत येणारे रेल्वे दुहेरीकरणाचे काम ही तात्काळ सुरू करावे, दुहेरीकरणापर्यंत मिरज ते कुर्डूवाडी मार्गावरील क्रॉसिंग पॉइंट वाढवावेत अशी मागणी करण्यात आली आहे. सदर निवेदनाच्या प्रती रेल्वेमंत्री, महाव्यवस्थापक,सोलापूर व पुणे विभागातील सर्व खासदार, वरिष्ठ अधिकारी यांना देण्यात आल्या आहेत अशी माहिती संघटनेने दिली.

निवेदनानुसार कोल्हापूर-कलबुर्गी-कोल्हापूर इंटरसिटी, कोल्हापूर-हैदराबाद रेल्वेचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयास पाठवून पाठपुरावा करणार आहे. प्रामुख्याने या माणदेशातील संघटना, प्रवाशांच्या सूचना व मागण्यांकरिता सकारात्मक अहवाल वरिष्ठ कार्यालयास पाठवून गैरसोय दूर करण्याचा प्रयत्न करु. रेल्वेसेवा वाढवण्यावर भर देणार आहे. **- मच्छिंद्र गळवे**
विभागीय अधिकारी, कार्मिक सेवा, भारतीय रेल्वे

हायकोर्टात आठ जणांची आणखी एक जनहित याचिका

अनगर अप्पर तहसील रद्द करण्यासाठी समितीचा पुढाकार; सोमेश क्षीरसागर यांची माहिती

तभा वृत्तसेवा,
मोहोळ, दि. २४ सप्टेंबर-

तालुक्यातील अनगर अप्पर तहसील रद्द करण्यासाठी समितीच्या वतीने हायकोर्टात ८ जणांनी मिळून आणखी एक जनहित याचिका ही अॅड. धनंजय चव्हाण (मुंबई) यांच्यामार्फत दाखल केली असल्याची माहिती सोमेश क्षीरसागर यांनी दिली.

या जनहित याचिकेला पीआयएल/२६८६६/२०२४ असा नंबर पण पडला आहे. मोहोळ तालुक्याचे विभाजन होऊन अनगर येथे नव्यानेच अपर तहसील कार्यालय मंजूर केल्याचा आदेश राज्य शासनाकडून पारित झालेला आहे.याला विरोध करण्यासाठी मोहोळ तालुका बचाव संघर्ष समितीची स्थापना झाली असून या समितीच्या माध्यमातून मागील अनेक दिवसापासून अनेक वेगवेगळ्या धाटणीची आंदोलने केली आहेत. तर मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्याही भेटी घेऊन मोहोळ तालुका बचाव संघर्ष समितीच्या सदस्यांनी आपली कैफियत मांडली. मात्र त्यावर कोणताही तोडगा निघत नसल्याने, समिती ने या पूर्वी ही न्यायालयीन लढा लढण्यासाठी ड. अनंत वडगावकर बार असोसिएशन मोहोळ यांच्या माध्यमातून मुंबई उच्च न्यायालयात रीट याचिका दाखल केली आहे.

आता ही दुसरी जनहित याचिका सोमेश क्षीरसागर (नरखेड मोहोळ), उमेश पाटील (नरखेड) विजयराज डोंगरे (शेटफळ) मानाजी माने (पेनूर), नरखेडचे सरपंच यशवंत मोटे, बालाजी खुर्द (येवती), विक्रांत दळवी (पोखरापूर) मनोज मुळे (सारोळे) या आठ जणांनी दाखल केली आहे. यामुळे यावर निर्णय काय होणार याकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे. याच्या आदी संतोष पाटील नरखेडकर यांनीही एक जनहित याचिका दाखल केले आहे, ती मंगळवारी दि. २४ सप्टेंबर रोजी मुख्य न्यायाधीशांच्या देवेंद्र कुमार उपाध्याय यांच्या समोर सुनावणीस येईल असेही सोमेश आबा यांनी सांगितले. या दोन्हीही याचिकांच्या साठी सीनियर कौन्सिल अॅड. अनिल अंतुरकर, अॅड. वृषाली मैदाड (मुंबई) अॅड. धनंजय चव्हाण (माढा) हे काम पाहणार आहेत असेही सोमेश आबा यांनी सांगितले.

अनगर येथे नव्याने मंजूर झालेले अप्पर तहसील कार्यालय रद्द करण्यासाठी मोहोळ तालुक्यातून मोठी जनचळवळ उभी राहिली आहे. अनेक आंदोलने करून ही प्रशासन व शासनाला जाग येत नसल्याने मोहोळ तालुका बचाव संघर्ष समितीच्या वतीने न्यायालयीन लढा लढण्याची केली आहे. याबाबत संघर्ष समितीचे सोमेश क्षीरसागर हे माध्यमांशी बोलत होते. त्यांनी पुढे सांगितले की, या अप्पर तहसील कार्यालयाची निर्मिती करताना महाराष्ट्र राज्य महसूल अधिनियम कायद्याची अंमलबजावणी झाली आहे काय?, हे कार्यालय नव्याने सुरू करत असताना त्याचे प्रसिद्धीकरण व नागरिकांच्या हरकती मागवल्या आहेत काय?, शासनाने व प्रशासनाने या कार्यालयाची निर्मिती करताना कोणत्या मूलभूत बाबी विचारात घेतल्या आहेत? अनगर पेक्षा मोहोळ हेच जवळचे, सोयीस्कर व मध्यवर्ती ठिकाण आहे हे दिसून येते. अनगर हे त्यांना आडवळणीचे व गैरसोयीचे होते आहे. तसेच कायदेशीरदृष्ट्या व लोकांच्या सोयीच्या दृष्ट्या शासनाने घेतलेला हा निर्णय अत्यंत चुकीचा आहे. त्याच बरोबर एखाद्या राज्याचा संविधानिक प्रमुखाने एखाद्या निर्णयाला स्थगिती दिली तर त्या स्थगिती निर्णयाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित महसूल विभागाची असते. ती अद्याप का झालेली नाही. म्हणजे मुख्यमंत्र्यांच्या स्थगितीला काहीच अर्थ नाही का?, मुख्यमंत्री हे राज्याचे संविधानिक प्रमुख असतात.त्यांचा हा अपमानच आहे. या सर्व बाबी दाखल केलेल्या याचिकेत नोंदविल्या आहेत, असे सोमेश क्षीरसागर म्हणाले.

मोहोळ तालुका संघर्ष समितीचे हे आहेत जनहित याचिकाकर्ते

सोमेश क्षीरसागर (नरखेड मोहोळ), उमेश पाटील (नरखेड), विजयराज डोंगरे (शेटफळ), मानाजी माने (पेनूर), नरखेडचे सरपंच यशवंत मोटे, बालाजी खुर्द (येवती), विक्रांत दळवी (पोखरापूर) मनोज मुळे (सारोळे) हे समितीचे जनहित याचिकाकर्ते आहेत तर या अगोदर मोहोळ बार असोसिएशनच्या वतीनेही एक याचिका दाखल केली आहे.तसेच अन्य दोन याचिकाही पुढील आठवड्यात दाखल होण्याची शक्यता आहे.

आशा लोंढेची पोलिस दलात भरती

तभा वृत्तसेवा,
श्रीपूर, दि. २४ सप्टेंबर-

श्रीपूर येथील आशा रमेश लोंढे हिची पुणे सिटी पोलिस दलात पोलीस शिपाई म्हणून भरती झाली. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत तिले नारायण आगाशे कनिष्ठ महाविद्यालयातून पधवी शिक्षण पूर्ण केले. शालेय जीवनापासून मैदानी खेळात प्राविण्य मिळवत तिने अकलूज येथील पोलिस अकॅडमीत प्रशिक्षणाचा कालावधी पूर्ण केला. ब्रिमा सागर महाराष्ट्र डिस्टिलरी श्रीपूरमध्ये सुरक्षा विभागात जमादार असलेले रमेश लोंढे यांची ती मुलगी आहे. प्रतिकुल परिस्थितीतून तिने हे यश मिळवल्याबद्दल तिचं सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे.

अक्कलकोट तालुक्यातील तात्पुरते समायोजन रद्द झाल्यास आंदोलन करणार

ग्रा.पं. अंकलगे अन गुड्डेवाडी कडून सीईओंना निवेदन

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २४ सप्टेंबर

अक्कलकोट तालुक्यातील झेडपीच्या शाळेत अत्यल्प कमी पट असलेल्या शाळेवरील व अतिरिक्त शिक्षक असलेल्या शाळेवरील शिक्षकांची तात्पुरती नियुक्ती विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवु नये यासाठी करण्यात आलेली आहे. अश्या विविध मागण्यांचे निवेदन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांना ग्रा.पं. अंकलगे अन गुड्डेवाडी ग्रामस्थ,पालक,शाळा समिती,ग्रा.पं. सरपंच यांनी दिले. तात्पुरते समायोजन रद्द झाल्यास झेडपी समोर आंदोलन करणार करणार असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

या दिलेल्या निवेदनात असे नमुद केले आहे की, अक्कलकोट तालुक्यात करण्यात आलेल्या शिक्षकांच्या सर्व तात्पुरत्या स्वरुपाच्या नियुक्त्या या ग्रामस्थ, पालक, सरपंच यांनी यांना वेळोवेळी गटशिक्षणाधिकारी यांना फोन करुन व प्रत्यक्ष भेटून शाळेला कुलूप लावून आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा विद्यार्थ्यांच्या हितासाठी त्यांना देण्यात आलेला होता. यात कोणताही गटशिक्षणाधिकारी यांचा स्वार्थ दिसून येत नाही. तालुक्यातील शिक्षण व्यवस्था विस्कळीत झालेली आहे. गटशिक्षणाधिकारी प्रशांत आरबळे हे तालुक्याचा पदभार घेतल्यापासून शिक्षण व्यवस्थेला शिस्त लागली आहे. गटशिक्षणाधिकारी सतत पालकांच्या संपर्कात राहुन विद्यार्थ्यांच्या विकासासाठी सतत प्रयत्नशील असतात. शाळेवर तात्काळ शिक्षकांची नियुक्ती करावी व्यक्तिश: शिक्षणाधिकारी यांना जबाबदार धरु नये असही निवेदनात नमुद केले आहे.

आमचा तडवड भाग हा सीमा भागात असलेला आहे. पूर्ण शिक्षकांची कमतरता असून, शाळेची पटसंख्या १२0 असून, आपल्या शाळेत दोन शिक्षक होते. वेळोवेळी शिक्षकांची मागणी करुनही शिक्षक उपलब्ध होत नव्हते, त्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत होते. त्यामुळे ग्रामस्थांच्या लोकवर्गणीतून उच्चशिक्षीत दोन शिक्षक शाळेवर घेण्यात आले आहे. आता शाळेवर तीन शिक्षक आहेत. गटशिक्षणाधिकारी आरबळे यांना विनंती केल्यानंतर त्यांनी शाळेची परिस्थिती पाहता तातापुरती एक शिक्षक शाळेवर देण्यात आला आहे.

- मारुती कोळी, पालक,

शिक्षकांची तातपुरती प्रतिनियुक्ती रद्द करण्यासाठी शिक्षण संघटनेनी मागणी केली होती. विद्यार्थ्यांच्या हिता विरोधी असून, तसे केल्यास संपूर्ण व्यवस्था कोलमडून पडेल.

- प्रशांत आरबळी, गटशिक्षणाधिकारी, अक्कलकोट

शिक्षकांची प्रतीनियुक्ती करण्यांचा अधिकार यांना कोणी दिला. हा अधिकार पुणे आयुक्तांना आहे. गटशिक्षणाधिकारी यांनी शिक्षकांच्या प्रतिनियुक्त्या केल्याच कसे. गटशिक्षणाधिकारी यांनी प्रसारमाध्यमांसमोर यायचा अधिकार त्यांना नाही. महाराष्ट्र शिस्तीचा भंग केला आहे. त्यांनी प्रत्येक नियमाचे भंग करुन काम काज चालु ठेवले आहे. यांच्या कामकाजाचा आम्ही मागास्वर्गीय शिक्षक संघटना आणि सुकानू समीतीच्या वतीने आम्ही निषेध व्यक्त करतो.

- महांतेश कट्टीमनी, अध्यक्ष
मागास्वर्गीय शिक्षक संघटना, अक्कलकोट

आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

मराठा आरक्षणाच्या पाठिंब्यासाठी उद्या मंगळवेढा बंदचे आवाहन

तभा वृत्तसेवा
मंगळवेढा, दि. २४ सप्टेंबर -

मंगळवेढा शहर व तालुका सकल मराठा समाज यांचे कडून जाहीर आवाहन करणेत येते की मराठा आरक्षणाच्या लढ्यासाठी मनोजदादा जरांगे पाटील यांचे वर्षभरातील सहावे आमरण उपोषण आहे व गेले ८ दिवसापासून त्यांचे आमरण उपोषण सुरू आहे.

जरांगे पाटील यांची प्रकृती अत्यंत खालावली आहे परंतु सरकार या आंदोलनाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून एक प्रकारे जरांगे पाटील व मराठा समाजाच्या संयम व सहनशीलतेचा अंत पहात आहे व समाजाची अवहेलना करत आहे या निष्ठूर व निर्दयी सरकारचा निषेध व मनोज दादा जरांगे यांचे समर्थनार्थ सकल मराठा समाजाच्या वतीने गुरुवार दिनांक २६ सप्टेंबर रोजी होणाऱ्या बंदमध्ये सर्व शासकीय,निमशासकीय,सहकारी संस्था व व्यापारी यांनी बंदला पाठिंबा देवून खुलेपणाने बंदमध्ये सहभागी व्हावे असे आवाहन सकल मराठा समाज मंगळवेढा तालुका यांच्यावतीने करण्यात आले

संक्षिप्त वृत्त...

मनोज जरांगे-पाटलांना दिर्घायुष्य लाभावे यासाठी ग्रामदैवत म्हंकाळेश्वरला जलाभिषेक

वैराग, दि २४ सप्टेंबर-

बार्शी तालुक्यातील सासुरे येथे सकल मराठा समाजाकडून संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांना दिर्घायुष्य लाभण्यासाठी ग्रामदैवत श्री म्हंकाळेश्वर महाराज यांना आज जलाभिषेक करण्यात आला . मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी अंतरवाली सराटी येथे गेल्या सात दिवसांपासून जरांगे - पाटील यांचे उपोषण सुरू आहे त्यामुळे त्यांची प्रकृती चिंताजनक झाली आहे जरांगे यांनी हा लढा मराठा समाजासाठी उभारला असून त्यास समाजातील सर्व घटकांनी एकत्र येऊन पाठींबा दिला पाहिजे असे मत यावेळी मराठा बांधवांनी व्यक्त केले तसेच सासुरेतील मराठा समाज बांधवांनी एकजुटीने पाठींबा दर्शवला यावेळी बालाजी आवारे ,शिवराज पाटील,उदय आवारे ,सागर आवारे,विकास भारती, स्वप्निल आवारे ,विशाल आवारे, रामेश्वर आवारे, शिवराज दळवी, ऋषिकेश करंडे, दयाळ आवारे, गणेश आवारे,उमाकांत पुजारी,यांनी नागझरी नदीत अंघोळ करून श्री.म्हंकाळेश्वर मंदिरात जलाभिषेक केला.

उदयसिंह मोहिते-पाटील यांच्या जयंतीनिमित्त सायकल वाटप, स्नेहभोजन

अकलूज, दि २४ सप्टेंबर-

उद्योगमहर्षि कै.उदयसिंह मोहिते-पाटील यांच्या ६४ व्या जयंती निमित्त विविध सामाजोपयोगी उपक्रम राबवून अभिवादन करण्यात आले. श्री क्षेत्र आनंदी गणेश येथील कै.उदयसिंह मोहिते-पाटील यांच्या शक्तीस्थलास माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या उपस्थितीत मोहिते-पाटील परिवार व विविध संस्थांचे पदाधिकारी व नागरीकांनी अभिवादन केले. यावेळी श्री क्षेत्र आनंदी गणेश सेवाभावी संस्थेच्या वतीने आनंदनगर परिसरातील गरजू विद्यार्थिनींना सायकलीचे वाटप करण्यात आले तसेच श्रीक्षेत्र आनंदी गणेश परिसरात १५० वृक्षांची लागवड करण्यात आली.अकलूज-माळेवाडी परिसरातील सर्व जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शिवकिर्ती युवा मंचच्या वतीने स्नेहभोजन देण्यात आले.यामध्ये २२०० विद्यार्थी-विद्यार्थीनी व शिक्षकांचा सहभाग होता. कार्यक्रमास माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, शिवशंकर बझारच्या चेअरमन डॉ.स्वयंप्रभादेवी मोहिते-पाटील, आमदार रणजितसिंह मोहिते पाटील, सत्यप्रभादेवी मोहिते पाटील, खासदार धैर्यशील मोहिते पाटील, माजी पं.स.सदस्य अर्जुनसिंह मोहिते-पाटील, शिवरत्न उद्योग समुहाचे चेअरमन किर्तीध्वजसिंह मोहिते-पाटील, बझारच्या माजी अध्यक्षा ईश्वरीदेवी मोहिते-पाटील, सहकार महर्षी कारखान्याच्या संचालिका स्वरूपाराणी मोहिते-पाटील, माजी सरपंच शिवतेजसिंह मोहिते पाटील, किशोरसिंह माने पाटील, विश्वतेजसिंह मोहिते पाटील उपस्थित होते.

बार्शी तहसीलसमोर सुरु असलेल्या उषोपणस्थळी बोंबाबोंब आंदोलन

बार्शी, दि २४ सप्टेंबर-

मराठा समाज मागील अनेक वर्षापासून आंदोलन करत आहे. मराठा समाजाचा संघर्ष होता म्हणून जरांगे-पाटील हे अंतरवाली सरटीमध्ये सहा वेळा आंदोलनाला उपोषणाला बसलेले आहेत. आत्ता देखील ते सहाव्या वेळी आमरण उपोषणाला बसले असताना आज आमरण उपोषणाचा आठवा दिवस आहे. त्यांच्या समर्थनार्थ बार्शी तहसील कार्यालयासमोर आनंद काशीद यांचे आमरण उपोषण चालू आहे. तरी देखील हे सरकार कोणत्याही प्रकारे समाजाच्या मागणीची दखल घेत नसल्यामुळे आंधळ्या आणि बहिऱ्या सरकारच्या नावाने बार्शी तालुक्यातील गरजवंत मराठा समाजाच्यावतीने तहसील कार्यालयासमोरील उपोषणस्थळी बोंबाबोंब आंदोलन करण्यात आले. यावेळी उपोषण करते आनंद काशीद यांनी सरकारने लवकरात लवकर मागण्या मान्य करा व अन्यथा मराठ्यांचा रोष तुम्हाला कदापीही परवडणार नाही, असे आवाहन केले. यावेळी बोंबाबोंब आंदोलनकर्ते विनायक घोडके, किशोर मांजरे, विक्रमबापू घायतिडक, अविनाश लोंढे, मनोज शिंदे, अविनाश मोरे, राहुल डोंगरे, सुधाकर जाधव यांच्यासह मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते. यावेळी बुधवार दि. २५ सप्टेंबर रोजी जरांगे पाटील व आनंद काशीद यांचा अमर उपासनाच्या नवव्या दिवशी एक दिवसाचे उपोषण संपूर्ण बार्शी तालुक्यातील मराठा समाज करणार, असा निर्धार समाज बांधवांनी व्यक्त केला.

तीन ट्रॅक्टर ट्रॉली जप्त, एक होडी तोडली

● अवैध वाळू वाहतुकीवर तहसीलदार लंगुटे यांच्या पथकाची कारवाई

तभा वृत्तसेवा,
पंढरपूर,दि.२४ सप्टेंबर-

अवैध वाळू उपसा व वाहतूकी विरोधात पंढरपूरच्या महसूल विभागाने धडक मोहीम हाती घेतली आहे. शेगाव दुमाला येथे भीमा नदीपात्रात महसूल पथकाने अवैध वाळू व वाहतूकीसाठी वापरण्यात येणारे ३ ट्रॅक्टर ट्रॉलीसह जप्त करण्यात आले आहे. तर शिरढोण येथे भीमा नदीपात्रात एक लाकडी होडी नष्ट करण्यात आली असल्याची माहिती तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिली.

पंढरपूर तालुक्यातील अवैध वाळू उपसा रोखण्यासह वाळूची अवैध वाहतूक करणार्यांच्या विरोधात कारवाई करण्यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद व प्रांताधिकारी सचिन इथापे यांच्या मार्गदर्शनाखाली तहसिलदार सचिन लंगुटे यांनी पथकांची नेमणूक केली आहे. त्यासाठी दररोज रात्री ८.०० ते सकाळी ८.०० वाजेपर्यंत तसेच दिवसा उत्खनन व वाहतुक होत असलेल्या विशिष्ट ठिकाणी धाडी टाकल्या जात आहेत.

शेगाव दुमाला येथे दि. १९ रोजी दुपारी ४.३० च्या सुमारास येथील भिमा नदी पात्रालगत अवैधरित्या वाळु काढण्यासाठी जात असताना तीन ट्रॅक्टर पकडून शासकीय धान्य गोदाम पंढरपूर येथे जमा केले आहेत. सदर वाहनांच्या मालकांवर महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाई करण्याची कार्यवाही सुरु आहे. ही कारवाई महसुल नायब तहसिलदार, मंडळ अधिकारी तुंगत, तलाठी शेगांव दुमाला, सहाय्यक तलाठी शेगांव दुमाला, पोलीस कर्मचारी, कोतवाल व पोलीस पाटील यांनी केली आहे.

तर दुसऱ्या घटनेत दि. २१ रोजी दुपारी ४. ४५ च्या सुमारास शिरढोण (ता. पंढरपूर) येथील नदीपात्रात अवैधरित्या वाळू उपसा करणार्या दोन लाकडी होड्या पकडून कटरच्या सहाय्याने कापून नष्ट करण्यात आल्या आहेत. ही कारवाई मंडळ अधिकारी पंढरपूर, तलाठी शिरढोण, तलाठी पंढरपूर व पोलीस कर्मचारी यांच्या मदतीने करण्यात आली आहे.

करमाळ्यात बिबट्या सदृश्य प्राण्यांची दहशत

● वनाधिकारी घटनास्थळी दाखल

तभा वृत्तसेवा,
करमाळा दि.२४ सप्टेंबर-

शेटफळ तालुका करमाळा येथील शेतकर्याच्या तीन शेळ्या बिबट्या सदृश्य प्राण्याने फस्त केले आहेत व त्यांची पिल्ले कळपासून ओढून नेल्याची घटना घडली आहे.येथील शेतकरी बळीराम रोंगे यांच्या शेतातील गोट्यावर बांधलेल्या शेळ्यावर बिबट्या सदृश्य प्राण्याने हल्ला करून तीन शेळ्या जागेवरच खाऊन फस्त केल्याची व तीन पिल्ले ओढून दुसरीकडे नेल्याची घटना घडल्याने शेटफळ परिसरामध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाले असून या परिसरात बिबट्या असल्याची अफवा सर्वत्र उठली आहे. या प्राण्याचा बंदोबस्त करण्याची मागणी लोकांमधून केली जात आहे

शेतातील गोट्यावर बांधलेल्या शेळ्यावरील हल्ल्याच्या घटनेची माहिती मिळताच वनपरिक्षेत्र अधिकारी सतीश ओढगे यांच्या मार्गदर्शनाखाली वनरक्षक अविनाश गायकवाड व वनपाल बाबासाहेब लटके यांनी घटनास्थळी भेट देऊन परिसरातील शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

घटनास्थळाचा पंचनामा केला असून त्यांना त्या ठिकाणी तीन अर्धवट खाल्लेल्या शेळ्या आढळून आल्या या घटनेतील शेळ्यावर हल्ला करण्याची पद्धत लक्षात घेता हा हल्ला बिबट्याचा नसून तरस किंवा लांडगा या प्राण्यांनी केला असावा असा अंदाज वन विभागाकडून व्यक्त केला जात असला परिसरामध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे.

गेल्या आठ ते दहा वर्षांपासून आमच्या शेतातील गोट्यावर गाई, म्हशी, शेळ्या आहेत बाजूने तारेचे कुंपण केलेले आहे. असे असतानाही कळपातून तीन मोठ्या शेळ्या खाऊन व तीन पिल्ले ओढून नेल्याची घटना घडली आहे. यामुळे माझे आर्थिक नुकसान झाले असून याची दखल घेईल घेऊन शासनाकडून सहा शेळ्यांच्या झालेल्या सर्व नुकसानीची भरपाई मिळावी.

- **बळीराम रोंगे,** शेतकरी शेटफळ

बाबासाहेब लटके (वनपाल मोहळ) शेटफळ येथील शेळ्यावरील हल्ल्याची घटना समजतात आम्ही घटनास्थळी भेट दिली असून घटनास्थळी हल्ला केलेल्या प्राण्याचे ठसे आढळून न आल्याने कोणता प्राणी असावा याचा अंदाज लागत नसला तरी हा हल्ला निश्चितच बिबट्याचा नाही. तरीही शेतकऱ्यांनी सतर्क राहून नक्की काय काळजी घेतली पाहिजे. याविषयी लोकांचे मार्गदर्शन केले आहे.

- **बाबासाहेब लटके,** वनपाल मोहळ

जैवविविधतेचे संरक्षण ही काळाची गरज : प्रा. साळुंखे

तभा वृत्तसेवा,
अकलूज, दि.२४ सप्टेंबर-

जैवविविधतेच्या संरक्षण ही काळाची गरज आहे तसेच वाढते जलप्रदूषण मानवाच्या विनाशाकडे जाणारे आहे. पाण्यासारखे अनमोल साधन संपत्तीचे संरक्षण करणे ही गरज आहे. वनसंपदा प्रत्येक देशाच्या चौरसफळाच्या ३३ टक्के असावी लागते. पण दुर्दैवाने ही परिस्थिती आता राहिली नाही. त्यामुळे सर्वांनी जैवविविधतेचे संरक्षण करणे हे गरजेचे असल्याचे पर्यावरण प्रेमी प्रा. बाळासाहेब साळुंखे यांनी सांगितले. ओझोन संरक्षण दिनाचे प्रा. साळुंखे यांचे शंकरराव मोहिते महाविद्यालयात 'पर्यावरण संरक्षण' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.

यानिमित्ताने महाविद्यालयामध्ये परिसंस्था, जैवविविधता नैसर्गिक संसाधने, पर्यावरण प्रदूषण या विविध विषयावर निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, तसेच पोस्टर प्रदर्शन स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. या स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील ७७ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. पर्यावरणातील प्रदूषणामुळे ओझोन थरावर होणाऱ्या दुष्परिणामांची जाणीव जागृती व्हावी, या उद्देशाने डॉ. सातपुते एस. एम. यांचे मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आल्या. या स्पर्धेचे परीक्षण करण्यासाठी प्रा. सुर्वे, डॉ. परकाळे, डॉ. मुळीक, डॉ. देवकर आणि डॉ. कांबळे यांचे सहकार्य लाभले. अध्यक्षीय भाषण डॉ. टिळेकर यांनी केले. स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यास मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. प्रास्ताविक डॉ. सातपुते एस. एम. यांनी केले. आभार प्रा. धाइंजे पी. एम. आणि सूत्रसंचालन प्रा. व्ही. एम. कुंभार यांनी केले. कार्यक्रमासाठी कार्यालयीन अधीक्षक मालुसरे, प्रबंधक बामणे, डॉ. एस. एच. वाघ, प्रा. ए. ए. साठे, प्रा. सी.डी. चव्हाण, प्रा. डी. एफ. माने-देशमुख, बी.बी. कदम यांनी सहकार्य केले.

हद्दवाढ भागातील मुलभूत सुविधांची कामे तात्काळ व्हावीत

● ॲड. सोमनाथ वैद्य यांची उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे मागणी
● सरपंच, उपसरपंच यांच्या मानधनात वाढ केल्याबद्दल मानले आभार

तभा वृत्तसेवा,
मंद्रुप, दि.२४ सप्टेंबर-

दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघातील जुळे सोलापूर , हद्दवाढ भागातील विविध मूलभूत सुविधांची कामे तात्काळ व्हावीत तसेच इतर मागण्यांच्या पूर्ततेसाठी विकासाचे व्हिजन असलेले स्वयंम शिक्षा फाउंडेशनचे संस्थापक ॲड. सोमनाथ वैद्य यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले.

ॲड. सोमनाथ वैद्य हे आगामी दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघ संघातून निवडणूक लढविण्याची जोरदार तयारी करीत आहेत. या मतदारसंघात शहरी व ग्रामीण भागात त्यांनी विविध सामाजिक उपक्रमाचा धडाका लावला आहे. या मतदारसंघाचा विकास करून येथील जनतेला सुखी, समाधानी ठेवण्याचा निर्धार त्यांनी केला आहे. त्यामुळेच तेथील प्रश्न समस्या व आवश्यक योजनांची माहिती घेऊन त्यासाठी ते शासनाकडे पाठपुरावाही करीत आहेत.

दरम्यान, दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघातील जुळे सोलापूर हद्दवाढ भागात साधारपणे २ लाख लोक राहत असून या भागात मुलभूत सोयीसुविधाची कामे अदयापही झाली नाहीत. विविध नगरातील रस्ते, ड्रेनेज, भुमिगत पाणी पाईपलाईन झालेली नसून यामुळे या परिसरातील लोकांना समस्यांना सामोरे जावे लागत आहे. येथील सर्वसामान्य जनतेमध्ये सरकारबद्दल नाराजी पाहायला मिळत आहे. टॅक्स भरूनही मूलभूत सुविधा उपलब्ध होऊ शकल्या नाहीत. त्या सुविधा तत्काळ उपलब्ध होणे आवश्यक असून कार्यवाही करण्याचे आदेश उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रशासनाला द्यावेत.

मानधन वाढीच्या मागणीची पूर्तता

सरपंच यांना प्रति महिना १० हजार रुपये तसेच उपसरपंच व सदस्य यांना ५ हजार रुपये मानधन देण्यात यावे, अशी मागणी उपमुख्यमंत्र्यांकडे ॲड. वैद्य यांनी निवेदनाद्वारे केली होती. दरम्यान, मंत्रिमंडळाच्या बैठकीत सरपंच, उपसरपंच यांच्या मानधनात दुपटीने वाढ करण्याचा निर्णय घेतला. याबद्दल ॲड. वैद्य यांनी आभार मानले आहेत.

होमगार्डस्‌चा भत्ता वाढवा

राज्यातील गृहरक्षक (होमगार्ड) दल हे पोलिसांना सहाय्यकारी दल आहे. सध्या त्यांना ९० दिवसच काम मिळते. मुख्यमंत्रीपदी फडणवीस हे असताना त्यांनी होमगार्ड साठी १८० दिवस नियमित काम देण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार कार्यवाही व्हावी. बॉम्बे होमगार्ड ॲक्ट १९४७ मध्ये सुधारणा व बदल करण्यात यावा अशी होमगार्डची प्रमुख मागणी असून त्याबाबतचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे राज्य शासनाने पाठविला आहे. त्यावर त्वरित कार्यवाही व्हावी. राज्यातील होमगार्डना प्रतिदिन १ हजार २८५ रुपये भत्ता आणि १८० दिवस काम देण्याबाबत गृहमंत्री म्हणून निर्णय घ्यावा.

उत्तरेश्वर नवरात्र मंडळाच्या अध्यक्षपदी डॉ.साळुंखे

तभा वृत्तसेवा,
बार्शी, दि. २४ सप्टेंबर-

बार्शी शहरातील मंगळवार पेठ येथील श्री उत्तरेश्वर नवरात्र महोत्सव मंडळाच्या अध्यक्षपदी युवा उद्योजक डॉ. विजय साळुंखे यांची निवड करण्यात आली आहे. या वर्षाकरिता नवीन कार्यकारणी पुढीलप्रमाणे- अध्यक्ष डॉ. विजय साळुंखे, उपाध्यक्ष भाऊ गोरे, संकेत मारडकर

खजिनदार, नाना सातपुते, अंबऋषी कदम (सर), सचिव भैया शिंदे, कार्याध्यक्ष ऍड.नितीन सोडळ, अजय तिवारी ,सहसचिव मंगेश बारंगुळे, उत्सव समिती प्रमुख हर्षद मारडकर, ऋषी करडे, मार्गदर्शक विनोद जगताप, आधारस्तंभ बापू जाधव, मिरवणूक प्रमुख मोहन मारडकर, ,द्दत्ता शिंदे यांच्या नवीन निवडी करण्यात आल्या. यावेळी मंडळाच्यावतीने बार्शी शहरात भव्यदिव्य मिरवणूक काढणार असल्याचे सांगण्यात आले. यावेळी निवडीसाठी श्री उत्तरेश्वर नवरात्र महोत्सव मंडळाचे सर्व सदस्य व कार्यकर्ते उपस्थित होते.

ईश्वरप्राप्तीसाठी प्रेम अन् भक्तीची गरज

● पूज्य रामप्रसाद महाराज; संत नामदेव भक्तमाला कथेचा समारोप

तभा वृत्तसेवा,
पंढरपूर, दि.२४ सप्टेंबर-

जेव्हा एखादा भक्त संकिर्तनात परमेश्वराचा जयजयकार करण्यासाठी हात वर करतो, तेव्हा परमेश्वर त्याला आपल्या बाहुपाषात घेतो. ईश्वर कुणाची जात , पात , धर्म , पंथ पहात नाही. तो फक्त भाव पहातो. संत नामदेवजींनी भजन आणि कीर्तनाच्या माध्यमातून भक्ती, प्रेम निर्माण केले. त्यामुळेच त्यांना ७२ वेळा श्री विठ्ठलाने प्रत्यक्ष दर्शन दिले. संत नामदेव भक्तमाल कथेच्या समारोपात जोधपूरचे पूज्य रामप्रसादजी महाराज म्हणाले की, या पवित्र भूमीवर मला संत नामदेव भक्तमाल कथा सांगण्याचा योग आला हे माझे भाग्य आहे.

श्री संत नामदेव समाज सेवा समितीच्या वतीने पंढरपूर येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या भक्ती निवास परिसरात संत शिरोमणी श्री नामदेव महाराज यांच्या भक्तमाल कथेचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये पाच दिवस कथा कथन करण्यात आले. ही कथा ऐकण्यासाठी देशभरातून नामदेव भक्त श्रीक्षेत्र पंढरपूर येथे आले होते. यावेळी अखिल भारतीय श्री नामदेव छिपा महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष राम सोप्रा, राष्ट्रीय सरचिटणीस अवधेश पांडे, संत नामदेव समाज सेवा समितीचे अध्यक्ष जगदीश परिहार, पंजाबच्या श्री नामदेव दरबार कमिटी श्री क्षेत्र घुमाणचे सरबजितसिंग बावा, सुखजिंदरसिंग बावा, मनजिंदरसिंग बावा, नामदेव समाजोन्नती परिषदेचे अध्यक्ष संजय नेवासकर, रवींद्र रहाणे, अहमदाबाद छिपा समाजाचे अध्यक्ष मूलचंदजी परमार, भागवत धर्म प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सूर्यकांत भिसे, कोषाध्यक्ष मनोज मांढरे, मूलचंद गेहलोत, नवरत्नमल टांक, श्री संत नामदेव शिंपी समाजाचे अध्यक्ष गणेश उंडाळे व विश्वस्त मंडळाचे सदस्य उपस्थित होते.

नामदासांचा सन्मान

यावेळी संत नामदेव भक्तमाल कथेच्या समारोपप्रसंगी केशव महाराज नामदास, मुकुंद महाराज नामदास, माऊली महाराज नामदास, कृष्णदास महाराज नामदास, माधव महाराज नामदास, एकनाथ महाराज नामदास, निवृत्ती महाराज नामदास यांचा संत नामदेव समाज सेवा समितीच्या वतीने सन्मान करण्यात आला. श्रद्धा आणि भक्तिमय वातावरणात या कथेची सांगता झाली.

धनगर समाजाच्या मागण्यांना आ.राऊतांचा जाहीर पाठिंबा

तभा वृत्तसेवा,
बार्शी, दि. २४ सप्टेंबर-

महाराष्ट्रातील धनगर समाजाच्या आरक्षणाच्या मागणीला विधानसभेचे सदस्य श्री. राजेंद्र विठ्ठल राऊत यांनी जाहीर पाठींबा दिला आहे. त्यांनी २२ सप्टेंबर रोजी आपल्या निवेदनात सांगितले की, महाराष्ट्र शासनाने दिलेल्या आश्वासनानुसार धनगर समाजाला अनुसूचित जमातीमधून आरक्षणाची अंमलबजावणी तत्काळ केली जावी.

धनगर समाजाच्या मागण्या मागील अनेक वर्षांपासून प्रलंबित आहेत. १९५६ च्या एस.सी./ एस.टी. यादीत अनुक्रमांक ३६ वर धनगड या जमातीचा उल्लेख करण्यात आला होता. मात्र, वास्तविकता अशी आहे की, 'धनगड' नावाची कोणतीही जमात अस्तित्वात नाही. ही एक त्रुटी आहे आणि 'धनगड' हे प्रत्यक्षात 'धनगर'च आहेत. त्यामुळे धनगर समाज आपल्या हक्काच्या अनुसूचित जमातीच्या आरक्षणापासून वंचित राहिला आहे. श्री. राऊत यांनी आपल्या निवेदनात सांगितले की, धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या आरक्षणाची मागणी गेल्या ६८ वर्षांपासून केली जात आहे, मात्र अद्यापही त्याची अंमलबजावणी झालेली नाही. धनगर समाज पिढ्यानपिढ्या मेंढपाळ व्यवसायाशी निगडीत असून ते पशुपालक म्हणून आपली उपजीविका करतात. त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक, आणि आर्थिक विकासासाठी आरक्षण अत्यावश्यक आहे. राज्य सरकारने यापूर्वीच धनगर समाजाला आरक्षण देण्याचे आश्वासन दिले होते. मात्र या आश्वासनांची अद्याप अंमलबजावणी झालेली नसल्यामुळे धनगर समाजाच्या बांधवांमध्ये असंतोष आहे. या परिस्थितीत राजेंद्र राऊत यांनी त्यांचे पाठबळ दिले आहे आणि धनगर समाजाच्या न्याय मागण्यांसाठी लढा देण्याची भूमिका मांडली आहे.

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

परशुराम विकास आर्थिक महामंडळाचे स्वागत

तभा वृत्तसेवा
भूम, दि.२४ सप्टेंबर -

कॅबिनेट मंत्रिमंडळाच्या बैठकीत परशुराम विकास आर्थिक महामंडळ स्थापन करण्याच्या मागणीला मान्यता देऊन ब्राह्मण समाजाला न्याय देण्यात आला.

त्याबद्दल ब्राह्मण समाजातील भूम तालुक्यातील सर्व ब्राह्मण समाज बांधवांच्या भूम शहरातील गोलाई चौकात महाराष्ट्र शासनाचे, महायुती शासनाचे अभिनंदन करून पेढे वाटून आनंद उत्सव भूम शहरातील समाजाच्या वतीने सरकार अभिनंदन करण्यासाठी सर्व समाज बांधव एकत्र येऊन परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापनेला मान्यता देणाऱ्या महाराष्ट्र सरकार मधिल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे अभिनंदन करण्यात आले. याप्रसंगी भूम तालुकाध्यक्ष सुधीर देशमुख, संजय शाळू, हेमंत देशमुख, भगवंत देशमुख, अरुण कुलकर्णी, उमाकांत धर्माधिकारी, अंबादास देशपांडे, श्रीराम मुळे, आनंद बेलसरे, अमोल तुळशी, प्रभाकर अघोर, दत्तन देशमुख यांच्यासह आदी उपस्थित होते.

संक्षिप्त वृत्त...

उमाकांत मिटकर यांचा तेलंगणा राज्यपालांच्या हस्ते सन्मान

नळदुर्ग, दि.२४ सप्टेंबर -

नळदुर्ग येथील उमाकांत मिटकर यांचा तेलंगणा राज्याचे राज्यपाल जिष्णु वर्मा यांच्या हस्ते हैदराबाद येथील रेडिसन ब्ल्यु हॉटेल मधील सभागृहात सन्मान करण्यात आला. मैत्री पीस फाऊंडेशनच्या माध्यमातुन सदरील कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. उच्चशिक्षित असुनही कोणतीच नोकरी न करता मिटकर हे गेल्या वीस वर्षापासुन समाजाच्य वेगवेगळ्या सामाजिक क्षेत्रात काम करत असुन याच कामाची दखल घेऊन त्यांची पोलीस प्राधिकरणावरही निवड झाली आहे.डिव्हाईन जस्टिस नावाचे त्यांचे आत्मचरीत्र तीन भाषेत प्रसिद्ध झाले आहे. या कार्यक्रमात मिटकर यांचा राज्यपालांसोबत विशेष अतिथी म्हणुन व कार्याचा देखील गौरव करण्यात आला. यामुळे मिटकर यांचे सर्व स्तरातुन अभिनंदन होत आहे.

ग्रा.पं. सदस्यांकडून जि.प. प्राथमिक शाळेस साहित्य भेट

इटकळ, दि.२४ सप्टेंबर -

तुळजापूर तालुक्यातील केशेगाव येथील ग्रामपंचायत सदस्य मल्लिनाथ महाबोले व महेबुब फकीर यांनी कोरे वस्ती येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेस टेबल व खुर्ची भेट दिली. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षक यांच्यासह विकास बिराजदार, नितीन जळकोटे, महेश कोळी, शिव हाद्रे, रजनीकांत घंटे यांची उपस्थिती होती. नेहमीच सामाजिक कार्यात सहभाग घेणारे ग्राम पंचायत सदस्य मल्लिनाथ महाबोले व महिबुब फकीर यांचे ग्रामस्थांतून कौतुक केले जात आहे.

आशिष शेळके यांना स्वामी विवेकानंद सेवारत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार

परंडा, दि.२४ सप्टेंबर -

परंडा येथील महाराष्ट्र ग्रामीण बॅंकेचे कर्तव्यदक्ष शाखा अधिकारी आशीष अरुण शेळके यांना सहारा चॅरिटेबल ष्ट्रस्ट या निती आयोग एमसीएएमएमएस ईजीएस अमेरिकन मेरिट कौन्सिलशी संलग्न असलेल्या राष्ट्रीय संस्थेने २०२४ चा स्वामी विवेकानंद सेवारत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल त्याची सदिच्छा भेट घेऊन रामेश्वर सदगुरू मजुर सहकारी संस्थेच्या वतीने सत्कार करुन शुभेच्छा दिल्या. आशीष शेळके यांनी गेल्या चार वर्षामध्ये शाखाधिकारी म्हणून उत्कृष्ट उल्लेखनीय कामगिरी केली आहे. जिद्द, चिकाटी, मेहनत घेऊन बॅंकेच्या क्षेत्रात नावलौकिक मिळवून स्वतःच्या कार्याचा ठसा उमटवला ते बॅंकेचे आर्दश शाखा अधिकारी म्हणून गणले जात आहे. त्यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल त्याचा रामेश्वर सदगुरू मजुर सहकारी संस्था भोजेकर परीवार कडून सत्कार करण्यात आला. यावेळी चेअरमन सुनिल पवार, शंकर पवार व बॅंकेचे कर्मचारी व आनंद बनसोडे व संदिप बनसोडे उपस्थित होते.

पोतराज महासंघाच्या तालुका अध्यक्षपदी आप्पासाहेब साखरे

इटकळ, दि.२४ सप्टेंबर -

पोतराज महासंघ महाराष्ट्र राज्य संघटनेची तालुका स्तरीय निवड करण्यासाठी महासंघाचे कार्याध्यक्ष लखन ननवरे यांनी बैठक बोलवण्यात आली होती. यावेळी संपूर्ण महाराष्ट्रातून जिल्हा कार्यकारणी व समस्त पोतराज बांधव बैठकीस उपस्थित झाले होतो या बैठकीच्या अध्यक्षस्थानी लखन ननवरे होते. या बैठकी वेळी समस्त पोतराज बांधवांचे समजा विषयी असणारी भावना वा त्यांच्या प्रदीर्घ कार्याची दाखल घेऊन जिल्हाध्यक्ष, उपाध्यक्ष यांनी नावे सुचवून त्यातून निवडक पोतराजांची तालुकाध्यक्ष, उपाध्यक्ष व कार्याध्यक्ष म्हणून खालील प्रमाणे निवड करण्यात आली आहे. तुळजापूर तालुका अध्यक्षपदी आप्पासाहेब साखरे, उपाध्यक्ष मारुती भोवळ, तर कार्यध्यक्ष म्हणून सचिन माने यांची निवड करण्यात आली. लखन ननवरे यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देऊन निवड करण्यात आली आहे. कार्यक्रमास जिल्हाध्यक्ष नागनाथ शिंदे, जिल्हा उपाध्यक्ष धनराज सरवदे यांच्यासह बहुसंख्य पोतराज बांधव उपस्थित होते.

श्री तुळजाभवानी मातेच्या मंचकी निद्रेस प्रारंभ

९ दिवस चालणार श्री तुळजाभवानी मातेच्या सर्व नित्योपचार पूजा...

तभा वृत्तसेवा
तुळजापूर, दि.२४ सप्टेंबर -

तुळजाभवानी मातेच्या मंचकी निद्रेस मंगळवारी (दि.२४) सायंकाळी प्रारंभ झाला. सायंकाळच्या अभिषेक पूजेनंतर तुळजाभवानी माता शेजगृहातील चांदीच्या पलंगावर विसावली. तत्पूर्वी सेवेकरी पलंगे कुटुंबियांनी मंचकी निद्रेसाठी चांदीचा पलंग घासून स्वच्छ धुतला. तर आराधी महिलांनी गाद्यांचा कापूस पिंजला. दरम्यान, नऊ दिवसांची मंचकी निद्रा संपवून दि.३ गुरुवारी पहाटे आई तुळजाभवानी सिंहासनावर विराजमान होईल.

मंगळवारी सकाळी आराधी गीतांच्या तालावर महिलांनी देवीच्या गादीचा कापूस पिंजला. यावेळी मानकरी, सकाळपासूनच देवीचा चांदीचा पलंग स्वच्छ करुन नवीन नवार पट्ट्या बांधल्या. दुपारनंतर पलंगावर नवीन गाद्या, अंथरूण, पलंग देवीचा मंचकी निद्रेसाठी सज्ज केला. यासाठी सेवेकऱ्यांनी परिश्रम घेतले.

तुळजाभवानी मातेचा मंचकी निद्रेसाठी गाद्यांचा कापूस पिंजण्याचा मान मुस्लिम समाजाला आहे. शम्मू बाशुमीया पिंजारी यांच्याकडे परंपरागतपणे हा मान चालत आला आहे.

शम्मू पिंजारी यांनी गाद्यांचा कापूस पिंजला. नकाते यांनी कापूस गाद्यात भरला व त्यांच्या कुटुंबीयांनी मदत केली.

तुळजाभवानी मातेच्या मंचकी निद्रेदरम्यान सकाळच्या चरणतीर्थ पूजेपासून सायंकाळच्या प्रक्षाळ पूजेपर्यंत देवीच्या सर्व नित्योपचार पूजा पलंगावर करण्यात येतात. मंचकी निद्रेदरम्यान तुळजाभवानी मातेचा नैवेद्य, अभिषेक आदी सर्व धार्मिक विधी परंपरागतपणे सुरू असतात.

अभिषेक मात्र दही-दुधाऐवजी सुगंधी तेलाने घालण्यात येतो. सायंकाळचा अभिषेक पूजेनंतर खंडोबाचे पुजारी वाघे यांनी आणलेला भंडारा तुळजाभवानी मातेच्या मूर्तीला लावत आई राजा उदो उदोच्या जयघोषात तुळजाभवानी मातेची मूर्ती सिहांसनावरून हलवून पलंगावर ठेवली. तत्पूर्वी गाभाऱ्यात दोन धार्मिक विधी पार पडले. त्यानंतर पलंगावरच प्रक्षाळ पूजा करण्यात आली.

यावेळी मंदिर संस्थानचे मंदिर संस्थानचे अधिकारी, कर्मचारी, भोपे पुजारी, पुजारी, सेवेकरी, मानकरी, शहरातील प्रतिष्ठीत नागरीक, श्री तुळजाभवानी मातेचे भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पर्यटन दिनानिमित्त तेर येथे हेरिटेज वॉकचे आयोजन

तभा वृत्तसेवा
तेर, दि.२४ सप्टेंबर -

जागतिक पर्यटन दिनानिमित्त २७ सप्टेंबर रोजी पर्यटन जनजागृती संस्थेच्या वतीने धाराशिव तालुक्यातील तेर येथे हेरिटेज वॉकचे आयोजन करण्यात आले आहे.

तेर येथील त्रिविक्रम मंदिरापासून हेरिटेज वॉकची सुरुवात होणार असून यानिमित्ताने तेर येथील ऐतिहासिक वारसा पर्यटकांना माहिती व्हावा, पर्यटकांपर्यंत पोहोचावा आणि जिल्ह्याचे पर्यटन वाढावे या हेतूने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात जिल्ह्यातील पर्यटन प्रेमी नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

पर्यटन जनजागृती संस्था मागील अनेक वर्षांपासून धाराशिव जिल्ह्यातील पर्यटनाचा विकास होऊन जिल्ह्यात पर्यटन व्यवसाय वाढावा या हेतूने अनेक कार्यक्रम, उपक्रम आयोजित करत आहे. याचाच एक भाग म्हणून २७ सप्टेंबर या जागतिक पर्यटन दिनानिमित्त तेर येथे असलेला ऐतिहासिक दुर्मिळ ठेवा नागरिकांपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने या हेरिटेज वॉक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. याची सुरुवात त्रिविक्रम मंदिरातून होणार असून तीर्थकुंड आणि चैत्यगृह या दोन्ही ठिकाणापर्यंत हा हेरिटेज वॉक असणार आहे.

त्रिविक्रम मंदिराला असलेला ऐतिहासिक संदर्भ आणि पर्यटन विभागाने या ठिकाणी सुरू केलेले दुरुस्तीचे काम या ठिकाणाचे महत्त्व नागरिकांपर्यंत पोहोचवून पर्यटकांना तेर सारख्या ऐतिहासिक पर्यटन स्थळाकडे आकर्षित करण्यासाठी या हेरिटेज वॉकचा उपयोग होणार असल्यामुळे धाराशिव जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी या हेरिटेज वॉकसाठी तेर येथे २७ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता उपस्थित राहावे असे आवाहन पर्यटन जनजागृती संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

माकणी येथील निम्न तेरणा प्रकल्प; ९० टक्के जलसाठा...

नदीकाठच्या सर्व नागरिकांनी दक्षता बाळगावी : आ. चौगुले

तभा वृत्तसेवा
लोहारा, दि.२४ सप्टेंबर -

लोहारा तालुक्यातील माकणी येथील निम्न तेरणा प्रकल्प, सध्या ९० टक्के जलसाठा झाला असुन मागील दोन दिवसांत निम्न तेरणा प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने प्रकल्पात वेगाने पाणी येत आहे. याबाबत आ. ज्ञानराज चौगुले यांनी प्रकल्पाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क करून आढावा घेतला आहे.

दक्षता व खबरदारीचा उपाय म्हणुन प्रकल्पातुन कोणत्याही क्षणी तेरणा नदीपात्रात पाणी सोडावे लागू शकते, असे संबंधित अधिकाऱ्यांनी आ. ज्ञानराज चौगुले यांनी कळविले आहे.

तरी नदीकाठच्या सर्व गावातील नागरिक व शेतकरी बांधवांनी दक्ष रहावे. नदीकडे जाऊ नये व आपली जनावरे व मालमत्ता आदी नदीकाठाहून दुर न्यावे. सदर बाबीकडे आ. ज्ञानराज चौगुले लक्ष ठेवून आहोत.

तरी कोणत्याही स्वरूपाची समस्या उद्धवल्यास नागरिकांनी त्वरीत आमच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन उमरगा व लोहारा तालुक्याचे आ. ज्ञानराज चौगुले यांनी यावेळी केले आहे.

वाहनधारकांकडून दीड लाखाचा दंड वसूल

धाराशिव, दि.२४ सप्टेंबर -

धाराशिव शहर वाहतुक शाखा व धाराशिव जिल्ह्यातील संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.२३ सप्टेंबर रोजी मोटार वाहन कायदा- नियम भंग प्रकरणी एकुण १९६ कारवाया करण्यात आल्या.

या कारवाई दरम्यान १ लाख ५३ हजार ७०० रूपये 'तडजोड शुल्क' वसुल केले आहे.

प्रगती पतसंस्थेची २२ वी वार्षीक सर्वसाधारण सभा संपन्न

सभासदांना मिळणार १२ टक्के लाभांष...

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२४ सप्टेंबर -

प्रगती सहकारी पतसंस्थेची २२ वी वार्षीक सर्वसाधारण सभा संस्थेचे अध्यक्ष प्रशांत नानासाहेब पाटील यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच संपन्न झाली. यावेळी बोलताना त्यांनी प्रगती पतसंस्थेला मागील आर्थीक वर्षात संस्थेला १ कोटी ८६ लाख ६९ हजार ५५५ रुपये इतका नफा झाला असुन सभासदांना त्यांच्या भागभांडवलाच्या प्रमाणात १२ टक्के एवढा लाभांष देण्याचे संचालक मंडळाने ठरवल्याचे सांगितले. सर्व सभासदांनी टाळयांच्या गजरात याचे स्वागत केले.

सभेच्या सुरुवातीला संस्थेचे सचिव डॉ. हर्षल डंबळ यांनी प्रास्ताविकामध्ये संस्था स्थापनेमागील उददेश व त्या दिशेने संस्थेने केलेल्या वाटचालीचा आढावा मांडला. यावेळी बोलताना त्यांनी संस्थेचे कार्यक्षेत्र तालुका स्तरावरुन जिल्हास्तर झाल्याचे तसेच संस्थेचा संपुर्ण जिल्हात शाखा विस्तारास मान्यता मिळाल्याचे जाहिर केले असून उमरगा, लोहारा, तुळजापूर, कळंब, भूम, परांडा या ठिकाणी चालू वर्षात शाखा चालू करण्याचा मानस व्यक्त केला, त्याचप्रमाणे संस्थेने विकत घेतलेल्या भुखंडावर यावर्षी संस्थेच्या कार्यालयाचे भव्य असे बांधकाम सुरु असून ते याच वर्षी संपवण्याचा मानस व्यक्त केला.

यावेळी प्रमुख पाहूणे म्हणून माजी सनदी अधिकारी अनिल कवडे, आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, पुणे एस.आर. नाईकवाडी तसेच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेचे माजी अध्यक्ष नानासाहेब हरिश्चंद्र पाटील हे उपस्थित होते.

एस.आर. नाईकवाडी यांनी सहकाराची राज्यातील सद्यस्थिती विषयी चिंता व्यक्त केली. त्या तुलनेत प्रगती सहकारी पतसंस्थेला मीच नोंदणी प्रमाणपत्र दिले असून

संस्था सुरू करत असताना ५ लाख ५० हजार एवढया भागभांडवलातून सुरू झाली असून आज संस्थेची स्वतची जागा असून संस्थेच्या जागेवर बांधकाम चालू केले आहे. एका छोट्याशा रोपट्याचे आज खरोखरच वटवृक्षामधे रूपांतर झालेले आहे. याप्रमाणे त्यांनी सस्थेचा उंचावलेला आलेख आणि सभासदांमध्ये वाढलेला विश्वास पाहून समाधान व्यक्त केले.

नानासाहेब पाटील यांनी मार्गदर्शन करताना ज्याप्रमाणे आपण एखादा ठेवीदाराला मान सन्मान देतो. त्याप्रमाणेच तेवढाच मान सन्मान आपण कर्जदार यांना द्यावा कारण ठेवीदार आपल्याकडून व्याज घेवून जातो आणि कर्जदार आपणाला व्याज देवून जातो आणि त्यातूनच पतसंस्थेला उत्पन्न मिळते असे सांगितले. त्याचप्रमाणे संस्थेचा कारभार संचालक मंडळाने प्रामाणिकपणे आणि पारदर्शक पद्धतीने असावा अशी अपेक्षा व्यक्त केली.

या वार्षिक सर्वसाधारण सभेत प्रगती सहकारी पतसंस्थेच्या वतीने शहरातील अन्नपूर्णा ग्रुप, स्वाधार मतिमंद मुलींची शाळा आळणी या दोन सामाजिक उपक्रम राबविणाऱ्या संस्थांची प्रत्येकी ११००० रुपयाचा धनादेश, सन्मान चिन्ह, शाल देऊन सत्कार करून आपली सामाजिक बांधिलकी जपली. आभार प्रदर्शन संथेचे उपाध्यक्ष शाम जाधव यांनी केले.

या सभेसाठी संस्थेचे संचालक रमाकांत घोडके, शशिकांत वैराळे, नंदकुमार भुतेकर, व्यकंटेश राजे, सुधाकर कुलकर्णी, विजयालक्ष्मी पांढरे, विमल यादव, सविता थोरात आणि संस्थेचे व्यवस्थापक मोहन सावंत, सभासद मकरंद राजेनिंबाळकर, नितीन भोसले, अॅड.डी.डी. मडके, अग्निवेश शिंदे, उमेश राजेनिंबाळकर, दर्शन कोळगे, ऋषीकेश राजेनिंबाळकर, महादेव थोरात, अविनाश यादव, मनोज पडवळ, व सर्व कर्मचारी वर्ग, संक्षेप ठेव प्रतिनिधी, संस्थेचे कर्जदार, ठेवीदार, सभासद हितचिंतक मान्यवर मोठया प्रमाणावर उपस्थित होते.

नवरात्र महोत्सवानिमित्त आई येडेश्वरी देवी मंदिर ट्रस्टकडून जय्यत तयारी सुरु

देवीच्या मंदिराची रंगरंगोटीचे काम अंतिम टप्प्यात...

तभा वृत्तसेवा
येरमाळा, दि.२४ सप्टेंबर -

राज्यातील प्रसिद्ध आराध्य दैवत, भाविकांचे श्रद्धास्थान आई येडेश्वरी देवीच्या नवरात्र महोत्सवाचा गुरूवार (ता.३) ऑक्टोबर पासुन मोठ्या उत्साहात घटस्थापनेने प्रारंभ होणार आहे. नवरात्र महोत्सवासाठी येणाऱ्या भाविकांची सर्व प्रकारच्या सोई सुविधा पुरवण्यासाठी मंदिरदेवस्थान ट्रस्टकडून जय्यत तयारी करण्यात आली असुन देवीच्या मंदिराची रंगरंगोटीचे काम अंतिम टप्प्यात आहे.

गुरुवार (ता. ३) ऑक्टोबर अश्विनशुद्ध प्रतीपदेस रात्री आठ वाजता देवीची पंचोपचार महापूजा, महाआरतीने घटस्थापनेने आई येडेश्वरी देवीच्या शारदीय नवरात्र महोत्सवास सुरुवात होणार आहे. तुळजाभवानीची धाकटी बहीण म्हणून श्री येडेश्वरी देवीची राज्यभर प्रसिद्धी असल्याने तुळजाभवानीचे दर्शन झाल्यानंतर प्रत्येक भाविक येडेश्वरी देवीच्या दर्शनासाठी येतो.नवसाला पावणारी देवी म्हणुन जागृत श्री येडेश्वरी देवस्थान महाराष्ट्रासह परराज्यात प्रसिद्ध आहे. त्यामुळे नवरात्र काळात लाखो भाविक देवी दर्शनासाठी येतात. येणाऱ्या भावीकांची सोय व्हावी यासाठी मंदीर ट्रस्ट कडून जोरदार तयारी करण्यात येत आहे. यामध्ये येडेश्वरी मंदिराचा परिसर स्वच्छ करणे, मंदिरावर रंगरंगोटी, मंदिरातील चांदीचे आवरण असलेले खांब स्वच्छ करणे, मंदिरातील तांब्याच्या पितळाच्या मोठ्या वस्तू स्वच्छ करणे मंदिरावर, मंदिर परिसरामध्ये आकर्षक अशी विद्युत रोषणाई अशी विविध कामे लगबगीने करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राची कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी देवीची धाकटी बहीण म्हणून श्री येडेश्वरी देवीचा लौकिक आहे. तुळजाभवानीचे दर्शन झाल्यानंतर तुळजापुरला येणारा भाविक आवर्जून येरमाळाला दर्शनासाठी येतो. नवरात्र काळात राज्यातील लोक पंचक्रोशीतील लोक देवीच्या डोंगराला खेटा (प्रदक्षिणा) घालतात नवरात्र काळात, भाविक दर्शनासाठी गर्दी असते. गावातील पंचक्रोशीतील भाविक घटस्थापनेच्या दुसऱ्या दिवसापासून देवीच्या डोंगराला खेटा (प्रदक्षिणा) घालण्याची पद्धत रूढ झाल्याने लोक पाच दिवस भल्या पहाटेपासून खेटा घालतात. मंदिराला पहाटे खेटा घालण्याची जणु भाविकात स्पर्धाच असल्याचे चित्र असते. नवरात्र महोत्सव,चैत्र पौर्णिमा, नारळी पौर्णिमा हे उत्सव गर्दीचे असतात. देवीच्या डोंगराला दोरा वाहून कोणी साकडे घातले तर कोणी नवस पूर्ण झाला म्हणुन देवीच्या डोंगराला दोरा वाहून खेटा घालतात. श्री येडेश्वरी देवीच्या मंदिराला आकर्षक अशी विद्युत रोषणाई करण्यात येत आहे मंदिराच्या शिखरावर तसेच पायऱ्यावर, मंदिर परिसरामध्ये, मंदिर परिसराच्या गाभाऱ्यामध्ये रोषणाई केल्याने मंदिरा परिसरात भक्तीमय वातावरण झाले आहे.

नवरात्र काळामध्ये येणाऱ्या भाविकांसाठी सुलभ दर्शन व्हावे यासाठी मंदिर संस्थांकडून दर्शन रांगेची व्यवस्था, भाविकांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, खेटा (प्रदक्षिणा) मार्गावरील रस्त्याची स्वच्छता, खेटा मार्गावर प्रकाशासाठी पथदिवे व्यवस्था लावण्यात येत असल्याचे येडेश्वरी मंदिर संस्थानचे संतोष आगलावे यांनी सांगितले.

तेरणा कारखाना २५ वर्षानंतर देखील शेतकऱ्यांच्याच मालकीचा राहणार : मंत्री प्रा.डॉ.तानाजीराव सावंत

भैरवनाथ शुगर हा कारखाना विकत घेणार नाही; केंद्राच्या विचाराचे सरकार राज्यात निवडून द्यावे

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२४ सप्टेंबर -

राज्याचे सहकार मंत्री कोळसे पाटील यांनी राज्यातील ज्या सहकारी कारखान्याकडे कर्ज आहे ते कर्ज वसूल करण्यासाठी कारखाने विकावी लागतील असा निर्णय घेतला. कर्ज हा भाग वेगळा असून आम्ही भैरवनाथ शुगरच्या माध्यमातून हा कारखाना फक्त २५ वर्ष भाडेतत्त्वावर चालविण्यासाठी घेतलेला आहे. करार संपल्यानंतर या कारखान्यावर भैरवनाथ शुगर चा कुठलाही हक्क व अधिकार राहणार नाही. तो हक्क आणि अधिकार फक्त आणि फक्त या कारखान्याच्या सभासद असलेल्या शेतकऱ्यांचाच राहणार असल्याची ठाम ग्वाही राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री प्रा डॉ.तानाजीराव सावंत यांनी आई तुळजाभवानीची शपथ घेऊन उपस्थित जनसमुदायास दि.२४ सप्टेंबर रोजी दिली.

दरम्यान, या कारखान्याच्या १०० किलो मीटर परिसरात असलेले साखर कारखाने जो उसाला दर देतील त्यापेक्षा हा कारखाना ५१ रुपये जास्ती दर देणार असल्याचे आश्वासन हे त्यांनी दिले.

धाराशिव तालुक्यातील ढोकी येथील भैरवनाथ शुगर वर्कस युनिट ६ संचलित तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना गेटसमोरील मैदानावर तेरणा परिवार सभासद व ऊस उत्पादक शेतकरी स्नेह संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख अनिल खोचरे, तेरणा कारखान्याचे कार्यकारी संचालक केशव सावंत, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत, जिल्हाप्रमुख दत्ता सांळुके, सुरज साळुंके, ढोकीचे सरपंच आमोल समुद्रे, धाराशिव शिवसेना तालुकाप्रमुख अजित लाकाळ, संदीप मडके, नितीन लांडगे, अविनाश खापे, उपजिल्हाप्रमुख अनंत वाघमारे, लक्ष्मण हुलजते, आण्णासाहेब जाधव, गणेश जगताप, संतोष जगदाळे, अजित खोत, ईश्वर शिंदे, अनिल माने, दत्ता तिवारी, भारती गायकवाड, तेरणा बचाव संघर्ष समितीचे अध्यक्ष राहुल वाकुरे आदींसह मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना ना. प्रा डॉ सावंत म्हणाले की, लोकसभा निवडणुकीच्या प्रचार दरम्यान पुन्हा मोदी सरकारला निवडून दिले तर ते भारतीय राज्यघटना बदलणार असा विरोधकांनी अपप्रचार केला. त्याला बळी पडून नागरिकांनी जिल्ह्यात विरोधी पक्षाचा खासदार केला. मात्र भाजप व मित्र पक्षांच्या उमेदवाराचा पराभव केला.

राज्यात रेल्वे, रस्ते व इतर विकास कामे सुरू आहेत त्यासाठी निधीदेखील उपलब्ध करून दिला जात आहे. मात्र राज्यात जर विरोधकांचे सरकार निवडून दिले तर ती कामे पुन्हा खोळंबतील असे सांगत राज्यात शिंदे व फडणवीस यांच्या विचाराचे सरकार आणणे गरजेचे आहे. कारण केंद्रामध्ये महायुतीचे सरकार स्थापन झाले असून राज्यात देखील महायुतीचे सरकार आगामी विधानसभा निवडणुकीमध्ये पुन्हा निवडून द्यावे असे आवाहन केले. महाराष्ट्रात सर्व जाती-धर्माचे लोक छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून गुण्यागोविंदाने एकत्र राहत आहेत. मात्र, विरोधक अफवा पसरवण्यामध्ये यशस्वी होत असून एक चिंगारी सुद्धा संपूर्ण देशाला आग लावू शकते. त्यामुळे अशा अफवांवर कोणीही विश्वास ठेवू नये अशी आवाहन त्यांनी केले. तसेच तेरणा साखर कारखाना हा मराठवाड्यातील सहकार क्षेत्रातील पहिला कारखाना शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी उभारला. मात्र त्याची राख रांगोळी कोणी केली? असा प्रश्न विचारीत कारखान्याचे वाटोळे केले असल्याचा गंभीर आरोपही त्यांनी केला.

करी स्नेह-संवाद मेळावा
कार्यक्रमाचे अध्यक्ष
मा.श्री. शिवाजीराव सा

विशेष म्हणजे इथल्या नेते मंडळीच्या मनात पाप नसते तर हा कारखाना भैरवनाथ शुगरने चालविण्यासाठी घेतल्यानंतर ते कोर्टामध्ये गेले नसते असा टोलाही त्यांनी लगावला. हा कारखाना ३६ हजार शेतकऱ्यांचा असून कोणाच्या बापाचा नाही असे सांगत दुसऱ्याच्या घरावर विस्तव फिरवायचा आणि स्वतःची घरे भरायची असले धंदे बंद करा असा इशारा त्यांनी दिला. तसेच हा उद्योग यापुढे कोणीही खपवून घेऊ नये. तसेच यापुढे तुमच्याकडे कोणी मते मागायला आला तर शेतकऱ्यांनी तुम्ही आमच्यासाठी काय केले हे ठणकावून विचारावे असे आवाहन त्यांनी केले. विकासाच्या गप्पा मारण्यात येथील राजकीय नेते मंडळी तरबेज असून फक्त फेसबुक लाईव्हवर उजनीचे पाणी आले म्हणून नारळ फोडण्याच्या कामात मग्न असल्याची खरमरीत टीकाही त्यांनी केली.

विकास काय असतो? हे भूम, वाशी व परांडा या भागात येऊन बघा असे सांगत या भागाच्या विकासासाठी दीड हजार कोटींचा निधी आणला असून राज्यातील कोणत्या लोकप्रतिनिधीने आपल्या मतदारसंघासाठी असा निधी आणला आहे का? असा थेट प्रश्न विचारला. तर कोल्हापुरी पद्धतीचे बंधारे कशासाठी बांधलेले आहेत? त्याचे सर्व दरवाजे चोरीला गेले असून फायबर दरवाजे बसविण्यास का विरोध करीत आहेत? असे सांगत लोखंडी दरवाजे तयार करणारे ठेकेदार त्यांचे, चोरी करणारे चोरांची टीम त्यांची असल्याचा थेट हल्ला त्यांनी चढविला.

या सरकारने मुख्यमंत्री लाडकी माझी बहीण, शेतकऱ्यांना वीज मोफत यासारखे अनेक लोकोपयोगी निर्णय घेतले असून एकाही शेतकऱ्याला शेतातील लाईटचे बिल दिले तर ते मला आणून द्या, त्या अधिकाऱ्याचे काय करायचे ते तुम्ही माझ्यावर सोडून द्या असे त्यांनी सांगितले. विशेष म्हणजे निजामापासून अन्याय सहन करण्याची या भागातील नागरिकांना सवय झाली आहे. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली. या कार्यक्रमास ऊस उत्पादक शेतकरी, तेरणा कारखान्याचे सभासद, महिला व पुरुष तसेच शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मंत्री सावंत यांचे वारकऱ्यांनी केले स्वागत!

मंत्री प्रा.डॉ.सावंत यांचे आगमन झाल्यानंतर तालुका वारकरी साहित्य परिषदेच्यावतीने तालुकाध्यक्ष आप्पासाहेब वाघुलकर यांच्यासह भजनी मंडळांनी त्यांचे टाळ मृदुंग व पालखी मिरवणूक काढत वाजत गाजत स्वागत केले. भजनी मंडळ टाकळी बेंबळीच्या अन्नपूर्णा शेंद्रे, सुकुमार कंजे, कलावती राठोड, छाया तौर, रुक्मीन मोरे, रुक्मिणी नरवडे, विजाबाई सोनटक्के, पार्वती, गुणाबाई पांढरे, धाराशिव (शांतिनिकेतन) येथील संत जनाबाई भजनी मंडळाच्या शोभाताई लंगडे, कल्पना सुतार, प्रभावती भिंगडे, शितल माने यांच्यासह इतर सहभागी झाले होते.

पालकमंत्री प्रा.डॉ.तानाजीराव सावंत यांच्या हस्ते बैठक हॉलचे उद्घाटन

धाराशिव, दि.२४ सप्टेंबर -

जिल्हाधिकारी कार्यालय येथील बैठक हॉलचे नुतनीकरण करण्यात आले आहे. नुतनीकरण करण्यात आलेल्या या बैठक हॉलचे उद्घाटन आरोग्यमंत्री तथा पालकमंत्री प्रा.डॉ.तानाजीराव सावंत यांच्या हस्ते आज २४ सप्टेंबर रोजी करण्यात आले.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओम्बासे,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष, अपर जिल्हाधिकारी शिरीष यादव, निवासी उपजिल्हाधिकारी शोभा यादव, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतीश हरदास, जि.प.माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत, शिवसेना जिल्हा प्रमुख दत्ता साळूंखे, सुरज साळूंके, अनिल खोचरे, जाकीर सौदागर आदी उपस्थित होते.

प्रतिक्षा पवार यांचा वाढदिवस विविध उपक्रमाने साजरा

तभा वृत्तसेवा
कळंब, दि.२४ सप्टेंबर -

बदलत्या काळानुसार कार्यक्रमाचे सोशल मीडियामुळे स्वरूप बदलत चालले आहे. कोणत्याही कार्यक्रमाचे फोटो टाकण्याची स्पर्धाच लागली आहे. पण काहीजण मात्र सामाजिक भान जपत वाढदिवस साजरा करताना दिसत आहेत.

करांजकल्ला येथील सरपंच विशाल पवार हे मात्र कुटुंबातील वाढदिवस मात्र वेगळ्या पद्धतीने साजरा करतात. विशाल पवार हे उच्चशिक्षित असून त्यांना धडपड्या युवा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांच्या पत्नी प्रतिक्षा पवार यांचा वाढदिवस मतिमंद, विकलांग मुलांना खाऊ, शैक्षणिक साहित्य वाटप करून त्यांच्यासोबत साजरा करण्यात आला यावेळी महेश इटकर, शेतकरी निलेश कांबळे, जाधव उपस्थित होते.

वाशी येथे पावसामुळे शेतकऱ्यांचे नुकसान!

तभा वृत्तसेवा
वाशी, दि.२४ सप्टेंबर -

वाशी शहरात २२ सप्टेंबर रोजी २८ मिली पाऊस झाला. त्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतात पाणीच पाणी साचले गेले. वाशी येथील वसंत कवडे हे शेतकरी तर शेतात साचलेल्या पाण्यात सोयाबीन काढत होते. सोयाबीन नाही काढले तर ते वाळले असल्याने थोड्या उन्हात फुटून जमिनीवर गळू लागतात.

पाण्यात सोयाबीन जाऊ नये म्हणून शेतकरी वर्ग पावसात सोयाबीन कापून कोरड्या जागेवर ठेवून देतात. व थोडे सुकल्यानंतर ते ताडपत्रीने झाकतात. अशाप्रकारे शेतकऱ्यांच्या शेतात उद्योग चालू आहे.

सोयाबीन काढण्यासाठी दुसरीकडे मजूर मोठ्या प्रमाणात आले असून ते साडेचार हजार ते पाच हजार एकरी भाव घेत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांची दोन्ही कडून कोंडी झाली आहे. सोयाबीन नाही काढावा तर पावसाने नुकसान होत आहे. जर काढायचे म्हटले तर मजुरी जास्त आहे. त्यामुळे शेतकरी वर्ग मेटाकुटीस आला आहे.

सध्या सोयाबीनचा भाव ही फार कमी असून ४ हजार २०० रु क्विंटल ने जात आहे. एकंदरीत शेतकऱ्यांची चोहोश बाजूने आडवणूक चालू आहे. वाशी येथे आतापर्यंत ७९७ मिली पाऊस झाला असून सध्या ही दररोज पाऊस थोडा थोडा येत आहे. त्यामुळे शेतकरी वर्ग मेटाकुटीस आला आहे. शासनाने त्वरित गोडाऊन चालू करून सोयाबीन खरेदी चालू करावी, अशी ही शेतकऱ्यांची मागणी आहे.

संक्षिप्त वृत्त...

भाषा आणि साहित्य आपणास जीवनामध्ये समृद्ध बनवते: प्रा.डॉ.नयन

वाशी, दि.२४ सप्टेंबर -

कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय वाशी येथे हिंदी दिवस पंधरवाड्यानिमित्त राष्ट्रीय हिंदी दिनाचे औचित्य साधून व्यख्यानाचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रमुख म्हणून जी.के जोशी वाणिज्य महाविद्यालय लातूर येथील हिंदी विभागाच्या प्रा.डॉ नयन भादुले (राजमाने) कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अरुण गंभीरे,एम.एस बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालय लातूर चे प्रा.महेश सोमनाथ राजमाने, वैदेही अरुण गंभीरे, सावित्री राम जाधव उपस्थित होते. यावेळी प्रा.डॉ.नयन भादुले (राजमाने) म्हणाल्या कि, भाषा किंवा साहित्य आपणाला समृद्ध बनवते जीवनामध्ये योग्य मार्गावर मार्गक्रमण करण्यासाठी पुस्तकाचे वाचन करणे महत्वाचे असते महाविद्यालयामध्ये तुमच्यातील विविध गुणांना विकसित केले जाते. तसेच हिंदी हि भाषांतरामुळे रोजगाराची भाषा समजली जाते असे त्या म्हणाल्या. प्रास्ताविक प्रा.एन.पी झेंडे यांनी प्रमुख पाहुणे परिचय प्रा.ए.एसचिंचोलकर यांनी तर सूत्रसंचालन प्रा.ए.सीपाटील यांनी आणि प्रा.एस.एसखटींग यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्वप्नील शेलकांदे, चंद्रकांत घाडगे व दत्ता निकम यांनी परिश्रम घेतले.

वागदरीत अनिकेत याचा सत्कार

जळकोट, दि.२४ सप्टेंबर -



एस.टी महामंडळात अत्यंत इमानदारीने चालक म्हणून कार्यरत असलेले संजय नरसिंह बिराजदार यांचे चिरंजीव अनिकेत संजय बिराजदार यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेऊन ऑल इंडिया रँकमधून गुलबर्गा येथे बीएएमएस वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमला प्रवेश घेतल्याबद्दल त्यांचा ग्रामपंचायत कार्यालय, वागदरीच्या वतीने सरपंच तेजाबाई शिवाजी मिटकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी उपसरपंच सुरेखा भालचंद्र यादव, ग्रा.पं.सदस्य ज्ञानेश्वर पाटील,गुणाबाई बनसोडे, जेष्ठ कार्यकर्ते शिवाजी मिटकर, ह.भ.प.सुरेशसिंग परिहार, राजकुमार पाटील, महादेव बिराजदार, किशोर सूरवसे, जितेंद्र पाटील, संजय बिराजदार, एस.के.गायकवाड, किशोर धुमाळ, सुधाकर बिराजदार ग्रामस्थ उपस्थित होते.

मधुकरराव चव्हाण यांच्यामुळे फिरणार इच्छूकांच्या इच्छेवर पाणी

तभा वृत्तसेवा
नळदुर्ग, दि.२४ सप्टेंबर -

तुळजापुर विधानसभा मतदार संघात विधानसभा निवडणुक लढविण्यासाठी यावेळी अनेकजण इच्छुक असल्याने या मतदार संघात बहुरंगी लढत होण्याची शक्यता आहे. राज्याचे माजी मंत्री व काँग्रेसचे जेष्ठ नेते मधुकरराव चव्हाण हे पुन्हा विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात पुर्ण ताकदीने उतरल्यामुळे महाविकास आघाडीकडुन निवडणुक लढविण्यासाठी ज्यांनी प्रयत्न सुरु केले होते. त्यांच्यामध्ये निराशा पसरली आहे.

तुळजापुर विधानसभा निवडणुक यावेळी देखील २०१९ च्या निवडणुकीप्रमाणे चुरशीची होणार असल्याचे दिसुन येत आहे. या मतदार संघाचा इतिहास पहिला तर २०१९ ची विधानसभा निवडणुक वगळता प्रत्येक निवडणुकीत या मतदार संघातुन धोतरवला उमेदवारच निवडुन आला आहे. २०१९ पर्यंत या मतदार संघात कै. साहेबराव पाटील हंगरगेकर, शिवाजीराव पाटील बभाळगावकर, माणिकराव खपले, सिद्रामप्पा आलुरे गुरुजी, आणि मधुकरराव चव्हाण हे निवडुन आले आहेत. विशेष म्हणजे हे सर्वजण धोतर परीधान करणारेच होते. मात्र २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत या मतदार संघाचे भाजपचे विद्यमान आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी मधुकरराव चव्हाण यांचा पराभव करून या मतदार संघात धोतरवाला निवडुन येण्याची परंपरा खंडीत केली. या मतदार संघात सलग चार वेळा आणि एकुण पाचवेळा निवडुन येण्याची किमया काँग्रेसचे जेष्ठ नेते मधुकरराव चव्हाण यांनी केली आहे, शिवाजीराव पाटील बाभाळगावकर दोन वेळेस तर माणिकराव खपले तीनवेळेस या मतदार संघातुन निवडुन आले आहेत. हा मतदार संघ काँग्रेसचा गड म्हणुन ओळखला जात होता. मात्र २०१९ साली आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी काँग्रेसचा हा गड उध्वस्त करीत पहिल्यांदा या मतदारा संघात भाजपचा झेंडा फडकविला आहे.

गेल्या पाच वर्षात आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी तुळजापुर विधानसभा मतदार संघात मोठ्या प्रमाणात विकासकामे केली आहेत आजही या मतदार संघात त्यांच्या प्रयत्नातुन कोट्यावधी रुपये खर्चाची महत्वपुर्ण विकासकामे सुरु आहेत. गेल्या अनेक वर्षांपासुन नळदुर्ग शहरात पाण्याचा प्रश्न अतिशय बिकट होता. बोरी धरण पाण्याने तुडुंब भरलेले असतानाही नळदुर्गकरांना आठ ते दहा दिवसाआड पाणी मिळत होते. अनेकांनी पाण्याचा हा प्रश्न सोडविण्याच्या फक्त वलगनाच केल्या मात्र एकाही नेत्यांना नळदुर्गकरांचा हा महत्वाचा प्रश्न सोडविला नाही मात्र आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी हा प्रश्न सोडविला असुन सध्या ४६ कोटी रुपये खर्चाच्या नळदुर्ग पाणीपुरवठा योजनेचे काम सुरु आहे. हे काम पुर्ण झाल्यानंतर आता नळदुर्ग करांना दररोज पाणी मिळणार आहे.

त्याचबरोबर नळदुर्ग शहरात आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्या प्रयत्नामुळे अप्पर तहसिल कार्यालय मंजुर झाले आहे. या सर्व कामांचा फायदा येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत आमदार राणा जगजितसिंह पाटील यांना नक्की होणार यात शंका नाही. फक्त भाजपाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी प्रामाणिकपणे काम करून या कामांची माहिती नागरीकांपर्यंत पोहचविणे गरजेचे आहे.

या मतदार संघात आमदार राणा जगजितसिंह पाटील, माजी आमदार मधुकरराव चव्हाण, देवानंद रोचाकरी, अशोक जगदाळे, आण्णासाहेब दराडे, डॉ. स्नेहा सोनकाटे, ऍड. धीरज पाटील यांच्यासह कांहीजण इच्छुक आहेत. यातील कांही मंडळींना विधानसभा निवडणुक आली की मगच तालुक्यातील जनतेची आठवण येते. इतरवेळी मात्र ही मंडळी कुठल्या बिळात जाऊन बसतात हे समजत नाही. आज अनेकजण या निवडणुकीची जय्यत तयारी करत आहेत. अनेक कार्यक्रमांच्या माध्यमातुन, मतदारांच्या गाठीभेटी घेऊन आपण विधानसभा निवडणुक लढविणार असल्याचे सांगत आहेत.

सध्या या मतदार संघात महाविकास आघाडीचे नेते अशोक जगदाळे, माजी आमदार मधुकरराव चव्हाण, देवानंद रोचकरी, आण्णासाहेब दराडे, ॲड. धीरज पाटील, डॉ. स्नेहा सोनकाटे या गावागावात बैठका घेऊन मतदारांशी विविध प्रश्नांवर चर्चा करून आपली बाजु मतदारांसमोर मांडत आहेत. यामध्ये आण्णासाहेब दराडे यांनी तर कमालच केली आहे. ना राजकीय गॉडफादर,ना राजकीय कुठली पार्श्वभुमी नसताना त्यांनी प्रचारात जी आघाडी घेतली आहे आणि त्यांना जो मतदारांचा प्रतिसाद मिळत आहे याबद्दल त्यांचे कौतुक करावे लागेल.

या मतदार संघात यावेळी बहुरंगी लढत होण्याची शक्यता आहे.कारण कुणीच माघार घ्यायला आज तयार नाही. काँग्रेसचे जेष्ठ नेते मधुकरराव चव्हाण यांनी पुन्हा एकदा मीच विधानसभा निवडणुक लढविणार असल्याचे जाहीर केल्याने महाविकास आघाडीकडुन निवडणुक लढविण्याची जय्यत तयारी करीत असलेले महाविकास आघाडीचे नेते अशोक जगदाळे आणि काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ऍड. धीरज पाटील यांची मात्र यामुळे मोठी गोची झाली आहे. हा मतदार संघ महाविकास आघाडीमध्ये काँग्रेसकडे आहे हे विसरून चालणार नाही. त्यामुळे येणाऱ्या कांही दिवसात या मतदार संघात अनेक राजकीय घडामोडी घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

जाहीरनामा

उमरगा येथील सौ.एम.पी. मथुरे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, उमरगा

किरकोळ अर्ज क्र. २९४/२०२४ सुजाता / निरंक नि.क.७

ज्यापेक्षा मयत कै. पंडीत बसण्णा कनमुसे हे मौजे कसगी ता.उमरगा जि. धाराशिव येथे दि. १३/११/२००२ रोजी मयत झाले असुन अर्जदार क. १. सुजाता पंडीत कनमुसे वय ४८ वर्षे रा. कसगी ता.उमरगा २. राजश्री पंडीत कनमुसे वय २८ वर्षे ३. राजेश पंडीत कनमुसे वय २६ वर्षे ४. राकेश पंडीत कनमुसे वय २४ वर्षे वरील मयताचे वारस असल्याच्या नात्याने त्यांचे पश्चात शासकीय निमशासकीय कार्यालयीन कामकाजाकरिता वारसा प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार मयताचे वारसदार असल्याबाबत आक्षेप असल्यास या जाहीरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यांत येते की जर सदर मुदतीत कोणी योग्य त्या हरकती दाखल न केल्यास अर्जदाराच्या वारसा प्रमाणपत्र मिळाल्याच्या मागणीबददल पुरावा घेवुन त्याची कै. पंडीत बसण्णा कनमुसे यांचे वारस असल्याबददलचे वारस प्रमाणपत्र हे न्यायालय वरील अर्जदारांना देईल.

दिनांक २८/०८/२०२४
पुढील तारीख ०२/०९/२०२४

स्वाक्षरित/-
(बी.एस.घोडके)
कनिष्ठ लिपीक

स्वाक्षरित/-
(बी.व्ही जाधव)
सहा. अधिक्षक

सह दिवाणी न्यायाधीश, क स्तर, उमरगा

जाहीरनामा

उमरगा येथील सौ.एम.पी. मथुरे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, उमरगा

किरकोळ अर्ज क.३१२/२०२४ व्यकंट/ निरंक. नि.क.७

ज्यापेक्षा मयत कै.नरसिंग व्यकंट धानुरे हे मौजे. नळदुर्ग ता. तुळजापुर जि. धाराशिव येथे दि. २४/०४/२०२४ रोजी मयत झाले असुन अर्जदार क. १. व्यकंट दत्तात्रय धानुरे वय ५४ वर्षे रा. तुरोरी ता.उमरगा २. निकिता नरसिंग धानुरे वय २१ वर्षे ३. धनश्री नरसिंग धानुरे वय ११ महिने ४. सुवर्णा व्यकंट धानुरे वय ५० वर्षे वरील मयताचे वारस असल्याच्या नात्याने त्यांचे पश्चात शासकीय निमशासकीय कार्यालयीन कामकाजाकरिता वारसा प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार मयताचे वारसदार असल्याबाबत आक्षेप असल्यास या जाहीरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यांत येते की जर सदर मुदतीत कोणी योग्य त्या हरकती दाखल न केल्यास अर्जदाराच्या वारसा प्रमाणपत्र मिळाल्याच्या मागणीबददल पुरावा घेवुन त्याची कै.नरसिंग व्यकंट धानुरे यांचे वारस असल्याबददलचे वारस प्रमाणपत्र हे न्यायालय वरील अर्जदारांना देईल.

दिनांक २८/०८/२०२४
पुढील तारीख ०२/०९/२०२४

स्वाक्षरित/-
(बी.एस.घोडके)
कनिष्ठ लिपीक

स्वाक्षरित/-
(बी.व्ही जाधव)
सहा. अधिक्षक

सह दिवाणी न्यायाधीश, क स्तर, उमरगा

जाहिर प्रगटन

तालुका कार्यकारी दंडाधिकारी
तथा तहसीलदार उमरगा यांचे कार्यालय
(दंडणीय विभाग)

जा.क्र.२०२४/दंडणिय/कावि- दिनांक २/०९/२०२४

समस्त गावकरी मौजे. उमरगा ता.उमरगा जि.धाराशिव यांना कळविण्यात येते की, या कार्यालयात अर्जदार श्री मुबीनाबेगम मस्तान बागवान उमरगा ता.उमरगा जि. धाराशिव यांनी जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत मागणी केली आहे.

जन्म झालेल्याचे नावः खर्शीद मस्तान बागवान

सदरील व्यक्तीचा मौजे. उमरगा ता. उमरगा जि. धाराशिव या ठिकाणी दि. ०९/०३/२००७ या दिवशी जन्म झाला असून प्रमाणपत्र मिळणे संबंधी सदरील कार्यालयात दिनांक. ०६/०८/२०२४ रोजी अर्ज केला आहे.

वरील जन्म बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयास सादर करावा. आक्षेप मुदतीनंतर च्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरित /-
कार्यकारी दंडाधिकारी
तथा तहसिलदार उमरगा

पालिका कर्मचाऱ्यांकडून स्वच्छता हीच सेवा उपक्रमातून श्रमदान

अवघ्या एका तासात रामलीला मैदान केले चकाचक

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २४ सप्टेंबर

हिंगोली नगर पालिका अधिकारी, कर्मचाऱ्यांनी मंगळवारी सकाळी स्वच्छता हीच सेवा उपक्रमांतर्गत अवघ्या एका तासात स्वच्छता मोहीम राबवून संपूर्ण रामलीला मैदान चकाचक केले आहे. पालिकेच्या कर्मचाऱ्यांनी सोमवारी येथील सिरेहक शाह बाबा तलाव परिसरही स्वच्छ केला. पालिकेच्या या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

केंद्र आणि राज्य शासनाच्यावतीने स्वच्छता हीच सेवा अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांत हिंगोली नगर पालिकेने शहरातील महत्वाच्या ठिकाणी स्वच्छता मोहीम सुरू केली असून या उपक्रमात अधिकाऱ्यांसह कर्मचारी सकाळपासूनच सहभागी होत आहे. स्वच्छ शहर, सुंदर शहर तसेच माझी वसुंधरा अभियान मोठ्या प्रमाणावर राबविण्यात येत आहे. नगर पालिकेच्यावतीने अनेक ठिकाणी वृक्षारोपनाचे कार्यक्रम राबविण्यात येत असून या रोपांचे संवर्धनही करण्यात येत आहे. तत्कालीन मुख्याधिकारी रामदास पाटील यांनी शहराचा कायापालट करण्यासाठी विविध उपक्रम राबवले होते तसेच केंद्र आणि राज्य शासनाचे पुरस्कार आणि बक्षीसांची लाखो रूपयांची रक्कम मिळवली होती. हाच वारसा विद्यमान मुख्याधिकारी अरविंद मुंढे पुढे चालवित असतांना दिसत आहेत.

मंगळवारी सकाळी नगर पालिकेचे अधिकारी आणि कर्मचारी यांनी येथील रामलीला मैदानावर मुख्याधिकारी अरविंद मुंढे, उपमुख्याधिकारी उमेश हेंबाडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता निरीक्षक बाळू बांगर, कार्यालयीन अधीक्षक शाम माळवटकर, प्रतीक नाईक, देवीसिंह ठाकूर, वसंत पुतळे, संदीप घुगे, विनय साहू, यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते. हातात झाडू, फावडे आणि इतर साहीत्य घेवून अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी मैदानावरील सर्व कचरा, प्लास्टीक पिशव्या आणि इतर साहीत्य उचलून अवघ्या एका तासात रामलीला मैदान चकाचक केले. नगर पालिकेच्या या कार्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

स्वच्छता ही सेवा अभियानांतर्गत ग्रामपंचायतींमध्ये स्वच्छता मोहीम

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २४ सप्टेंबर

जिल्ह्यात १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत स्वच्छता ही सेवा अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत दि. १९ ते २१ सप्टेंबर २०२४ या कालावधीत जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतीमध्ये सार्वजनिक ठिकाणाची श्रमदानातून साफसफाई केली. जिल्ह्यातील अधिकारी व कर्मचारी तसेच गावातील ग्रामस्थांच्या पुढाकारातून थेट गावात जाऊन एक दिवस गावासाठी या उपक्रमांतर्गत मोठ्या प्रमाणात श्रमदानात सहभाग घेतला .

जिल्हाधिकारी अभिनव गोयल व मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्या आदेशानुसार उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) संजय कुलकर्णी यांच्या सनियंत्रणाखाली ही मोहीम राबविण्यात आली. स्वच्छता ही सेवा अंतर्गत श्रमदान मोहीम जिल्ह्यातील सर्व महसूल व जिल्हा परिषदेचे अधिकारी, विभाग प्रमुख तसेच पंचायत समिती स्तरावरील अधिकारी व प्राध्यापक, शिक्षक, ग्रामसेवक, गट समन्वयक कर्मचारी सहभागी होऊन ग्रामस्थाच्या मदतीने सर्व ग्रामपंचायतीमध्ये श्रमदानातून सार्वजनिक ठिकाणे, मंदिर, शाळा, ग्रामपंचायत, आरोग्य उपकेंद्र, अंगणवाडी परिसरात स्वच्छता तसेच नदी घाट परिसरात स्वच्छता करुन या सर्व ठिकाणाची श्रमदानातून साफसफाई करण्यात आली. स्वच्छतेची प्रतिज्ञा घेण्यात आली. आईच्या नावाने एक झाड हा वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला.

यामध्ये गावातील ग्रामस्थ, ज्येष्ठ नागरिक, सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, महिला सदस्य, महिला बचत गटातील सदस्य, रोजगार सेवक, शाळेचे विद्यार्थी,गावातील व्यायाम मंडळ, सार्वजनिक गणेश मंडळ, भजनी मंडळ, युवा क्रीडा मंडळ आदींचा मोठ्या प्रमाणात सहभाग घेण्यात आला.

दिव्यांग व्यक्तींना अंत्योदय शिधा पत्रिकेचे वाटप

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २४ सप्टेंबर

येथील तहसील कार्यालयात जिल्हा पुरवठा अधिकारी राजेश पुंजल यांच्या आदेश अन्वये दिव्यांग व्यक्तींना अंत्योदय शिधा पत्रिकेचे वितरण करण्यात आले. शासनाने दिव्यांग व्यक्तींना स्वतंत्रपणे अंत्योदय शिधापत्रिका देण्यासाठी आणि त्यावरील देय लाभ तात्काळ देण्यासाठी शासन निर्णय निर्गमित केलेले आहे. त्या अनुषंगाने हिंगोली तहसील कार्यालयात तहसीलदार श्रीकांत भुजबळ यांच्या कार्य तत्परतेने दिव्यांग व्यक्तींचे शिधापत्रिका ऑनलाईन करून त्यांचे ई-रेशन कार्ड संगणकीकृत करून दिव्यांग व्यक्तींना त्यावरील देऊ असलेल्या लाभ देण्यासाठी आवश्यक कार्यवाही केली. दिव्यांग व्यक्तींनी सदरील योजनेचा लाभ घ्यावा व सदरील प्रक्रिया पुरवठा विभाग तहसील कार्यालयात सुरू असल्याने दिव्यांग व्यक्तींनी आवश्यक कागदपत्रासह संपर्क करण्याचे आव्हान तहसीलदार श्रीकांत भुजबळ यांनी केले.

याप्रसंगी उपविभागीय अधिकारी घुटुकडे जिल्हा पुरवठा अधिकारी राजेश पूंजल, तहसीलदार श्रीकांत भुजबळ यांच्या हस्ते दिव्यांग व्यक्तींना ई-शिधापत्रिका देण्यात आले. या प्रसंगी नायब तहसीलदार अनिल घुगे, अव्वल कारकून अनिल पगारे, सय्यद इशरत अली, उमरा स्वस्त धान्य दुकानदार मुटकुळे, जिल्हा संघटक शाहनवाज गौरी, खरेदी - विक्री संघाचे व्यवस्थापक आसिफ गौरी, मोतीराम इंगोले, गोपाळ कऱ्हाडे, जावेद पठान उपस्थित होते. यावेळी सदर योजनेचे लाभार्थी सिंधू नारायण गायकवाड, प्रीती भारत कांबळे, विभा रायचंद जैन, प्रमोद बळीराम नांदनकर, नजमा हसन शेख इत्यादी लाभार्थी होते.



हिंगोली- येथील रामलीला मैदानावर ऐतिहासिक सार्वजनिक दसरा महोत्सवाची जय्यत तयारी करण्यात येत असून मैदानावर प्रदर्शनीत विविध खेळाचे साहीत्य, आकाशपाळणा आदीचे आगमन झाले असून कारागीरामार्फत हे सामान उभारण्यात येत आहे. छाया- विजय गुंडेकर

कोतवाल संवर्गाला चतुर्थ श्रेणीचा दर्जा देण्यासाठी धरणे आंदोलन

तभा वृत्तसेवा
हिंगोली २४ सप्टेंबर

कोतवाल संवर्गाला चतुर्थ श्रेणीचा दर्जा द्यावा यासह इतर प्रलंबीत मागण्यांसाठी येथील तहसील कार्यालयासमोर दि २४ सप्टेंबर रोजी कोतवाल संघटनेच्यावतीने धरणे आंदोलन करण्यात आले. मागण्या मान्य न केल्यास २५ सप्टेंबर पासून बेमुदत काम बंद आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

२४ तास शासनाचची व जनतेची सेवाकरणाऱ्या कोतवालास आंदोलनाची वेळ येऊ न देता मागण्याचा सहानुभूतीपुर्वक विचार करून मागण्या मान्य कराव्यात जेणेकरून मूलभूत गरजा पूर्ण करून किमान समाधानकारक जीवन जगता येईल. मागण्या मान्य न केल्यास २५ सप्टेंबरपासून जिल्हास्तरावरकाम बंद आंदोलन करण्यात येईल. तसेच दि २६ सप्टेंबर पासून आझाद मैदान मुंबई येथे मागण्यां मान्य होईपर्यंत बेमुदत काम बंद धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. निवेदनावरतालुका अध्यक्ष प्रल्हाद घोडके, शेख मुस्ताक,सचिव शिंदे, संपर्क प्रमुख दिपक खंदारे, नितेश गाडेकर, गजानन साखरे, सुनिता पोटे, मंदाकिनी मुळे, चंचला बोरकर, मारुती खंदारे, आशा जावळे शेख माजीद, गोरखनाथ वायकुळे, गणेश उबाळे, साईनाथ फलटणकर, सीमा खंदारे, वैशाली भोसले, नितेश खिल्लारे, सागर पुरी, संतोष मानमोठे, सचिन राठोड, अमोल कुरवाडे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

संक्षिप्त वृत्त

रेशीम उत्पादक शेतकरी अभ्यास दौऱ्यासाठी रवाना

हिंगोली- हिंगोली जिल्ह्यातील रेशीम उत्पादक लाभार्थ्यांचा शेतकरी अभ्यास दौरा रूई ता.गेवराई जि.बीड व जालना येथील रेशीम मार्केट व शेतीस भेट देण्यासाठी आज रवाना झाले आहेत. या दौऱ्यास जिल्हा रेशीम विकास अधिकारी पी. एस. देशपांडे यांनी हिरवा झेंडा दाखवून रवाना केला. या दौऱ्या दरम्यान रूई ता.गेवराई जि.बीड येथील प्रगतशील रेशीम उत्पादक शेतकऱ्यांना भेटी देणार आहेत. तसेच जालना येथील रेशीम मार्केट व प्रगतशील शेतकऱ्यांना भेटी देणार आहेत. यावेळी वरिष्ठ तांत्रिक सहाय्यक अशोक वडवळे, गजानन काचगुंडे तसेच नितीन लोलगे, राजू रणवीर, रजनीश कुटे, कुलदीप हरसुले, केतन प्रधान, कु.राधा पाटील, रमेश भवर, तान्हाजी परघणे आदी शेतकरी उपस्थित होते.

हिंगोली, कळमनुरी विधानसभा उबाठालाच

हिंगोली- हिंगोली जिल्ह्यातील उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे सर्व पदाधिकारी नुकतेच मुंबईतील मातोश्री इथे उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या भेटीला गेले होते. यावेळी पदाधिकारी यांनी हिंगोली विधानसभा आणि कळमनुरी विधानसभा शिवसेना गटालाच देण्याची मागणी केली. या मागणीला प्रतिसाद देत शिवसेना प्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी हिंगोली आणि कळमनुरी विधानसभेची जागा शिवसेनेलाच देण्यात येईल, असे आश्वासन दिले. यावेळी हिंगोली शिवसेना गटाचे जिल्हाप्रमुख संदेश देशमुख, जिल्हाप्रमुख गोपू पाटील, उपजिल्हाप्रमुख परमेश्वर मांडगे, उद्धवराव गायकवाड, गणेश शिंदे, भानुदास जाधव, संतोष देवकर आदींची उपस्थिती होती.

येहळेगाव सोळंके येथे साखळी उपोषण

औंढा नागनाथ- मराठा आंदोलक मनोज जरांगे यांच्या समर्थनार्थ तसेच शासनाच्या निषेधार्थ येहळेगाव सोळंके येथे सकल मराठा समाजाच्यावतीने साखळी उपोषणाला सुरूवात करण्यात आली आहे. सगेसोयरे अधिसूचनेची अंमलबजावणी करा, हेद्राबाद, सातारा आणि बॉम्बे गॅझेट लागू करा, मराठा बांधवांवर दाखल झालेले गुन्हे मागे घ्या, कुणबी नोंदीच्या आधारावर प्रमाणपत्रे वितरीत करा, मराठा आणि कुणबी एकच असल्याचा अध्यादेश काढा या मागण्यांसाठी सकल मराठा समाजाच्यावतीने साखळी उपोषण सोमवार दि २४ सप्टेंबर पासून सुरू करण्यात आले आहे. यावेळी मोठ्या संख्येने मराठा बांधव सहभागी झाले आहेत.

शिवसेना आ. बांगर यांच्याकडून वाटप होत असलेल्या पैशाची चौकशीची मागणी

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २४ सप्टेंबर

कळमनुरी विधानसभा मतदार संघाचे शिवसेना शिंदे गटाचे आ. संतोष बांगर हे मोठ्या प्रमाणात महिलांना पैशाचे वाटप करीत आहेत. वाटप करण्यात येत असलेल्या पैशाची चौकशी करण्याची मागणी उध्दव बाळासाहेब ठाकरे शिवसेना गटाच्यावतीने पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांचेकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, कळमनुरी मतदारसंघाचे शिवसेनेचे आ. संतोष बांगर हे महिलांना मोठ्या प्रमाणात पैशाचे वाटप करीत आहेत. आतापर्यंत लाखोंचे वाटप करण्यात आले असून हा पैसा जिल्ह्यात चालविल्या जाणाऱ्या अवैध धंदे अवैध वाळू, नकली दारू, प्रतिबंधीत गुटखा, जुगार अड्डे, मटका यामधून येत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. पैशाच्या माध्यमातून मतदारांना प्रलोभने देण्याचे काम चालू असून या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची तसेच अवैध वाटप बंद करण्याची मागणी उबाठा शिवसेनेच्यावतीने निवेदनात करण्यात आली आहे. निवेदनावर जिल्हाप्रमुख गोपू पाटील, माजी आ. डॉ. संतोष टारफे, बाळासाहेब मगर, डॉ रमेश मस्के, अजित मगर, आनंद जगताप आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

अनुदानासाठी शेतकऱ्यांनी ई-केवायसी करावी- तहसीलदार

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २४ सप्टेंबर

हिंगोली तालुक्यातील सर्व ई केवायसी न झालेल्या बाधित शेतकऱ्यांनी अनुदान खात्यात जमा करून घेण्यासाठी आपले सरकार सेवा केंद्रात ई-केवायसी करून घ्यावी, असे आवाहन तहसीलदार श्रीकांत भूजबळ यांनी केले आहे.

माहे नोव्हेंबर २०२३-२४ अवेळी पाऊस/गारपीट व अतिवृष्टीमुळे हिंगोली तालुक्यातील बाधित झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाईची शासनातर्फे अनुदान प्राप्त झाले आहे. याबाबतच्या याद्या ई पंचनामा पोर्टलवर अपलोड करण्यात आल्या आहेत.सदर याद्यास मान्यता मिळाली असून विशिष्ट क्रमांक व्हीके नंबर तयार झाले आहेत. या क्रमांकाच्या सहाय्याने शेतकऱ्यांनी आपले सरकार सेवा केंद्र येथे जाऊन ई केवायसी केल्याशिवाय अनुदान खात्यात जमा होत नाही. ई केवायसी न केल्यामुळे गावातील प्रलंबीत शेतकऱ्यांची यादी व विशिष्ट क्रमांक व्हीके नंबरची यादी तलाठी कार्यालय येथे प्रसिध्द करण्यात आली आहे. शेतकऱ्यांनी येत्या ३ दिवसात आपले सरकार सेवा केंद्रात जाऊन ई केवायसी करून घ्यावी ई केवायसी न केल्यापासून अनुदानापासून वंचीत राहील्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत शेतकऱ्याची राहील. तालुक्यात ई केवायसी न झालेल्या शेतकऱ्यांची संख्या ४ हजार २३८ शेतकरी आहेत. व्हीके क्रमांक सांगून आधार क्रमांकांशी संलग्न असलेल्या खात्यात अनुदानाची रक्कम तत्काळ जमा होणार आहे. तलाठी, कोतवाल यांच्या मार्फत शेतकऱ्यांना वैयक्तीरित्या कळविण्यात येणार आहे. ईकेवायसी न केल्यामुळे अनुदानाची रक्कम अजूनही शासनाच्या खात्यावर पडून आहे. नागरिक, शेतकऱ्यांनी तत्काळ ई केवायसी करावी तसेच ईपीक पाहणीही लवकरात लवकर करून घ्यावी असे आवाहन तहसीलदार श्रीकांत भूजबळ यांनी केले आहे

मयत पशुधन मालकांना ११ लाख ४५ हजार सानुग्रह अनुदान वाटप

तभा वृत्तसेवा
औंढा नागनाथ, २४ सप्टेंबर

१ आणि २ सप्टेंबर रोजी औंढा नागनाथ तालुक्यात अतिवृष्टी झाली. या अतिवृष्टीमध्ये शेतकऱ्यांच्या मोठ्या प्रमाणात नुकसान झाले तसेच शेतकऱ्यांची ७० जनावरे दगावली होती. शासनाने ११ लाख ४५ हजार ५०० रूपयांचे अनुदान दिले असून धनादेशाद्वारे मयत पशुधन मालकांना तहसीलदार हरिष गाडे यांचेहस्ते धनादेशाक्षद्वारे वितरीत करण्यात आले आहे.

सप्टेंबर महिन्याच्या एक आणि दोन सप्टेंबर रोजी औंढा नागनाथ तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे पुर आला. या पुरात दुभती आणि ओढकाम जनावरे वाहून गेली तर काही जनावरे दगावली. त्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले. तहसील कार्यालयाच्यावतीने पंचनामे करून नुकसान भरपाईचा अहवाल शासनाकडे पाठविण्यात आला होता. शासनाने मयत ७० जनावरांच्या ३८ मालकांना ११ लाख ४५ हजार ५०० रूपयांचे सानुग्रह अनुदान मंजूर झाले. सदरील अनुदान मयत पशुधन मालकांना तहसीलदार हरिष गाडे यांच्याहस्ते धनादेशाद्वारे वाटप करण्यात आले.

CMYK

लातूर दिनांक

लातूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व
बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केल

केशव बालाजी मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

तभा वृत्तसेवा,
शिरुरअनंतपाळ, दि. २४ सप्टेंबर-

प्रति बालाजी श्री केशव बालाजी देवस्थान ची स्थापना कनकेश्वरी देवी मॉ (गुजरात)यांच्या संकल्पनेतून व शिरुर अनंतपाळ तालुक्यातील मौजे थेरगाव येथील रहिवासी कै.श्रीरंगजी पल्लोड यांच्या पुढाकारातून श्री. सद्गुरू चेरी टेबल ट्रस्ट संचालित श्री.बालाजी मंदिर स्थापन झाले अल्पावधीतच हे देवस्थान संपूर्ण महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश राज्यामध्ये प्रसारित होऊन हजारो भाविक दर्शनासाठी येत आहेत. देवस्थानाचा अकरावा ब्रह्मोत्सव दि. ४ ते १२ ऑक्टोबरपर्यंत संपन्न होणार आहे. या ब्रह्मोत्सव काळामध्ये अखंड अन्नदान सेवा संपन्न होणार आहे. तसेच या अनुषंगाने दररोज विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी या उत्सवात सहभागी होऊन या सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन अध्यक्ष राजकुमार पल्लोड, कार्यकारी विश्वस्त रमन पल्लोड, सचिव शितल पल्लोड, कोषाध्यक्ष गोविंद इंदानी, तसेच उषा सारडा, पवन पल्लोड हुकुमचंद कलंत्री, सतीश पल्लोड, श्यामसुंदर सोनी, राजेश पल्लोड, अजय मुंदडा, अविनाश मंत्री, डॉ. वरूण नागोरी श्रीया पल्लोड, जगदीश भुतडा,राजेश कुमार मंत्री, किशोर पल्लोड, डॉ.सपना पल्लोड, डॉ. पूजा नागोरी विजेश सोनी यांनी केले आहे.

संक्षिप्त वृत्त

औसा, उजनीत मराठा समाजाच्या बंदला प्रतिसाद

औसा, दि. २४ सप्टेंबर-

मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांचे अंतरवाली सराटीत मराठा समाजाला आरक्षण मिळावे, या मागणीसाठी उपोषण सुरु असून या आंदोलनाच्या समर्थनार्थ औसा व उजनी येथील मराठा बांधवानी रॅली काढून आंदोलन केले. तर व्यापाऱ्यांनी व्यवसाय बंद करुन आंदोलनाला पाठिंबा देत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सकल मराठा समाजबांधवानी दिलेल्या बंदच्या हाकेला औसा , उजनीतील छोट्या, मोठ्या व्यापाऱ्यांनी सकाळपासूनच आपली दुकाने उघडली नव्हती. तसेच पुकारलेल्या बंदला प्रतिसाद देत ग्रामीण भागातील नागरिक औसा शहरात आले नाहीत. यामुळे शहरात सर्वत्र शुकशुकाट दिसत होता. शहरातील बहुतांश शाळा, महाविद्यालय, खासगी, इंग्रजी शाळा बंद होत्या. आडत बाजारपेठ बंद असल्याने सोयाबीनची आवक ठप्प झाली होती. छावा संघटनेचे जेष्ठ कार्यकर्ते तथा मराठा समाजाचे नेते नामदेव जाधव यांनी उजनी येथे बंदचे आवाहन केले. सकाळपासूनच हाटेल, किराणा, स्टेशनरी, सलून, कृषी फर्टिलायझर, मशनरी, कापड अशा सर्वच व्यवसायिकांनी व्यवसाय बंद करुन सकल मराठा समाजाच्या आरक्षण मागणीस व आंदोलनास पाठिंबा दिला. यावेळी सकल मराठा बांधवांनी जरांगे पाटलांच्या उपोषणाची दखल त्वरित घेवून मराठा समाजाला आरक्षण देण्याची मागणी करण्यात आली.

परतीचा पाऊस; सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या मुळावर

शिरूर अनंतपाळ, दि. २४ सप्टेंबर-

शिरूर अनंतपाळ तालुक्यातील प्रमुख पिक म्हणजे सोयाबीन या पिकावर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांची पावसाने चिंता वाढली आहे. गेल्या आठवडा भराच्या विश्रांतीनंतर ऐन सोयाबीन कापणीच्या सुरवातीलाच पावसाने हजेरी लावलेल्याने शेतकऱ्यांचे काढणीला आलेल्या सोयाबीनचे पीकांचे नुकसान होते आहे. त्यामुळे पावसाचा लहरीपणा सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या मुळावर उठला आहे. तालुक्यात यंदा लवकर पेरणी झाली असल्याने व तीन महिन्यांतील नगदी पीक म्हणून सर्वात जास्त सोयाबीन पेरा झाला आहे.त्यात सोयाबीनचे लवकर येणाऱ्या बियाणे पेरणी केल्याने काही ठिकाणी सोयाबीन काढण्यास सुरुवात झाली आहे. ऐन कापणीच्या सुरवातीलाच पावसाला सुरुवात झाली असल्याने शेतकऱ्याचे नुकसान होत आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार आणखीन काही दिवस पाऊस पडण्याची शक्यता वर्तवली असल्यामुळे शेतकऱ्यांनाही भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

दापका ग्रामपंचायततर्फे नूतन मुंबई पोलीस वृंदावन घायाळचा सत्कार

निलंगा, दि. २३ सप्टेंबर-

निलंगा तालुक्यातील दापका ग्रामपंचायत हद्दीतील शहरालगत असलेल्या मुबारकपुर (दगडगाव) येथील वृंदावन घायाळ हीची मुंबई पोलीस दलात निवड झाली असून नागपूर येथे सात महिन्याचे पोलीस प्रशिक्षण पूर्ण करुन दि. २२ सप्टेंबर रोजी गावात आली असता निलंगा तालुका अल्पसंख्याक कॉग्रेस सेलचे तालुकाध्यक्ष लालाभैय्या पटेल यांच्या हस्ते ग्रामपंचायत कार्यालय मुबारकपुर दापका ग्रुप ग्रामपंचायत च्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष बबर पठाण, ग्रामपंचायत सदस्य राहुल घोडके, सलीम कादरी, लिपिक अमर घंटे, शंकर दहीवाले, स्वप्नील उपस्थित होते.

लातूर जिल्ह्यात आज पावसाचा रेड अलर्ट

लातूर, दि. २४ सप्टेंबर-

प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांनी आज दि. २४ रोजी लातूर जिल्ह्यासाठी ऑरेंज अलर्ट दिला असून आज आणि उद्या दि. २५ सप्टेंबर २०२४ रोजी लातूर जिल्ह्यांत मुसळधार पाऊस होण्याचा अंदाज वर्तवला आहे. यादरम्यान जिल्ह्यात तुरळक ठिकाणी विजेच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तविली आहे. तरी लातूर जिल्हावासियांनी विशेषतः नदीकाठच्या गावांनी सतर्क राहून स्वतःची व आपल्या पशुधनाची काळजी घ्यावी. या कालावधीत वीज पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली असून नागरिकांनी सुरक्षित ठिकाणी राहावे. शाळकरी मुलांनी नदी, नाले, तलावावर पोहण्यासाठी जाऊ नये, असे आवाहन लातूर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्यामार्फत करण्यात आले आहे.

औसा तालुक्याला तुफानी पावसाचा तडाका

‘तेरणा’ सलग तीन दिवस काठोकाठ

तभा वृत्तसेवा,
औसा, दि.२४ सप्टेंबर-

एकदिवसाच्या उघाडीपनंतर सोमवारी रात्री ते मंगळवारी पहाटे ५.३० वा. पर्यंत एकामागून एक जोरदार सरी कोसळून औसा तालुक्याला पावसाने तुफानी तडाका दिल्याने सोयाबईन पिकाम या अवेळी होत असलेल्या पावसामुळे भरपूर ओली झालेल्या जमिनीवरील व पाण्यात उभे असलेले सोयाबीन झाडावरच उगविण्याचा अंदाज जाणकाराकडून व्यक्त होत असून तालुक्यातील शेतकऱ्यांचे डोळे पाणावले आहेत. तर तेरणा नदी गेले तीन दिवस दुथडी भरुन वाहत आहे.

पंधरा दिवसाच्या उघाडीपनंतर शनिवारी दुपारनंतर पावसाचे वादळी आगमन औसा तालुक्यात झाला. या वर्षीच्या खरिप हंगाम त मृग नक्षत्रापूर्वीच पावसाने दमदार हजेरी लावली होती. यामुळे पेरणीसाठी पावसाची वाट पाहण्याची वेळ शेतकऱ्यांवर दशकात यंदा पहिल्यांदाच आली नाही. तर मृग नक्षत्रातच अर्ध्याहून अधिक शेतकऱ्यांनी पेरण्या उरकल्या होत्या. यामुळे काढणीचा मोठा मोसम आला आहे. या काढणीच्या मोसमातच पावसाने पुन्हा धुमाकुळ घातल्याने शेतकरी तिहेरी संकटात सापडला आहे. या वर्षीच्या खरीप हंगामात पेरणीपासून शेंगा भरेपर्यंत सतत पाऊस पडला असून या वर्षी पिकातील आंतरमशागत एकाही शेतकऱ्यांना करता आली नाही.

सततच्या पावसाने पिकाची उंची आणि फुटवा जोमदार वाढला आहे. पण सततच्या ओलीमुळे शेंगाची लागण अत्यल्प झाली आहे. यामुळे उत्पनात शेतकऱ्यांना फटका बसणार आहे. हे कोणालाही नाकारता येत नाही. पण यंदा सोयाबीनच्या झाडाकडे पाहून मजुरांनी मजुरीत ४० टक्के वाढ केली. तर सततच्या पावसामुळे व अंतरमशागत झाली नाही. यामुळे पिकाबरोबर गवताची चांगली वाढ झाली आहे.

सोयाबीनची काढणी करुन रब्बी हंगामातीर पेरणीसाठी जमिन तयार करता यावी, यासाठी शेतकऱ्यांनी मजुरांनी काढणीच्या वाढविलेल्या दराला होकार देत काढणीला सुरुवात केली. या पावसामुळे काढलेले सोयाबीन काळे पडेल. पाण्यात व उभे असलेले सोयाबीन झाडावरच उगवणार असल्याची भिती शेतकऱ्यांना आहे. या अवेळी पडत असलेल्या पावसामुळे हातातोंडाशी आलेल्या पिकांचे नुकसान होऊन काढणीचा व रब्बी हंगामाच्या पेरणीपूर्व मशागतीचा खर्च कसा करावा. याची चिंता शेतर्क्यांना भेडसावत आहे. रात्री व पहाटेच्या सुमारास पडलेल्या पावसामुळे गेले तीन दिवस झाले तेरणा नदी दुथडी भरुन वाहत आहे. तर ओढ्या, नाल्यांना सतत पूर येत असल्याने ग्रामिण भागातील रहदारीचे बंद होऊन जनजिवन विस्कळीत होत आहे.

निलंगा येथे धनगर समाजाचा रस्ता रोको

तभा वृत्तसेवा,
निलंगा, दि. २४ सप्टेंबर-

धनगर समाजाला एस. टी. आरक्षण द्यावे या मागणीसाठी निलंगा येथे सकल धनगर समाजाच्या वतीने उदगीर मोडवर चक्का जाम वह रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.

धनगर समाजाची अनुसूचित जमातीच्या आरक्षणाची मागणी गेल्या ६० वर्षा पासून प्रलंबित आहे. धनगर समाजाला एस.टी. आरक्षण लागू करून सरसकट धनगर समाज बांधवांना एस.टी. प्रमाणपत्र देण्यात यावे या मागणीसाठी महाराष्ट्रत पंढरपूर ,लातूर यासह अनेक ठिकाणी आमरण उपोषण चालू आहे परंतु सरकार आंदोलनाची कसलीच दखल घेत नाही. या आमरण उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी निलंगा येथे उदगीर मोडवर निलंगा तालुका सकल धनगर समाजच्यावतीने दोन तास चक्का जाम व रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.

या वेळी जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते झटींग म्हेत्रे, माजी नगराध्यक्ष बाळासाहेब शिंगाडे , मुरलीधर अंचूळे, भगवान वरवटे, विजयकुमार भोसले,संजय भोसले नामदेव काळे ,दता काळे ,माधव म्हेत्रे, कमलाकर म्हेत्रे, नागेश रकटे ,सुग्रीव सूर्यवंशी ,संदीप वजीर, लक्ष्मण होळकर ,शिवदास गुंजिटे, विजयकुमार सोनटक्के, अंकुश म्हेत्रे, एस बनसोडे,सुरेश बिराजदार या सह हजारो धनगर बांधव उपस्थित होते.

निम्न तेरणा प्रकल्पातून पाण्याचा विसर्ग सुरू

तेरणा नदी काठच्या गावातील नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन

तभा वृत्तसेवा,
लातूर, दि. २४ सप्टेंबर-

माकणी येथील निम्न तेरणा प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात झालेल्या पावसामुळे प्रकल्पात येणारा येवा लक्षात घेऊन पाणी पातळी नियंत्रित करण्याचे दृष्टीने २४ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५.३० वाजता निम्न तेरणा प्रकल्पाचे ४ वक्रद्वारे १० सेंटीमीटरने उघडण्यात आले आहेत. यामधून निम्न तेरणा नदीपात्रात १५२६ क्यूसेक्स (४३.२२६ क्युमेक्स) इतका विसर्ग सोडण्यात येत आहे.

धरणामध्ये येणारी पाण्याची आवक पाहून विसर्ग वाढवणे किंवा कमी करण्याबाबत निर्णय घेण्यात येणार असल्यामुळे प्रकल्पाखालील तेरणा नदी काठावरील नागरीकांनी खबरदारी घ्यावी, असे आवाहन निम्न तेरणा प्रकल्प पूर नियंत्रण कक्षामार्फत करण्यात आले आहे.

शाळास्तरीय विज्ञान प्रदर्शन ५७ विद्यार्थ्यांचा सहभाग

तभा वृत्तसेवा,
शिरूर अनंतपाळ, दि. २४ सप्टेंबर-

तालुक्यातील लोक जागृती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय रापका येथे शाळास्तरीय एक दिवसीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या शाळास्तरीय विज्ञान प्रदर्शनात जवळपास ५७ प्रयोग विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले.

कार्यक्रमाचे उद्घाटन पंचायत समितीचे प्रभारी गटशिक्षण अधिकारी अनिल पागे यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी लोक जागृती शिक्षण प्रसारक मंडळाचे कोषाध्यक्ष तथा शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रा. एस. एन. पाटील हे होते. यावेळी लोकजागृती शिक्षण प्रसारक मंडळाच्या सदस्या श्रीमती नीलीमा शिंदे या विज्ञान प्रदर्शनाच्या उदघाटन प्रसंगी उपस्थीत होते.

परीक्षक म्हणून प्रेमनाथ विद्यालय थेरगाव शाळेचे मुख्याध्यापक व्ही. डी. तांदळे, विषयतज्ञ सुनील गायकवाड उपस्थित होते. या विज्ञान प्रदर्शनात प्राथमिक गटातून मानसी भंडे हिने हर्बल हॉन्ड वॉश तयार करून प्रथम आली तर माध्यमिक गटातून मुळके संस्कार यांने बॉयोगॅस तयार करून दाखवला तो प्रथम आला तर उच्च माध्यमीक गटातून शिंदे सिद्धी हिने न्युटन क्रायडल हा प्रयोग तयार करून दाखविले. यशस्वी विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक बालाजी शेलार गटविकास अधिकारी अनिल पागे, प्रा. एस. एन.पाटील, संचलिका नीलिमा चिंचोलकर यांच्या हस्ते प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व ट्रॉफी देऊन सत्कार करून शुभेच्छा दिल्या. या विज्ञान प्रदर्शनात सहभागी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन माध्यमीकच्या कविता पाटील व सूर्यवंशी आर एम , पवन गायकवाड यांनी मार्गदर्शन केले.

या विज्ञान प्रदर्शानामुळे विधार्थामधून भविष्यातील शास्त्रज्ञ निर्माण होऊ शकतात. विधार्थाच्या कला गुणाचा विकास व्हावा यासाठी हे शाळा स्तरीय विज्ञान प्रदर्शनाच्या आयोजनाचा उदेश असल्याचे शाळेचे मुख्याध्यापक बालाजी शेलार यांनी सांगीतले .

घाडगेंच्या उपोषणाच्या समर्थनात ट्रॅक्टर रॅली

राज्यभरातील शेतकऱ्यांकडून उपोषणास वाढता पाठिंबा

गावोगावी जागरण गोंधळाचे सरपंच संघटनेचे आयोजन

तभा वृत्तसेवा ,
औसा दि. २४ सप्टेंबर -

सोयाबीनला प्रति क्विंटल ८५००/- भाव द्यावा.
सरसकट कर्जमाफी करण्यात यावी
उपोषण

सोयाबीनला ८५०० रुपये दर मिळावा व शेतकऱ्यांची सरसगट कर्जमाफी करावी. या मागणीसाठी सात दिवसांपासून शेतकरी नेते तथा छावा संघटनेचे विजयकुमार घाडगे पाटील तहसिल कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसले आहेत. या उपोषणाच्या समर्थनात जिल्हा व राज्यातून मोठा प्रतिसाद वाढला असून नांदेड, धाराशिव, जालना ,बीड या ठिकाणी आंदोलन करीत निवेदने देण्यात आले आहेत.तर तालुक्यातील शेतकऱ्यांनी औसा येथे सोमवार दि. २३ रोजी किल्ले मैदान ते तहसिल कार्यालय भव्य ट्रॅक्टर रॅली काढून उपोषण स्थळी जाऊन पाठींबा देत तहसीलदार यांना निवेदन दिले आहे.

उपोषण आंदोलनाच्या समर्थनात तालुक्यातील शेतर्क्यांनी आपले स्वतःचे ट्रॅक्टर घेऊन औसा येथील किल्ला मैदानवर आले. किल्ला मैदान, गांधीं चौक, हनुमान मंदिर ते तहसील कार्यालय पर्यंत ही रॅली काढण्यात आली. रॅली नंतर विजयकुमार घाडगे यांना पाठींबा देऊन उपोषणा स्थळी तहसीलदार यांच्या मार्फत मुख्यमंत्री यांना निवेदन देण्यात आले. माजी दिनकर माने यांनी उपोषणास शिवसेना उद्धव ठाकरे गटाचा पाठींबा जाहीर केला असून शेतकऱ्यांसाठी ज्या मागण्या केल्या आहेत. त्यासाठी सरकारने तातडीने निर्णय घ्यावा. अन्यथा औसा मतदार संघात गावोगावी जनता रस्त्यावर उतरून विरोध करील असा इशारा दिला आहे. यावेळी शिवसेना महिला संघटिका जयश्री उटगे, संतोष सूर्यवंशी, सुरेश भुरे उपस्थित होते.

सरकारबरोबर संवाद साधणार : आ. अभिमन्यू पवार

उपोषणकर्ते विजयकुमार घाडगे पाटील यांनी केलेल्या दोन्ही मागण्या रास्त आहेत. या मागण्या घेऊन राज्याचे मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री यांची भेट घेऊन तात्काळ निर्णय घेण्याची विनंती करणार असल्याचे आ. अभिमन्यू पवार यांनी सांगितले.

गावोगावी होणार जागरण गोंधळ

ग्रामीण भागातील शेतकरी सोयाबीनच्या पडलेल्या दरामुळे चिंतेत आहेत .सुरु असलेले आंदोलन आता विजयकुमार घाडगे यांचे राहिले नाही. तर याची मोठी जबाबदारी आम्ही पक्ष विचार, राजकारण सोडून शेतकऱ्यांचा मागे उभे राहत करणार आहोत . सरपंच म्हणून आम्ही आमच्या गावात सरकारचे लक्ष वेधण्यासाठी जागरण गोंधळ करणार आहोत. जो पर्यंत सरकार योग्य निर्णय घेत उपोषण सोडवत नाही .तो पर्यंत आम्ही आंदोलन सुरु ठेवणार असल्याचे सरपंच संघटनेचे अध्यक्ष विष्णू कोळी, बालाजी शिंदे, विठ्ठल बेडजवळगे, अड श्रीधर जाधव यांच्या सह सर्वच गावचे सरपंच उपोषणास पाठींबा देत निर्णय जाहीर केला आहे.

स्वस्त औषध निर्मितीमध्ये भारत अव्वल स्थानावर

उच्च दर्जाची औषधे उत्पादन करण्यात भारताचा जगात तिसरा क्रमांक लागतो. जगाला लागणारी ८० टक्के औषधे देशात तयार होतात. अमिरिकेच्या अन्न व औषध प्रशासन मान्यता प्राप्त कंपन्या अमेरिकेनंतर सर्वात जास्त भारतात आहेत. स्वस्त औषध निर्मितीमध्ये भारत अव्वल स्थानावर आहे. त्यामुळे जगाची फार्मसी म्हणून भारताची ओळख निर्माण झाली आहे. २५ सप्टेंबर रोजी होत असलेल्या जागतिक फार्मासिस्ट दिनानिमित्त विशेष आढावा.

जागतिक फार्मासिस्ट

दिनविशेष

आपले आरोग्य निरोगी ठेवण्यात आणि विविध रोगांवर उपचार करण्यात डॉक्टरांसोबतच फार्मासिस्ट यांची मोठी भूमिका आहे. जागतिक आरोग्यामध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिल्याबद्दल फार्मासिस्ट आणि फार्मसी व्यावसायिकांचा सन्मान आणि कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी दरवर्षी २५ सप्टेंबर रोजी जागतिक फार्मासिस्ट दिन साजरा केला जातो. जगभरातील फार्मासिस्ट यांना समर्पित हा दिवस साजरा करून आम्ही त्या सर्व फार्मासिस्टना संदेश देतो की ते आमच्यासाठी किती महत्त्वाचे आहेत.

फार्मासिस्ट ही अशी व्यक्ती आहे ज्याला औषधांबद्दल पूर्ण माहिती आहे. औषधनिर्मिती, संशोधन, शिक्षण, मार्केटिंग, क्लिनिकल रिसर्च, रिटेल फार्मसी या सर्वच क्षेत्रात फार्मासिस्टची भूमिका महत्वाची आहे. दरवर्षी हा दिवस इंटरनॅशनल फार्मास्युटिकल फेडरेशनने ठरवलेल्या एका विशेष थीमवर आधारित असतो. या वर्षी आंतरराष्ट्रीय फार्मासिस्ट दिवस २०२४ ची थीम आहे फार्मासिस्ट: मीटिंग ग्लोबल हेल्थ नीड्स जी अत्यावश्यक आरोग्य सेवा पुरवण्या पासून ते संशोधनाला गती देणे आणि सुरक्षित औषधांचा वापर सुनिश्चित करणे यापर्यंत फार्मासिस्ट करत असलेल्या महत्त्वपूर्ण योगदानावर भर देते, तसेच जगभरातील आरोग्यसेवा प्रणाली सुधारण्यासाठी आणि स्थानिक व जागतिक आरोग्य आव्हानांना तोंड देण्यासाठी व्यवसायाच्या चालू असलेल्या वचनबद्धतेवर प्रकाश टाकते. भारतात औषधांची समृद्ध बाजारपेठ आहे सामान्य जनतेला फक्त औषध आणि औषध विक्री करणारा फार्मासिस्ट दिसतो. पण बाजारात येण्यापूर्वी औषधाला मोठ्या अग्नी दिव्याला सामोरे जावे लागते. औषधांच्या उत्पादनापासून ते औषध विक्रीपर्यंतची अत्यंत क्लिष्ट प्रक्रिया फार्मासिस्ट पार पाडत असतो. त्यामध्ये औषधांचे संशोधन, उत्पादन, त्या औषधांच्या चाचण्या, आवश्यक त्या परवानग्या करण्यामागे सुद्धा फार्मासिस्ट असतो.

फार्मासिस्ट दिनाचा इतिहास

जगामध्ये २००९ पासून दरवर्षी जागतिक फार्मासिस्ट दिन म्हणून साजरा केला जातो. इस्तंबूल (तुर्की) येथे आंतरराष्ट्रीय फार्मास्युटिकल फेडरेशन द्वारे सुरुवात झाली. आणि यासाठी २५ सप्टेंबर तारीख निवडण्यात आली. कारण हा दिवस १९१२ मध्ये स्थापन झालेल्या आंतरराष्ट्रीय फार्मास्युटिकल फेडरेशनची स्थापना दिवस होता. आधुनिक औषधे अत्यंत प्रभावी, कमी मात्रेतही गुणकारी, त्वरित परिणाम करणारी पण घातक दुष्परिणाम देणारी असतात. योग्यपणे वापरली तर अमृत, अन्यथा विषारी. आधुनिक तंत्रज्ञानामुळे औषधांचे प्रकारही (डोसेज फॉर्मस्) नवनवीन विकसित होत गेले. डॉक्टर रोगनिदान व उपचारांत तज्ज्ञ, तर फार्मासिस्ट हा औषधतज्ज्ञ, त्यामुळे फार्मासिस्टची रुग्णाभिमुख भूमिका विकसित व विस्तारीत होत गेली. जागतिक आरोग्य संघटनेनेही या भूमिकेवर शिक्कामोर्तब केले. फार्मासिस्ट हा डॉक्टरांना पूरक व आरोग्य सेवेतील महत्वाचा घटक झाला. विशेष प्रशिक्षित फार्मासिस्ट तर औषधे लिहून देण्याचे किंवा कन्सल्ट फार्मासिस्टचे काम करत आहेत. अशी वृध्दांसाठी विशेष सेवा चालू आहेत. एकंदर फार्मासिस्ट हा पेंशट व डॉक्टर यांच्यातील दुवा आहे.

- प्रा. डॉ. सुरज मालपाणी,
शिवलिंगेश्वर फार्मसी महाविद्यालय, आलमलाता
औसा, जि. लातूर.